मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

( ठाणे जिल्हा वाचनालय ) वाचनालय / संदर्भ / नौपाडा

इतिहास १६१ स. १८९२

ले. वाबनी प्रभाकर मोडक.

# कोल्हापूर राज्याचा इतिहास

भाग २

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# कोल्हापूर राज्याचा इतिहास.

## भाग २रा.

हा ग्रंथ

बाळाजी प्रभाकर मोडक,

कोल्हापूर राजाराम कालेजांतील

पदार्थविज्ञानशास्त्राचे गुरु

यांनीं

तयार केला.

---

जानेवारी सन १८९३ इसवी.

---

हिंदुस्थान सरकारच्या १८६७ च्या २५ आक्टाप्रमाणें नोंदला आहे.

---

सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें ठेविले आहेत.

---

किंमत एक रुपया आठ आणे.

पुणें,
चित्रशाळा छापखान्यांत छापिलें.

# प्रस्तावना.

कोल्हापूर राज्याच्या इतिहासाचा हा दुसरा भाग हल्लीं प्रसिद्ध केला आहे. यांत सन १८१३ सालापासून सन १८८२ सालापर्यंत सत्तर वर्षांची हकीगत आली आहे. प्रथमतः आबासाहेब व बुवासाहेब महाराज यांच्या राज्यांचीं वर्णनें करून पुढें बाबासाहेब महाराज्यांच्या अल्प वयांत प्रथम जी त्यांची काकी व मातुश्री या उभय राणीसाहेबांस रीजंट आणि दिनकरराव गायकवाड, रावजी वांकनीस, जिवराव जाधव हवलदार, आणि मोरोपंत हुजूरबाजार हे मंत्री किंवा कारभारी नेमून जी रीजन्सी स्थापन झाली, तिच्या कारकीर्दीचें वर्णन केलें आहे. यांच्या हातून कारभार निभावेना म्हणून दाजी पंडित यांस मुख्य कारभारी नेमिलें, व त्यांच्या कारकीर्दीच्या आरंभींच सन १८४५ सालीं बंड झालें. व त्या नंतर या राज्यावर पोलिटिकल सुपरिंटेंडंट यांची नेमणूक होऊन त्यांजकडून बाबासाहेबांस मुखत्यारी मिळेपर्यंत कारभार चालला, त्या कारकीर्दीचें वर्णन केलें आहे. पुढें बाबासाहेबांच्या कारकीर्दीचें वर्णन केलें आहे. यांचे दत्तक पुत्र राजाराम महाराज व त्यांचे दत्तक पुत्र शिवाजी महाराज हे दोघेही अल्पवयांच मरण पावले, व त्यांच्या अल्पवयांत पोलिटिकल एजंट यांणींच राज्यकारभार केला. म्हणून यांचीं जातीचीं चरित्रें देऊन एजंटीकारकीर्दीचें तिची समाप्ती होऊन रीजन्सी स्थापन होईपर्यंत वर्णन केलें आहे. व येथेंच हा भाग समाप्त केला आहे.

हा काळ फार महत्वाचा होता. पेशवाई बुडून कंपनी सरकारचा अम्मल सर्व महाराष्ट्रांत एकसहा बसला; व जी राज्यक्रांति झाली, त्या वेळेसच या काळास आरंभ झाला, व या काळांत कोल्हापूरच्या राज्यावर बरींच गंडांतरेंही आलीं. आबासाहेब महाराजांनीं पेशव्यांची बाजू न धरितां इंग्रज सरकारची दोस्ती संपादन करून राज्यकारभार चांगल्या रीतीनें चालविला. याबद्दल कंपनी सरकारानें खुष होऊन कोल्हापूरकरांचे जे चिकोडी व मनोळी तालुके पेशव्यांनीं काढून घेतले होते, ते कोल्हापूरकरांस परत दिले. परंतु एका मोहित्यानें त्यांचा वध केला, व त्यांचे कनिष्ट बंधु बुवासाहेब महाराज गादीवर बसले. यांनीं खर्च फार वाढविला, व फौज फार ठेविली. पदरच्या सरंजामदारांस हे उपद्रव देऊं लागले, आणि आसपासच्या कंपनी सरकारच्या मुलखासही उप-

सर्ग करूं लागले. यामुळें यांवर कंपनी सरकारची इतराजी झाली व प्रथम चिकोडी व मनोळी हे तालुके काढून घेतले, व कित्येक सरंजामदारांस आपल्या बाहेदारीखालीं घेतलें. नंतर यांनीं अमुक फौज ठेवावी, कोल्हापुरास कंपनी सरकारची छावणी पाहिजे तेव्हां ठेवूं द्यावी, व मर्जीस येईल तेव्हां कंपनी सरकारानें आपल्या तर्फेचा कारभारी नेमावा, अशा शर्तींचा तह करून यांचा अधिकार आकुंचित केला. यांच्या पश्चात् यांचे दोघे चिरंजीव लहान असल्यामुळें व त्यावेळीं इंग्रज सरकारचें वर्तन उदारबुद्धीचें असल्यामुळें अल्पवयी महाराजांची मातुश्री व काकी यांस रीजंट नेमिलें, व त्यांचे तर्फेचे कारभारी नेमून त्यांजकडे सर्व अधिकार सोंपविला. यांजकडून कारभार चांगला चालेना. तेव्हां आपल्या तर्फे इंग्रजांनीं कारभारी नेमिला. त्याच्या सुधारणा गडकऱ्यांस न आवडून गडकऱ्यांनीं बंड केलें, व तें बंड मोडण्यास इंग्रज सरकारास फौज आणावी लागली. व सुमारें वर्ष सहा महिने बंड मोडण्यास खटपट करावी लागली, व सुमारें १५ लाख रुपये खर्च झाला. असें हें मोठें गंडांतर या राज्यावर आलें. हें बंड मोडल्यावर राज्यच खालसा करावें असा हिंदुस्थान सरकारचा बेत दिसला. परंतु त्या वेळच्या इंग्रज अंमलदारांच्या चांगुलपणामुळें हें अरिष्ट टळलें. तरी पोलिटिकल सुपरिंटेंडेंटाची नेमणूक होऊन त्याच्या नांवें कारभार चालावा, व महाराजांस नेमणूक देऊन त्यांचा दरजा व मानमरातब चालवावा, एवढेंच उरलें. या नवीन व्यवस्थेप्रमाणें कारभार चालला असतां सन १८५७ सालीं कोल्हापूर येथें असलेल्या इंग्रज सरकारच्या २७ व्या पलटणींतील लोकांनीं बंड केलें व त्यांस कांहीं इकडीलही लोक मिळाले, व हें दुसरें मोठें गंडांतर आलें. हें बंड मोडून महाराजांचे धाकटे बंधु चिमासाहेब यांजविषयीं वहीम आल्यावरून त्यांस कराचीस नेऊन तर ठेविलें. परंतु या वेळीं बाबासाहेब महाराजांचें वर्तन अगदीं निर्दोष असल्यामुळें व त्या वेळचे कारभारी जनोबा आबा कीर्तने यांनीं चांगला बंदोबस्त ठेविल्यामुळें अरिष्ट टळलें. परंतु यामुळें बाबासाहेबांस राज्याधिकार मिळण्याचें आणखीं लांबलें. असो. या प्रमाणें अरिष्टें टळून अखेर बाबासाहेबांस त्यांचे वयाचे ३३ वे वर्षीं राज्यकारभार मिळाला. परंतु ते दोन तीन वर्षांतच मृत्यु पावले, आणि त्यांचे दत्तक पुत्र राजाराम महाराज यांच्या अल्पवयांत एजंटी कारकीर्द सुरू झाली. सुपरिंटेंडेंटी का-

रकीर्दीत राज्यांत स्वस्थता करण्यांत व कारभाराची शिस्त बसविण्यांत आली. आणि बंडामुळें झालेलें व इतर कर्ज बरेंच फेडण्यांत आलें. बाबासाहेबांनीं राहिलेलें कर्ज फेडून शिल्लक टाकिली, व कारभाराची चालू शिस्त कायम ठेविली. एजंटी कारकीर्दीत कोल्हापूरच्या भरभराटीस आरंभ झाला व या काळांत जिकडे तिकडे सुधारणा झाल्या. तरी या काळांत कोल्हापुरावर अरिष्टें आलीं नाहींत, असें झालें नाहीं. राजाराम महाराज विलायतच्या प्रवासास गेले, तिकडेच राज्याधिकार स्वाधीन होण्याचे वेळींच मरण पावले. त्यांचे दत्तक पुत्र येथेंच भ्रमिष्ट झाले. यांची भ्रमिष्ट स्थिति कायम होतांच सरळ रीतीनें स्वराज्यसुखाचा जो लाभ कोल्हापूरच्या लोकांस मिळेना तो मिळावा या हेतूनें इंग्रजसरकारानें रीजन्सीची स्थापना करून त्यांचे हवालीं सर्व कारभार केला.

या प्रमाणें कोल्हापूर राज्याच्या इतिहासाचा हा उत्तरार्ध प्रसिद्ध केला आहे. यांतील माहिती जुने कागदपत्र व अलीकडचे रिपोर्ट यांतूनच मुख्यत्वें घेतली आहे. ही माहिती मिळावी तितकी अद्याप मिळाली नाहीं. व याहून जास्त माहिती जमविण्यास मला वेळही मिळाला नाहीं. यामुळें यास वास्तविकपणें इतिहास हें नांव शोभेल असें मला वाटत नाहीं. इतिहास म्हणजे विवक्षित काळाचें हुबेहुब चित्र होय. तसें हें चित्र साधलें नाहीं, हें मी समजून आहें तसें चित्र चांगलें वठण्यास सरकारनें सर्व कागदपत्र स्वाधीन करून एखाद्या विद्वानाची कांहीं काळ या कामाकरितां योजना केली पाहिजे. किंवा असें आपण होऊन करणारास तरी लोकाश्रय व राजाश्रय मिळाला पाहिजे. परंतु प्रस्तुत काळीं आमच्या लोकांस इतिहासाची योग्यता समजत नसल्यानें या दोहोंचा अभाव आहे. कोणी नादानें एकादें उपयुक्त पुस्तक तयार करून प्रसिद्ध केलें तर छापण्याचा खर्च भागण्यापुरतें सुद्धां उत्पन्न होण्याची मारामार पडते. केवळ परभाषेंतून मात्र उच्च शिक्षण देण्याच्या पद्धतीचा हा सर्व परिणाम आहे. परभाषेप्रमाणेंच स्वभाषेंतून उच्च शिक्षण देण्याची पद्धत सुरू झाल्यास विद्वानांची संख्या वाढेल व जास्त लोकांस निरनिराळ्या विषयांची योग्यता समजून त्यांस वाचनाची अभिरुचि लागेल. असो. मी जमविलेली माहिती सर्व प्रकारें समाधानकारक पुरी नाहीं म्हणून ती प्रसिद्ध करण्यास माघार घेतली होती. तथापि आज कित्येक वर्षें थोडथोडी माहिती जमवीत गेल्यानें जी बरीच पु-

जी जमली होती ती सर्वांपुढें ठेवावी म्हणजे याहून जास्त विस्तृत इतिहास लिहिण्याच्या प्रयत्न करणारास कोणत्या दिशेनें माहिती मिळवावी, हें समजावें. आणि यांत दिलेल्या त्रोटक हकीकतीचें तरी ज्ञान करून घेण्यास लोकांस साधन व्हावें, या हेतूनें पहिल्या भागाप्रमाणें हा दुसरा भाग प्रसिद्ध केला आहे. रीजंटी कारकीर्दीचें वर्णन आणि विशाळगडकर, बावडेकर, इचलकरंजीकर, कागलकर, कापशीकर वगैरे पोटसंस्थानिकांचा इतिहास एका वेगळ्या भागांत प्रसिद्ध करण्याचा विचार आहे. परंतु ही अल्प सेवा पसंत पडून या यत्नास ज्या मानानें जसा लोकाश्रय व राजाश्रय मिळेल त्यावर तो विचार अवलंबून राहील.

राजाराम कालेज कोल्हापूर,<br>तारीख ५ फेब्रुवारी १८९३ इ० } वा० म० मोडक.

# अनुक्रमणिका.

## कोल्हापूर राज्याचा इतिहास.

### आबासाहेब महाराजांचे कारकीर्दीपासून एजंटीचे अखेरीपर्यंत.


| | पृष्ठें. |
|---|---|
| दुसरे संभाजी ऊर्फ आबासाहेब महाराज... ... .... | १ — ८ |
| शाहाजी ऊर्फ बुवासाहेब महाराज ... ... ... ... | ९ — ६९ |
| शिवाजी ऊर्फ बाबासाहेब महाराज ... ... ... | ७० — १४८ |
| राजाराम महाराज ... ... ... ... ... ... ... ... | १४९ — १७५ |
| शिवाजी महाराज .. ... ... ... ... ... ... .. | १७६ — १८४ |
| एजंटी कारकीर्द.... ... ... ... ... ... .. | १८४ — २३२ |

सर्ग करूं लागले. यामुळें यांवर कंपनी सरकारची इतराजी झाली व प्रथम चिकोडी व मनोळी हे तालुके काढून घेतले, व कित्येक सरंजामदारांस आपल्या वाहेदारीखाली घेतलें. नंतर यांनीं अमुक फौज ठेवावी, कोल्हापुरास कंपनी सरकारची छावणी पाहिजे तेव्हां ठेवूं द्यावी, व मर्जीस येईल तेव्हां कंपनी सरकारानें आपल्या तर्फेचा कारभारी नेमावा, अशा शर्तींचा तह करून यांचा अधिकार आकुंचित केला. यांच्या पश्चात् यांचे दोघे चिरंजीव लहान असल्यामुळें व त्यावेळीं इंग्रज सरकारचें वर्तन उदारबुद्धीचें असल्यामुळें अल्पवयी महाराजांची मातुश्री व काकी यांस रीजंट नेमिलें, व त्यांचे तर्फेचे कारभारी नेमून त्यांजकडे सर्व अधिकार सोंपविला. यांजकडून कारभार चांगला चालेना. तेव्हां आपल्या तर्फे इंग्रजांनीं कारभारी नेमिला. त्याच्या सुधारणा गडकऱ्यांस न आवडून गडकऱ्यांनीं बंड केलें, व तें बंड मोडण्यास इंग्रज सरकारास फौज आणावी लागली. व सुमारें वर्ष सहा महिने बंड मोडण्यास खटपट करावी लागली, व सुमारें १५ लाख रुपये खर्च झाला. असें हें मोठें गंडांतर या राज्यावर आलें. हें बंड मोडल्यावर राज्यच खालसा करावें असा हिंदुस्थान सरकारचा बेत दिसला. परंतु त्या वेळच्या इंग्रज अंमलदारांच्या चांगुलपणामुळें हें अरिष्ट टळलें. तरी पोलिटिकल सुपरिंटेंडेंटाची नेमणूक होऊन त्याच्या नांवें कारभार चालावा, व महाराजांस नेमणूक देऊन त्यांचा दरजा व मानमरातब चालवावा, एवढेंच ठरलें. या नवीन व्यवस्थेप्रमाणें कारभार चालला असतां सन १८५७ साली कोल्हापूर येथें असलेल्या इंग्रज सरकारच्या २७ व्या पलटणींतील लोकांनीं बंड केलें व त्यांस कांहीं इकडीलही लोक मिळाले, व हें दुसरें मोठें गंडांतर आलें. हें बंड मोडून महाराजांचे धाकटे बंधु चिमासाहेब यांजविषयीं वहीम आल्यावरून त्यांस कराचीस नेऊन तर ठेविलें. परंतु या वेळीं बाबासाहेब महाराजांचें वर्तन अगदीं निर्दोष असल्यामुळें व त्या वेळचे कारभारी जनोबा आबा कीर्तने यांनीं चांगला बंदोबस्त ठेविल्यामुळें अरिष्ट टळलें. परंतु यामुळें बाबासाहेबांस राज्याधिकार मिळण्याचें आणखीं लांबलें. असो. या प्रमाणें अरिष्टें टळून अखेर बाबासाहेबांस त्यांचे वयाचे ३३ वे वर्षी राज्यकारभार मिळाला. परंतु ते दोन तीन वर्षांतच मृत्यु पावले, आणि त्यांचे दत्तक पुत्र राजाराम महाराज यांच्या अल्पवयांत एजंटी कारकीर्द सुरू झाली. सुपरिंटेंडेंटी का-

रकीर्दीत राज्यांत स्वस्थता करण्यांत व कारभाराची शिस्त बसविण्यांत आली. आणि बंडामुळें झालेलें व इतर कर्ज बरेंच फेडण्यांत आलें. बाबासाहेबांनीं राहिलेलें कर्ज फेडून शिल्लक टाकिली, व कारभाराची चालू शिस्त कायम ठेविली. एजंटी कारकीर्दीत कोल्हापूरच्या भरभराटीस आरंभ झाला व या काळांत जिकडे तिकडे सुधारणा झाल्या. तरी या काळांत कोल्हापुरावर अरिष्टें आलीं नाहींत, असें झालें नाहीं. राजाराम महाराज विलायतच्या प्रवासास गेले, तिकडेच राज्याधिकार स्वाधीन होण्याचे वेळींच मरण पावले. त्यांचे दत्तक पुत्र येथेंच भ्रमिष्ट झाले. यांची भ्रमिष्ट स्थिति कायम होतांच सरळ रीतीनें स्वराज्यसुखाचा जो लाभ कोल्हापूरच्या लोकांस मिळेना तो मिळावा या हेतूनें इंग्रजसरकारानें रीजन्सीची स्थापना करून त्यांचे हवालीं सर्व कारभार केला.

या प्रमाणें कोल्हापूर राज्याच्या इतिहासाचा हा उत्तरार्ध प्रसिद्ध केला आहे. यांतील माहिती जुने कागदपत्र व आलीकडचे रिपोर्ट यांतूनच मुख्यत्वें घेतली आहे. ही माहिती मिळावी तितकी अद्याप मिळाली नाहीं. व याहून जास्त माहिती जमविण्यास मला वेळही मिळाला नाहीं. यामुळें यास वास्तविकपणें इतिहास हें नांव शोभेल असें मला वाटत नाहीं. इतिहास म्हणजे विवक्षित काळाचें हुबेहुब चित्र होय. तसें हें चित्र साधलें नाहीं, हें मी समजून आहें. तसें चित्र चांगलें वठण्यास सरकारानें सर्व कागदपत्र स्वाधीन करून एखाद्या विद्वानाची कांहीं काळ या कामाकरितां योजना केली पाहिजे. किंवा असें आपण होऊन करणारास तरी लोकाश्रय व राजाश्रय मिळाला पाहिजे. परंतु प्रस्तुत काळीं आमच्या लोकांस इतिहासाची योग्यता समजत नसल्यानें या दोहोंचा अभाव आहे. कोणी नादानें एखादें उपयुक्त पुस्तक तयार करून प्रसिद्ध केलें तर छापण्याचा खर्च भागण्यापुरतें सुद्धां उत्पन्न होण्याची मारामार पडते. केवळ परभाषेंतून मात्र उच्च शिक्षण देण्याच्या पद्धतीचा हा सर्व परिणाम आहे. परभाषेप्रमाणेंच स्वभाषेंतून उच्च शिक्षण देण्याची पद्धत सुरू झाल्यास विद्वानांची संख्या वाढेल व जास्त लोकांस निरनिराळ्या विषयांची योग्यता समजून त्यांस वाचनाची अभिरुचि लागेल. असो. मी जमविलेली माहिती सर्व प्रकारें समाधानकारक पुरी नाहीं म्हणून ती प्रसिद्ध करण्यास माघार घेतली होती. तथापि आज कित्येक वर्षे थोडथोडी माहिती जमवीत गेल्यानें जी बरीच पु-

जी जमली होती ती सर्वांपुढें ठेवावी म्हणजे याहून जास्त विस्तृत इतिहास लिहिण्याच्या प्रयत्न करणारास कोणत्या दिशेनें माहिती मिळवावी, हें समजावें. आणि यांत दिलेल्या त्रोटक हकीकतीचें तरी ज्ञान करून घेण्यास लोकांस साधन व्हावें, या हेतूनें पहिल्या भागाप्रमाणें हा दुसरा भाग प्रसिद्ध केला आहे. रीजंटी कारकीर्दीचें वर्णन आणि विशाळगडकर, बावडेकर, इचलकरंजीकर, कागलकर, कापशीकर वगैरे पोटसंस्थानिकांचा इतिहास एका वेगळ्या भागांत प्रसिद्ध करण्याचा विचार आहे. परंतु ही अल्प सेवा पसंत पडून या यत्नास ज्या मानानें जसा लोकाश्रय व राजाश्रय मिळेल त्यावर तो विचार अवलंबून राहील.

राजाराम कालेज कोल्हापूर,<br>तारीख ५ फेब्रुआरी १८९३ इ०

बा० म० मोडक.

# अनुक्रमणिका.

## कोल्हापूर राज्याचा इतिहास.

### आबासाहेब महाराजांचे कारकीर्दीपासून एजंटीचे अखेरीपर्यंत.


| | पृष्ठें. |
|---|---|
| दुसरे संभाजी ऊर्फ आबासाहेब महाराज.... .. .... | १ — ८ |
| शाहाजी ऊर्फ बुवासाहेब महाराज... ... ... ... | ९ — ६९ |
| शिवाजी ऊर्फ बाबासाहेब महाराज. ... ... ... | ७० — १४८ |
| राजाराम महाराज ... ... ... ... ... ... ... ... ... | १४९ — १७५ |
| शिवाजी महाराज ... ... ... ... ... ... ... ... | १७६ — १८४ |
| एजंटी कारकीर्द.... ... ... ... ... ... ... ... | १८४ — २३२ |

# कोल्हापूर राज्याचा इतिहास.

## उत्तरार्ध.

## दुसरे संभाजी महाराज ऊर्फ आबासाहेब महाराज.

सन १८१३ - १८२१.

*आबासाहेबांचा स्वभाव.*

शिवाजीचे वडील पुत्र संभाजी ऊर्फ आबासाहेब महाराज राज्य करूं लागले, त्यावेळीं यांचें वय सारें १३ वर्षांचें होतें. यांस लढाया व दंगे, बखेडे मनापासून आवडत नसत. आपल्या पदरच्या सरदारांमधील बखेडे मोडून त्यांची पुंडाई कमी करण्यास व राज्यांत शांतता करण्यास यांनीं फार यत्न केला.

*राज्यांत नवीन सुधारणा.*

यांनीं आपल्या कारकीर्दीत इनसाफाचीं कोर्टें स्थापन केलीं; विद्यावृद्धीस उत्तेजन दिलें; राज्यांत रयतेवर जुलूम होत असे तो बंद केला; व राज्यकारभार चांगल्या रीतीनें चालवून नवीन लढाईचा प्रसंग येऊं दिला नाहीं. मोहिमेस कोठें स्वारी न गेल्यामुळें बऱ्याच वर्षांनीं या वेळीं सरकारी निशाण (जरीपटका) राजधानींतच फडकत राहिलें. चोंहोंकडे शांतता व बंदोबस्त असल्यामुळें वसूल सुरळीत येऊं लागला. व जामदारखान्यांत शिल्लकही पडूं लागली. नीच जातीच्या अपराध्यांनीं केलेला अपराध कबूल करावा याकरितां त्यांस मिरचांची धुरी देणें, टिपऱ्या लावणें, उरावर धोंडा देणें. इत्यादि गोष्टी साधारण होत्या. तसेंच दुष्ट ब्राम्हणास विषयुक्त अन्न देऊन त्यांचा वध करीत. इनसाफाच्या कामांत दिव्य करण्यास लावीत. म्हणजे आपला हक्क खरा आहे हें सिद्ध करण्यास लोकांस निखाऱ्यांवरून चालवीत. किंवा तापलेल्या तव्यावर उभें करीत. किंवा हातांत तापलेलें लालभडक लोखंड देत. जरी बाकी चाली सन १८४५ पर्यंत या इलाख्यांत बंद झाल्या नव्हत्या, तरी दि-

व्य करण्याची चाल आबासाहेबांनीं आपल्या कारकीर्दींत बंद केली. याचें शेवटलें उदाहरण विशाळगडावर सन १८०६ सालीं घडलें. तेथच्या एका पाटलास आपल्या वडिलोपार्जित वतनावरील हक्क स्थापित करण्यास नृसिंहदेवाच्या स्थंडिला सभोंवार लालभडक तोफेचा गोळा हातांत घेऊन सात वेळ प्रदक्षणा करण्यास लाविलें होतें असें सांगतात.

पेशवाई बुडाल्यावर दक्षिणेंतील सर्व बखेडे मोडून इंग्रजसरकारनें सन १८१८ सालीं आसपास बंदोबस्त केला होता. यामुळें आबासाहेबांस आपल्या मुलखीं व्यवस्था करण्यास फार सहाय्य झालें. कोल्हापूरकर, सावंतवाडीकर वगैरेस सक्त ताकीद देऊन चांचेपणा, लूट व इतर दंगे इंग्रजसरकारानें अगदीं मोडून टाकिले. आतां या गोष्टी इतक्या जुन्या झाल्या आहेत कीं, प्रत्यक्ष पाहिलेले लोक तर कोणी नाहींतच. परंतु ज्यांस या गोष्टी ऐकून माहीत आहेत, असेसुद्धां विरळा आढळतात. चांचे लोकांच्या ज्या स्वाऱ्या होत त्यांचें वर्णन कोठें आढळत नाहीं. त्या वेळीं ज्या भयंकर शस्त्रांचा उपयोग करीत तीं मात्र तांबेरा चढलेलीं शिलेखान्यांत दृष्टीस पडतात.

इंग्रजसरकारचें जें पेशव्यांशीं नुकतेंच युद्ध झालें त्यांत आबासाहेबांनीं इंग्रजांचा पक्ष स्वीकारला होता, व इंग्रजांशीं नवीन तह करण्याविषयीं यांनीं रुकार दिला. यावेळीं नवीन तहनामा झाला नाहीं. परंतु कंपनीसरकारतर्फे सर टामस मनरो यांनीं सनद देऊन जे चिकोडी व मनोळी तालुके पेशव्यांनीं कोल्हापूरकरांचे हिसकावून निपाणकरांस दिले होते, ते निपाणकरांकडून घेऊन कोल्हापूरकरांस दिले, व याच सनदेवरून कोल्हापूरकरांस कंपनीनें आपल्या बाहेदारी खालीं घेतलें. चिकोडी व मनोळी तालुक्यांचा या वेळीं ३,००,००० रुपये वसूल होता. याच वेळीं कंपनीसरकारानें भाऊ महाराजांस चार खेडीं इनाम दिलीं. तसेंच सावंतवाडीकरांशीं कुंडली नदीच्या दक्षिणेस असलेल्या कांहीं खेड्यांच्या हक्काविषयीं कोल्हापूरकरांचे तंटे चालले होते. त्यांची चौकशी करून चापलीनसाहेबांनीं ठराव केला.

चिकोडी व मनोळी तालुके कंपनीसरकार मोकळे करून देते.

राज्यांत स्वस्थता व शांतता राहण्यासाठीं महाराज आपल्या हा-

तून होईल तितका झटून यत्न करीन. परंतु महाराज ज्या तजविजी योजीत, त्या पदरच्या बडेलोकांस रुचत नसत. यावरून असें दिसतें कीं राज्यांत सुधारणा करण्याची योग्य वेळ आली नव्हती. शांततेपासून होणाऱ्या सुखांचा उपभोग प्रजेस नुकता मिळूं लागला होता, तोंच महाराजांचा अकस्मात् काळ होऊन राज्यांत पूर्वीची भालेराई यथेष्ट सुरू झाली.

सन १८११ सालीं कऱ्हाडकर **प्रतिनिधि** यांचा सर्व मुलूख **बाजीराव पेशवे** यांणीं घेतला तेव्हां प्रतिनिधीच्या पदरचा कोणी **सयाजी मोहिते** या नांवाचा सरदार कोल्हापुरास आला, व महाराजांचे पदरीं नोकरीस राहिला. तेव्हां महाराजांनीं त्याच्या तैनातीस भौगांव व **केरली** हे दोन गांव लावून दिले होते. पुढें महाराजांनीं आपल्या एका हुजऱ्यास केरली गांवांतील पांच बिघे जमिनीची सनद करून दिली. त्या हुजऱ्यास जमिनीचा कबजा न देतां मोहित्यानें महाराजांस असा अर्ज केला कीं, हुजऱ्यास दिलेली सनद तरी रद्द करावी किंवा आपली २०,००० रुपये बाकी सरकाराकडे निघते ती माझी मला द्यावी, म्हणजे मी निघालोंया प्रमाणें सतत चार महिने वरचेवर तो मोहिता अर्ज करीत होता. परंतु त्याच्या अर्जाला कोणताच जबाब महाराज किंवा त्यांचे कारभारी यांजकडून मिळेना. शेवटीं आपली दाद लागत नाहीं असें पाहून मोहिता आपल्याबरोबर हत्यारबंद सहा लोकांस घेऊन सन १८२१ च्या जुलई महिन्याच्या १६ व्या तारखेस आपल्या अर्जाचा निकाल मागण्याकरितां सरकारवाड्यांत गेला. महाराज एका लहान खोलींत बसले होते; तेथें त्या लोकांस पाहरेकऱ्यांनीं गोडिलें. खोलीजवळ हे लोक येतांच महाराज उठले तें, पाहून मोहित्यानें खोलीच्या दारांत उभें राहून वाट अडविली, व महाराजांचा पदर धरून आपल्या अर्जाचा जाब मागितला. ही त्याची दांडगाई व उद्धटपणा पाहून महाराजांस फार संताप आला, व मोहित्यास वाड्यांतून बाहेर हांकून लावण्यास आपल्या लोकांस महाराजांनीं हुकूम दिला. आणि खोलींतून बाहेर येण्यास महाराज झटपट करिताहेत तों मोहित्याच्या एका मनुष्यानें महाराजांवर आपला तमंच्या झाडिला. त्याचा वार महाराजांच्या कुशींत लागून ते जमिनीवर मृतप्राय पडले. हें पाहून सयाजी मोहिते आपला जंब्या उपसून महाराजां शेजारीं बसला, व आपल्या दुपेट्यानें रक्त वहात होतें, तें बंद करण्यास यत्न करूं लागला.

महाराजांस मोहिता मारिलो.

ही गोष्ट भरदीनमहरीं घडली. तरी या दंगेखोरांस म्हणण्यासारखा कोणी अडथळा केला नाहीं. यावरून असें दिसतें कीं, वाड्यांतील सर्व लोकांची पांचावर धारण बसून ते घाबरून गेले असावे, किंवा मोहित्यास आंतून दुसरे कांहीं लोक सामील असावे. नंतर महाराजांचे चार विश्वासू नोकर आबा भोंसले, भुजंगराव, चैनसिंगजमादार व बापूखासबारदार त्यांच्या आंगावर धांवून गेले; त्यांसही त्या दंगेखोरांनीं ठार केलें. तरी सायंकाळपर्यंत त्यांस वाड्यांतून हांकून देण्याची तजवीज झाली नाहीं. हें वर्तमान बुवासाहेब महाराजांस कळतांच ते खिडकींतून उडी टाकून गुरुमहाराजांचे घरीं गेले. शेवटीं हैबतराव गाईकवाड यांनीं त्या दुष्टलोकांस चार गोष्टी सांगून ताब्यावर आणिलें. आणि आपल्या जिवास इजा पोंचणार नाहीं, अशाबद्दल सर्जेराव घाटगे, गुरुमहाराज व सरलष्कर यांस जामीन घेऊन मोहिते आपल्या नोकरांसह स्वाधीन झाले, तेव्हां त्यांस तबेल्यांत कैदकरून ठेविलें. नंतर महाराजांस तेथून उचलून महालांत नेलें, व त्यांची जखम बांधिली. परंतु कंबर सोडीत असतां महाराजांनी लागलाच म्हणजे शके १७१३ आषाढवद्य २ इंदुवारीं प्राण सोडिला.

नंतर ज्यांस आपण जामीन झालों आहों, त्यांचें संरक्षण आपल्या हातून होणार नाहीं, असें मनांत आणून घाटगे, गुरुमहाराज व सरलष्कर यांणीं आपले उत्कृष्ट घोडे देऊन व रात्रौ शहराचे दरवाजे गुप्तपणें उघडवून मोहित्यास शहराबाहेर लावून दिलें. मोहिते पळून गेले अशी खबर राणीसाहेबांस कळतांच त्यांणीं जिजाजीराव खानविलकर व जमनमुलूख यांस लागलेंच त्यांचा पाठलाग करण्यास पाठविलें. त्यांणीं येळगूड गांवाजवळ फरारी झालेल्या लोकांस गांठून प्रथमतः सयाजी मोहित्यास गोळी घालून ठार केलें. नंतर त्यांच्या बरोबरच्या लोकांचीही तीच दशा केली, आणि त्यांचीं शिरें हुकुमाप्रमाणें कोल्हापुरास आणिलीं. केरळीहून मोहित्याच्या कुटुंबाचीं माणसें आणून त्यांपैकीं कित्येकांस हत्तीच्या पायांखालीं देऊन ठार मारिलें व बाकीच्यांस पन्हाळ्यावर कैदकरून ठेविलें. या प्रमाणें मोहिते व त्यांचे मिलाफी कांहीं चौकशी न होतां मेले यामुळें त्यांच्या मसलतीस दुसरे कोण सामील होते तें कळण्यास मा-

मोहिते व त्यांचे साथी यांचा शेवट.

र्ग राहिला नाहीं.

याचविषयीं दुसरी हकीकत अशी आढळते कीं; सन १८२१ सालीं तारीख १६ जुलई रोजीं संध्याकाळच्या प्रहर दिवसास आबासाहेबमहाराज अंबाबाईच्या चौकांतून मातोश्रीच्या खोलीकडे जात अस- तां त्यांस सयाजी मोहिते आणि त्याचे तिघे मुलगे बा- बजी, बापजी आणि बाजीराव, त्याचा नातू भाऊ मोहिते आणि पुतण्या माधवराव मोहिते हे भेटले. बाबजीनें महाराजांचें मणगट धरिलें व बाकीच्यांनीं आपल्या तरवारी म्यानांतून काढिल्या. त्या बरोबर महाराजांबरोबरचे हुजरे दूर झाले, बाबजीनें महाराजांस विचारिलें कीं, माझी बाकी कां देत नाहीं. आणि माझा मस्ति! हा गांव मंत्री यांस कां दिला. तेव्हां महाराजांनीं सांगितलें कीं; तुम्हांकडे अद्याप भोगांव आहे. आणि मस्ति (हेमती) हा गांव मूळचा मंत्र्याचा होता. परंतु त्याविषयीं मातोश्रीस विचारून काय ती तजवीज करूं. या प्रमाणें त्यांस उत्तर देऊन हात सोडवून पुढें जाणार होते, इतक्यांत भुजंगराव भोंसले पागेकडील कामगार तेथें आला. आणि त्यांस म्हणाला कीं; तुम्हीं महाराजांशीं फार बेअदबीनें वागलां. असें तो बोलतांच बाप्पाजीनें आपली कटार महाराजांच्या कुशींत खुपसली आणि भाऊ मोहित्यानें महाराजांवर डाव्या बाजूस तमंच्या झाडिला. त्यांतील सर्व छरे महाराजांच्या कुशींत शिरले. हें पहातांच सयाजी आपल्या नातवावर फार रागावला व म्हणाला कीं तूं या अविचारीव क्रूर कृत्यानें आमच्या कुटुंबाचा सर्वस्वी नाश केलास. सयाजी व त्याचा मुलगा बाबजी यांनीं महाराजांस उचलून बसविलें आणि एकानें त्यांची मान सांवरून धरिली व दुसऱ्यानें त्यांस कुशीवर धरिलें. अशी अवस्था झाली तेव्हां महाराजांचा हुजऱ्या आबाजी भोंसला सयाजीच्या पायां पडून महाराजांचा जीव घेऊं नका, अशी विनवणी करूं लागला. त्याचें डोकें पायांवर असतांच बाजी मोहित्यानें त्यास ठार केलें. बापजी आणि माधवराव यांनीं तरवारी घेऊन महाराजांचे बंधु बुवासाहेब यांस मारण्याकरितां त्यांच्या सावत्र आईच्या खोलीकडे निघाले. तेथें जयसिंग या नांवाचा शिपाई पाहाऱ्यावर होता. त्यानें आपली तरवार उपसून बाबजीच्या तोंडावर लहानसा वार केला. त्याबरोबर त्यानें आपली तरवार त्यावर चालवून त्यास ठार केलें. ही गडबड पाहतांच बुवासाहेब

या विषयीं दुसरी हकीकत.

सावध झाले आणि खोलीचें दार बंद करून खिडकींतून उडी टाकून भाऊमहाराजांच्या वाड्यांत पळून गेले. वाड्यांतील बखेडा समजतांच भाऊमहाराज वाड्यांत महाराजांकडे आले. महाराजांचा मेहुणा यशवंतराव घाटगे सर्जेरावही इतक्यांत तेथें येऊन महाराजांचा जीव वांचविण्याविषयीं मोहित्याची विनवणी करीत होता. तेव्हां सयाजीनें आपली २०,००० रुपये बाकी आणि आपणास व आपल्या आप्तांस अभय मागितलें. तेव्हां भाऊ महाराजांनीं बाकी देण्याचें वचन दिलें, व यांच्या जिवाकरितां आपल्या भावास हवालीं केलें. एवढ्यानें मी ऐकणार नाहीं असें मोहिता म्हणाला. तेव्हां आपला मुलगा ओलीस देतों असें भाऊमहाराजांनीं सांगितलें, परंतु तेवढ्यानेंही तो ऐकेना. शेवटीं आपल्या जिवास व मालमत्तेस धक्का लागूंनये आणि बाकीचा उलगडा व्हावा याबद्दल हिंदुराव गाईकवाड, यशवंतराव घाटगे, नानापाटणकर व खुद्द भाऊमहाराज यांनीं जामीन राहावें, असें ठरून त्यांस घेऊन ते भाऊमहाराजांच्या घरीं गेले. कोणी आपणास यत्किंचित् इजा केल्यास जामिनांचीं शिरें उडवितां यावीं म्हणून सरकार वाड्यांतून भाऊमहाराजांच्या वाड्यांत जातांना भाऊमहाराजांच्या मानेवर बाबजी व बापजी यांनीं आपल्या नागव्या तरवारी धरिल्या होत्या. तिकडे वाड्यांत महाराजांची जखम बांधिली व ते उठून बोलूं चालूं लागले. तेव्हां त्यांनीं आपला कमरबंद सैल करण्यास सांगितलें तो सैल करितांच रक्त खालीं उतरून महाराजांस फार इजा झाली व मूर्छा येऊन खालीं पडले व वाचा बंद झाली. पुढें आणखीं तीन तासांनीं म्हणजे सुमारें चार घटका रात्रीं महाराजांनीं प्राण सोडिला.

इकडे मोहिते भाऊमहाराजांच्या घरीं गेल्यावर त्यांस कोणी अशी सल्ला दिली कीं, महाराजांची जी दशा त्यांनीं केली तशी आपली होऊनये, असें मनांत असेल तर यशवंतराव घाटगे, यांची दोस्ती संपादन करावी. तेव्हां त्या सरदाराकडील २५ आरबांस माझ्या रक्षणाकरितां द्यावें असें मागणें केलें. त्यास भाऊमहाराजांनीं कागदिला. नंतर भाऊंनीं आपला स्वतःचा व दुसरे कांहीं घोडे दिले, व बाकी देण्याबद्दल यशवंतराव घाटगे जामीन राहिला. या प्रमा-

णें त्यांचें सर्व मागणें दिल्यावर तुम्हीं आतां येथून जावें असें मो-
हित्यास सांगितलें. तेव्हां भाऊमहाराजांनीं स्वतः आमच्या बरोबर या-
वें, असा आग्रह धरिला. तेव्हां मी एकटें तुम्हांबरोबर कसें यावें? अ-
शी त्यांनीं हरकत घेतली; परंतु माझे सर्व लोक बरोबर घेऊन पाहि-
जे तर येतों, असें भाऊंनीं सांगितलें. तथापि भाऊचे कारकून सदाशी-
वपंत आबा यानें कोल्हापूरच्या पूर्वेस ५ कोसांवर लेलगडावर मोहि-
त्यास मी सुरवरूप पोंचवितों, असा पत्कर घेतल्यावरून भाऊमहारा-
जांस जावें लागलें नाहीं. व मोहिते रातोरात गडावर निघून गेले.

महाराजांनीं प्राणोत्क्रमण केल्यावर मोहित्यांस धरिलें पाहिजे असें
खुद्द भाऊमहाराज म्हणाले. तेव्हां राणीसाहेबांचा पुतण्या जिजाबा
आणि बाळासाहेब गोसावी हे उभयतां माधवराव निंबाळकरा-
च्या पागेंतील १०० स्वार व २०० शिपाई घेऊन ना-
ना पाटणकरांच्या कारकुनाबरोबर निघाले. ते दुस-
ऱ्या दिवशीं सकाळीं (तारीख १७ जुलई) लेलगडाव-
र पोंचले. तेथें सदाशीवपंतासहवर्तमान मोहिते ब-
सले होते, व एका मोहित्यानें सदाशीवपंताच्या छा-
तीवर नागवी तरवार उपसून धरिली होती. यशवंतरावाचे आरब मो-
हित्यास गडावर पोंचविल्यावर कोल्हापुरास गेले. जिजाबास पाहतांच
मोहिते त्यावर तुटून पडले, आणि त्यास व त्याबरोबरच्या तीन चार
शिपायांस त्यांनीं जखमी केलें. शेवटीं जिजाबा बरोबरच्या लोकां-
नीं सर्व मोहित्यांस ठार करून त्यांचीं डोकीं कोल्हापुरास आणि-
लीं. आणि कोल्हापूरशहरच्या वेशीवर लाविलीं. नंतर कोल्हापुरीं अ-
सलेलीं त्यांच्या कुटुंबांतील माणसें बाजीरावाचा मुलगा, बापजी रावाची
बायको व मुलगा, बाबजीरावाची बायको यांसही लोकांनीं मारिलें.
या प्रमाणें कत्तल झालेली ऐकून भाऊमहाराजांनीं सयाजीची बा-
यको व त्याचे दोघे मुलगे व मुलगी यांस मारूनये अशी मध्यस्ती
केली. तेव्हां त्यांस न मारितां कैदेंत टाकिलें.

मोहिते व त्यांचे साथी यांस ठार मारितात. तारीख १७ जुलई सन १८२१ इ.

# शाहाजी
## ऊर्फ
# बुवासाहेब महाराज.

सन १८२२ — १८३७.

आबासाहेबांचे चिरंजीव बाळासाहेब यांस गादीवर बसविण्याची मंडळीची खटपट.

**संभाजी ऊर्फ आबासाहेब महाराज** मरण पावले त्यावेळीं त्यांचा मुलगा **बाळासाहेब** पांच वर्षांचा होता. त्याची मातुश्री पूर्वींच मरण पावली होती. कैलासवासी महाराजांच्या कारकीर्दींत **श्री भाऊ महाराज, हैबतराव** व **दिनकरराव गाईकवाड, आबाजीराव पन्हाळकर, बळवंतराव** व **मोरोपंत चिटणीस** आणि **बापू नारायण** व **रामजी भास्कर** वगैरे मुख्य मंडळी जमून कामकाजांत वागत असत. त्याप्रमाणें पुढेंही आपल्या हातीं अधिकार रहावा, या हेतूनें त्यांनीं अशी मसलत केली कीं **बाळासाहेब** महाराजांस, गादीवर बसवून त्यांच्या नांवें सर्व राज्यभार महाराजांची सापत्न मातोश्री **सुंदराबाईसाहेब** यांणीं आपल्या स्वाधीन ठेवावा.* आणि **बुवासाहेबांस** दौलतीच्या कामांत हात घालूं देऊंनये, अशी सल्ला द्यावी. ही मसलत **सुंदराबाईसाहेबांस** कळवितांच त्यांनीं या गोष्टीस रुकार दिला, आणि राज्यांत कलह उत्पन्न न होण्यास काय तजवीज करावी. म्ह-

---

*. या विषयीं दुसरी हकीगत अशी आढळते. कैलासवासी महाराजांचे उत्तरकार्य व्यंकटराव भोंसले यांणीं केल्यावर चवदावे दिवशीं राणीसाहेबांनीं भाऊमहाराज व इतर मानकरी व सरदार यांची सल्ला घेऊन असें ठरविलें कीं, आबासाहेबांचा अल्पवयी पुत्र व आपला पुतण्या यांच्या नांवें सदरेस बसून बुवासाहेबांनीं विडे वांटावे व सर्व कागदपत्रांवर बुवासाहेबांनीच सह्या कराव्या. आबाजीपंत फडणीस यांनीं दप्तरदारीचें काम पहावें. हैबतराव गाईकवाड यांनीं फौज संभाळावी. नानापाटणकरांनीं सल्ला मसलत द्यावी. आणि आईसाहेब व भाऊमहाराज या उभयतांनीं सर्वांवर देखरेख ठेवावी. नव्या शिबंदीस फांटा देण्याविषयीं हुकूम दिले. प्रत्येक सरदारावर एक कारकून व पांच शिपाई यांचा पहारा ठेविला. आणि गडांवर व किल्यांवर कामगार पाठवून गडावरील सर्व कामगारांचे जामीन घेतले.

णून विचारिलें. तेव्हां सदरमंडळीनीं सांगितलें. कीं यशवंतराव घाटगे, सर्जेराव कागलकर आणि महिपतराव गोपाळ पारसनवीस हे उभयतां शहाणे व कर्ते असून बुवासाहेबांच्या लोभांतील आहेत. यांचा बंदोबस्त केला म्हणजे बुवासाहेब सहजच आपल्या स्वाधीन होऊन स्वस्थ राहतील. तसें करण्यासही राणीसाहेबांनीं अनुमोदन दिलें.

कागलकर व महिपतराव पारसनवीस यांस अटकेंत ठेवितात.

ज्या सयाजी मोहित्यानें गर्दीकरून आबासाहेब महाराजांस गफलतीनें मारिलें तो मोहिता कागलकर यांचा आप्त होता. यास्तव त्यास कागलकर घाटगे आंतून मिलाफी असावे असें त्यांजवर दुर्निमित्य ठेवून घाटगे यांस वाड्यांत बोलावून आणिलें आणि आईसाहेबांनीं भेट घेतली आणि अशा दुष्टकृत्यास प्रवृत्त झाल्याबद्दल त्यांची निर्भत्सना करून त्यांस बहुत दुर्भाषणें ही आईसाहेब बोलल्या. नंतर त्यांबरोबर अमृतराव निंबाळकर, मानाजी यादव आणि विठोजी मोहिते होते त्यांस बेड्या घालून कैदेंत ठेविलें आणि कागलकर यांस बरोबर पाहऱ्यास ५० असामी देऊन आषाढ वद्य ३० (तारीख २१ जुलई) रोजीं परत पाठविलें. नंतर पारसनवीस हे कागलकर यांच्या घरीं वरचेवर जात येत असत यास्तव तेही या प्रकरणांत सामील असावेत असा आरोप त्यांजवर ठेवून त्यांस श्रावण वद्य ३० (तारीख २७ आगस्ट) रोजीं वाड्यांत आणून प्रातःकाळपासून सहा घटका रात्रपर्यंत ब-

---

* येशवंतराव घाटगे कैलासवासी महाराजांचे मेहुणे यांस लग्नाच्या वेळीं जे गांव आंदण दिले होते, ते जप्त केल्यामुळें तो नाखुष झाला. शिवाय यशवंतरावाच्या मुलीशीं लग्न करण्याचें महाराजांनीं कबूल केलें नाहीं, व त्या मुलीचें साताराच्या राजाशींही लग्न होऊं दिलें नाहीं. या सर्व गोष्टींवरून महाराजांच्या वधांत यांचें आंग असावें असा संशय आला होता. तसेंच महाराजांविषयीं याच्या मनांत वांकडें असल्याबद्दल दुसरींही कारणें उघडीस आलीं होतीं. शिवाय यांनीं आपल्या तैनातीस आरब ठेविले होते. मोहित्याच्या रक्षणाकरितां यांनीं आपले आरब नेमिले व त्यांस गडावर पोंचविण्यासही दिले. यावरून मोहित्यास आंतून यांचें पाठबळ असावें याविषयीं अधिकच खात्री वाटूं लागली. यामुळें कोल्हापूरच्या कारभाऱ्यांस स्वाभाविकच वाटलें कीं, त्यांस धरून चौकशी करावी. त्या प्रमाणें येशवंतरावास कैद केलें. परंतु नंतर सोडून दिलें.

सवून ठेविले आणि नंतर त्यांस पुष्कळ दुर्भाषणें बोलून बरोबर शिद्दी व आरब मिळून १०० असामी व हुजरे व कारकून देऊन त्यांस घरीं पाठविलें. हुजरे व कारकून यांणीं घराचा सर्व झाडा घेऊन सदर संशयाबद्दल सर्व कागदपत्र जप्त करून ठेविले आणि घरासभोंवती आरब व शिद्दी यांचा पाहारा ठेविला. या प्रमाणें या उभयतांचा बंदोबस्त केल्यावर सुंदराबाई महाराज यांस व गाईकवाड प्रभृति मंडळीस आपली मसलत बरीच साधली असें वाटलें.

पारसनवीस यांच्या घरासभोंवती पाहारा ठेविल्याचें वर्तमान बुवासाहेबांस कळतांच त्यांस फार खेद झाला. आपल्याबद्दल त्यांस अशी दशा प्राप्त झाली, हें पाहून तर त्यांना फारच वाईट वाटलें. त्या रात्रीं बुवासाहेब

पारसनवीस यांचे घराबरील पाहारा बुवासाहेब उठवितात.

ताटें न होतां तसेच निद्रिस्त झाले. दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं स्नान संध्या पूजा वगैरे आटपून देवघरांत असतां हैबतराव गायकवाड यांस बोलावून आणून म्हणाले, पारसनवीस यांजकडे काय अपराध आहे तो कळवावा. नाहीं तर त्यांच्या घरावरचा पाहरा उठवावा. पाहरा उठल्याशिवाय ताटें व्हावयाचीं नाहींत. असा आईसाहेबांकडे अर्ज करून कशी आज्ञा होईल तें कळवावें म्हणजे आमच्या मर्जीस येईल तसें पुढें करूं. याप्रमाणें गाईकवाड यांणीं आईसाहेबांस निरोप कळवितांच आईसाहेब यांणीं सांगितलें कीं, सेवक लोकांकरितां दुराग्रह धरणें महाराजांस योग्य नाहीं. त्याचा विचार होणें तसा होईल. या प्रमाणें गाईकवाड यांणीं उत्तर कळविल्यावर बुवासाहेब बहुत क्रोधायमान झाले, आणि पाहरा उठविण्याची आईसाहेबांची मर्जी नसल्यास आम्हीं आतांच उठवितों, असें बोलले. हें आग्रहयुक्त भाषण ऐकतांच आतां आग्रह धरण्यांत उपयोग दिसत नाहीं, असें आईसाहेबांस गाईकवाड यांणीं सांगितलें. तेव्हां पारसनवीस यांच्या घरचा पाहरा उठवून खासबारदार १० असामी ठेविले. या प्रमाणें महाराजांस कळतांच त्यांनीं त्या लोकांच्या कामगारांस आणून हरएकविषयीं पारसनवीस यांस लोकांकडून उपद्रव लागला असतां शिक्षा होईल, अशी ताकीद करून स्वारी ताटास गेली.

नंतर भाऊमहाराज प्रभृति मंडळीनीं पारसनवीस यांचे घरचें कागदपत्र वाड्यांत नेऊन पाहिले. त्यांस ज्या गोष्टीचा अंदेशा होता त्या

ग्रं... नं. ... ता. ११

संबंधीं कांहीं न सांपडल्यामुळें मशारनिल्हे पारसनवीस यांचें अंग मोहित्याच्या दुष्ट कृत्यांत नाहीं अशी त्यांची खात्री झाली. तथापि ते कोल्हापुरीं असल्यास कोणते वेळीं कोणतें राज्यकारण उपस्थित करून अपाय करतील याचा नियम नाहीं.यास्तव त्यांस मनोहर किल्यावर पाठवावे, असें ठरवून चिटणिसाकडून आज्ञापत्र तयार करविलें. आणि दिनकरराव गाईकवाड निशाण मोर्तबास बुवासाहेब महाराजांकडे घेऊन गेले. बुवासाहेबांनीं तें पत्र पाहून फाडून परत दिलें आणि म्हणाले "या फंदांत तुम्हीं कितीएक मंडळी आहां हें आम्हांस माहीत आहे. विनाकारण कलह वाढवून नाहीं ते बखेडे उपस्थित करीत आहां; तो क्रम सोडून द्यावा, नाहीं तर तुमचा नाश होऊन अनर्थास कारण होईल हें ध्यानांत ठेवावें. पारसनवीस यांजकडे कांहीं अपराध असल्यास कळवावें म्हणजे जसें करणें असेल तसें करूं." पुढें असें आणखी एक दोन वेळां झालें; तेव्हां हैबतराव गाईकवाड बुवासाहेबांकडे गेले आणि अर्ज केला कीं, सेवकलोकांकरितां मातोश्री व आपण यांमध्यें वितुष्ट यावें हें चांगलें दिसत नाहीं. त्यांचा संतोष होईल तें करावें. तेव्हां "आमच्या मातोश्रींनीं कैलासवास केल्यास फार दिवस झाले. आम्हांस मातोश्री नाहीं." असें साफ उत्तर दिलें. हा मजकूर गाईकवाड यांणीं आईसाहेबांस कळविला. तेव्हां यापुढें बुवासाहेबांची मर्जी संभाळणें फार कठीण आहे. तर आपला हेतु कसा सिद्धीस जाईल या चिंतेंत आईसाहेब पडल्या. आणि घाटगे यांस वाड्यांत अधिक बंदोबस्तानें ठेविलें.

> पारसनवीस यांचे घरचे कागद पाहतां ते निरपराधी ठरतात.

बाळासाहेबांस वस्त्रें मिळून त्यांच्या आधिपत्यास मान्यता मिळावी म्हणून श्रीभाऊमहाराज मुंबईच्या गव्हरनरांकडे गेले होते, परंतु दैववशात थैलीचें उत्तर येण्यापूर्वीच बाळासाहेबांस गोंवर येऊन तारीख ३ जानुआरी सन १८२२ रोजीं ते रात्रीं मरण पावले. यामुळें भाऊमहाराज, गायकवाड प्रभृति मंडळींचा बेत विस्कळीत झाला आणि बुवासाहेबांस राज्याधिकार मिळण्याची आयतीच संधि आली.

> बाळासाहेबांचा मृत्यू तारीख ३ जानुआरी १८२२.

बुवासाहेबांचा बांधा ठेंगणा असून ते आंगानें सडपातळ होते. म्हणून दिसण्यांत त्यांची मूर्ति लहान दिसे. त्यांचा वर्ण काळासांवळा होता.त्यां-

ची चाल व वर्तणूक सभ्य व सौम्यपणाची नसून दांडगाईची व रांठाळ असे. ते शरीरानें बळकट असून त्यांची मुद्रा उग्र दिसे. मनाच्या थोरवीशिवाय मराठ्यांचीं सर्व लक्षणें व मराठ्यांची सर्व पुंडाई त्यांच्या आंगीं वसत होती. आसमतांत यांचा दरारा इतका असे कीं, यांचें नांव ऐकतांच लोक थरथरां कांपत असत. हे स्वभावानें मोठे मानी, आग्रही व क्रूर होते.

**बुवासाहेबांस** घोड्यावर उत्कृष्ट बसतां येत असून त्या कामांत मोठे ते धाडशी असत. कसलाही तल्लख घोडा असला तरी त्यावर बसण्यास ते मागें पुढें पहात नसत. यांस बोथाटी उत्तम खेळतां येत होती. तसेंच यांस शिकारीचा फार षोक असे; आणि ते आपला बराच काळ शिकार करण्यांत घालवीत असत.

बुवासाहेब महाराज गादीवर बसतात. सन १८२२.

**बाळासाहेब** मरण पावतांच **बुवासाहेबांनीं नारायणराव पंडित** व **नारायणराव सरलष्कर** यांस अनुकूळ करून घेऊन थैली देऊन सरलष्कर यांजकडील **आनंदराव त्र्यंबक** यांस पुण्यास नामदार **एलफिन्स्टन्‌साहेब** मुंबईचे गव्हरनर यांजकडे पाठविलें. आणि राज्यकारण सिद्ध केलें, **आईसाहेबां**कडीलवकील **श्री भाऊ महाराज** पुण्यास होतेच. त्यांनीं अनेक प्रकारें **बुवासाहेबांचे** गिल्ले गव्हरनर साहेबांस सांगितले. परंतु **भाऊमहाराज** अप्रामाणीक असा अनुभव साहेबांस पूर्वींच आला होता. यामुळें त्यांच्या बोलण्यावर कांहीं प्रमाण न ठेवितां **बुवासाहेबांकडील** वकील यांचें बोलणें समजून घेऊन उलट थैली महाराजांस लिहिली व **आईसाहेबां**-

---

* यांच्या मानी स्वभावाची अशी एक गोष्ट सांगतात कीं एके वेळीं बोथाटी घेऊन घोडें फेरीत असतां जवळ सुंदराबाई राणीसाहेबांच्या बंधूचे चिरंजीव जिजाजीराव खानवेलकर हे ही बोथाटी घेऊन घोडा फेरीत होते. त्यांनीं महाराजांस पाठीमागून येऊन विनोदानें बोथाटी मारिली. त्या सरसा महाराजांस राग आला, व ते खानवेलकरावर धांवले. तेव्हां जिजाजीराव वाड्यांत पळून गेले. तेव्हां बुवासाहेब महाराज रुसून हुपरीस गेले. तिकडे आईसाहेबांनीं गायकवाड वगैरे मंडळीस पाठवून मोठ्या प्रयासानें त्यांची समजूत घालून पंधरा रोजांनीं त्यांस परत आणिलें.

सही पत्र पाठविलें कीं, बुवासाहेब गादीचे व राज्याचे मालक आहेत, तर त्यांच्या विचारें चालावें. या प्रमाणें कंपनीसरकारचीही मान्यता मिळून **बुवासाहेबमहाराज** निर्विवादपणें राज्यपदारूढ झाले.

पुढें महाराजांनीं आपल्या वकिलांमार्फत करवीरीं भेटीस येण्याविषयीं पाचारण केल्यावरून सन १८२२ सालीं नामदार **एलफिनूस्तनसाहेब** दसरा झाल्यावर पुण्याहून करवीरीं येण्यास निघाले. वाटेनें विजापूर वगैरे पाहून कोण्णूरचा (गोकाकचा) धबधबा पाहण्यास गेले. तेथून करवीरीं येणार असें वर्तमान महाराजांकडे त्यांच्या वकिलांकडून आलें, तेव्हां महाराजांनीं निघण्याची तयारी करून नामदार साहेबांस सामोरें जाण्यासाठीं शिरोळास जाण्यास निघाले. स्वारी विजापूर वेशीनें (रविवार वेशीनें) निघाली तेव्हां जातांना वाटेंत **पारसनवीस** सांप्रदायाप्रमाणें मुजरा करण्यास आले. त्यावेळीं पूर्वी सूचना नसतां स्वारीबरोबर निघावें अशी त्यांस आज्ञा झाली. आणि स्वारीपुढें कोतवाल घोडे होते, त्यांपैकीं एक घोडा आणवून त्याजवर बसण्यास हुकूम झाला. नंतर पारसनवीस यांस घेऊन स्वारी शिरोळ मुक्कामीं गेली. मागाहून **आईसाहेबांची** स्वारीही आली. नंतर थोड्याच दिवसांनीं नामदार **एलफिनूस्तन** साहेबांचीही स्वारी येऊन दाखल झाली. कामगार नेऊन त्यांच्या सरफराईचा बंदोबस्त यथास्थित ठेविला होता. मोठा दरबार भरून मोठ्या समारंभानें महाराजांची भेट नामदारसाहेबांनीं घेतली. खैरखुशीची वगैरे परस्पर बोलणीं होऊन व महाराजांकडील सर्व मजकूर ऐकून निरोप घेऊन आपल्या डेऱ्यास निघाले, आणि जातेवेळीं दरबारांत जो कोणी मातबर माहितगार असेल त्यास पाठवावें म्हणून सांगितलें. दुसऱ्या दिवशीं रत्नाकरआपाचे चिरंजीव **नारायणराव पंडित** यांस त्यांच्या वडिलांचा राजाज्ञ हा किताब देऊन साहेबांकडे पाठविलें. त्यांजकडून सर्व मजकूर समजून घेऊन त्यांस निरोप दिला. नंतर पुनः दरबार भरून दुसरी भेट झाली. त्यावेळीं **श्री० आईसाहेब** हजर होत्या. नामदार साहेबांनीं आईसाहेबांस सांगितलें कीं, महाराज दौलतीचे मालक आहेत, त्यांणीं राज्यपदीं आरूढ राहून कारभार चालवावा, ही गोष्ट आम्हांस सर्वथैव मान्य आहे.

नामदार मुंबईचे गव्हरनर कोल्हापूर प्रांतीं येतात, व मोठा दरबार होतो.-दुसरी सन १८२३

श्री॰ भाऊमहाराजांचा फार निषेध करून तत्पक्षीय मंडळी आपणास भलतीच बदसल्ला देऊन राज्यांत विनाकारण बखेडे उपस्थीत करितात. यास्तव त्यांचें न ऐकतां महाराजांच्या विचारें चालावें, असा बहुत प्रकारें बोध केला.

एके दिवशीं महाराजांनीं साहेबांस शिकार दाखविण्यासाठीं नेलें. त्या समयीं महाराजांनीं घोड्यावरून भाल्यानें हरण मारिलें. तें पाहून साहेब फार खुष झाले, व त्यांनीं महाराजांची फार तारीफ केली. ८।१० मुक्काम राहून व महाराजांस बोध करून नामदारसाहेब निरोप घेऊन गेले, व महाराजांची स्वारी कार्तिक अखेर करवीरीं आली.

राज्यांतील मोठ मोठ्या कामावर हलकट व बेदर्दी लोकांस नेमितात.

बुवासाहेब महाराज दौलतीचें कामकाज स्वतः पाहूं लागले. राज्यांतील बडे व जाणते लोक आईसाहेबांस मिळाले होते. तेणेकरून त्यांजवर यांचा फार राग होता. तेही यांजकडे येत जात नसत. यास्तव कारभार चालविण्यास हलके व बेदर्दी लोकांस नेमून जुन्या कामगारांस दूर केलें व त्यांच्या तैनाती जप्त केल्या. **अनंतशास्त्री शिरोळकर** हे महाराजांपाशीं फार दिवस येत जात असत. त्यांस कारभाऱ्याचे जागेवर नेमिलें. हलक्या माणसांस लौंभांत वागवून वाढवूं लागले. मर्जीस येईल त्यास मात्र सरंजाम व इनामें चालवूं लागले. आणि बाकीच्यांचे जप्त करूं लागले. **नारायणराव पंडित** व **भाऊमहाराज** यांस मारण्याचा यत्न केला.

बुवासाहेबाचा स्वभाव व वर्तन.

मेजर **ग्रेहामसाहेब** यांनीं याविषयीं असें लिहिलें आहे. "महाराजांनीं थोड्याच काळांत ८ लग्नें केलीं. त्या शिवाय सर्व जनानखाना दासींनीं भरलाच होता. या दुराचारी दासींनीं महाराजांच्या सर्व कृत्यांस कलंक आणिला. यांस राहण्याकरितां मोठमोठे वाडे बांधून दिले. त्यांच्या खर्चाकडे गांवचे गांव तोडून देऊन शिवाय खजिन्यांतून रोख नेमणुका पोंचत होत्या. या दुष्ट स्त्रियांचे मित्र व आप्त यांस मोठ्या पदवीस चढवून त्यांजकडे जबाबदारीचीं कामें सांगितलीं. सारांश राजवाडा केवळ दुर्गुणी, दुराचारी व बदफैली लोकांचें माहेर घर बनला होता. खटपटी व दुष्ट कृत्यें यांची तर परमावधी झाली होती. कोणी कोणावर विश्वास ठेवीत नसे. कोणावर केव्हां

जुलूम होईल याचा नेम नसे. लांच घेणें हें तर कामगार आपलें कर्तव्यच समजत. यामुळें कोल्हापूर दरबारची आसमंतातल्या संस्थानांत इतकी प्रसिद्धि झाली होती कीं, कोणच्याही दुष्ट कृत्यास कोल्हापूर दरबारचा दृष्टांत देणें ही साधारण चाल पडून गेली.'

बुवासाहेबांस शिकारीचा फार नाद होता, व त्यांत ते बराच काळ घालवीत. हे स्वभावानें फार क्रूर व साहसी होते, इत्यादि वर सांगितलेंच आहे; परंतु इंग्रजसरकारच्या प्रतिबंधामुळें त्यांस कोणाशीं उघडपणें युद्ध करितां येत नसे. म्हणून त्यांचा क्रूरपणा पूर्णपणें उघडीस येण्याचा प्रसंग आला नाहीं. तथापि महाराजांनीं साहसी व लुटारू लोकांची एक टोळी चाकरीस ठेविली होती, तिजवर सुभाना निकम या नांवाचा महाराजांच्या लोभांतील हुजऱ्या यास नेमिलें होतें. त्या लोकांस घेऊन महाराज स्वतः फिराक्यास जात, व गांवचे गांव लुटून उद्ध्वस्त करीत. पुढें यांच्या कारकीर्दींतील ज्या मुख्य मुख्य गोष्टी सांगितल्या आहेत, त्यांवरून वर जें महाराजांच्या स्वभावाचें व गुणांचें वर्णन केलें आहे, त्याविषयीं स्पष्टता होईल.

आईसाहेब पन्हाळ्यास जातात व महाराज त्यांस परत आणितात.

दौलतीच्या कामांत महाराज आपलें कांहीं ऐकत नाहींत, या रागानें आईसाहेबांची स्वारी पन्हाळ्यास गेली. त्यांची समजूत पाडण्यासाठीं म्हणून मागाहून महाराजांची स्वारीही पन्हाळ्यास गेली. तेथें मुक्काम असतां तेथील कित्येक लोकांनीं सांगितलें कीं, दौलतबुरुजांत द्रव्य आहे. त्यावरून महाराजांनीं पुष्कळ लोक लावून बुरूज पाडवून खणून पाहिलें. परंतु तेथें कांहीं सांपडलें नाहीं. तेथील आबाजी राम पन्हाळकर यांनीं पूर्वीं आईसाहेबांकडील मंडळींत वागून बखेडे केले होते. याबद्दल त्यांजवर रोष होता. मशारनिल्हे पन्हाळकर यांनीं चार दरवाजांतील एक बहुत दिवसांचें मोठें विस्तीर्ण असें सोनचाफ्याचें झाड घरच्या इमारतीकरितां तोडलें होतें. हें वर्तमान महाराजांस कळतांच तें निमित्य करून महाराजांनीं त्यांच्या घरीं पाहरा ठेविला, आणि त्यांस जरब देऊन कांहीं ऐवज गुन्हेगारीबद्दल त्यांजकडून घेऊन स्वारी आईसाहेबांसह करवीरीं आली. मशारनिल्हे पन्हाळकर अब्रूदार गृहस्थ होते. त्यांस आपला हा झालेला अपमान सहन न होऊन पुढें केव्हां काय होईल याचा नेम नाहीं या काळजीनें ते एका महिन्यानें मृत्यू पावले.

*चिटणीस यांस कैद करितात.*

नारायणभट बिन सदाशीवभट शिराळकर यांस शंभु छत्रपति असतां एका गांवच्या सनदा देण्याचें ठरलें. आणि भाऊमहाराज यांनीं सनदा तयार करवून शिक्का मोर्तब झालेल्या सनदा चिटणीस यांच्या दप्तरीं शिल्लक होत्या. महाराजांवर गर्दी झाल्यावेळीं मोहित्यानीं एक दोन माणसें मारिलीं त्यांचें रक्त सनदांवरउडालें होतें. त्या सनदा शंभु छत्रपति वारल्यावर भाऊमहाराज व बळवंतराव चिटणीस यांनीं हुकुमाशिवाय भटजीस दिल्या होत्या. चिटणीस आईसाहेबांच्या पक्षाच्या मंडळींत असून बखेडे करण्यांत होते. विगर हुकूम सनदा दिल्याचें महाराजांस कळतांच बळवंतराव चिटणीस व त्यांचे बंधु वगैरे चार असामींस धरून कैद केलें, व बिड्या घालून निरनिराळ्या ठिकाणीं पाहऱ्यांत ठेविले. त्यांची चौकशी करितां बळवंतरावाच्या सांगण्यावरून भटजींस सनदा दिल्या, असें इतरांनीं लिहून दिलें. तेव्हां बाकीच्यांस जामीन घेऊन सोडून दिलें व बळवंतराव आणि मोरोपंत यांस मात्र कैदेंत ठेविलें. पुढें त्यांजकडून बोलणें आलें कीं मखलाशीबद्दल १२००० रुपये देतों ते घ्यावे व आम्हांस मोकळें करावें. त्याप्रमाणें ठराव करून व रकमेबद्दल जामीन घेऊन त्यांस मोकळें केलें. मोरोपंत भयानें थोड्याच दिवसांत वारले.

*टामरीनसाहेब कमिशनर करवीरीं येतात. फेब्रुवारीं सन १८२४.*

शके १७४५ सालीं माघमाशीं बजाजीराव खानवेलकर यांच्या कन्येशीं विवाह करण्याचें ठरून विवाहसमारंभ मोठ्या थाटानें झाला. याच वेळीं धारवाडसुभ्याचे कमिशनर टामरीनसाहेब प्रांत पहात पहात मिरजेवरून करवीरीं आले. दरबार भरून भेटीचा समारंभ झाला. साहेबांनीं एकांतीं महाराजांस स्वहिताविषयीं बहुत प्रकारें बोध केला व ५।६ मुकाम करून साहेब निघून गेले.

*महाराज फौज घेऊन कितूरास जातात. सन १८२४*

शके १७४६ (सन १८२४) सालीं कितूरकर देसाई मयत झाले. त्यावेळीं त्यांच्या पदरच्या लोकांनीं जें बंड केलें त्याच्या बंदोबस्ताकरितां टामरीनसाहेब पलटणें घेऊन धारवाडाहून कितूरास आले. त्यावेळीं महाराज ५००० स्वार १००० पायदळ आणि ७ तोफा घेऊन एकाएकीं करवीराहून निघून कितूरास गेले. यावरून साहेबांस महाराज बंडवाल्यांस सहाय्य करण्याकरितां आले, असा संशय आला. पर-

[library stamp]

तु त्यांनीं साहेबांची भेट घेतली, व आपला हेतु कळविला. तथापि टामरीनसाहेबांचा संशय गेला नाहीं. नंतर बंडवाल्यांशीं कटकट होऊन जीगोळागोळी झाली. त्यांत टामरीनसाहेब गोळी लागून पडले. तेव्हां तेथील बंदोबस्तास चापलीनसाहेब कमिशनर पुणें हे कितुरास आले; ठाणें घेऊन तेथील बंदोबस्त करून साहेब धारवाडाकडे गेले. बरोबर महाराजांची स्वारीही गेली. तेथें थोडे दिवस राहून चापलीनसाहेब पुण्यास गेले. जातेवेळीं साहेबांनीं महाराजांस सांगितलें कीं, धारवाडच्या कामावर बेबरसाहेब लौकरच येतील. त्यांची भेट घेऊन स्वारी करवीरास जावी. परंतु महाराज साहेब येण्याची वाट न पाहतां करवीरीं निघून आले.

बाटेनें येतांनां गांवचे गांव लुटिले व कित्येक लोकांस जिवें मारिलें. लोभांतील मंडळी सांगतील तें करण्यास सदा प्रवृत्त होते. कागलकर घाटगे हुकुमांत वागत नाहींत असें निमित्य लावून कागल तालुका घेऊन बंदोबस्त करावा असें लोभांतील लोकांनीं सांगितलें; त्याप्रमाणें तयारी करून फौजेसुद्धां स्वारी कागलास गेली, व ठाण्यास वेढा दिला. बाहेरून तोफा लावून ठाण्यांतील तोफा कोंडल्या. ठाण्यांत जमावही थोडा होता. लढतां लढतां ठाणें जेरीस आलें. तेव्हां घाटगे ठाण्यांतून निघून गेले. ठाणें सोडून गेल्यावर महाराजांनीं तें घेतलें व गांव लुटला. नंतर ठाण्याचा बंदोबस्त करून तालुक्यांत अंमल बसविला, व गांवगन्ना वहिवाटीस कारकून नेमून स्वारी करवीरास आली. भाऊ महाराज व बाबा महाराज यांचे सरंजामही नीट चालवीनात. इचलकरंजी–करांसही वरचेवर शिलशिला करीत. प्रांतांत लुटारू लोकांचा तर उपद्रव सुरू होताच. यामुळें सर्वांचे गिल्हे धारवाडास गेले. तेव्हां कोल्हापूरकरांविषयीं विचार करणें भाग पडून सर्व बखेडा मोडून जुलूम बंद करण्यासाठीं कंपनी सरकारची ६००० फौज घेऊन बेबरसाहेब धारवाडाहून सन १८२५ सालीं डिसेंबर महिन्यांत करवीरीं आले. यावेळीं हिंदुस्थानांत भरतपूरच्या दुर्धर किल्यास वेढा देऊन तो किल्ला घेण्याच्या यत्नांत इंग्रजसरकार होतें.

महाराजांचें जाहागीरदाराशीं वर्तन. बेबरसाहेब फौज घेऊन येतात. तारीख २५ दिजंबर सन १८२५.

फौज येण्यापूर्वीच श्री० सुंदराबाई आईसाहेब वृद्धपणामुळें प्रकृति क्षीण होऊन मृत्यु पावल्या. त्यांचें सार्थक दानधर्म वगैरे यथासांग करून महाराज मोकळे झाले होते; इतक्यांत फौज येऊन पोंहचली. याच समया-

स अनंतशास्त्री कारभारी मरण पावले. कृष्णराव माधव गर्दे हे नवीनच येऊन करवीरीं राहिले होते. महाराजांच्या लोभांतील मंडळीच्या वळणानें त्यांचें वाड्यांत जाणें येणें होतें; यामुळें हलकट मंडळीच्या सांगण्यावरून त्यांस व जिवराव जाधव सलवत खान्याकडील हवलदार यांस कारभाराचें काम महाराजांनीं सांगितलें त्यांच्या सल्यानें बुवासाहेबांनीं इंग्रजी पलटणें येऊन पोंहचतांच उघडपणें लढाईची तयारी केली, सुमारें २०,००० फौज जमवून शहराबाहेर येऊन छावणी दिली. तेणेंकरून शहरा सभोंवतालचें मैदान डेरे राहुट्यांनीं फुलून गेलें. परंतु जेव्हां इंग्रजसरकारच्या फौजेनें शहराबाहेरच्या कांहीं बळकट जागा सहज घेतल्या आणि नजीकच्या टेंकड्यांवर आघाडीची फौज लढाईस सज्ज केली, तेव्हां यांपुढें आपला टिकाव लागणार नाहीं असें वाटून महाराजांचें धैर्य खचलें. आणि ब्रिटिश सरकारच्या सन्मानार्थ तोफांची सलामी देऊन वेबरसाहेबांच्या भेटीस गेले; आणि त्यांनीं सांगितलेल्या सर्व शर्ती मान्य करून पुढील तहनामा कबूल केला.

महाराज शरण येऊन तहनामा कबूल करितात. सन १८२६

श्री.

यादी सरकार दौलतमदार कंपनी इंग्रजबहादूर व श्रीमन्महाराज राजे शाहाजी छत्रपति करवीरकर यांच्या दरम्यान कोल्हापूर मुक्कामीं तहनामा मुकरर जाहला. आंकीं पेशजी तारीख १ माहे आक्टोबर सन १८१२ इसवीस पुणे मुक्कामीं सरकार दौलतमदार कंपनी इंग्रज बहादूर व श्रीमन्महाराज छत्रपतिसाहेब करवीरकर यां दरम्यान सलाहव दोस्तीबद्दल तहनामा ठरला आहे. नंतर खलेल व बखेडे मुद्यांत आले. ते दूर होऊन दोस्ती व एक नहती मुस्तकीम राखावी. म्हणून हरदू सरकार यांचा करार हल्लीं ठरला तीं कलमें लिहिलीं जात आहेत.

१. तारीख १ माहे आक्टोबर सन १८१२ इसवीचे तारखेस तहनामा ठरला त्यापैकीं हल्लींचे करारांत रद्द जाहलीं त्या कलमांशिवाय वरकड तहनामा कायम आहे.

२. महाराज छत्रपतिसाहेब सरकार करवीर करार करितात जेः— आपली फौज कमी करून लढाईचा मुकदमा नसतां मुलखाच्या बंदोबस्तास जरूर असेल तितकीच ठेवण्यांत येईल. व आपल्या मुलखांतील

व मुलखाबाहेरील लोक हवालनाक होतील तितकी फौज ठेवणार नाहीं. अगर ठेवणें झाल्यास प्रथम इंग्रजसरकारचा सल्ला घेऊं. श्रीमन्महाराज छत्रपति साहेब हे आपल्या राज्याचे मुकत्यार धनी आहेत. परंतु हरदु सरकारच्या मुलखाचे आरामी व आबादीचे सरकार इंग्रजबहादूर सल्ला देतील त्या प्रमाणें वहिवाट ठेवण्यांत येईल; असें श्रीमन्महाराज छत्रपतिसाहेब कबूल करीत आहेत.

३. महाराज छत्रपतिसाहेब करार करितात जेः- राजश्री हिंदुराव घाटगे सर्जाराव वजारत मा आब व नारायणराव घोरपडे इचलकरंजीकर हे आपली जमीन व हक्क मासूलप्रमाणें अनुभवितील त्यांस आम्हांकडून कांहींएक उपद्रव लागणार नाहीं.

४. आलिजाह मा आकला जाये गाह मेजर जनरल सर टामस मन्रो बहादूर यांहीं आपल्या सहीची सनद देऊन महाराज छत्रपतिसाहेब करवीरकर यांजकडे चिकोडी व मनोळी हे दोन्ही तालुके लावून दिले आहेत ते कोणें तहनाम्यांत किंवा करारांत लिहिले गेले नाहींत. परंतु सदरहू तालुके महाराज छत्रपतिसाहेब करवीरकर यांच्या मुकत्यारींत तोडून दिले आहेत असें सरकार इंग्रजबहादुर हल्लीं कबूल करितात. व महाराज छत्रपति साहेब आपल्या तर्फेनें करार करितात जेः- सदरहू तालुक्याचे जमेदार इनामदार व वतनदार यांचे हक्क व जमिनी मासूलप्रमाणें चालवितील.

५. वाडीकर सावंत भोंसले सरदेसाई प्रांत कुडाळ व महालनिहाय व महाराज छत्रपतिसाहेब करवीरकर यांचा दुतर्फी अंमल होता. त्यां विषयीं सरकार कंपनी इंग्रजबहादूर यांनीं सन १८२२ इसवींत फैसला ठरविला. त्यास महाराज छत्रपतिसाहेब करवीरकर कबूल आहेत. व त्या फैसल्या बमोजीब सावंत महसूफ तसरुपेंत आणितील. त्यास महाराज छत्रपतिसाहेब मान्य आहेत व त्याच्या मुबदला महाराज छत्रपतिसाहेब यांस कंपनी सरकार धारवाड सुभ्यांत कांहीं गांव वगैरे लावून देतील ते घ्यावयास महाराज छत्रपतिसाहेब राजी आहेत.

६. महाराज छत्रपतिसाहेब करार करितात जेः- सरकार इंग्रज यांचे दुष्मन व बदमामली लोक यांस आश्रय देणार नाहीं व कों-

णी चोर व इतर गुन्हेगार आपले मुलखांतून सरकार इंग्रजबहादुर यांचे मुलखांत अगर इतर दौलतदार यांच्या मुलखांत येऊन चोरी किंवा दुसरा अन्याय करील तर त्यास धरून स्वाधीन करूं. कदाचित् अशा चोराचा पक्का बंदोबस्त महाराज छत्रपतिसाहेब यांजकडून न जाहल्यास त्याचा इतल्ला इंग्रजसरकारांतून महाराज छत्रपतिसाहेब यांस देतील. असा इतल्ला दिल्यानंतर हरवक्त पाहिजे तेव्हां चोरांस धरावयास लोक पाठवितील त्या चोरांचा पत्ता लावून धरावयास जरूर लागेल ती मदत करूं, असा महाराज छत्रपतिसाहेब करार करितात. कदाचित् महाराज छत्रपतिसाहेब यांचे मुलखांत अन्याय करून सरकार कंपनी यांच्या मुलखांत कोणी येऊन राहील. तर त्याची पक्केपणीं सरकारांत चौकशी करून महाराज छत्रपति साहेब यांच्या मुलखास त्यापासून उपद्रव न लागे असा इनसाफाच्या रुईनें बंदोबस्त ठेविला पाहिजे तो त्या चोराविषयीं इंग्रज सरकारांतून ठेविला जाईल.

७. महाराज छत्रपतिसाहेब करार करितात जेः- **श्री भाउमहाराज व बाबा महाराज** यांच्या जमिनी व हक्क आलाहिदा यादी प्रमाणे त्यांचे त्यांजकडे चालवूं, व मशारनिल्हे भाऊमहाराज व बाबा महाराज यांचे हयातीपर्यंत सदरहू जमिनी व हक्क इंग्रजसरकारच्या वाहेदारीनें चालतील. परंतु सनद बरहुकूम व शिरस्त्या प्रमाणें यांच्या अवलादीचा हक्क असेल त्यास वाहेदारी महकूब झाल्यानें हरकत होणार नाहीं.

८. महाराज छत्रपतिसाहेब यांणीं बहुत लोकांचे गांव वगैरे जप्त करून व इजा देऊन नुकसान केलें. त्याची यादी आलाहिदा आहे. त्या नुकसानीबद्दल कंपनीसरकारांतून वाजवी चौकशी करून नुकसानी बद्दल जें ठरवितील तें देणें पेशजी कबूल केलें आहे. व सदरहू नुकसानीची चौकशी पुरी होऊन जो ऐवज त्या लोकांस देणें ठरवितील, तो ऐवज ठरविल्या तारखेपासून साठ रोजांत महाराज छत्रपतिसाहेब देतील. अगर न देतील तर कंपनीसरकारांतून महाराज छत्रपतिसाहेब यांस **चिकोडी व मनोळी** तालुका जितका पेशजी दिला आहे तो कंपनी सरकारांत जप्तीस ठेवून ऐवजाचा पुरा आदा होई तों पर्यंत कंपनी सरकारच्या ताब्यांत ठेवावा. ऐवज पोंहचता झाल्यावर परतून तालुका महाराज छत्रपति साहेब यांस वागुजाष करितांना तेथील जमाखर्चाचा वाजवी हिशेब धारवाड सुभ्याचे

प्रिन्सिपल कलेक्टर व पोलिटिकल एजंट साहेब देतील.

सदरहू आठ कलमें टामस हेरवी बेबरसाहेब पोलिटिकल एजंट आज तर्फ सरकार दौलतमदार कंपनी इंग्रजबहादूर व कृष्णराव गर्दे व जिवराव जाधव हवलदार आजतर्फ श्रीमन्महाराज छत्रपतिसाहेब यां दरम्यान कोल्हापूर मुक्कामीं तारीख ३० माहे दिजंबर सन १८२५ इसवीस करार झाला आहे. त्यास तरतीब देऊन नबाबफलकजनाब गव्हरनरसाहेब बहादूर फर्मा रवाय दारुल हुकमत मुंबई दर इजलास साहेब व कौन्सिल योहीं तारीख २४ जानेवारी सन १८२६ इसवीस कायम केला आहे. तो नबाब मुस्तताब माहाला अलकाब अशर फुल अशराफ गव्हरनरजनरलसाहेब बहादुर फर्म फर्माय दारुल अमारे आ कलकत्ता दर इजलास साहेबनें कौन्सिल यांच्या हुजुरांत मंजूर झाला म्हणजे हरदु सरकारांतून अमलांत येईल.

त्या प्रमाणें तारीख १० मार्च सन १८२६ इसवी रोजीं कलकत्याहून मंजूरी येऊन तहनामा अमलांत आला.

सदरहू तहनाम्या अन्वयें कागल तालुका नागाव्यासहीत घाटगे यांस परत दिला. बाकी नागाव्याबद्दल व नुकसानीबद्दल चौकशी चालली होती. तहनामा पुरा झाल्यावर बेबरसाहेब कांहीं दिवस राहून परत जाण्यास निघाले. त्यांस पोंचविण्याकरितां त्यां समागमें महाराजांची स्वारी चिकोडी मुक्कामास गेली. तेथेंही साहेब महाराजांच्या डेऱ्यास येऊन भेटी झाल्या. व महाराजांस साहेबांनीं कर्तव्यतेच्या बहुत गोष्टी सांगितल्या. चिकोडीहून हुकेरीस मुक्काम झाला. तेथेंही महाराजांची स्वारी दाखल झाली. त्या समयीं स्वारीसमागमें भाऊमहाराज होते. महाराजांच्या डेऱ्यासंन्निध त्यांचे डेरे आहेत हा मजकूर साहेबांस कळतांच पट्टेवाले पाठवून त्यांचे डेरे काढून टाकिले, आणि इतःपर कोल्हापुरापासून बारा कोशांच्या आंत येऊनये, अशी ताकीद करून त्यांस घालविलें. हुकेरीहून स्वाऱ्या बेळगांवीं गेल्या. तेथें भेटी होऊन महाराजांची स्वारी निरोप घेऊन करवीरीं येण्यास निघाली. गणेश महादेव गर्दे यांस मामलेचें काम सांगून सामानगडावर पाठविलें होतें. त्यांस गडकरी यांनीं किल्यावर घेतलें नाहीं. यास्तव बेळगांवाहून परत येतांना सा-

बेबरसाहेबां बरोबर बेळगांवापर्यंत जाऊन परत येतात.

सामानगडावर स्वारी जाते.

री गडावर गेली, आणि ज्या लोकांनीं बखेडा करून हुकूम अमान्य केला होता, त्यांस शिक्षा देऊन स्वारी करवीरास मार्गशीर्ष शुक्लपक्षीं आली.

श्रीमन्महाराज **शिवछत्रपति** यांच्या कारकीर्दीत जंजिरे **सिंधुदुर्ग** ऊर्फ **मालवण** किल्ला कंपनी सरकारांत देण्याचा ठराव होऊन राजाज्ञा यांजबरोबर **येसाजी सदाशीव म्हैसकर** यांस देऊन पाठविलें, व किल्यांतील जिनगी वगैरे सर्व सामान बाहेर काढून किल्ला मोकळा करून दिला होता. त्यावेळीं किल्यांतून काढलेल्या तोफा वरघाटीं नेण्यास अवसर झाला नसून घांटाखालीं गांवगन्नाचे रानांत टाकिल्या होत्या. त्या तोफा करवीरीं आणाव्या असें मनांत येऊन महाराजांची स्वारी तयारीनिशीं मार्गशीर्ष वद्यपक्षीं करविराहून निघाली. वरघाटीं **ओलवण** नजीक कोल्हापूर प्रांताच्या सरहद्दीवर जाऊन मुकाम केला. तेथून सडी स्वारी घांटाखालीं फोंडे मुकामीं गेली. तेथें राहून रानांत पडलेल्या एकंदर २०० शें तोफा जमविल्या. नंतर मोठीं मोठीं झाडें पोखरून त्यांत तोफा घातल्या, आणि झाडांनिशी तोफा घांटावर माणसांकडून चढविल्या. त्यावेळीं घांट बांधलेला नसून केवळ पायवाटा होत्या. तसल्या वाटांनीं अवजड तोफा चढविण्यास किती प्रयास व खर्च लागला असेल याची बरोबर कल्पनासुद्धां होत नाहीं. घांटावर तोफा चढविल्यावर सर्व तोफा घेऊन स्वारी परत करविरास पौष अखेर आली.

*मालवणच्या तोफा रानांतून आणतात सन १८२६ जानेवारी व फेब्रुवारी.*

तिकडून आल्यावर फौज घेऊन सातार इलाख्याच्या सरहद्दीवर महाराज गेले. याविषयीं ब्रिटिश सरकारास विचारिलें नव्हतें. यामुळें सातारच्या महाराजांस संशय येऊन त्यांनीं तयारी चालविली. परंतु कांहीं बखेडा न करितां फौज घेऊन स्वारी परत आली.

**विशाळगड** पाहावा या हेतूनें स्वारी माघ मासीं करविराहून निघाली. विशाळगडानजीक गजापूर येथें जाऊन पोंहोंचली. त्यावेळीं **माधवराव पंडित प्रतिनिधि** यांनीं बंडखोर लोकांच्या मसलतीनें आपण महाराजांच्या पदरचे हें मनांत न आणितां महाराजांस किल्यावर घेतलें नाहीं आणि किल्यावरून तोफांचे गोळे महाराजांवर मारिले. यास्तव तेथून निघून स्वारी मलकापुरास आली. तेथें कांहीं दिवस मुकाम करून प्रतिनिधि यांचा ते-

*महाराज विशाळगड पाहण्यास जातात. फेब्रुवारी १८२६.*

थील वाडा जाळिला, आणि त्यांचे मान मरातब बंद करून स्वारी करवीरीं आली.

याच सुमारास आजरे तर्फेची व प्रसिद्ध मनोहरगड वगैरे संबंधीं घांटावाली दुतर्फी अम्मल होता. त्या अमलाची एकतर्फी होऊन आजरें तर्फेतील निम्मे बेरजेचे गांव नेमून व घांटाखालच्या अमला मोबदला वरघांटी कंकणवाडी तर्फेतील गांव नेमून त्यांच्या यादी धारवाडाहून आनंदराव त्रिंबक वकील यांच्या नांवें होऊन आल्या, त्या अन्वयें गांव स्वाधीन होऊन अंमल बसला.

दुतर्फी अमलाची एकतर्फी होते.

इतक्यांत प्रतिनिधि यांस अयोग्य कर्म केल्याबद्दल पश्चात्ताप होऊन त्यांजकडून बोलणें आलें, आणि मोठा नजराणा देऊन त्यांनीं महाराजांचें दर्शन घेतलें. थोडे दिवस करवीरीं राहिले, आणि निरोप घेऊन परत गेले. महाराजांनींही त्यांचे पूर्वींचे सर्व मानमरातब पूर्वींप्रमाणें त्यांजकडे चालू केले.

प्रतिनिधि पश्चात्ताप पावून शरण येतात. सन १८२६ इ०

पाटणकर सरलष्कर हे निपाणकरांचे माउसबंधु असल्यानें भीममहाराज शिवछत्रपतीच्या कारकीर्दींत निपाणकर यांस अनुकूळ होऊन त्यांनीं दौलतीची खराबी केली होती, यास्तव त्यांजवर रोष होता. ते राजाज्ञाबरोबर चापलीनसाहेबांकडे पुण्यास गेले होते. ते तिकडून परत आल्यावर त्यांचे घरीं कांहीं दिवस पाहारा ठेवून त्यांस कोल्हापुराहून घालवून दिलें. तेव्हां ते निपाणीस गेले, आणि तेथें जाऊन मेले. यामुळें सरलष्कर हें पद रिकामें होतें. तें पद ह्मणमंतराव निंबाळकर यांस देण्याचा निश्चय झाला. त्यांजकडून अतिशय मोठा नजराणा घेऊन आषाढ शुद्ध ५ इंदुवारीं अष्टप्रधान वगैरे सर्व मानकऱ्यांस आणून दिवाणखान्यांत कचेरी झाली, आणि वस्त्रें अलंकार शिक्का मोर्तब हत्ती व सरंजाम देऊन पदाधिकार दिला.

निंबाळकर यांस सरलष्करी मिळते, तारीख १० जुलई सन १८२६ इ०

तसेंच उदाजीराव चव्हाण हिंमतबहादूर यांचे चिरंजीव रताजीराव चव्हाण यांस हिंमतबहादूर हा किताब देणेचा संकेत ठरून सदरी लिहिल्या सांप्रदाया प्रमाणें श्रावण वद्य ५ रोजीं पदाधिकार देऊन हलकर्णी तालुका सरंजामांत दिला. त्याच दिवशीं रताजीराव चव्हाण यांस त्यांच्या बापाचा

रताजीरावास हिंमतबहादुरी मिळते. तारीख २१ आगष्ट

**उमदेतुल् उमराव** हा किताब दिला.

नागाव्याबद्दल ऐवज भरणा महाराजांकडून न झाल्यामुळें त्या ऐवजाच्या फेडीस चिकोडी व मनोळी तालुके कंपनीसरकारनें आपल्या ताब्यांत घेतले. ताब्यांतील तालुके गेल्याबद्दल महाराजांस अत्यंत खेद वाटत होता, व ते परत मिळवावे अशी फार इच्छा होती. याकरितां ते तालुके परत मिळविण्यास्तव कारभारी वगैरे मंडळींच्या विचारें नामदार **एलफिन्स्टनसाहेब** गव्हरनर यांस समक्ष विनंति करण्यासाठीं महाराज वड्यास्वारीनिशीं पुण्यास भाद्रपद अखेरीस (सन १८२७ सालीं निघाले. बरोबर १००० स्वार १६०० पायदळ १६ हत्ती आणि शेंकडो हरकारू उंट असा सरंजाम घेतला होता. रामापूर, कमळापूर, येथें मुकाम करून तेथेंच विजयादशमी केली. आणि तेथून ५ व्या दिवशीं जेजुरीस स्वारी जाऊन पोहोंचली. तेथें देवदर्शन करून कुच केलें, आणि मध्यें एक मुकाम करून दुसऱ्या दिवशीं स्वारी पुण्यास जाऊन पोंचली. स्वारी आल्याचें वर्तमान नामदार गव्हरनर साहेबांस समजतांच सर्वसाहेब लोकांसुद्धां सामोरे जाऊन भेटी झाल्या, व खैरखुषीचीं बोलणीं झालीं. नंतर पर्वतीच्या पिच्छाडीस उतरण्याचा बेत ठरून डेरे दिले होते, तेथपर्यंत महाराजांस पोंचते करून साहेब परत गेले. महाराजांच्या सन्मानार्थ २१ तोफांची सलामी दिली.

> चिकोडी व मनोळी तालुके परत मिळविण्यासाठीं महाराज पुण्यास जातात. सपटंबर सन १८२७ इ.

नंतर दुसऱ्या दिवशीं महाराजांची स्वारी गव्हरनर साहेबांच्या भेटीस त्यांच्या बंगल्यास गेली. साहेब बाहेर येऊन महाराजांस हातीं धरून बंगल्यांत घेऊन गेले. व समारंभानें भेट झाली. त्यावेळीं कामकाज प्रकरणीं जीं बोलणीं व्हावयाचीं होतीं तीं झालीं. त्या भेटींत तालुके ठेवण्याचे ब्रिटिश सरकारचे हेतु स्पष्टपणें कळविण्यांत आले. महाराजांनीं करवीरास परत जावें असेंही सुचविलें. दुसऱ्या दिवशीं साहेब महाराजांच्या परत भेटीस त्यांच्या डेऱ्यांत आले. त्यावेळीं शहरापासून डेऱ्यापावेतों दोहोंबाजूंनीं रोषनाई केली होती, व लोक उभे केले होते. साहेब येऊन भेटी झाल्यावर त्यावेळींही कामकाजसंबंधीं बोलणीं झालीं. तेव्हां गव्हरनर साहेबांनीं सांगितलें कीं, ऐवजाची फेड झाल्याशिवाय तालुके परत मिळणार नाहींत. याकरितां विनाकारण येथें न राहतां स्वारी करविरास परत जावी. असें सुचविलें नंतर

दारू काम पाहून साहेब परत गेले.

इतक्यांत कांहीं कारण प्राप्त झाल्यामुळें गव्हर्नरसाहेब साताऱ्यास गेले. तेथील काम आटपून लौकरच परत आले. साहेब परत आल्यावर महाराजांनीं पुन्हा भेट घेतली. तेव्हांही तेंच उत्तर मिळालें. तें त्यांस न रुचून अर्जावर अर्ज करून आपल्या हट्टानें सरकारास कंटाळा आणावा, आणि आपलें कार्य साधून घ्यावें, या इराद्यानें स्वारी पुण्यास सुमारें तीन महिने राहिली. पुण्यास स्वारी असेपर्यंत त्यांचें सरकारशीं फार गैरशिस्त व बेपर्वाईचें वागणें होतें. शेवटीं तीन महिने लोटल्यावर एके दिवशीं पुण्याच्या रिसाल्यांतील एका स्वारास जखम केली. याबद्दल सरकारचा अपशब्द येईल, या भीतीनें स्वारी एकाएकीं पुण्याहून निघाली. ती जेजुरीस मुक्कामास आली. तेथें वाठारकर निंबाळकर यांणीं महाराजांस मेजवानी करून वस्त्रें, अलंकार व घोडा दिला. तेथून मसुरावरून श्रीच्या दर्शनाकरितां चाफळास स्वारी गेली. तेथून पाटणाहून मलकापुरास आली. व तेथून कुच करून करवीरनजीक येऊन दाखल झाली. नंतर सुमुहूर्तानें शहरांत प्रवेश केला.

स्वारी तीन महिन्यां न्यांनीं पुण्याहून परत येते. दिजंबर सन १८२७.

वाटेनें लोकांस लुटलें. त्यांचीं घरें जाळिलीं व दुसऱ्या अनेक रीतींनीं लोकांस त्रास दिला. कोल्हापुरास आल्यावरही त्यांचे दंगेबखेडे व प्रजेवरचा जुलूम अगदीं बंद झाला नाहीं. याकरितां महाराजांस ताळ्यावर आणण्याकरितां बेळगांवाहून एक पलटण रवाना झाली. तेव्हां आपणापासून इतःपर कांहीं अपकृत्य घडणार नाहीं, अशी महाराजांनीं कबूली केली, आणि पलटण माघारी गेली. परंतु महाराज आपलीं वचनें लौकरच विसरले. आणि पहिल्याच्या दसपट त्यांनीं प्रांतांत जुलूम सुरू केला. महाराजांचे स्वार सर्व देशाची संफजंगी उडवूं लागले.

बेळगांवाहून पलटण येते. सन १८२८.

तोरगलकर सेनाखासखेल हे हुकुमाविरुद्ध वर्तणूक करूं लागले, यास्तव त्यांच्या बंदोबस्ताकरितां स्वारी तोरगलास गेली. तेथें पोहोंचल्यावरसुद्धां सेनाखासखेल यांणीं बदमामली केली. तेव्हां स्वारी कटकोळास गेली, व तें ठाणें घेऊन

स्वारी तोरगल व कटकोळाकडे जाते. सन १८२८ इ.

---

* बुवासाहेबांच्या एका बखरींत असें लिहिलें आहे कीं, कामकाजाचे बंदोबस्त व्हावयाचे होते. ते तीन महिने राहून करून घेऊन साहेबांचा निरोप घेऊन स्वारी निघाली.

तेथील बंदोबस्त केला. तेथून स्वारी ठाणें मुगळीहाळ येथें गेली. त्यावेळीं ठाण्यांतील लोकांनीं महाराजांवर गोळी टाकिली. त्यासमयीं महाराजांच्या कृपेंतील नाथाजी शिंदे गोळी लागून पडला. सबब ठाण्यावर गर्दी करून हल्ला केला. ठाण्यांत लोक थोडे असल्यामुळें जेरीस येऊन ठाणें सोडून निघून गेले. या कामांत आपाजीराव जाधव यांणीं फार मेहनत केली. म्हणून त्याचा जप्तमुलूक हा किताब होता, तोच त्यास देऊन सरंजामास तीन गांव दिले. नंतर स्वारी तेथून परतली. वाटेनें तोरगलकरांचे गांव लुटून लोकांस फार यातना भोगावयास लाविलें.

नंतर कृपेंतील मंडळीच्या सल्यानें आणखी नवी फौज ठेवून कागलकर व इचलकरंजीकर यांच्या गांवगन्ना उपद्रव सुरू केला. हीं संस्थानें इंग्रजसरकारच्या जाहेदारीखालीं होतीं. सन १८२६ च्या तहनाम्यांत यांस उपद्रव देणार नाहीं असें कबूल केलें होतें. तत्राप गांवगन्ना त्रास देऊन त्यांचे सरंजाम त्यांजकडून हिसकावून घेऊं लागले. तेव्हां चोंहोंकडून धारवाडास बोभाटा गेला. इतक्यांत एक क्षुल्लक गोष्ट घडून ब्रिटिशसरकारचे अखबरनवीस यांच्याशींही महाराजांच्या लोकांनीं धक्काबुकी केली. वैष्णवस्वामी श्रीजगदंबेच्या दर्शनास करवीरीं आले होते. त्यांजपाशीं एक हत्तीचें लहान पोर होतें. तें स्वामींनीं आपणास द्यावें, या हेतूनें स्वामीस परवानगीशिवाय बाहेर जाऊं देऊंनये, म्हणून वेशीवरील लोकांस ताकीद होती. हें वर्तमान स्वामीस कळतांच त्यांनीं अखबरनवीस यांस विनंति केली कीं, आजच आम्हांस शहराबाहेर पोंचवावें. अखबरनवीस हे वैष्णवच होते. त्यांनीं सांगितलें कीं "आपण ब्रिटिश सरकारचे रयत आहां. तुम्हांस महाराजांस अटकावकरण्याचा अधिकार नाहीं." यास्तव स्वामीस बाहेर घालविल्याशिवाय भोजन करणार नाहीं, असें सांगून महाराजांची परवानगी न घेतां, आपण जगेवर जाऊन स्वामीस बाहेर जबरीनें घालविलें. त्यावेळीं ६ घटिका रात्र झाली असून रविवार दरवाजांत तेथील लोकांची व अखबरनवीस यांची कटकट होऊन धक्काबुकी झाली. त्या संतापानें अखबरनवीस घरीं न जातां पारसनवीस यांच्या घरींच रात्रीं राहिले. दुसऱ्यादिवशीं महाराजांची स्वारी येऊन अखबरनवीस यांचें समाधान करून त्यांस घरीं पोंचतें केलें. वैष्णवस्वामीचें खटलेंही धारवाडास समजलें. असा महाराजांविषयीं चहूंकडून बोभाटा झा-

महाराजांचें गैरवर्तन. ब्रिटिश सरकारची फौज येते. व नवीन तहनामा ठरतो. सन १८२९

ला आणि गिल्ले जाऊं लागले. तेव्हां ब्रिटिशसरकारास विचार करणें भाग पडलें. कारण सन १८२७ सालीं फौज आली त्यावेळीं महाराजांनी ज्या गोष्टी कबूल केल्या होत्या. त्याप्रमाणें त्यांजकडून बिलकूल वर्तन न घडतां उलट दुर्वर्तन वाटलें. यामुळें मेहेरबान जोशीया निसबिट साहेब धारवाडचे मुख्य कलेक्टर व पोलिटिकल एजंट पुष्कळ फौज घेऊन धारवाडाहून निघाले. ब्रिटिशसरकारची फौज ही तिसऱ्यावेळीं कोल्हापुरास आली. मौजे बोरवाड येथें मुक्कामास असतां निसबिटसाहेबांनीं सात रोजांचे आंत फौज घालवून कंपनीसरकारच्या इतल्यानें चालावें, म्हणून महाराजांस पत्र पाठविलें. त्यावेळीं कोल्हापुरास ३००० आरब होते. तरी लढाईचा वगैरे मुकदमा न करितां कंपनी सरकारच्या इतल्याशिवाय चालण्याचा बिलकुल इरादा नाहीं, असें उत्तर लागलेंच अखबरनवीस यांजबरोबर पाठविलें. उत्तरांत लिहिल्याप्रमाणें महाराज वागतात किंवा नाहीं, हें पाहण्याकरितां कोल्हापूर, पन्हाळा, पावनगड वगैरे पांच किल्यांच्या सोडचिठ्या व किल्या मागण्यास पाठविलें, आणि नवीन लोकांस निरोप देऊन घालवावें म्हणून सांगून पाठविलें. त्याप्रमाणें नवीन शिबंदी घालवून किल्यांच्या सोडचिठ्या व किल्या देऊन राजाज्ञ, जिवराव जाधव, व पारसनवीस यांस पाठविलें. नंतर चिकोडी व मनोळी तालुके पूर्वीं दिले ते परत द्यावे, असें मागणें आलें. त्या अन्वयें त्या तालुक्यांच्याही सोडचिठ्या दिल्या. नंतर उभयतांकडील एकंदर मजकुराचें बोलणें होऊन तहनामा ठरून मुंबईस लिहून गेलें. तिकडून सुमारें दीड महिन्यानें मंजूरी आल्यावर तहनाम्यावर सह्या शिक्के झाले. तो तहनामा येणें प्रमाणेः-

श्रीमन्महाराज छत्रपतिसाहेब करवीरकर व कंपनी इंग्रजबहादूर यां दरम्यान जाहला तो तहनामा; आंकीं सरकार दौलतमदार कंपनी इंग्रजबहादूर व श्रीमन्महाराज राजे शहाजी छत्रपति संस्थान करवीरकर यां दम्यान सुलाह व दोस्तीबद्दल छ २४ माहे जानुआरी सन१८२६ इसवीचा तहनामा झाला आहे. त्यावर महाराज छत्रपतिसाहेब यांनीं कायम न राहतां त्यांचे बरदिलाफ बहुतांठ अंमल चालवून तहनामा मोडला व सरकार कंपनीच्या दोस्तींत कसूर आणिली. याजवरून करवीर मुक्कामीं मिस्तर जोशीया निसबिटसाहेब बहादूर सर कलेक्टर व पोलिटिकल एजंट सुभा धारवाड यांचे आणि श्रीमन्महाराज छत्रपतिसाहेब यांचे दरम्यान पेशजीच्या तहनाम्यांती-

ल कांहीं कलमें रद्द व तबदील करून व कांहीं कलमें कायम केलीं व शर्तीच्या मजबुतीबद्दल कांहीं कलमें नवीन दाखल केलीं. त्यास सन १८२७ इसवी माहे आक्टोबर छ २३ तारखेस तहनामा केला होता. अशास आलीकडे त्यांत कितीएक जरूर असण्याचें तबदिल करून हल्लीं फिमावेन कायम ताजा तहनामा ठरविला तो तपशील:—

१. सदरहू तहनाम्याच्या दुय्यम कलमांत महाराज छत्रपतिसाहेबांनीं आपली फौज कमीकरून लढाईचा मुकदमा नसतां मुलखाच्या बंदोबस्ताबद्दल जरूर असेल तितकीच ठेवण्यांत येईल, अगर जास्त ठेवणें झाल्यास प्रथम इंग्रजसरकारचा सल्ला घेऊं अशी शर्त आहे. त्याचे बरखिलाफ सरकार इंग्रजबहादूर यांच्या इतल्याखेरीज पुष्कळ फौज मिळवून बहुतेक अंमल चालविला. बल्कें कंपनी सरकाराकडून मनाईबद्दल सल्लाही दिला. तरी खातरेंत आणिलें नाहीं. याजवरून आईंदा महाराज छत्रपति साहेबांनीं फौज असुक ठेवावी असा मजकूर व्हावा लागला. सबब हल्लीं ठरविण्यांत येत आहे कीं, महाराज छत्रपति साहेब यांचे इलाख्यांतील गड किल्ले जातीचे पहारे चौकीबद्दल कंपनी सरकारांत मुनासबपाहून त्यांस ठेवण्याकरितां यादी अलाहिदा दिली आहे. याशिवाय पागा व सरंजामी व शेतसनदी वगैरे स्वार एकंदर ४०० व पायदळ ८०० इतकी फौज ठेवावी. यासी जास्ती ठेवूंनये, व सरकार इंग्रजबहादूर यांच्या हुकुमाशिवाय तोफा कोठेंही बाहेर घेऊन जाऊंनये. असा ठराव झालेला आहे. त्यास श्रीमन्महाराज छत्रपतिसाहेब कबूल आहेत.

२. पेशजींच्या तहनाम्याच्या ४ थे कलमांत चिकोडी व मनोळी हे तालुके कंपनीसरकारांतून महाराज छत्रपतिसाहेबांच्या मुखत्यारींत नेमून दिले. त्यास महाराज छत्रपति साहेबांनीं सदरहू तालुक्याचे जमेदार व इनामदार व वतनदार यांचे हक्क व जमिनी मामूल प्रमाणें चालतील, असा करार केला. अशास सदरहू दोन्ही तालुके महाराज छत्रपतिसाहेबांस पेशजी देण्याचें कारण हेंच कीं, पेशवे सरकारची दौलत कंपनीसरकारचे सिफुर्दीत आली. तेव्हां महाराज छत्रपतिसाहेबांस व कंपनी सरकारास दोस्तीचा शिलशिला पुस्त दरपुस्त चालावयाबद्दल कंपनी सरकारांतून तालुके इजायत केले. त्यास महाराज छत्रपतिसाहेबांनीं दोस्तीवर नजर न ठेवितां बहुत कसूरी आणिली, व इनामदार व वतनदार यांचे हक्क वगैरेस अ-

डथळा झाला, व तालुक्यांत जुलूम व ताअदी बहुत चालविली. सबब कंपनीसरकारांतून अजराह दोस्ती जितका तालुका देण्यांत आला, तितका तालुका सरकारास ओलीस द्यावा, परंतु महाराज छत्रपतिसाहेबांस तो परत मिळणार नाहीं, असा ठराव झाला. त्यास महाराजछत्रपतिसाहेबांनीं कबूल करून दोन्ही तालुके ओलीस दिले आहेत, व आइंदा यांचा दावा करणार नाहींत.

३. पेशजींच्या तहनाम्याच्या ७ वे कलमांत श्री॰ भाऊ महाराज व बाबा महाराज यांच्या जमिनी व हक्क यांच्या हयातीपर्यंत इंग्रजसरकारच्या बाहेदारीनें चालतील; परंतु सनदांवरहुकूम व शिरस्त्याप्रमाणें यांच्या अवलादीचा हक्क असेल तो बाहेदारी महकूब झाल्यानें हरकत होणार नाहीं, अशी शर्त आहे. त्यास महाराज छत्रपतिसाहेबांकडून वारंवार इजा पोंहचून गांव वगैरे जप्तींत येतात. त्यास ठरविला जातो जेः- मशारनिल्हे श्री॰ भाऊ महाराज व बाबा महाराज यांचे गांव व जमिनी हक्क वगैरे आलाहिदा यादी दिली आहे त्याप्रमाणें त्यांचे पुस्तदरपुस्त सरकारबाहेदारीनें चालतील. त्यास महाराजछत्रपतिसाहेबांकडून हरकत होणार नाहीं.

४. विश्वासराव घाटगे यांजकडे कागल तालुक्याचे ८॥ साडे आठ गांव चालत होते. त्यास मशारनिल्हेचा काळ झाल्यावर दोन गांव त्यांच्या कुटुंबाकडे चालवून बरकड गांव **महाराज छत्रपति** साहेबांनीं जप्त केले. त्यास हल्लीं महाराज छत्रपतिसाहेब करार करीत आहेत जेः- मशारनिल्हे असतांना त्यांजकडे चालत होते ते ८॥ साडेआठ गांवही त्यांच्या वारसदारांस चालवितील. त्यास हरकत करणार नाहींत.

५. अकिवाट येथील ठाण्यांत एकसर चोरलोक आश्रा करून राहून अतराफ कंपनी इलारव्याचे सरंजामीदार वगैरेच्या ताब्यांत चोऱ्या व दरवडे वगैरे बहुतेक चालविले. सबब त्यांचा बंदोबस्त व्हावा. याकरितां मौजे अकिवाट हा गांव किल्यासुध्दां व त्यास लागत असतील ते गांव देखील १०,००० रुपये वसुलांबाबत कंपनी सरकारांत द्यावे. आइंदा सदरहू फिरून गांव व ठाणें महाराज छत्रपतिसाहेब यांसीं येणार नाहींत. असा कंपनी सरकारांत ठराव झाला. त्यास महाराज छत्रपति साहेबांनी सदरीं प्रमाणें द्यावयास कबूल केलें, व आइंदा याचा दावा करणार नाहींत.

६. महाराज छत्रपतिसाहेबांनीं तहनाम्याच्या हरजीत फौज भारी जमाकरून नुकसानी व जुलुम व ताअदी चालवून तहनामा मोडला. त्याजवरून कंपनीसरकारची फौज येण्याचें कारण पडलें. त्यास महाराज छत्रपतिसाहेबांनीं आइंदा आपणाकडून अशी वर्तणूक घडणार नाहीं, असा कंपनीसरकारच्या भरवशाबद्दल करार करितात कीं, करवीरच्या किल्यांत व पन्हाळगडावर कंपनीसरकारांत जरूर दिसेल, तोंपर्यंत कंपनीसरकारचें ठाणें राहील. त्याचा खर्च महाराज छत्रपतिसाहेब कंपनीसरकारास पोंहोंचवीत जातील.

७. पेशजीच्या तहनाम्याच्या आलीकडे सन १८२६ इसवींत महाराज छत्रपतिसाहेबांनीं सरकारचे सरंजामीदार अज्जम **गोविंदरावसाहेब पटवर्धन, आपाजीराव शितोळे, श्री॰ भाऊमहाराज व बाबा महाराज** यांची नुकसानी केली ती भरती करून देण्यास मिस्तर **बाबरसाहेब** बहादूर माजि पोलिटिकल एजंट यांशीं करार केले आहेत. त्याप्रमाणें अमलांत न आणितां ते वक्ताशिवाय आलीकडे परतून त्यांवर व कंपनीसरकारावरचे परवर्षीतील दिगर सरदार वगैरे यांजवर जबरदस्ती चालविली आहे; सबब त्यांची देखील चौकशी करून कंपनीसरकारांतून पुरी होऊन ऐवज द्यावयाचा ठरवीला; तो अलाहिदा यादीप्रमाणें बाकी देणें ते रुपये १,४७,९४८ महाराज छत्रपतिसाहेबांनीं द्यावयास कबूल करून कबजांत मजकूर अदा होई तोंपर्यंत पंनास हजार रुपये वसुली तालुका कंपनीसरकारच्या ताब्यांत ठेवावा. ऐवज पोंहोंचता झाल्यावर परतून तालुका महाराज छत्रपतिसाहेब यांशीं लागूजाब करितांना तेथील जमाखर्चाचा वाजवी हिशेब धारवाडसुभ्याचे प्रिन्सिपाल कलेक्टर व पोलिटिकल एजंट देतील.

८. आइंदा महाराज छत्रपतिसाहेबांकडे कारभार चांगला चालवावा याबद्दल लायख असामी कंपनीसरकारच्या पसंतीस जो येईल त्यास मुखत्यारीनें कारभार करावयास कंपनी सरकार सांगतील. त्यांजकडून बंदोबस्त ठेवून कारभार चालवावा त्यास कायम करण्यास व तबदील करण्यास व मह्कूब करण्यास कंपनीसरकार मुखत्यार आहे.

९. पेशजीच्या सदरहू तहनाम्यापैकीं हल्लीं ग्हूच तबदील झाल्या कलमांशिवाय बरकड कलमें कायम आहेत. त्याप्रमाणें हरदुतर्फेनें वर्तणुकींत येतील.

तहनाम्यांत ठरलेलीं कलमें अमलांत आणण्यासाठीं कोल्हापूरच्या दक्षिणेस छावणी करून तेथें पलटणें ठेविलीं. जुन्या कारभाऱ्यांस कामावरून काढून **नारायणराव पंडित राजाज्ञ** यांस कारभारी नेमिलें., कोणी कांहीं गलबल करतील तर त्यांचें निवारण करण्यास त्यांच्या जिम्मेस ५० संत्री दिले. याप्रमाणें बंदोबस्त केल्यावर साहेब चिकोडीस गेले. तेथें असतां **जिवाजीराव जाधव** व दुसरी महाराजांस मसलत देणारी त्यांच्या लोभांतील मंडळी यांस घालवून देण्याकरितां त्यांस राजाज्ञास सांगून चिकोडीस आणिलें. यांस घालविल्यानें महाराजांस फार खेद होईल व आपणावर निमित्य येईल. यास्तव साहेबांची समजूत घालून त्यांस ताकिदी करून निरोप देऊन करविरीं पाठविलें. चिकोडीहून साहेब बेळगांवास गेले. बरोबर राजाज्ञही गेले. व तेथें पुढें कारभार कसा चालवावयाचा, याविषयीं बंदोबस्त करून घेणार होते. इतक्यांत **बुवासाहेब** महाराजांस महामारीचा उपद्रव झाल्याचें वर्तमान आलें. यामुळें पुढील काम तसेंच टाकून साहेबांचा निरोप घेऊन जलदीनें करवीरीं आले. प्रकृतीस आरोग्य झाल्यावर दौलतीचें काम कसें चालवावें याविषयीं धारवाडास जाऊन एजंटसाहेबांचे सल्यानें सर्व शिस्त ठरवून करवीरीं आले. त्या प्रमाणें कारभार चालविण्याविषयीं महाराजांचा शिक्का मोर्त्तबसूद हुकूम घेतला आणि काम चालवूं लागले.

करवीरीं छावणी आली. व नारायणराव राजाज्ञ यांस कारभारी नेमिलें. सन १८२९ इ.

याप्रमाणें **बुवासाहेबांनीं** आपल्या कृतीनें आपलें स्वातंत्र्य घालविलें, मुलूख गमाविला, अधिकारास मुकले, आसमंतात बदलौकीक संपादिला, आणि अब्रू घालविली. हा सर्व परिणाम हलक्या लोकांस जवळ बाळगून त्यांच्या सल्यानें वागल्यापासून झाला. ज्यांची किंमत दीड दमडीची नाहीं, ज्यांस अब्रूची चाड नाहीं, व ज्यांस कोणतेंही हलकें कृत्य करण्यास भीति वाटत नाहीं अशा लोकांच्या आर्जवास व हांजी हांजीस व मधुर बोलण्यास, मर्जी राखण्यासाठीं म्हणावें नसल्या नीच कृत्यांस माना डोलविण्यास किती राजेलोक भुलून त्यांच्या मोहपाशांत पडून नाश पावले आहेत, याचीं उदाहरणें इतिहासांतरीं शेंकडों आढळतात. हा अनुभव असतांही अशा रीतीनें राजे लोक व

हलक्या लोकांच्या सल्यानें चालल्याचे परिणाम.

बडे लोक फसल्याचीं उदाहरणें आपण वरचेवर पाहतों. त्यांस हें बुवासाहेब महाराजांचें उदाहरण सर्वदा ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. बुवासाहेबांचें आरंभापासून हा वेळ पर्यंतचें चरित्र व कारकीर्द वर दिली आहे. ती वाचली असतां अज्ञानी अविचारी व तुच्छ असे हलकट लोक कसा बदसल्ला देतात, धनी कोणतेंही दुष्ट कृत्य करण्यास प्रवृत्त झाल्यास त्यास एका शब्दानें देखील निवारण न करितां त्यास उलट कसें उत्तेजन देतात, अगदीं निरुपयोगी व हलकट कृत्यें करण्याविषयीं कशी भर देतात, चांगल्या व भल्या मनुष्यांविषयीं धन्याच्या मनांत कसें वांकडें आणून देतात, प्रसंग गुदरला म्हणजे नामानिराळे राहून धन्यास हव्या तसल्या अपमानाच्या गोष्टी करण्यास कसें लावितात, आणि आपल्यास न भिल्यामुळें ज्या भल्या व सुष्ट मनुष्यास अपमान करून घालविलें असेल त्यासच बिकट प्रसंगीं कसें तोंड घशीं देतात, इत्यादि गोष्टींबद्दल वाचकांची खात्री होईल. यास्तव राजे व सरदार लोकांस आमची अशी शिफारस आहे कीं त्यांनीं बुवासाहेबांचें चरित्र वाचून सावध व्हावें, आणि हलक्या लोकांच्या भुलथापांस व स्तुतीस भुलून त्यांच्या नादीं न लागतां जे शहाणे विचारी पोक्त वहिवाटलेले आपणास खरें व योग्य असेल तेंच सांगतील, आणि अयोग्य व वाईट असेल तें न करण्याविषयीं मुर्वत न धरितां सल्ला देतील, ज्यांवर आपला भरंवसा आहे, व जे आपलें हित राखतील व अब्रू जाऊं देणार नाहींत, व लोकांत हसें होऊं देणार नाहींत, अशा मनुष्यांस जवळ बाळगून त्यांच्या सल्ल्यानें वागत जावें म्हणजे परिणामी हित होऊन चांगला लौकिक मिळेल. आणि पेंचांत येणार नाहींत.

राज्याची अहवाल.

असो; बुवासाहेबांच्या या अविचारी वर्तनामुळें राज्याची अहवाल कशी होती, बडेलोक व रयत यांची स्थिति कशी होती* याविषयीं चारशब्द लिहून पुढील कारकीर्दीचें वर्णन करण्यास आरंभ करूं.

बुवासाहेब महाराजांच्या कारकीर्दीच्या या दहा वर्षांत खजिन्यांत एक पैसाही शिल्लक नव्हता. सुपीक व भरवसुल्याचे कांहीं प्रांत खालसा झाले, व वसूल कमी होऊं लागला. तथापि राज्य भरभराटींत असतां जो इत-

* मेजर ग्रेहाम यांचा रिपोर्ट

माम होता. व जी फौज होती, व जो लवाजमा होता, तो सर्व ठेविल्यामुळें दौलतीस अतिशय कर्ज झालें. अशा वेळीं देखील त्यांजवळ दहा हजार फौज होती. पदरच्या कामगार लोकांचा पगार वेळच्या वेळीं पोंचत नसे. याजमुळें ते रयतेवर जुलूम करून त्यांस नागवीत. व त्यांजकडे महाराज बिलकूल लक्ष देत नसत. "यथा राजा तथा प्रजा" ही म्हण सर्व काळास सारखी लागू पडते. या प्रसंगीं धन्याचा कित्ता उचलून पदरचे सरदार व बडे लोक हात चालेल त्याप्रमाणें पैसा मिळवीत, व पुढील कांहीं काळजी न बाळगितां अस्ताव्यस्त खर्च करून टाकीत. यामुळें बहुतेक सरदारांच्या जिनग्या व गांवें सावकारांच्या हातीं गेलीं. म्हणून सरंजामी लोक स्वारीबरोबर बाहेर जाऊं लागले म्हणजे त्यांचा लवाजमा व पोषाख वगैरे अगदीं हलका असे.

सैन्यांतील लोकांस वेळेवर पगार मिळत नसल्यानें सारी फौज लुटारू लोकांचा एक मेळाच बनून गेली होती. पोलिटिकल एजंट वरचेवर महाराजांची भेट घेऊन राज्यांतील अंदाधुंदी व जुलूम मोडून टाकण्याविषयीं एकसारखा सल्ला देत; व भेटीच्या वेळीं तसें चालण्याविषयीं महाराजही त्यांना वचन देत. परंतु ती वेळ गेल्यावर महाराजांच्या मनांत ती गोष्ट मुळींच राहत नसे. पुनः ते दुराचारी व बदफैली लोकांसच आपल्या जवळ आश्रय देत, व त्यांची सल्ला घेत. यामुळें आसमंतात दुर्व्यसनें व दुर्गुण याविषयीं कोल्हापूर दरबारची कीर्ति जिकडे तिकडे गाजूं लागली; व राजधानींत अनीति व अनाचार अतिशय वाढले.

सरदारांची स्थिति व वरखेडे. सन १८२८.

सरदार व इतर आश्रित लोकांपाशीं उदरनिर्वाहा पुरता देखील पैसा उरला नाहीं म्हणून ते सर्व महाराजांजवळ राहून त्यांच्या पंक्तीस भिक्षुकाप्रमाणें भोजन करूं लागले. या कारणानें त्यांच्या मुलखांत त्यांचें वजन नाहींसें होऊन त्यांस केवळ हलकट चाकराप्रमाणें लोक मानूं लागले. सर्व सरदार व कामदार राजधानींत येऊन भरले. तसेंच दुसरे श्रीमान व इनामदार हेही बाहेर आपणांस कोणी नागवील, या भीतीस्तव तेही शहरांत घरें दारें करून राहिले. याच कारणास्तव इतर शहरांपेक्षां या शहरची वस्ती पूर्वीपासून इतकी दाट झालेली आहे. राजधानींत सर्व प्रकारचे लोक एक ठिकाणीं जमल्यानें शहरांत पुष्कळ फळ्या झाल्या, आणि खटप-

टी व कारस्थानें हीं अतिशय माजलीं.

तालुक्याच्या मामलेदारापासून ते तहत इनामदारापर्यंत सर्व अधिकाऱ्याची आपले अखत्यार चालविण्याकरितां मुखत्यार पाठविण्याची चाल अगदीं सर्व साधारण झाली होती. सरकारास नजर दिल्याशिवाय कोणतेंच काम मिळत नसे, आणि अशा रीतीनें मिळविलेला हुद्दा केव्हां काढून घेतील याचाही नेम नसे. म्हणून कामावर असतांना हात चालेल तितका पैसा मिळविण्यास कोणी मागें पुढें पहात नसे. कारण त्यावेळीं जो पगार मिळत असे तो तनाखोरीच्या मनोतीबद्दल होता. पगार इतके लहान असत कीं, कुटुंबांतील माणसें एक वेळ जेवून राहिलीं तरीं त्यांस तो पुरण्या जोगा नसे. कोणास मोठें काम मिळालें म्हणजे हें गर्भितच असे कीं, त्यानें रयतेवर जुलूम करून हवा तितका पैसा मिळवावा. कोणाची श्रीमंती त्याच्या पगारावरून न कळतां तो कोणतें काम पाहतो, ह्यावरून त्याजविषयीं अनुमान काढीत. ही दुष्ट चाल कोल्हापुरांत इंग्रजी अम्मल चालू होईपर्यंत चालू होती. ती पुढें हळू हळू बंद होत आतां बहुतेक नाहींशी झाली आहे. आणखी पांच पन्नास वर्षांनीं जसजशी यूरोपांतील सुधारलेली राजरीति अधिकाधिक चालू होईल, तसतशी अशा प्रकारची सत्ता चालविण्याची जुलमी रीति पूर्वीं होती असें सांगितल्यास तें कोणास खरें देखील वाटणार नाहीं.

कामगार

या सर्व गोंधळाचा परिणाम असा झाला कीं, राजा तर विलक्षणच जुलमी होऊन बसला. लोक भिकारी, अडाणी, व अज्ञानी झाले. लोकांचा एकमेकांवर विश्वास, परस्परांमध्यें स्नेहभाव, एकाची दुसऱ्यापाशीं पत, इत्यादि लोकसमाजाच्या सुखास व हिनास अवश्य लागणाऱ्या गोष्टी राज्यांत फार कमी होत चालल्या. राजावर सर्वथैव अवलंबून राहणें या शिवाय निर्वाहाचा दुसरा मार्गच लोकांस दिसेनासा झाला. राजा हवें तें मोठें काम मर्जीस येईल त्यास धडधडीत विकीत असे. दरिद्री झालेले बडे लोक राजाची मर्जी संपादन करण्याकरितां हवीं तीं हलकीं कामें करण्यास प्रवृत्त होऊं लागले. कारण राजा जसा निष्ठुर होता, तसाच उदार व भोळाही

परिणाम.

होता. त्याच्या मनांत जर आलें तर त्यास जिनगी वगैरे बुचाडून घेऊन आज बंदींत घातलें असेल, त्यासच उद्यां पूर्वीपेक्षां दसपट सधन व सुखी करण्यास मागें पुढें पाहात नसे. याप्रमाणें राजाचा जुलूम सोसून घेण्यास या व अशा दुसऱ्या पुष्कळ मोहक गोष्टी होत्या. यामुळें लोक सर्व त्रास निमूटपणें सोसून आपल्या भाग्याचा दिवस कधीं तरी येईल या आशेवर काळक्रमीत असत.

ज्यांवर राजाची मर्जी असे त्यास कोणत्याही गोष्टीची कमताई पडत नसे. त्यास सरकारी पागेंतून पाहिजे त्यावेळीं हवे तितके घोडे वापरण्यास मिळत. तसेंच शिबंदींतून लोकही मिळण्यास अडचण पडत नव्हती. महाराजांच्या पंक्तीस चमचमीत भोजन मिळे. परंतु राजा मोठा चतुर, शहाणा, व सज्ञान नसल्यामुळें, राज्यांत बढती होण्यास लांच लबाडी, फितुरी व हांजी हांजी एवढेंच काय ते मार्ग उरले होते. म्हणून जरी काळ अनुकूल नव्हता तरी जे हुषार, खटपटी, आणि धाडसी असे मराठे होते, त्यांस आपलीं कार्यें साधून घेण्यास पुष्कळ संधि सांपडत असत. या कारकीर्दींत कितीएक साहसी व धाडसी लोक उदयास आले, त्यांत सुभाना निकम हा मुख्य होता.

कारभाराची शिस्त.

तथापि अशा जुलमांत देखील राज्यांत बंदोबस्त राहण्याकरितां जी अवश्य सामग्री ती होती. गांवोगांव पोलीस पाटील व कुळकरणी होते. तालुक्यांनीं मामलेदार असत. त्यांस दिवाणी व फौजदारी अधिकार होते. त्याशिवाय कोल्हापुरास न्यायाधीश म्हणून होते; त्यांजवर अपील महाराजांकडे होत असे. महाराज स्वतः अर्जदारांचा मजकूर ऐकून घेऊन निकाल करीत. त्यावर मात्र अपील नसे. गांवांत धान्य वगैरे महाग विकलें जाऊंनये व लोकांचे हाल होऊं नयेत म्हणून मन मानेल तसे दर ठरवून दुकानदारांस बळजोबरीनें माल विकण्यास लावीत. तथापि मालावर जकाती वगैरे यथास्थीत होत्याच. राज्यांत गुन्हे फार होऊं नयेत म्हणून जे गुन्हेगार लोक पकडले जात त्यांस फार कडक शिक्षा देत असत. परंतु जर कोणी दंड भरण्याचें कबूल केलें तर खजिन्यांत भरणा केल्यावर माफी मिळत असे. तसेंच जमाबंदीकडील कामगार यांनीं जर जुलमानें आणि अन्यायानें पैसा मिळविला तर त्यास मोठा दंडक-

रून तो सर्व पैसा सरकारांत घेत, व त्याच प्रमाणें त्यास शासन करीत. इतका तरी न्याय राजाची नव्यत लागेल त्या वेळीं होत असे.

*नारायणराव राजाज्ञ कारभार पाहूं लागतात.*

नारायणराव राजाज्ञ काम पाहूं लागल्यावर सर्व कामाची नीट शिस्त बसवून व्यवस्थेनें कारभार पाहूं लागले. लांच लबाड्या व जुलूम मोडून टाकण्यास यत्न करूं लागले. पूर्वीचे गर्दे कारभारी यांस कामांतून मतकूब केलें होतें. त्यांच्या दुष्ट सल्यामुळें आपणावर हा प्रसंग गुजरला, असें वाटून त्यांजवर महाराजांची फार गैर मर्जी झाली. त्यांस कांहीं दिवस पाहऱ्यांत ठेविले. नंतर पाण्यांत उभें करून जामग्या पेटवून आंगास लाविल्या. खांद्यावर बंदुकी दिल्या. या प्रकारें त्यांचे हाल करून त्यांस सोडून दिलें. पुढें लौकरच आपल्या दुष्ट आचरणानें जसे लोकांस त्यांनीं क्लेश दिले होते तसे स्वतः क्लेश व दुःखें सोसून गर्दे मरण पावले.

*मुंबईचे गव्हर्नर नामदार मालकमसाहेब करवीरीं येतात. सन १८३० इ.*

नानासाहेब राजाज्ञ यांणीं काम करण्याचा जो क्रम घातला होता, त्यांत स्त्रीभांतील मंडळीचें कांहीं न चालतां त्यांचा नाश होऊं लागला. यामुळें राजाज्ञास काढून आपल्या वतीचा कारभारी नेमून घ्यावा, अशी मसलत करून त्या वेळचे अखबरनवीस रामराव देसाई यांस कारभार देण्याची लालूच दाखवून मंडळीनीं त्यांस अनुकूल करून घेतलें; आणि महाराजांपाशीं राजाज्ञाचा गैरवाका समजावूं लागले. यामुळें दौलतीच्या कामास हरकती येऊं लागल्या. इतक्यांत नामदार मालकमसाहेब मुंबईचे गव्हरनर हे विलायतेस जाणार म्हणून प्रांत पहात व फिरत विजापूर व गोकाकचा धबधबा पाहून करवीरास आले. बराबर निसबिटसाहेब धारवाडचे कलेक्टर व पोलिटिकल एजंट होते. साहेबांची भेट होऊन मेजवानी झाली. नंतर कामकाजांचीं बोलणीं झालीं. त्यावेळीं राजाज्ञ यांच्या सल्यानें चालावें, म्हणजे बढती होऊन लौकीक वाढेल. असा उपदेश करून साहेब डेऱ्यास गेले. दुसऱ्या दिवशीं राजाज्ञ चिरंजीवांसह साहेबांकडे जाऊन दौलतीचें काम बरोबर चालत नाहीं याचीं कारणें समजावून देऊन त्यांनीं निरोप मागितला. त्या वेळीं साहेबांनीं खात्री करणें तशी करून कांहीं एक अंदेशा न घेतां काम करावें असें सांगून

पांच वस्त्रें दिलीं. जाते वेळीं साहेब. महाराजांच्या भेटीस आले. त्यावेळीं ही महाराजांस बहुत प्रकारें चांगल्या रीतीनें चालण्यास उपदेश केला.

स्वारी साहेबाच्या डेऱ्यास भेटीस गेली. त्या वेळीं वाघावर हत्ती घालून वाघ मारण्याची गंमत दाखवावी, म्हणून बरोबर वाघ व हत्ती नेले. आणि शिकारीं कुत्रींही नेलीं. डेऱ्यापुढें वाघ बांधून त्यावर हत्ती घातला. परंतु हत्तीनें वाघास मारिलें नाहीं. तेव्हां वाघावर शिकारीं कुत्रीं सोडिलीं; कुत्रीं वाघावर चालून न जातां त्यांपैकीं जें उत्तम कुत्रें होतें, त्यास मात्र वाघानें धरिलें. सबब महाराजांस फार वाईट वाटलें. तेव्हां हैबतराव गाईकवाड वाघावर चालून गेले. त्यासमयीं वाघानें कुत्र्यास सोडून गाईकवाडास धरिलें. त्याची व यांची झटापट होऊन गायकवाडाच्या आंगास जखमा लागल्या. तेव्हां हिंदुराव गाईकवाड यांणीं वाघ मारिला. गाईकवाड मोठे शूर असी साहेबांनीं स्तुती करून आपल्या डाक्टराकडून त्याच्या जखमा बांधविल्या, व नित्य जाऊन पाहण्यास सांगितलें, आणि महाराजांस निरोप दिला. तेथून गव्हरनरसाहेब सांगलीस निघाले. करवीराहून अळत्यास मुकाम झाला. तेथपर्यंत बरोबर महाराज व राजाज्ञ गेले. तेथून परत जाण्याविषयीं महाराजांस साहेबांनीं सांगितलें; तेव्हां महाराजांचा बरोबर येण्याचा आग्रह दिसला. यावरून जरबेचीं भाषणें बोलले. तीं महाराजांस समजतांच आग्रह धरून उपयोग नाहीं असें पाहून स्वारी करवीरास आली. साहेब सांगलीहून साताऱ्यास गेले. तथें राजाज्ञ यांनीं दौलतीच्या खर्चाच्या व जमेच्या अंदाजाच्या यादी केल्या होत्या. त्या पाहून पसंत केल्या. आणि राजाज्ञास निरोप देऊन साहेब नगरास गेले. राजाज्ञ यांणीं व्यवस्था करून बंदोबस्तानें काम चालविण्याचा क्रम चालविला. लोकांतील मंडळीचें कांहीं चालेनासें झालें. यामुळें ते नाना तऱ्हेचीं गाऱ्हाणीं सांगून राजाज्ञाच्या कामास हरकती उत्पन्न करूं लागले. अखबर नवीस यांस अनुकूल करून घेऊन त्यांजकडून राजाज्ञ काम बरोबर चालवीत नाहींत, म्हणून साहेबांकडे गैरवाका समजावून देऊं लागले. राजाज्ञास कामांतून काढून महाराजांस मुखत्यारी द्यावी, आणि त्यांनीं अखबरनवीस यांच्या सल्यानें काम चालवावें, असें राजकारण सिद्ध करण्याचा बेत करून कारभाराच्या कामास फार हरकत करूं लागले. श्री-

राजाज्ञ कारभारी करितात.

कराचार्य यांस न्यायाधीश पद देऊन, सरंजामास मौजे थेरगांव दिलें राजाज्ञ यांच्या कोणत्याही कामांत दखलगिरी करूं नये. असें मंडळींनीं महाराजांच्या चित्तीं पूर्णपणें बिंबविलें, आणि मुखत्यारी मिळण्याविषयींची खटपट चालविली.

शके १७५१ सालीं सापल मातोश्री उमाबाईसाहेब यांचें वृंदावन ब्रह्मपुरी नजीकच्या ओढ्याच्या संगमाजवळ आहे, व तिकडे स्मशानभूमी आहे. याकरितां वृंदावनापाशीं गंगेस घांट बांधून देवालय करावें, आणि स्थापना करावी. असें महाराजांच्या मनांत येऊन त्या प्रमाणें काम चालवून घांट तयार करविला, व देवालयांत स्थापना केली. त्या संधीस दोहों दगडांमध्यें महाराजांच्या उजव्या पांयाच्या किंगळीजवळचें बोट तुटून जखम झाली. ती आठ पंधरा दिवसांनीं बरी झाली.

पंचगंगेवर घांट बांधितात.

इतक्यांत महाराजांस मुखत्यारी मिळण्याचें राजकारण सिद्ध करून साहेबांची स्वारी बेळगांवास आली. त्यावरून महाराजांची स्वारी करविराहून निघून बेळगांवास गेली. बरोबर राजाज्ञ वगैरे मंडळी होती. बेळगांवांस पोहोंचल्यावर भेटी होऊन बोलणीं झालीं, चांगल्या रीतीनें चाललें असतां दौलतीची बढती होऊन फायदा होईल, असें बहुतप्रकारें महाराजांस व राजाज्ञास साहेबांनीं सांगितलें. दुसऱ्या वेळेस भेटी होऊन एकांतीं बोलणें होत असतां महाराजांकडील मंडळी व मानकरी कचेरींत बसले होते त्यांपैकीं आपाजीराव शिर्के यांजपाशीं बार भरलेलें व घोडा चढविलेलें पिस्तुल होतें. तें कालवशें करून अकस्मात् घोड्यास धक्का लागून उडालें व त्यांतील छरे जवळच्या मंडळीपैकीं अमृतराव राजाज्ञ प्रतिनिधि विशाळगडकर यांच्या पायास लागले. बार होतांच कचेरींत गलबल झाली. तेव्हां जलदीनें साहेब बाहेर येऊन पाहतात तों कांहीं गडबड नाहीं. तत्राप क्रुद्ध होऊन महाराजांस मुखत्यारी देण्याप्रकरणीं वगैरे, बोलणें रहित करून महाराजांस डेऱ्यास जाण्यास निरोप दिला, आणि लगी डंका वगैरे न वाजवितां बेळगांवाहून निघून जाण्यास हुकूम दिला. त्या प्रमाणें महाराज अत्यंत खिन्न हो-

महाराजांची स्वारी बेळगांवास जाते. दरबारांत पिस्तुल उडतें, व महाराजांस निघून जाण्याविषयीं हुकूम होतो. सन १८३० इ०

ऊन हमिदवाड्यास निघून गेले, आणि आपाजीराव शिर्के व त्याजबळ बसलेले नारायणराव भोंसले अनुरकर यांस कैद करून ठेविलें. महाराजांनीं जाते वेळीं मानकरी लोकांस रामराव अखबरनवीस यांस घेऊन येण्याविषयीं पालखी व स्वार देऊन मागें ठेविलें होतें.

मुखत्यारी देण्याविषयींचें सर्व राजकारण रामरावांनीं आकारांत आणिलें होतें, व पिस्तुलाच्या अपघातानें तें सर्व विसकळीत झालें व भलताच प्रसंग गुजरला. तेव्हां पुढें कशी तजवीज करावी याविषयीं सल्ला विचारण्यास रामरावास बोलाविलें, तें स्वाभाविकच होतें. महाराजांचा निरोप मानकरी यांणीं रामरावांस कळवितांच मेहेरबान निसबिटसाहेबांकडे करविरास जाण्याकरितां निरोप मागण्याकरितां गेले. तेव्हां महाराज भकल्यासारखे झाले आहेत; कोठें कोणीकडे जातील याचा नेम नाहीं. तुमच्या जिवास एखादा अपाय मात्र करतील, यास्तव तुम्हीं तिकडे जाण्याचें रहित करून आपल्याबरोबर धारवाडास यावें. असा आसाहेबांनीं रामरावास हुकूम केला; परंतु आपल्या हातीं सर्व कारभार मिळण्यासाठीं केलेली खटपट व्यर्थ गेली असती; म्हणून रामरावांनीं साहेबांची अशी समजूत केली कीं; जरी महाराज भकल्यासारखे झाले आहेत, तरी त्यांचा पूर्ण भरंवसा मजवर आहे, ते माझ्या जिवास कधीं अपाय करणार नाहींत, अशी माझी पक्की खात्री आहे. आणि जर मी न गेलों तर महाराज कोठें कोणीकडे तरी निघून जातील किंवा आपल्या जिवास अपाय करून घेतील, यास्तव मला निरोप द्यावा. म्हणजे मी जाऊन हरप्रकारें महाराजांची समजूत घालून कोल्हापुरास घेऊन जाईन; अशी माझी उमेद आहे. तेव्हां साहेबांनीं त्यांस हुकूम दिला कीं, गलबलीच्या वेळीं कोल्हापूर येथील पलटणावरील कर्नलसाहेबांस तयारींत असून कोल्हापूरच्या किल्यावरील बारगीर शिपायांस महाराजांस आंत घेऊनये, अशी ताकीद देण्याविषयीं पत्र गेलें होतें. यास्तव महाराजांस कोणत्याही प्रकारें हरकत न करण्याविषयीं कर्नलसाहेबांस पत्र घेऊन रामराव महाराजांकडे हमीदवाड मुकामीं आले.

महाराज रामरावास बोलावितात.

तेथें महाराज बहुत दुःखी व कष्टी होऊन रामरावाची मार्ग प्रतीक्षा करीतच बसले होते. रामरावांस पाहतांच आतां कोल्हापुरास जाऊन तों

ड दाखविण्याची मर्यादा राहिली नाहीं. यास्तव कांहीं क्षार घेऊन म-
रून जावें, किंवा देशांतरीं जावें, अशी वेळ गुजरली आहे, असें म्ह-

*रामराव येतात व महाराज कोल्हापुरीं परत येतात.*

णून प्रळय करूं लागले. तेव्हां विषम काळ असल्या-
नें विपरीत घडलें. महाराजांचें जिवंत येणें झालें हा-
च मोठा लाभ समजावयाचा. जिवंत असल्यानें पर-
मेश्वर कृपेनें पुढें सर्व यथास्थीत होईल. या प्रमाणें रा-
मरावानें शांतवन करून कोल्हापुरास जाण्याकरितां स्वारी निघण्याचा बे-
त ठरविला. आणि स्वतः आपण कोल्हापुरास पुढें जाऊन कर्नल साहेबां-
स पत्र दिलें. व पूर्वीच्या पत्रावरून पलटणीची तयारी चालली होती,
ती रहित करून दरवाजावर महाराजांस हरकत न करण्याविषयीं हु-
कूम पाठविला. मागून महाराजांची स्वारी तमाम लोकसुध्दां कोल्हापुरास
येऊन दाखल झाली व खबर बेळगांवास कळविली.

राजाज्ञ यांजविषयीं जवळच्या मंडळींनीं गैरवाका समजाविल्यावरू-
न त्यांजवर मर्जी नसून त्यांनीं कामांत राहूनये अशाविषयीं निसबि-

*राजाज्ञ काम सोडतात.*

टसाहेबांकडे थैल्यांवर थैल्या जाऊन अखबरनवीस
हेही सरकारचे विश्वासू व हुषार नोकर आहेत, त्यां-
च्या इतल्यानें आम्हीं कारभार चालवितों त्यास परवानगी असावी. अ-
शाबद्दल निसबिटसाहेबांकडे विनंति केली होती. त्याचा जबाब अनु-
कूलतेचा आला. तिकडून जबाब येतांच राजाज्ञ यांणीं शिल्लक व दा-
स्तान यांच्या यादी तयार करून महाराजांपाशीं गुदरल्या आणि का-
म पाहण्याचें बंद केलें.

रामरावास कारभार करण्यास ज्या अडचणी येणार त्या पुऱ्या
समजल्या होत्या. ज्या मंडळीच्या अनुकूलतेवरून आपणास कार-

*कारभार करण्यास येणाऱ्या अडचणी.*

भार मिळाला, त्यांस कामावर घेतलें पाहिजे. महा-
राजांनीं आपण होऊन कारभार दिला. त्यांची मर्जी
राखिली पाहिजे. आणि असें करून काम तर बिन-
बोभाट होऊन रयतेवरचा जुलूम बंद झाला पाहिजे. त्यास या गोष्टी
खुद्द महाराजांस कारभारांत गोविल्याशिवाय कधीं सिद्धीस जाणार
नाहींत. आणि याच्या अभावीं महाराज मन मानेल तसें वागून ह-
वा तसा खर्च करितील, आणि आपणास नोंडघशीं पडावें लागून

[library stamp]

आजपर्यंत मिळविलेली अब्रू व लौकीक घालविण्याची वेळ येईल. हें रामरावानें पक्कें ताडून या सर्व गोष्टी मोठ्या चतुराईनें तडीस नेल्या. त्यानें महाराजांस अशी विनंति केली कीं, नानासाहेब आपले वडील रत्नाकरपंत यांच्या हाताखालीं कामें पहात असून हल्लीं खुद्द कामें पहात होते. व पेशजी पासून पुरे माहितगार होते तरी त्यांच्या सारख्यांच्या हातून काम न निभावतां बखेडे उत्पन्न झाले. जमा कमी असून खर्च जास्त आहे. सर्व राजधानीची मर्यादा सांप्रदाया प्रमाणें यथास्थीत चालू ठेविली आहे. यास्तव नजर नजराणा, जकात, जसी वगैरे हरएक रीतीनें उत्पन्न करून खर्च चालवावा लागतो. आणि प्रसंग विशेषीं सावकार लोकांपासून कर्ज वाम काढावें लागतें. इतका खटाटोप आपल्या हातून होणार नाहीं, व कारभाराचें काम निभावणार नाहीं. तेव्हां महाराजांनीं सांगितलें कीं, आपण सर्व प्रकारें निभावून घेतों. नानासाहेब यांजवर आपला विश्वास नसल्यामुळें कामाची निभावणी झाली नाहीं. तुम्हांवर पूर्ण भरंवसा आहे. तुम्हीं कोणत्याही प्रकारचा अंदेशा मनांत आणूंनये. जर तुम्हीं या प्रसंगीं आपल्याकडून निभावणी होत नाहीं असें निसबिट साहेबांस कळविलें तर तिकडून कोणी असिस्टंट किंवा कोणी दुसरे कारभारी नेमतील. आणि राजधानीचा सर्वस्वी अबताब जाऊन फार संकटें प्राप्त होतील. यास्तव तुम्हीं कारभार पाहण्याचें पत्करिलेंच पाहिजे. अशी आज्ञा केली. तेव्हां रामरावांनीं कळविलें कीं, महाराजांच्या इच्छेनुरूप कबूल करण्यास सिद्ध आहे. परंतु दोन गोष्टी महाराजांनीं कबूल केल्या पाहिजेत. (१) महाराजांनीं खुद्द तसदी घेऊन एकंदर कामें चालविल्याशिवाय जमाखर्चाची निभावणी कोणाकडून होणार नाहीं. कारण कीं, महाराजांनीं खुद्द पाहिलें असतां जमेची बेरीज पाहून कमजास्त खर्च करणें तो बेतानें होत जाईल. आणि लोकांच्या रोजमुऱ्या बद्दलचा वगैरे दंगा होणार नाहीं. (२) मी जर स्वतः राज्यकारभार पाहूं लागलों, तर नेहमीं कोल्हापुरीं राहावें लागेल. आणि धारवाडास पॉलिटिकल साहेबांकडे वकीलीचें काम करण्यास जातां येणार नाहीं. तिकडे वरचेवर न गेल्यास राजधानी प्रकरणीं खरा मजकूर साहेबांस न कळून हरएक लोकांच्या फिर्यादी वगैरे होऊन बोभाटा हो-

महाराज रामरावास कारभार पाहण्यास सांगतात.

रामरावाच्या शर्ती.

ईल. शिवाय नानासाहेब राजाज्ञ कामांतून निघाले आहेत. ते कारभार पाहूं लागल्यापासून पूर्वींचे कारभारी व वकील मंडळी आज दोन वर्षें इतराजीमुळें घरीं आहेत. हे सर्वत्र मिळून अनेक कुचाळ्या करून बखेडे करितील आणि बदलाम निसबिटसाहेबांपर्यंत जाईल. मागील कारभारी व वकील लोकांची कदीम नोकरी असून आपणाशीं बेमानी केल्यावरून भ्रष्ट झाले आहेत व आपल्या व पोलिटिकल एजंट साहेबांच्या इतराजींत येऊन दोन्ही दरबारांत न यावें, असें झालें आहे व घरीं बसले आहेत. त्यांस जी शिक्षा झाली आहे ती पुरी आहे व ज्यांची क्रिया त्यांजकडे हें लक्षांत आणून त्यांचा उद्धार करावा, व त्यांस कामावर घ्यावें. म्हणजे मी मोकळा राहून त्यांवर देखरेख करीन आणि निसबिटसाहेबांकडे वकीलीचें कामही करून तिकडे कोणत्याही प्रकारें बोभाट होऊं देणार नाहीं. असें सांगतांच या दोन्ही गोष्टींस महाराजांचा रुकार पडला व या प्रमाणें महाराजांचें वचनही घेतलें. नंतर हें सर्व अमलांत आणण्यास मंजुरी घेण्यासाठीं रामराव धारवाडास गेले. आणि साहेबांस त्यांनीं कळविलें कीं; बुवासाहेब महाराजांनीं खुद्द आपल्या दौलतीचें काम पाहिल्यावांचून कोणापासून निभावणी होणार नाहीं. कारण ऐन वसुलाचे दोन तालुके चिकोडी व मनोळी सरकार कबज्यांत गेले असून पूर्ववत् प्रमाणें सर्व खर्च कायम आहेत. यामुळें खर्चाचा तोटा पडून बैदे बखेड्यास कारण होत आहे. महाराजांनीं खुद्द काम पाहिलें म्हणजे ओघाप्रमाणें खर्च ठेवण्यास यत्न होऊन सुरळीत चालेल. तेव्हां साहेबांनीं रामरावास फर्माविलें कीं, तुम्हांस जबाबदार धरूं. परंतु अंतर्यामीं तुम्हीं म्हणतां त्या प्रमाणें व्यवस्था असण्यास आमची परवानगी आहे असा साहेबांचा रुकार घेऊन रामराव कोल्हापुरास आले. नंतर पेशजीचे कारभारी व वकील वगैरे मंडळी यांस राजवाड्यांत बोलावून आणून महाराजांच्या पायांवर घातलें. तेव्हां त्यांणीं आम्हीं सर्वस्वी अपराधी असून महाराजांनीं कृपा करून क्षमा केली पाहिजे. इतःपर चांगली वर्तणूक ठेवीत जाऊं अशी विनंति केली. तेव्हां महाराजांनीं त्यांस निरोपिलें कीं; रामराव सांगतील त्या प्रमाणें कामकाज पहात जावें त्यावरून

जुन्या मंडळींस कामावर घेतात.

जिवराव जाधव आणि रावजी वांकनीस हे पुढें होऊन रामरावाच्या सांगण्या प्रमाणें काम पाहूं लागले. आणि महाराजही खुद्द कामकाजांत लक्ष घालूं लागले, व कारभार बराच सुरळीत चालूं लागला.

पुढें निसबिटसाहेब यांची प्रकृति बिघडल्यामुळें त्यांचा केप आफ् गुडहोप येथें जाण्याचा निश्चय ठरला. बेळगांव मुकामीं दरबारांत पिस्तुलाचा बार झाला. त्या वेळीं महाराजांस पूर्ण अखत्यार मिळण्याचा एकीकडे राहून सक्त इतराजी मुळें महाराजांनीं नौबत डंकासुद्धां न वाजवितां जावें असा हुकूम झाला होता. त्या वेळेपासून अद्याप महाराजांची व पोलिटिकल एजंट यांची भेट झाली नव्हती.

निसबिटसाहेब रजेवर जातात. सन १८३० इ.

निसबिटसाहेब जाण्यास निघाले, तेव्हां रामराव धारवाडास गेले. व त्यांनीं साहेबांस विनंति केली कीं, आलीकडे महाराजांचें वर्तन चांगलें असून कारभारसुरळीत चालला आहे, व रयतेवर जुलूमही नाहीं. नौबत डंका न वाजवितां जाण्याविषयीं हुकूम झाला. तेणेंकरून आपली फार नाचक्की झाली, असें वाटून महाराज तेव्हांपासून फार दुःखी आहेत. आणि सांप्रदाया प्रमाणें वाजत गाजत येऊन आपली भेट घ्यावी, अशी त्यांची फार इच्छा आहे, व तेणेंकरून त्यांस फार संतोष होईल. पिस्तुलाचा बार झाला त्यांत महाराजांचा अंगदीं दोष नसून केवळ पदरच्या सरदारांच्या वेडेपणामुळें घडलें. त्यास निसबिटसाहेबांनीं जातांना पाहतां येईल, असें सांगितलें.

निसबिटसाहेब केप आफ् गुडहोपास जाण्याकरितां धारवाडाहून निघाल्याचें वर्तमान समजतांच महाराजांनीं करवीराहून निघून सामानगड परगण्यांतील तेरणी हलकर्णी येथें मुक्काम करून साहेबांकडे रामरावास पाठविलें. महाराज भेटीच्या इच्छेनें आपल्या समीप येऊन राहिले आहेत, आणि भेटीचा लाभ देण्यासाठीं विनंति करण्यास मला आज्ञा झाली आहे. असें कळवितांच साहेबांनीं पूर्व सांप्रदायाप्रमाणें भेटीस येण्याची परवानगी दिली. तेव्हां महाराज बेळगांवास आले, व साहेबांच्या भेटीचा समारंभ पूर्वी प्रमाणें होऊन बोलणें चालणें पूर्ववत् प्रमाणें झालें. त्यावेळीं महाराज साहेबांस येणें प्रमाणें बोलले " आपली स्वारी प्रकृतीस नीट नसल्यामुळें केप आफ् गुडहो-

महाराज बेळगांव मुकामीं साहेबांची भेट घेतात. सन १८३० इ.

पास जात आहे. त्यास आपणास बहुत दिवसांपासून राजधानी प्रकरणीं माहिती आहे. हरदूकडील पूर्ण भरंवशाचे **रामराम अखबरनवीस** यांच्या विद्यमानें कामकाजें चालत असून हरएक प्रकारें कामाचा बंदोबस्त राहून सुरळीत चाललें आहे. त्यास आपण गेल्यावर आपल्या जागीं जे नवीन कामगार येतील त्यांच्या गैरमाहितीमुळें पोलिटिकल एजंट यांच्या ऑफीसांतील व राजधानींतील कामगारांमध्यें तंटे बखेडे उत्पन्न होऊन आपणास अखत्यार मिळण्यास हरकती येतील. यास्तव आपल्याच कारकीर्दींत अखत्यार मिळाला असतां सर्वोपरी नीट होईल. अशी आमची विनंति आहे. या उप्पर आपणास उक्त दिसेल तसें करावें. समक्ष जिकीर चालवून विशेष तसदी देत नाहीं." अशा प्रकारें बोलणें होऊन निरोप घेऊन महाराज करवीरास आले. बेळगांवाहून गोंव्यापर्यंत रामराव बरोबर गेले. कोल्हापूर प्रकरणाचें वरचेवर स्मरण करून विनंति करीत असत. तेव्हां त्यांस साहेब म्हणाले कीं, आपण जाण्याच्या संधीस जर अखत्यार दिला, तर मागील प्रमाणें दरबारांतील लहान मोठे लोक महाराजांस आणखी मन मानेल तसा सल्ला मसलत देतील, आणि बखेड्यास कारण होईल. या करितां केप-आफ् गुडहोपाहून परत आल्यावर महाराजांस अखत्यार देतां येईल, आलीकडे महाराजांनीं चांगल्या प्रकारें वर्तणूक ठेविली आहे, हें मी समजून आहें. तेव्हां रामरावांनीं कळविलें कीं, महाराज आपण सांगितल्या प्रमाणें ऐकत आहेत. सर्व काम बिन बोभाट व सुरळीत चाललें आहे. महाराज सर्वथैव आपल्यावर भरंवसा ठेवून आहेत. तर कृपा करून महाराजांस अखत्यार देऊन जाणें करावें. मग त्यांच्या नशिबा प्रमाणें घडणें तसें घडेल. या प्रसंगीं एवढी कीर्ति आपण घेतली पाहिजे. या प्रमाणें वरचेवर विनंति केल्यावर त्यांस करुणा येऊन बुवासाहेबांस पूर्ण अखत्यार देण्याविषयीं मुंबई सरकाराकडे पाठविण्याकरितां रिपोर्ट तयार केला. इतक्यांत त्यांचे जागीं नेमलेले **उइल्यम अंडरसन साहेब** त्यांजकडून चार्ज घेण्यासाठीं गोंव्यास आले. तेव्हां कोल्हापूर प्रकरणीं सर्व मजकूर त्यांस समजावून देऊन व रिपोर्ट

महाराजांस पूर्ण अखत्यार मिळाली सन १८३१.

दाखवून मुंबईस रवाना केला. थोड्याच दिवसांत मुंबईहून हुकूम आला, आणि **अंडरसन** साहेबांनीं महाराजांस पूर्ण अखत्यार दिला. आणि महाराज सर्व कामें पेशजी प्रमाणें रामरावाच्या विद्यमानें पाहूं लागले.

नंतर शके १७५२ सालीं पौष शुद्ध १२ रविवारीं **आनंदीबाईसाहेब** वाडा पांच यांस सरनोबत यांच्या घरीं प्रथम पुत्रोत्साह झाला. ब्राह्मणास दक्षिणा देऊन बहुत दानधर्म केला, आणि शहरांत साखर वांटिली. मोठ्या समारंभें करून बारसें केलें आणि नांव **श्रीमन्महाराज शिवछत्रपति** असें ठेविलें. पुढें **नर्मदाबाईसाहेब** वाडा सहा यांस महिपतराव भोंसले अलुरकर यांच्या घरीं पौष वद्य १० रोजीं प्रथम पुत्रोत्साह झाला. त्याचाही समारंभ सदरहू अन्वयें करून नांव **श्रीमन्महाराज शाहुछत्रपति** असें ठेविलें, त्यापासून **नर्मदाबाईसाहेबांची** प्रकृति उपद्रवीक दुखण्यानें क्षीण होत जाऊन माघ वद्य १४ रोजीं त्यांनीं कैलासवास केला. त्यांचें सार्थक करून उत्तरकार्य यथासांग झालें.

शिवाजी उर्फ बाबासाहेब यांचा जन्म तारीख २६ डिसेंबर सन १८३० इ.

शहाजीचा जन्म तारीख ८ जानेवारी सन १८३१ इ.

**प्रतिनिधि** संस्थान विशाळगड आणि **पंत अमात्य** बावडेकर या दोहींकडील घांटाखालच्या कोंकण प्रांतांतील गांवांत दुतर्फा अंमल होता. त्याची एकतर्फी होण्यास गांवगन्नाच्या यादी बेरजांसहीत, थैलीसमागमें धारवाड सुभ्याचे कलेक्टर यांजकडून शके १७५० सालीं आल्या होत्या. त्याजवरून **प्रतिनिधि** व **अमात्य** यांजकडील कारकून करवीरास आणवून आलेल्या यादी देऊन एकतर्फी करून घेण्याकरितां रत्नागिरीचे कलेक्टरसाहेब यांजकडे पाठविले. त्या प्रमाणें कारकून जाऊन एकतर्फीचें बोलणें चाललें असतां कोणतेंच शेवटास न जातां तो क्रम तसाच एकाएकीं तहकूब ठेविला. कारण **माधवराव पंडित** प्रतिनिधि यांस जवळच्या मंडळींनीं फिसालत देऊन विशाळगड संस्थानावर महाराजांचा हुकूम नसून स्वतंत्रपणें वागावें, असा सल्ला दिला; आणि मुंबईचे गव्हरनरसाहेबांकडे थैली पाठविली कीं, पूर्वीपासून महाराज सरकारचा हुकूम संस्थानावर कधीं नसून वहिवाट झाली नाहीं. सबब हल्लीं एकतर्फी होण्याप्रकरणीं जाबसाल इकडून परभारें व्हावे. यावरून हलकट सं-

दुतर्फी अंमल एकतर्फी करण्याविषयीं वाटाघाट व त्याची तहकुबी.

इळी कसला हवा तसला वेडेपणाचा सल्ला देण्यास चुकणार नाहींत, हें राजे लोक व वडे लोक यांनीं ध्यानांत ठेवण्याजोगें आहे.

नगारखाना बांधण्यास सुरुवात.

शके १७५३ सालीं छ १४ माहे रज्जब रोजीं वाड्यापुढील नगारखाना बांधण्याच्या कामास सुरुवात केली. (तारीख ११ जानेवारी सन १८३२ इसवी.)

प्रतिनिधि यांचा मृत्यु, व दत्तकाविषयीं घोंटाळा. तारीख १५ एप्रील १८३२ इ०

याच सालीं माधवराव प्रतिनिधि यांस दुखणें लागून प्रकृति फार हैराण झाली. यांस औरस संतति नव्हती; यामुळें पदरच्या कामगारमंडळींनीं दत्तक पुत्र घेण्याविषयीं विचारिलें. तेव्हां हिवऱ्याहून स्वगोत्री मुलगा आणून दत्तक करावा, असें सांगितलें. त्या प्रमाणें प्रतिनिधींची जनक मातोश्री हिवऱ्यास होती. त्यांजकडे तावडतोब पत्र लिहून मुलगा घेऊन येण्याकरितां कारकून पाठविले, आणि टप्प्यावर घोडेस्वार ठेविले. इकडे प्रतिनिधि यांची प्रकृति अधिक विघडून स्मृति नाहींशी झाली. त्या समयीं बखेडेखोर मंडळींनीं आपल्या हातीं दौलत असावी, या लोभानें कांहीं बाया मिलाफास घेऊन परगोत्री मुलगा मलकापुराहून आणून दत्तक घेण्याचें ठरविलें. महाराज सरकारच्या हुकुमानें दत्तक घेण्याची वहिवाट असून हुजूर हुकुमाशिवाय आणि ज्येष्ठ मुलास दत्तक घेऊंनये असा शास्त्राधार असतां, तो एकीकडे झुगारून सखाराम नारायण आष्टेकर या नांवाच्या एका ज्येष्ठ पुत्रास मलकापुराहून आणून फाल्गुन शुद्ध ६ गुरुवारीं सायंकाळीं तीन घटिका दिवसास दत्तविधान करून नांव त्रिंबकराव असें ठेविलें. नंतर थोड्या अवकाशानें प्रतिनिधि सावध होऊन शुद्धीवर आले, आणि झालेली गोष्ट समजून घेऊन फार अयोग्य झालें, असें त्यांस वाटलें. तेव्हां विठ्ठल अणाजी सबनीस हे त्या मंडळीस मिलाफी नव्हते. सबब त्यांस आणवून एकांतीं सर्व मजकूर सांगवून छ ७ माहे सव्वालचें विनंतिपत्र महाराजांकडे पाठविलें. सेवकाची प्रकृति फार हैराण होऊन निभावणीचा विचार न दिसल्यामुळें स्वगोत्री मूल आणविण्यास सांगितलें असतां, लबाड मंडळींनीं तसें न करितां परगोत्री मुलगा आणवून विचार केला तो आम्हांस पसंत नाहीं, व प्रकृतीचा भरंवसा नाहीं. यास्तव स्वगोत्री मुलगा आणून कायम करावा, आणि संस्था-

नचा बचाव करावा, इत्यादि सबनीस विनंति करितील. अशा मजकुराचें पत्र देऊन सबनीस यांस महाराजांकडे पाठविलें. नंतर शके १७५२ साली फाल्गुन कृष्ण १४ छ ११ सव्वाल रोजीं प्रतिनिधि यांचा काळ झाला.

याच समयास प्रतिनिधि यांणीं हलक्या मंडळीच्या फिसालतीनें महाराज सरकारचा हुकूम संस्थानावर नसल्याबद्दल जें मुंबई सरकाराकडे पत्र पाठविलें होतें, त्याजवरून विशाळगडाकडील कोंकणच्या अमलास अटकाव होऊन धारवाड सुभ्याचे अंडरसन साहेब यांजकडून छ १५ सफर सन १२४२ फसलीचें लिहून आलें कीं, प्रतिनिधि यांजकडील जे गाव कोंकणांत आहेत, त्यांजवर १०० वर्षांपासून महाराज सरकारचा हुकूम चालत नाहीं; याविषयीं संशय आला आहे. असा सरकारचा हुकूम आला आहे, त्यास १०० वर्षांपासून कसा काय हुकूम चालत असेल, त्याजबद्दल दस्तैवजी पुराव्यावरून रुजू करावें.

कोंकणच्या अमलास अटकाव. तारीख १० आक्टोबर सन १८३२ इ.

प्रतिनिधींचें पत्र घेऊन आलेले सबनीस यांणीं पारसनवीस यांच्या वर्तीनें नजराणा देण्याचें कबूल करून भगवंतराव प्रतिनिधि यांची थोरली स्त्री राधाबाई इच्या मांडीवर स्वगोत्री दत्तक द्यावा, असें बोलणें लाविलें. परंतु महाराजांनीं पारसनवीस यांस कळविलें कीं, मुंबई सरकाराकडून लिहून आलें आहे, त्याचा पुरावा केल्याशिवाय हें करितां येणार नाहीं, व १०० वर्षांचा पुरावा होणें हें ही कठीण दिसतें. त्यास पारसनवीस यांणीं महाराजांस उत्तर दिलें कीं, याचा पुरावा करणें अशक्य नाहीं, मात्र अखबारनवीस व कारभारी अनुकूल पाहिजेत. त्यांचें म्हणणें पहिला दत्तक कबूल करावा, असें आहे. परंतु तसें करणें अगदीं अप्रशस्त होईल. सबब कोणी भलत्या प्रकारें समजावितील तर न गडबडतां स्वस्थ असावें. सर्व पुरावा काढून हजर करितों. त्यावरून मंडळींनीं पहिल्या दत्तकाच्या तर्फे बहुत प्रकारें सांगितलें. तरी त्यास महाराजांनीं रुकार दिला नाहीं. विरगोंडा देसाई भडगांवकर मयत झाले. तेव्हां त्याची स्त्री आनंदीबाई यांस तेरणीकर देसाई यांचे पुत्र हणमंतराव यांस दत्तक घेणेस हुकूम होऊन छ २९ रबिलावलचीं आज्ञापत्रें झालीं. त्यांस या समयीं बन-

लें नाहीं, म्हणून ते तेरणीसच होते.

पारसनवीस यांणीं सबनीस यांस हाताखालीं घेऊन शकक-र्ते शिवाजी महाराजांपासून कोंकण प्रांतावर व प्रतिनिधि यांजवर हुकूम चालत असल्याचे दाखले, इनामपत्रें, सनदा व प्रतिनिधि यांचीं मानपत्रें व त्यांणीं हरएक प्रकरणीं नजराणा वगैरे दिल्याचे दाखले काढून यादी तयार करून मुंबई सरकाराकडे पाठविण्याचें उत्तर तयार केलें. दाखल्याच्या यादी वगैरे इंग्रजींत तर्जुमे करून छ१५ जमादिलावल सन १२४२ फसलीचें (तारीख १० आक्टोबर सन १८३२ इ॰) उत्तर मुंबईस पाठविलें.

इतक्यांत शके १७५४ सालीं मुंबईचे गव्हरनर अर्ल आफ् क्लेअर मुंबईहून प्रांत पहात व फिरत विजापूर व गोकाकचा धबधबा वगैरे पाहून शिरोळ मुक्कामीं महाराजांची स्वारी होती. तेथें येऊन पोंहोंचले. कार्तीक वद्य ७ (तारीख १४ नवंबर) रोजीं भेट होऊन बोलणीं झालीं. नंतर दौलतीच्या बंदोबस्ताविषयीं सात कलमी यादी दिली. निपाणीच्या खोटपुत्राच्या प्रकरणीं आपणास महाराजांनीं फार मदत केली, असें रामरावांनीं सरकारास कळविलें होतें. यामुळें उइल्यम अंडरसन साहेबांनी विचारिलें कीं, महाराजांनीं निपाणी प्रकरणांत तुम्हांस बहुत प्रकारें मदत केल्याचें ऐकून सरकारास फार संतोष झाला आहे. याकरितां थोडक्यांत महाराजांस कोणत्या रीतीनें संतोष होईल तें विचारिलें. तेव्हां रामरावांनीं विनंति केली कीं, कोल्हापुरास इंग्रजसरकारची छावणी नेहमी राहिल्यामुळें महाराज फार दिलगीर आहेत. या करितां कृपा करून छावणी काढिली असतां महाराजांस बहुत संताष होईल. त्यावरून अंडरसन साहेबांनीं गव्हरनर साहेबांस कळवून कोल्हापूर येथील छावणी उठविण्याविषयीं हुकूम घेतला. पलटणाचे खर्चाबद्दल एक लक्ष तीस हजार आठशें रुपये घेऊन छावणी उठविली. साहेब महाराजांच्या भेटीस येऊन विशाळगड प्रकरणीं सर्व मजकूर समजावून दिला. याच समयीं मिरज मुक्कामीं मोठा दरबार भरवून गव्हरनर साहेबांनीं निपाणी प्रकरणांतील नोकरीबद्दल रामरावास शालजोडी, पागोटें वगैरे पोषाख

नामदार गव्हरनर साहेबांचें आगमन. माहे नोव्हेंबर सन १८३२ इ.

कोल्हापूर येथील छावणी उठली.

देऊन बहुमान केला, आणि सर्व जाहागीरदारांस कळविलें कीं, निपाणीच्या खोट्या पुत्राच्या प्रकरणांत रामरावास फार दुस्मान उपस्थित झाले आहेत. करितां त्यांच्या जिवास व अब्रूस धक्का पोंचला असतां सर्व जाहागीरदारांपासून जाब घेतला जाईल. नंतर मिरजेहून स्वारी पुण्यास जाण्यास गेली.

चिंचलीकर देसाई सुबराव व्यंकटेश हे शके १७४२ सालीं मयत झाले. त्यावेळीं त्यांची स्त्री धनाबाई गरोदर होती. तिजला कन्या झाली; सबब त्यांचे धाकटे सापत्न बंधु रायेजीराव देसाई यांस करार करून नजराणा घेऊन आज्ञापत्रें झालीं; व ते वतनाची वहिवाट करूं लागले. पुढें धनाबाईच्या खर्चाचाही ठराव झाला; असें असतां तें सर्व एकीकडे राहून मंडळीच्या फिसालतीवरून माघ माशीं स्वारी श्रीच्या दर्शनाकरितां डोंगरास असतां भावाबंदांपैकीं एक मुलगा दत्तक घेणेस हुकूम झाला, आणि त्याविषयीं आज्ञापत्रें झालीं. फाल्गुन माशीं मोरो चिटको हुजूरबाजार यांणीं भुदरगडच्या भावाबंदांपैकीं नारोपंत यांस सरकार हुकुमानें दत्तक घेतलें. दत्तविधानाकरितां स्वारी मुद्दाम डोंगराहून आली. त्याच दिवशीं पारसनवीस यांच्या कनिष्ठपुत्राचा व्रतबंध होता, करितां सकाळीं त्यांचे घरीं पानसुपारीस जाऊन नंतर हुजूरबाजार यांच्या घरीं गेली. आणि तेथून स्वारी डोंगरास गेली.

विशाळगड प्रकरणाचा निकाल व नवा दत्तक

विशाळगड प्रकरणाचा विचार होऊन मुंबईचे गव्हर्नर यांजकडून धारवाडसुभ्याचे कलेक्टर यांजकडे हुकूम आला. त्याजवरून धारवाडाहून महाराजांस पत्र आलें कीं, प्रतिनिधि वगैरे सरंजामी यांच्या दत्तक प्रकरणीं इकडे दखलगिरी करण्याचें कारण नाहीं. प्रतिनिधि यांचा पहिला दत्तक कायम करण्यास अथवा दुसरा दत्तक कायम करण्यास महाराज मुखत्यार आहेत. कोंकणप्रांताच्या अमलाचा निकालही महाराजांच्या मार्फत होणेचा आहे. कोंकण प्रांताचा अम्मल अमानत आहे, तो परत देण्याविषयीं रत्नागिरीचेकडे लिहून गेलें आहे. त्यावरून राधाबाई यांस बोलावणें पाठवून आणविली, आणि हिवऱ्याहून नारायण बाबुराव यांचे दुसरे पुत्र बाबुराव यांस परभारें आणवून नजराण्याचा वगैरे ठराव करून शके १७५५ वैशाखवद्य ९ रोजीं प्रातःकाळीं राजाज्ञा यांच्या घरीं स्वारी जाऊन य-

थाशास्त्र दत्तविधान झालें, व नांव अमृतराव भगवंत ठेविलें. त्या

प्रतिनिधीचें दत्तविधान होतें. तारीख १३ मे १८३३

च दिवशीं तिसऱ्या प्रहरीं श्री अंबाबाईच्या चौकांत सदर होऊन मानकरी वगैरे आणवून अमृतराव यांजकडून श्रीसन्निध दुधभाताची क्रिया घेऊन इमान पत्र घेतलें; त्यांतील हांशील:- स्वामींनी कृपाळू होऊन पदाधिकार दिला, त्यास स्वामीच्या पांयापाशीं इमानानें राहून वडील सेवा करीत आले, त्याप्रमाणें करून आज्ञे अन्वयें राहून वर्तणूक करूं व पदरच्या लोकांकडून पहिल्या प्रमाणें सेवा घेऊन चालवूं. स्वामीच्या चरणापाशीं व राज्याशीं अंतर करणार नाहीं. राज्यांत हिम हरकत व फितवा होऊं देणार नाहीं; वगैरे मजकुराचें पत्र घेऊन प्रतिनिधीस पदाधिकाराचीं पांच वस्त्रें, अलंकार व शिक्के कटार देऊन अंताजी जिवाजी मुतालिक यांस साडेतीन वस्त्रें दिलीं. नंतर तुम्हांवर कृपाळू होऊन पदाधिकार दिला त्यास दरखदार, गडकरी व इनामदार व किल्ले विशाळगड येथील खर्च व नेमणुका ज्यांच्या त्यांस चालवाव्या. कोंकण व वरघाट पूर्ववत् प्रमाणें घेऊन सेवा इमानें करून रहावें. वगैरे मजकुराचें आज्ञापत्र देऊन निरोप दिला. प्रतिनिधि राजाज्ञ यांच्या घरीं बिऱ्हाडास गेले. त्याच दिवशीं अस्तमान झाल्यावर नाटें होऊन स्वारी विशाळगडीं जाण्यास निघून केरली येथें मुकामास गेली. दुसऱ्या दिवशीं प्रतिनिधि वगैरे आले. तिसऱ्या दिवशीं स्वारी विशाळगडास जाऊन दाखल झाली. विशाळगडावर एकंदर आठ मुकाम झाले. कैलासवासी प्रतिनिधीच्या खाशा बायांस बोलावून त्यांचे खर्चाचे ठराव केले, व त्यांस लुगडीं व शालजोड्या दिल्या. पदरच्या मंडळीस योग्यतेनुरूप सणगें दिलीं. प्रतिनिधि यांनीं महाराजांस मेजवानी केली. श्रीमन्महाराज राजारामसाहेब छत्रपति यांची राणी अंबिकाबाईसाहेब यांनीं महाराजांचा काळ झाल्यावर सहगमन केलें होतें. त्यांचे देवालय बांधण्यास सांगून खर्चाची नेमणूक ठरवून दिली. या प्रमाणें तेथील कामें आटपून स्वारी करविरास आली. पहिले दत्तक त्रिंबकराव यांस करवीरीं आणूनें जोशीराव यांच्या घरीं ठेविलें.

महाराजांस आऊबाई आक्काही कन्या झाली

पुढें शके १७५५ सालींच कार्तिक वद्य ७ रोजीं (तारीख ३ दिसेंबर १८३३) राणीसाहेब वाडा५ या प्रसूत होऊन कन्या झाली सांप्रदायाप्रमाणें समारंभ होऊन

नांव आऊबाई आका ठेविलें.

स्वारी विशाळगडाहून आल्यापासून नगारखान्याचें काम झपाट्यानें चाललें. कामाचा लौकीक ऐकून हिंदुस्थानांतून मोठे कसबी पाथरवट आले, त्यांस कोणास २५ कोणास ३० रुपये असा दरमहा देऊन ठेविले. अशा प्रकारें झपाट्यानें काम चालून शके १७५६ सालीं दरवाजा तयार झाला. तो भाद्रपद वद्य १२ रोजीं जाण्या येण्याकरितां मोकळा केला.

नगारखाना तयार झाला. तारीख १ आक्टोबर सन १८३४ इ०

धारवाडास पूर्वीचे निसबिटसाहेब परत आल्यावर पोटशूळाच्या व्यथेनें मरण पावले, व त्यांच्या जाग्यावर हारीसन साहेब आले. त्यांजकडून महाराजास पत्र आलें कीं, विशाळगडास प्रतिनिधि पदावर कोणाची स्थापना केली तें कळवावें, म्हणजे त्यांच्या नांवें कोंकण प्रांताची एक तर्फी करून देण्याविषयीं रत्नागिरीचे कलेक्टर यांस लिहून जाईल. त्यावरून अमृतराव प्रतिनिधि यांची स्थापना झाली आहे. यास्तव त्याजकडे कोंकण प्रांत सोडून देण्याविषयीं लिहून जावें, असें उत्तर गेलें. त्याप्रमाणें रत्नागिरीचे कलेक्टर यांस लिहून जाऊन एकतर्फीस गांव ११८ व बाकीचे भरतीस रोख ऐवज घ्यावा. असा ठराव झाला, व वसूल जमा झालेला दिला.

विशाळगड कर्यांच्या कोंकणांतील गांवांची एकतर्फी.

नगारखान्यावरील दिवाणखाना घोंटीव दगडांचा करावा, असें महाराजांच्या मनांत आलें. त्यास जोतीबाच्या डोंगरावरील दगड पाहिजेत. यास्तव पदरच्या पांच चार हजार मनुष्यांनिशी स्वारी श्री जोतीबाच्या डोंगरास कार्तिक वद्य पक्षीं जाऊन गायमुखानजीक मुक्काम झाला, आणि दगड काढण्यास आरंभ केला.

नगारखान्यावरील दिवाणखान्यास दगड काढण्यास स्वारी डोंगरास जाते.

स्वारी डोंगरावर असतां यादव कदमगीर, सयाजीराव गाईकवाड बडोदेकर यांचे व्याही, श्रीच्या दर्शनास करवीरीं आले. श्रीचें दर्शन घेऊन डोंगरास गेले. त्यांच्या मनांत आलें कीं महाराजांचे दर्शन घेऊन कांहीं किताब घ्यावा. त्या विषयीं बोलणें होऊन ३० हजार रुपये नजराणा देऊन दर्शनास आले. दर्शन घेतल्यावर त्यांस रण-

बडोद्याचे यादव कदमगीर यांस रणधीरबहादर हा किताब देतात.

धीरबहादर हा किताब मार्गशीर्ष वद्य १२ रोजीं तास रात्रीस दिला, व ते निरोप घेऊन गेले.

इतक्यांत धारवाडच्या सुभ्याचे कामावर पूर्वीचे बेबरसाहेब आले. कोल्हापूर दौलतीचे कारभारी यांणीं रामराव अखबरनवीस यांच्या आश्रयानें फार नुकसान केलें, असें त्यांस समजलें. यास्तव अखबरनवीशीचे कामावरून रामरावांस काढून नरशिंगराव शेंडूरकर यांस नेमिलें. नंतर दौलतींतील बखेडे झालेले साहेबांच्या नजरेस आणण्याकरितां राजाज्ञा धारवाडास गेले, आणि साहेबांची भेट घेऊन एकंदर दौलत प्रकरणीं मजकूर सांगितला. त्यावरून महाराजांस लिहून आलें, परंतु कांहीं विशेष परिणाम झाला नाहीं.

गोविंदराव पंत अमात्य यांस दुखणें लागून प्रकृति फार हैराण झाली. औरस संतति नाहीं. यामुळें त्यांनीं सरकार हुकमाशिवाय भिवराव भास्कर नंदगांवकर यांच्या धाकट्या बायकोचा अडीच वर्षांचा मुलगा दत्तक घेऊन त्याचें नांव रघुनाथराव ठेविलें. नंतर प्रकृति ताब्यावर येण्यास बहुत उपाय केले, परंतु आराम पडेना. यामुळें पौष अखेरीस करवीरास येऊन महाराजांचें दर्शन घेऊन वाडीस जाण्यास आज्ञा घेतली, आणि वाडीस निघून गेले. तेथें बरेच दिवस मुकाम झाला, तरी उपशम न होतां प्रकृति फारच बिघडली. सबब परत जाण्यास निघाले, ते मार्गीं बेडकेहाळ मुकामीं फाल्गुन शुद्ध ९ इंदुवारीं (शके १७५६ सालीं) वारले. त्यांच्या कामदार मंडळींनीं त्याचें शव पालखींत घालून बावड्यास नेलें, आणि तिसऱ्या दिवशीं बावड्यास पोंचून तेथें यथाशास्त्र सार्थक केलें. अमात्य यांणीं दत्तक घेतला आहे तो कायम न करितां दुसरा दत्तक घेण्याविषयीं हुकूम द्यावा, अशी सल्ला कारभारी यांणीं दिली; तेव्हां पारसनवीस यांणीं सांगितलें कीं, प्रतिनिधींच्या पहिल्या दत्तकास नकार करण्यास जागा होती, तशी या दत्तकास नकार करण्यास जागा नाहीं. यास्तव हा दत्तक नामंजूर करणें म्हणजे अन्याय होईल. असें बहुत प्रकारें सांगितलें; परंतु रुकार पडला नाहीं. हा मजकूर अखबरनवीस यांस समजल्यावरून त्यांणीं साहेबांकडे रिपोर्ट केला, त्या-

गोविंदराव पंत अमात्य प्रकृति बिघडल्यामुळें दत्तक घेतात.

पंत अमात्य यांचा मृत्यु. तारीख ९ मार्च सन १८३५ इ.

तुम्हीं हा मजकूर ऐकूंनये व दखलगिरी करूंनये, असें उत्तर आलें. हे महाराजांस समजल्यावर दुसरा दत्तक करण्याचा बेत रहित केला. थोड्या दिवसांनीं अमात्य यांजकडील कामगार करविरीं येऊन ३०,००० रुपये देण्याचा ठराव करून पहिल्या दत्तकास कायम करून अमात्य पदाचीं वस्त्रें द्यावीं. असें ठरलें. नंतर नजराण्याचा ऐवज जमा करून सांप्रदाया प्रमाणें कारकून व हुजरे यांजबरोबर वस्त्रें बावड्यास पाठविलीं. तीं आषाढ वद्य ७ भौमवारीं (शके १७५७) सुमुहूर्तें घेतलीं. याच दिवशीं महाराजांस विजापूर वेशीच्या दक्षिणेकडील खंदकांत माणसें दगड फोडीत होतीं; त्याची कपरी डाव्या भिवईपाशीं लागून जखम झाली. ती आठपंधरा रोजांनीं बरी झाली.

दत्तक कायम होऊन वस्त्रें मिळतात. तारीख १७ जुलई सन १८३५ इ.

सालगुदस्त शके १७५६ सालीं **संताजीराव घोरपडे** सेनापति यांजकडील सेनापति पद काढून **जोत्याजीराव निंबाळकर** वागरकर यांच्या बोलण्यावरून **शंकाजीराव घोरपडे** पागेरकर यांस देण्याचा ठराव झाला. याजवरून सेनापति यांणीं करविरास येऊन नजराणा देण्याचें कबूल केलें, तेव्हां तो क्रम रहित झाला. सेनापतींनीं नजराणा दिला व त्यांस महाराजांनीं वस्त्रें व हत्ती दिला, आणि ते निरोप घेऊन कापशीस गेले. तेथें पोटशुळाचा विकार होऊन फार हैराण झाले. तें दुःख सहन होईना, सबब हिरकणी खाऊन वैशाख वद्य ८ गुरुवारीं वारले. नंतर सेनापतीकडील कामगार करवीरीं येऊन नजराण्याचा ठराव केला. नंतर कैलासवासी सेनापतीचे पुत्र **रामचंद्रराव** यांस करविरास आणून महाराजांचें दर्शन करविलें. आणि श्रावणशुद्ध पंचमी रोजीं सांप्रदायाप्रमाणें कचेरी होऊन त्यांस सेनापतीचीं वस्त्रें शिक्के कटार वगैरेसह देण्यांत आले. नंतर ते कांहीं दिवस राहून आज्ञापत्र घेऊन कापशीस गेले.

संताजीराव घोरपडे सेनापति मरण पावतात व त्यांच्या मुलास वस्त्रें मिळतात सन १८३६.

**मनोहरगडावर** गडकरी यांणीं बखेडा केल्याचें वर्तमान आल्यावरून त्यांच्या बंदोबस्ता करितां स्वारी करविराहून निघाली ती मनोहरानजीक शिवपुरास जाऊन उतरली. इतक्यांत मनोहरगडकरी पळून

मनोहरगडास बंड होतें. व गडकरी पळून जाऊन बंड मोडतें.

गेले. नंतर स्वारी किल्ल्यावर जाऊन तेथील बंदोबस्त केला; आणि तेथें दोन तोफा होत्या, त्या घेऊन स्वारी खालीं आली.

हैबतराव गाईकवाड दत्ताजीरावास दत्तक घेतात. तारीख २४ सपटंबर सन १८३६ इ.

करविरीं **हैबतराव गाईकवाड** यांची प्रकृति फार बिघडली. ती सुधारण्याची आशा राहिली नाहीं. औरस संतति नाहीं. दत्तक घ्यावा तर हुकूम घेण्यास स्वारी नाहीं. तेव्हां सर्व कामदारांस आणून कसें करावें म्हणून विचारिलें. तेव्हां धाकटे बंधु दिनकरराव यांचे नातू **दत्ताजीराव** यांस सर्वांच्या सांगण्यावरून भाद्रपद शुद्ध १४ रोजीं दत्तक घेतलें. हें वर्तमान महाराजांस कळतांच फार उद्विग्न झाले. त्याजवर निघून स्वारी करविरीं आली.

महाराजांस बाळाक्का कन्या झाली.

याच सालीं प्रतिनिधीचा परगोत्री मुलगा करवीरीं होता, तो वारला. सौभाग्यवति आनंदीबाई राणीसाहेब वाडा ५ यांस कार्तीकमासीं कन्या झाली. तिचें नांव **बाळाक्का** ठेविलें.

रामराव अखबरनवीस परत कामावर येतात.

या संधीस **बेबर** साहेबांची प्रकृति नादुरुस्त झाली. म्हणून ते **निळगिरीवर** हवा पालटण्यास गेले. त्यांच्या जागीं धारवाडास **दंडनाप** साहेब आले. **रामराव** अखबरनवीस यांनीं साहेबांची मर्जी संपादून ते पुन्हा कामावर आले. दंडनापसाहेबही करवीरीं येऊन महाराजांची भेट घेऊन सहा दिवस राहून परत गेले. धारवाडसुभ्यापासून बेळगांव सुभा वेगळा करण्याचें ठरलें. आणि **बेबरसाहेब** परत येनांच बेळगांवास **दंडनाप** साहेबांची नेमणूक होऊन ते काम पाहूं लागले. **बेबरसाहेबांनीं** राजाज्ञा यांचा पक्ष स्वीकारून रामराव अखबरनवीस यांची चौकशी करण्याचें

राजाज्ञा यांचा मृत्यु. सन १८३७ इ०

ठरविलें. व त्याकरितां साहेब लोकांची कमेटी नेमिली त्यांचीं मतें दंडनाप साहेबांस अनुकूल अशीं पडून पुरी चौकशी न होतां साहेब निघून गेले. इतक्यांत राजाज्ञाच्या शरीरीं व्यथा होऊन ज्येष्ठमासीं शुद्ध ८ रोजीं धारवाड येथेंच वारले.

शेषाचा मृत्यु. त्याचें पद रावजी वांकनीस यांस मिळतें.

नंतर पहिले मंत्री शेषाव वारले. त्यांस कोणी वारस नसल्यामुळें त्यांचें पद रावजी वांकनीस यांस देऊन त्यांजकडे मौजे गाजमाळ हा गांव दिला. नंतर स्वारी वा-

डीस श्रीच्या दर्शनाकरितां उभयतां महाराजांस घेऊन निघाली. ती शिरोळास असतां दंडनापसाहेब गोविंदराव चिंचणीकर वारले. म्हणून तेथील बंदोबस्तास आले होते. ते महाराजांच्या भेटीस शिरोळास आले. भेट होऊन गेल्यावर स्वारी वाडीस जाऊन कांहीं दिवस राहून फाल्गुन शुद्ध १५ स करविरास आली. स्वारी आल्यावर अखबरनवीस वगैरे मंडळीच्या सल्यावरून नजराणा घेऊन **दत्ताजीराव गाईकवाड** यांस **विश्वासराव** हा किताब देऊन त्या पदाचीं वस्त्रें दिलीं.

दत्ताजीरावास विश्वासराव हा किताब देऊन गायकवाडपदाचीं वस्त्रें मिळतात. सन १८३७.

बुवासाहेबांनीं आपल्यास पुत्रोत्पत्ति अनुकूळ झाल्यास आपली श्री कुलस्वामिनी **तुळजापुरची भवानी** इच्या दर्शनास कुटुंबसहीत जाऊं असा नवस केला होता. त्या प्रमाणें तुळजापुरास श्रीच्या दर्शनास आणि गंगारवेडास गंगास्नानाकरितां जाण्याचा बेत करून तयारी चालविली. पूर्वीं एक वर्षापासून श्रीस देण्याकरितां हस्तिदंती कामाचे छपरपलंग व सिंहासन, व वसनें दागदागिनेसुद्धां तयार करून रवाना केले होते. स्वारी जाण्याबद्दल रहदारीच्या दस्तकाविषयीं साहेबांस लिहून पाठविलें, आणि शके १७५९ माघ शुद्ध १३ रोजीं दोन प्रहरीं सुमुहूर्तानें उभयतां चिरंजीव व महालच्या स्वाऱ्यासुद्धां स्वारी शहरांतून निघून रविवारच्या वाड्यांत येऊन राहिली. स्वारीच्या खर्चाकरितां ऐवज जमविण्यास्तव पुष्कळ गांवें व जवाहीर गहाण टाकिलें, आणि बरोबर नेण्याकरितां सुमारें २०,००० लोक चाकरीस ठेविले. मोठ मोठ्या तोफा, बंदुका व इतर लढाईची सामुग्री पातेरा व पाचोळा याखालीं लपवून नेण्याची योजना झाली.

तुळजापुरास स्वारी जाण्याची तयारी करून निघते. तारीख ३१ जानेवारी सन १८३८ इ.

इतक्यांत **दंडनाप**साहेब करविरास आले. महाराजांच्या भेटी वगैरे होऊन दस्तकाबद्दल व मार्गांत कांहीं बखेडे न करण्याबद्दल बोलणीं होऊन साहेब बेळगांवास गेले, व तेथून दस्तक पाठवितों; असें सांगितलें. परंतु शके १७५९ अखेर (मार्च सन १८३८ इ.) दस्तक आले नाहींत. यामुळें स्वारी निघण्याची तहकुबी झाली. अखेर शके १७६० वैशाख शुद्ध ११ रोजीं दस्तक येऊन पोंचतांच स्वारी ब्रम्हपुरीनजीक ओढ्याचे पलीकडे डेरे देऊन तेथें जाऊन राहिली. तेथून कांहीं दिवसां-

नीं निघून पूर्वेस कोटितीर्थाच्या कांठीं डेरे देऊन राहिली. इतक्यांत बरोबरच्या लष्करांत महामारीचा उपद्रव सुरू झाला, व पर्जन्यकाळ समीप आला. या प्रमाणें ज्येष्ठ अखेर निघणें झालें नाहीं. आषाढ शुद्ध १ रोजीं बेळगांवाहून दंडनाप साहेबांकडून पर्जन्यकाळ सुरू होऊन नदी नाले उतरून पार जाणें कठीण पडेल, व उपद्रवाच्या भीतीनें बरोबरचीं माणसें बेदिल होतील, व मार्गांत स्वारी उतरण्यास जागा मिळणार नाहीं. यास्तव दसरा झाल्यावर जाण्याचा बेत करावा. अशा मजकुराचें पत्र आलें. त्यावरून निघण्याचा बेत रहित करून स्वारी परत पुन्हा रविवारच्या वाड्यांत शुद्ध १२ बुधवारीं येऊन राहिली.

> तुळजापुरच्या स्वारीचा बेत न-हकूब होतो सन १८३८ इ०

श्रावण शुद्ध ५ गुरुवारीं रविवारच्या वाड्यांत सौभाग्यवति **आनंदीबाई** राणीसाहेब वाडा ५ यांस पुत्र झाला. पुत्रोत्साह करून नांव **राजाराम महाराज** ठेविलें. श्रावण मासीं जें गोसावी जेवण होतें, त्या निमित्त गोसावी नांवेंतून येत असतां नांव बुडून गोसावी बुडाले.

> राजाराम महाराजांचा जन्म तारीख २५ जुलई सन १८३८ इ०

अश्विन मासीं निघण्याकरितां प्रतिनिधि, अमात्य, सेनापति वगैरे मानकरी यांस आणवून तयारी केली. इतक्यांत श्रीचा नवरात्राचा उत्साह आला. त्याकरितां उत्साहाच्या समारंभाकरितां स्वारी शहरांतील वाड्यांत गेली. सालाबाद प्रमाणें नवरात्राचा उत्साह समारंभ आटपून पौर्णिमा झाल्यावर सुमुहूर्तीनें पुन्हा कोटितीर्थावर डेरे देऊन स्वारी मुक्कामास गेली. तेथून कार्तीक वद्य ४ रोजीं कुच होऊन तिसऱ्या दिवशीं स्वारी अर्जुनवाडास गेली. त्यावेळीं अकालीं पर्जन्य लागून कृष्णेस पूर येऊन उतार मोडला होता. सबब नावा जमवून, त्याजवरून व कांहीं हत्तींवरून असें सर्व लष्कर पलीकडे उतरलें आणि मिरजेस मुकाम झाला. तेथून स्वारी मालगांवास गेली. तेथें महाराजांस ज्वरांश होऊन तशीच स्वारी पंढरपुरास मार्गशीर्ष शुद्ध ५ रोजीं पोंहोंचली. तेव्हां तो विकार जास्त होऊन पांच मुकाम झाले. परंतु प्रकृतीस आराम पडला नाहीं. तसेंच एकादशीच्या दिवशीं श्रीचें दर्शन होऊन स्वारी निघाली.

> पुन्हां तुळजापुरास स्वारी जाण्यास निघते माहे आक्टोबर सन १८३८ इ०

> वाटेंत प्रकृति बिघडते

ती यवतीस मुक्कामास गेली. तेथें प्रकृति फारच बिघडून महाराज असावध झाले. यामुळें गांवांतील पाटलाचें घर मोकळें करून महाराजांस तेथें नेलें. परंतु उतार न पडतां मार्गशीर्ष शुद्ध १३ गुरुवार (तारीख २९ नवंबर सन १८३८) रोजीं महाराजांनीं कैलासवास केला. या स्वारींत बरोबर अखबरनवीस होते. त्यांच्या स्वाधीन उभयतां चिरंजीव व राणीसाहेब यांस करून दौलत स्वाधीन केली. आणि प्रतिनिधि, अमात्य सेनापति वगैरे सर्व मानकऱ्यांस सांगितलें कीं, दौलतीच्या हरएक कामकाजाचा बंदोबस्त रामराव ठेवतील, त्या प्रमाणें तुम्हीं सर्वांनीं अनुकूळ असून ते सांगतील त्या प्रमाणें वर्तन करावें. अशा प्रकारें व्यवस्था करून महाराजांनीं देह ठेविला.

बुवासाहेब महाराजांचा मृत्यु. तारीख २९ नवंबर १८३८.

महाराजांस रीतीप्रमाणें उठवून पोषाख वगैरे करावयाचा, त्यास अगोदर द्वाही फिरविल्याशिवाय करितां येत नसे. यास्तव महाराजांची भावजय सईबाई दिवाणसाहेब (आबासाहेबांची पत्नी) या सर्वांमध्यें वडील असल्यानें त्यांच्या नांवें द्वाही जाहीर करणें, अशी रामरावांनीं बुवासाहेबांच्या राणीसाहेबांची समजूत करून त्या प्रमाणें करविलें. नंतर बुवासाहेबांस उठवून सांप्रदायाप्रमाणें पोषाख, जवाहीर वगैरे घालून तयारी केली, आणि पंढरपूर क्षेत्रीं चंद्रभागेच्या कांठीं दहन करावें, असें ठरविलें. इतक्यांत बुवासाहेबांची पट्टराणी बबई साहेब (सईबाई दिवाणसाहेब यांची बहीण) इनें सती जाण्याबद्दल अत्यंत आग्रह धरिला. सती जाण्याविषयीं इंग्रजसरकारची मनाई असल्यामुळें रामरावांनीं नाना तऱ्हेनें त्यांस सांगून अखेर त्यांचे भळभळते शाप घेऊन रहित केलें, आणि बुवासाहेबांस रीतीप्रमाणें वाजत गाजत पालखींतून नेऊन चंद्रभागेच्या कांठीं दहन केलें. त्या वेळीं शेंकडों बंदुकांची सरबत्ती झाली. कोल्हापुरास आठवे दिवशीं पोहोंचून नववे दिवशीं उत्तरकार्यास आरंभ झाला पाहिजे. याकरितां तिसरे दिवशीं राख गोळा करून अस्थि काढावयाचा सांप्रदाय आहे, परंतु वरील अडचणीमुळें दहन झाल्याच्या दुसरेच दिवशीं राख विझवून अस्थि काढविल्या. आणि त्याच रो-

महाराजांच्या शवाचें दहन.

परत कोल्हापुरास निघतात.

जीं यवतीहून कुच करण्याची तयारी झाली.

लष्करामध्यें एकी नसून लोक एकमेकांचा हेवा करीत असत. सबब या समयीं कोणास कोण काय करतील याचा नेम नाहीं, आणि एकाएकीं जिनगी स्वलेल होईल, ही भीति आहे. याकरितां तमामजामदारखान्याकडील शिल्लक जड जवाहीर वसनागर यांस कुलुपें घालून बंद केलें, व मोहरा करून संभाजीराव सेनापति यांस आपल्या पथकासह चौकी पाहरा करून बंदोबस्त ठेविण्यास रामरावांनीं निघण्यापूर्वीच सांगितलें; यामुळें कमजास्त गलबल झाली नाहीं.

त्याच रोजीं लष्करांत पटकीचा उपद्रव सुरू झाला होता. याकरितां **जयराम भोंसले** यांजबरोबर मेणा, डोली. तटें व कामाठी मनुष्यें देऊन एक हजार रुपये खर्चास दिले. आणि सांगितलें कीं, मार्गीं हरएक लोक मेले गेले असतां ज्याच्या त्याच्या चाली प्रमाणें दहून व माती देत जाऊन मेले गेल्याची खबर लष्करांत कोणास कळूं न देण्याची तजवीज ठेवावी. याप्रमाणें रामरावानीं ताकीद केली.

सेनापति व एकंदर मानकरी यांस उभयतां धाकटे महाराज व राणीसाहेब यांस घेऊन पुढें चालावें. मागून सर्व राणीसाहेबांस संभाळून घेऊन आपण येतों. असें रामरावांनीं सांगितलें. राणीसाहेब यांजकडे बाडांत कोणी जाऊनये. त्यांजबराबर फक्त हुजरे गर्ति बायका कुणबिणी मात्र असाव्या. आणि बंदुक बारदार वगैरे मराठे लोक कोणी न ठेवितां आरब व सिद्दि लोक ठेविले, व पागेकडील २०० स्वार मात्र ठेविले. कारण राणीसाहेबांचे आप्त, इष्ट व तत्पक्षीय मंडळी कोणी गेले आले असतां कांहीं तरी कागाळी काढून मार्गीं खटला वाढवितील. हें जाणून अशी तजवीज ठेविली होती. खुद्द रामराव राणीसाहेबां समागमें राहून बाडाच्या बाहेर रात्रंदिवस स्वतः हजर असत.

लष्करासह धाकटे महाराज कोल्हापुरास दाखल होता-त. ता. ६ दिजंबर १८३८

**डिग्रजेस** मुकाम असतां **चिंतामणराव आपासाहेब पटवर्धन** राणीसाहेब व उभयतां महाराज यांजकडे समाचारास येऊन बहुत प्रकारें शांतवन केलें. तेथून कोल्हापुरास **बापूसाहेब हिम्मतबहादर** व **मोरोपंत हुजुरबाजार** यांस खबर कळवून असें फर्मा-

विलें कीं, लष्करांत स्पर्शास्पर्शाची मर्यादा राहिली नाहीं. याकरितां लष्करांतील एकंदर लोकांपैकीं कोणास कोल्हापूर शहरांत येऊं देऊं नये, आणि कोल्हापुरांतील हरएक लहान मोठ्या मनुष्यास लष्करांत येऊं देऊं नये. या प्रमाणें बंदोबस्त ठेविला. आठव्या दिवशीं मार्गशीर्ष वद्य ५ रोजीं (तारीख ६ दिजंबर १८३८ इ.) राणीसाहेब उभयतां धाकटे महाराजांसहित. कोल्हापूर किल्याबाहेर रविवार पेठेंतील वाड्यांत येऊन राहिले आणि तमाम लष्कर जितीच्या ओढ्यावर उतरलें.

नवव्या दिवशीं नारायणराव खानवटकर यांजकडून उत्तरकार्यास आरंभ करविला. दहाव्या दिवशीं पिंडास काक स्पर्श होईना. तेव्हां राणीसाहेब आदिकरून सर्वांनीं सांगितलें कीं, उभयतां धाकट्या महाराजांस सोडून जाणार नाहीं, असें उदक सोडण्यास रामरावास सांगितलें. त्या प्रमाणें उदक सोडतांच काक स्पर्श झाला. अकराव्या दिवशीं दान धर्म यथासांग करविला. बाराव्या दिवशीं सपिंडी उदकुंभ माशीकनिवृत्ति वगैरे आटपलें. नंतर चवदाव्या दिवशीं म्हणजे मार्गशीर्ष वद्य १२ रोजीं उभयतां महाराजांच्या स्वाऱ्या नदीवर जाऊन महाराजांचें दर्शन घेऊन गंगा दरवाज्यानें शहरांत येऊन श्री देवीचें दर्शन घेऊन वाड्यांत आल्या. नंतर तिसऱ्या प्रहरीं सांप्रदायाप्रमाणें कचेरी होऊन उभयतां महाराज सदरेस बसून सतके व नजरा झाल्या, आणि महाराजांनीं अष्टप्रधानास विडे दिले.

---

बुवासाहेब महाराजांविषयीं जी जी माहिती मिळाली ती ती सर्व दाखल केली आहे. यांच्या अंगीं खऱ्या मराठ्याचीं लक्षणें बहुत होतीं. हे मोठे शूर असून सरदारी बाणा यांच्या अंगीं पूर्ण वसत होता. यांचा शूरपणा प्रकट होण्यास त्यांच्या काळांत योग्य संधि मिळाली नाहीं. शिवाय यांमध्यें जो एक दोष होता तो हा कीं, ज्यास जवळ बाळगावयाचें त्याची चांगली परीक्षा करून कसोटीस लावून नंतर त्यास जवळ करावें; तसें न करितां बाह्यात्कारी स्वभावास व वर्तनास भुलून जात. हे जात्या शूर असतां शौर्य दाखविण्याचा प्रसंग न आल्यामुळें अव्वल मराठेशाईच्या धर्तीवर यांस लूट करण्याचा बराच नाद लागला; व त्याकरितां धाडसी व साहसी लोकांस ते बरेच आपले जवळ

बाळगूं लागले. त्यांपैकींच सुभाना निकम हा एक होय. त्याचें पुढें संक्षिप्त चरित्र दिलें आहे. या साहसी लोकांच्या अविचारी सल्यानें अनेक वेळां बुवासाहेब तोंडघशीं पडले. व अनेक वेळां त्यांचें नुकसान झालें, व त्यांस अपमानही सोसावा लागला. परंतु यांच्या कारकीर्दीत सर्वच जिकडे तिकडे अव्यवस्था व बेबंदशाही होती असें जें मेजर ग्रेहामसाहेबांनीं गमपणें आपलें मत ठेकून दिलें आहे, व त्यांचा मागें उताराही दिला आहे. तसेंच केवळ होतें असें म्हणण्यास दप्तरीं आधार मिळत नाहींत. निरनिराळ्या कारखान्यावर निरनिराळे अम्मलदार असून त्यांवर जबाबदारी टाकिलेली असे. अठरा कारखाने पृथक् पृथक् असून कामाची वांटणी केलेली होती. निरनिराळ्या कारखान्याच्या खर्चाकडे त्यांच्या मगदुरा प्रमाणें महाल व गांव तोडून दिलेले होते. मात्र कारखान्याकडे मोबदला खर्च करून रदकर्ज वारून घेण्याची वहिवाट चालू होती, जमाबंदीची जुन्यारीती प्रमाणें शिस्त चालू असून दरसालचे नाळेबद तयार होत असत. प्रजेस न्याय देण्याविषयींही पंचाइती करण्याची वहिवाटही बऱ्याच रीतीनें चालू होती. पंचाइती करण्याची कशी शिस्त असावी, याबद्दल महाराजांनीं पंचाइती करणाऱ्यांच्या माहितीकरितां जी यादी तयार केली होती ती खालीं दिली आहे, तिजवरून बरीच अटकळ होईल. तसेंच बुवासाहेब महाराजांचें औदार्य केवढें होतें, हें तर अद्याप सर्वतो मुखी आहे. देणग्या द्याव्या तर बुवासाहेबांनींच द्याव्या. अशी त्यांची कीर्ति अद्याप लोक गातात. उदारहस्तानें ते कशा देणग्या देत गेले, याची कांहीं अटकळ होण्याकरितां त्याबद्दलचीही स्थूल मानानें यादी तयार करून पुढें दिली आहे.

श्री.

यादी न्यायाधीशीकडे पंचाइती करणार यांनीं वर्तणूक करावयाचीं कलमें. सुरुसन आर्बा अशरीन मय्यानेन व अलफ (१२२४ फसली इसवी सन १८२३।२४ इसवी.)

१ सर्वांनीं सकाळच्या चार तास दिवसास भोजन करून फडास यावें. आणि मंध्याकाळच्या तास दिवसास माघारी परत जावें. तोंपर्यंत बसून पंचाइती करीत जाव्या, त्यांत एखाद्यास ता-

सभर जाजती येण्यास लागल्यास पांचवे तासीं हजर व्हावें. पांचतास जाहले नंतर न आलेस एक रुपया जुलमाना(?) द्यावी. आणि आपले घरीं काम असलेस आदले दिवशीं हुजूर अर्ज करून हुकूम घेऊन कामाबद्दल आपले घरीं राहणें कलम.

१. एखादे दिवशीं पंचाईत होत असतां कामाचे निकडीबद्दल रात्र जाहलेस फैसल होते असें जाहलेस रात्रीं बसावें. कलम.

१. हुजूरची स्वारी सोमवारीं व गुरुवारीं पंचाइतीच्या फैसलाती कशा जाहल्या असतील, त्या समजून घेणेबद्दल बसणार. त्यास ज्याज्या पंचाइती येतील त्यांचे सारांश, मजकूर समजोन देण्याबद्दल तयार करून सदरहू दोन्ही वारीं समजावीत जाव्या. कलम.

१. वादी प्रतिवादी पंचाइतीस येतील, त्यांस कोणी आश्रा देऊन पंचाइती होण्यास खलेल करतील, अथवा आश्रयांनीं वादी प्रतिवादी सरळ बोलणार नाहींत; याजकरितां कोणीकडून आश्रा होईल, त्याचा शोध करून सरकारांत समजावून द्यावा. त्याजकडून आश्रा होईल त्याचा बंदोबस्त करण्याची आज्ञा होईल. कलम.

१. सर्वत्र पंचाइतदार यांणीं एक विचारें संमतानें पंचाईत करीत जावी. एखादेनें कल्पना काढून बोलूं लागल्यास त्याची कल्पना बोलण्यानें सरून रुकार पडल्यावर पुढें चालवावें. एखादी गैरकल्पना पक्षांनी[+] काढितो, असें सर्वत्रांच्या विचारांत आल्यास त्याची कल्पना जी काढील ती जमेस न धरितां काम चालवावें. आणि हुजूर अर्ज करावयाशीं येतील, तेव्हां सर्वत्रांनीं संमतानें अर्ज करीत जावा. कलम.

१. एखादा कोणी फडाजवळून जातां येतां पंचाइती कशी झाली म्हणोन विचारितात. त्यास कोणी विचारितील त्याजविशीं हुजूर अर्ज करावा म्हणजे ताकीद होऊन कोणीही विचारूंनये असें होईल. तुम्हीं होईल तो मजकूर वाराचे वारीस अर्ज करीत जावा. कलम.

१. कामगार यांणीं नेमल्या प्रमाणें कामें करीत जावीं.

---

+ एकपक्षी, एकतर्फी.

२. निर्णय पाहून शास्त्राचे आधारावर सांगणार.

१. लक्ष्मणभट शिराळकर.
१ आमदशा—— काजी.
२

४. वादी प्रतिवादी यांचा मजकूर वकिलांशीं बोलणार.

१. बच्या चार्य.
१. रघुनाथ जोशीराव.
१. दिनकर राव गाईकवाड.
१ जिवाजी बल्लाळ.
४

४. बोलणार बोलतील त्यांत कल्पना घेणार.

१. अंताजी यंसाजी.
१. बाळाजी बाजीराव चिटणीस.
१. सखाराम—— गुणे.
१. खंडोजी नाईक भोंसले.
४

४. वकील वादी प्रतिवादी यांचा मजकूर समजून घेऊन बोलत असावें. बोलणें संबंधें दरशेंकडा रुपये पांच प्रमाणें घेत जावे आणि दोघांनीं एकपक्ष बोलावा, व दोघांनीं एक पक्ष बोलावा.

| | |
|---|---|
| १. नाथाजी घाटगे. | १. मालजी भोंसले |
| १. गणपत माधव गर्दे. | १. सखो माणकेश्वर वसफडे काटणीकर |
| २ | २ |

दोघांनीं एक पक्ष बोलावें. दोघांनीं एक पक्ष बोलावें. एकूण चार असामीनीं बोलणें बोलत जावें. या चार असामीस जुलमाना घेऊंनये. चार असामीस नेमणूक द्यावयाची नाहीं.

=. हुजरे असामी दोन यांणीं नेहमीं फडास बसत जावें. आणि कोणत्या वेळेस येतील, कोणते वेळेस येणार नाहींत, त्यांजकडून जुलमाना दर असामीस एक रु-

पया प्रमाणें घ्यावा. आणि हुजूर जाहलेले मजकुराचा फड समजावीत जावा. हुजरे कोणी फडांत बसण्यास चुकले तर हुजरे यांणींही जुलमाना द्यावा.

१. बापू शिंदे हुजरे.

१. बाळाजी जाधव केरलीकर हुजरे.

२

८— असामी दोन यांणीं नेहमी फडास बसत जावें. आणि कामांत बोलूंनये.

२. कारकून लिहिणार असामी दोन यांणीं फडांत लिहीत जावें. कामांत बोलत जाऊंनये.

१. बापू रामचंद्र घाणेकर. १. ——————

८— असामी दोन.

१८

असाम्या १८ यांणीं सदरहू लिहिले प्रमाणें काम करीत जावें.

१. जमीनदार वतनदार व इनामदार तालुक्यांतील यांचीं खटलीं असतील तीं कामदार यांणीं परभारे तोडूंनयेत. एरवादें परभारें तोडतात, असें समजलें असतां हुजूर अर्ज करून त्यांस फडांत आणण्याचा हुकूम घेत जावा. कलम.

१. पंचाइतीचा फैसलनामा जो करणें तो १० असामीनीं करावा. चार असामी बोलणार व कल्पना सांगणार चार व —————— व काजी एकूण दहा असामीनीं करून हुजूर दाखवून वकीलांचे स्वाधीन करीतजावें. कलम.

१. पंचाइती होत असतां खोटें होईल त्याजकडून खऱ्याचे रुपये देववीत जावे.

१०

८— एकूण कलम १० लिहिले अन्वयें वर्तणूक करीत जाणे. छ७ माहे रमजानरुजु. (बिलसति लेखनावधि)

---

# सुभाना निकम.

या धांदलीच्या व दंग्याधोप्याच्या काळांत जे धाडसी व साहसी पुरुष उदयास आले, त्यांपैकीं **सुभाना निकम** हा एक होता. त्याचें त्रोटकचरित्र येथें देतों. सुभाना निकम याची वडिलांपासून महाराज सरकारच्या हुजऱ्यांमध्यें असामी असल्यामुळें त्यास ५ बिघे जमीन इनाम चालत होती. महाराजांची याचर विशेष मर्जी बसल्यावरून दरवडे घालण्याकरितां व गांवें लुटण्याकरितां जी एक खासगी टोळी राजवाड्यांत ठेवण्यांत आली होती, तिजमध्यें यास असामी मिळाली. या टोळींत कांहीं दिवस लुटीचें काम केल्यावर हें काम आपण आपल्या जोरावरच करावें, असें मनांत आणून त्यानें सरकारची नोकरी सोडिली, आणि स्वतः १,००० मांग व रामोशी ठेवून दरवडे घालण्याचा धंदा सुरू केला; आणि पुष्कळ दिवसपर्यंत पन्हाळा प्रांतांत दरवडे घालण्याचा क्रम चालविला. आणि लूट मिळविण्याकरितां लोकांचे नाहीं नाहीं ते हाल करूं लागला. सन १८२७ सालीं बुवासाहेब महाराजांनीं नवी फौज ठेविली, त्यावेळीं सुभाना निकम यास दरवडेखोरांच्या टोळीसह नोकरीस ठेविलें. परंतु त्यानंतर लौकरच कोल्हापूर शहरांतच घर फोडून दरवडा घातल्याबद्दल त्यास पकडलें, व एका सरकार पागेंत कैदेंत टाकिलें. परंतु तेथून महाराजांच्याच एका आवडत्या घोड्यावर बसून तो पळाला आणि मोंगलाईंत गेला. तेथें आपण महाराजांचाच भाऊ आहे असें दाखवून छत्र चामरादि धारण करूं लागला, आणि एक मोठी टोळी जमवून साधेल तिकडे लूटण्यास सुरुवात केली.

तेथून त्यास हाकून दिल्यावर सातारकरांच्या मुलखांत २,००० रामोशांसह त्याणें दंगा आरंभिला, आणि लोकांकडून उघडपणें आपल्या नांवानेंच खंड घेऊं लागला. तेथून साताऱ्याच्या फौजेनें त्यास हांकून लावलें. व त्याच्या मागें लोक लागले असतां आपल्या जंब्यानें आपले कपडे वगैरे तोडून टाकून तो जंगलांत जाऊन दडाला.

पुढें तो आपल्या सासऱ्याच्या घरीं दडून होता. तेथें त्यास धरण्याकरितां कोल्हापुराहून लोक गेले, तेव्हां तो स्त्रीवेष घेऊन तेथून नि-

निसटला. शेवटीं सन १८३३ सालीं त्यास पकडलें, परंतु कोल्हापूर सरकारास २,००० रुपये दंड देऊन त्यानें आपली सुटका करून घेतली; व पुनः त्याजवर महाराजांचा इतका विश्वास बसला कीं, ते तुळजापुरास गेले तेव्हां शहरची कोतवाली त्याजकडे सोंपविली होती.

पुढें सरकाराविरुद्ध एका खटपटींत सांपडल्यावरून त्यास पुनः कोल्हापूर येथें कैदेंत टाकिलें. तेथें त्यानें एका मोठ्या संभावीत बायकोस फितविलें, व ती पुरुषाचा वेष घेऊन त्याजकडे त्याच्या तुरुंगांत गेली. पुढें त्यास भुदरगड किल्यावर कैदेंत ठेविलें. तेथेंहीत्यानें तेथच्या गडकऱ्यांस फितूर करून त्यांनीं बंड करावें, आणि चिमासाहेब महाराजांच्या नांवें द्वाही फिरवावी व आपणास कारभारी नेमावें, असा घाट घातला. परंतु हें बंड होणार इतक्यांत सर्व उघडीस येऊन सुभानास कैद करून कोल्हापुरास नेलें. तेथें तो सन १८४३ पर्यंत कैदेंत होता. या सालीं दिवाणसाहेबांनीं त्याचा जामीन घेऊन त्यास मुक्त केलें; तेव्हांपासून तो प्रांतांत लोकांच्या पंचायती करीत फिरूं लागला.त्यांत जुलूम केल्याबद्दल फिर्यादी होऊन त्यास पकडून पुनः कैदेंत टाकिलें. तेथून तो पुनः पळाला, आणि दरवडेखोरांची टोळी जमवून कांहीं दिवसपर्यंत आकीवाट हा गांव हस्तगत करण्यास यत्न करीत होता. तो बेत फसल्यावर सामानगडच्या बंडवाल्या गडकऱ्यांस जाऊन मिळाला. इंग्रजांनीं तो किल्ला लढून घेतल्यावर इतर बंडवाल्यांबरोबर सुभानास धरून बेळगांवच्या तुरुंगांत नेऊन कैदेंत ठेविलें. तेथूनही पळून जाऊन सन १८४५ अखेरपर्यंत निरनिराळ्या ठिकाणच्या बंडवाल्यांबरोबर फिरत होता. शेवटीं याच सालीं त्यास धरून चौकशी केली व फांशीं दिलें.

# देणग्या.

श्रीमन्महाराज छत्रपति बुवासाहेब महाराज यांच्या कारकीर्दींत जीं इनामें वगैरे दिलीं, त्यांविषयीं ठोकळ माहिती:– त्यांपैकीं कित्येक चालू असतील, व कित्येक पुनः खालसा केलीं असतील, किंवा काढून दुसऱ्यास दिलीं असतील; परंतु यांणीं मूळारंभीं किती देणग्या दिल्या व त्यांवरून त्यांचें औदार्य किती होतें, हें समजण्यास ठोकळ व ऐकीव माहितीवरून तयार केलेली यादि खालीं दिली आहे.

| कोणास दिल्या त्यांचीं नांवें. | गांवांचीं नांवें. | अजमासें आकार. | सन अगर शक. |
|---|---|---|---|
| श्री स्वामी जगद्गुरु मठ संकेश्वर. | मंदूर. | ३०७ | शके १७५४ |
| | कळवी कट्टे. | ८९३ | ,, १७५१ |
| | | १,२०० | |
| श्री कृष्णेंद्र स्वामी... ... ... ... ... | मौजे इसलामपूर. | ५५६ | ,, १७५१ |
| शिवराम भट लाटकर नि. श्रीजगद्गुरु. | ,, नागणवाडी. | २४५ | ,, १७५१ |
| श्रीकराचार्य न्यायाधीश... ... ... ... | ,, थरगांव. | १,२३५ | ,, १७५५ |
| आनंदराव यशवंत मंत्री... ... ... | ,, पडळी. | ६,१०० | |
| | ,, शिरूर | ५,५०० | |
| | | ११,६०० | |
| रताजीराव चवाण हिंमतबाहाद्दर.. | ७ एकंदर सात गांव कसबागृ नपैकीं. ६ आजरे तालुक्यापैकीं ६ गांव | १३,४४२ | सबअशरीन शके १७४७ |
| | हळदी. ,, [illegible] | १,९७५ | ,, १७५७ |
| | | १५,४१७ | |

| कोणास दिल्या त्यांचीं नांवें. | गांवांचीं नांवें. | अजमासें आकार. | सन अगर शक. |
|---|---|---|---|
| नीळकंठराव जमन मुलूख... ..... | मौजे पररवंबळें. | ८७१ | शके १७४१ |
| | ” गुंडाल. | २२६० | ” १७५५ |
| | ” सोळांकूर. | २४१५ | ” ” |
| | | ५५४६ | |
| दौलतराव जाधव... ... ... ... ... | ” मणेरी. | १३३५ | |
| | ” सुळकुड. | २८०६ | |
| | ” शिरसें. | ७०१ | |
| | ” कंथेवाडी. | ६०५ | |
| | | ५४४७ | |
| आबाजीराव जाधव... ... ... ... | ” बोरगांव. | ११७८ | ” १७५६ |
| व्यंकटराव भोंसले रवानविलकर.... | ” पुनाळ. | १०१५ | ” १७४१ |
| रवंडेराव निंबाळकर... ... ... .. | ” नेरली. | ७५० | ” १७५५ |
| | ” पेरवळ. | ५२० | |
| | | १२७० | |
| बाबाजी जगदाळे ... ... ... ... ... | ” मोहोरें. | ९०१ | |
| सदाशीवराव जोती दिवाण...... | ” चिंचवाड. | ३२०० | |
| | ” माणगांव. | | |
| | ” कळंबें. | | |
| | ” केकलें. | | |
| नरशिंगराव सुरवशी... ... ... | ” तासगांव. | ४५४ | |
| | ” नरंदें. | | |
| बचाराम घोरपडे ... ... ... ... | ” कोलोली. | ११६८ | |
| बापू साळुंरवे... ... ... ... ... | ” वाशी. | १३२६ | |
| विठूजी मोहिते... ... ... ... ... | ” सावर्डें | ६६७ | ” १७५६ |
| आबाजीराव जाधव... ... ... ... .. | ” ” | ११७८ | |
| आपाजीराव यादव ... ... ... ... | ” घोटवडें. | ६०६ | ” १७५७ |
| बाबाजी विचारे | ” वडगांवरवुर्द | ९१० | |

| कोणास दिल्या त्यांचीं नांवें. | गांवांचीं नांवें. | अजमासें आकार. | शक अगर सन. |
|---|---|---|---|
| जिजोजीराव खानविलकर........ | मौजे लिंगनूर.<br>,, धामणें. | १६६२ | शके १७४६<br>,, १७५६ |
| दादो कृष्णा परांडेकर... ... ... ... | ,, हिंगणगांव. | १७२५ | ,, १७५७ |
| रामराव भिमाजी अखबरनवीस.. | ,, हगिदहाळ.<br>,, बसापूर. | २१३६ | ,, १७६० |
| अणाजी नरसिंव्ह... ... ... ... ... | ,, घुडगुपी. | २५३ | |
| चिमाजीराव सुभेदार | ,, निष्णाष | १०७ | |
| हणमंतराव निंबाळकर सरलष्कर बहाद्दूर... ... ... ... ... ... | ,, दिगेवाडी.<br>,, कोगें. | २७८३ | |
| बाळाजी बाजीराव चिटणीस..... | ,, नणुंद्रें | ४९३ | |
| विष्णु मोरेश्वर चिटणीस........ | ,, हेरवडें | ५२३ | |
| हणमंतराव मोहिते... ... ... ... | ,, अंबरडें | १८४८ | |
| नाथाजी शिंदे हवलदार........ | ,, असुरळें. | १३६३ | |
| शंकाजी रघुनाथ खांडेकर... ..... | ,, कोहाळें | ६६४ | |
| हल्युमखान... ... ... ... ..... | ,, घुरवडें | ७१७ | |
| आबाजी सदाशीव... ... ... ... | ,, कोपरडें | १००० | |
| केसो लक्ष्मण चुनेकर........... | ,, कुरुकली | १०५७ | |
| मिराखान तबीब... ... ... ... ... | ,, निमशिरगांव | २६१२ | |
| आपाजी देसाई अटकूरकर... ... | ,, कमलगें | १३४० | |
| आपाजीराव नाईक निंबाळकर... | ,, येडराव<br>,, मोरे<br>,, बोमनाळ<br>,, हस्तवाळ | | |
| श्री स्वामी जगद्गुरु... .. ......... | ,, कमतनूर<br>,, टांकळी<br>,, बाळकी<br>,, बडेची वाडी. | | |

| कोणास दिल्या त्यांचीं नांवें. | गांवांचीं नांवें. | अजमासें आकार. | शक अगर सन. |
|---|---|---|---|
| जयराम भोंसले हवलदार.......... | मौजे भुयें | | |
| | ,, मुंगळी. | | |
| व्यंकटराव पाटणकर... ... ... ... | ,, पिरड. | | |
| | ,, सावरडें. | | |
| आकाराम शिवाजी कळेकर........ | ,, दिगवडें. | | |
| हिरगोजी कोळेकर............... | ,, कोंडिकरें. | | |

यांत कांहीं ठिकाणीं शक किंवा सन वगैरे माहिती अपुरी मिळाली, याबद्दल फार दिलगिरी वाटते. तथापि बुवासाहेब महाराज यांचें औदार्य किती होतें हें समजण्यास वरील यादीवरून पुष्कळ अनुमान करितां येईल.

या उदार पुरुषाचें नांव कोल्हापूर प्रांतांत सर्व आबालवृद्धांच्या मुखांतून वारंवार निघत असतें. यांच्या कारकीर्दीच्या अखेरीस कोल्हापूर राज्यापैकीं सुमारें $\frac{1}{3}$ पेक्षां जास्त राज्य देणग्या देण्यांत खर्च झालें होतें.

# शिवाजी महाराज
# ऊर्फ
# बाबासाहेब महाराज.

इसवी सन १८३८—१८६६प०

———·:०✱०:·———

शाहाजी ऊर्फ बुवासाहेब महाराज मरण पावले, तेव्हां राजघराण्याची वगैरे साधारण अहिवाल कशी होती, या विषयीं प्रथमतः चार शब्द लिहून नंतर पुढील कारकीर्द लिहिण्यास आरंभ करूं. बुवासाहेब महाराज वारले तेव्हां त्यांच्या बायकांपैकीं आनंदीबाई, सकवारबाई, सगुणाबाई, उमाबाई आणि कमळजाबाई अशा पांच बायका जिवंत होत्या. त्यांपैकीं आनंदीबाई ऊर्फ तारासाहेब किंवा मासाहेब यांचें वय सुमारें ३३ वर्षांचें असून यांस २ पुत्र व २ कन्या अशीं चार आपत्यें होतीं. वडील मुलाचें नांव शिवाजी ऊर्फ बाबासाहेब महाराज हें होतें. यांचें वय आठ वर्षांचें होतें. दुसरा मुलगा राजाराम या नांवाचा पांच महिन्याचा होता. आऊबाई या नांवाची एक ५ वर्षांची आणि बाळाबाई या नांवाची दुसरी २ वर्षांची या प्रमाणें २ कन्या होत्या. या शिंवाय बुवासाहेबांस तिसरा एक मुलगा शाहू ऊर्फ चिमासाहेब या नांवाचा शिवाजीहून सुमारें ५ महिन्यांनीं लहान असा होता. याची आई नर्मदाबाईसाहेब ही पूर्वीं बाळंतपणींच मरण पावली होती. आनंदीबाई ऊर्फ तारा आईसाहेब यांचाच मुलगा वडील असल्यामुळें कैलासवासी महाराजांच्या कुटुंबांत हीच राणी मुख्य होती, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

राजघराण्याची स्थिति.

कैलासवासी आबासाहेब महाराज यांच्या एकंदर ४ बायकांपैकीं सईबाई ऊर्फ दिवाणसाहेब आणि जिजाबाईसाहेब अशा दोन बायका जिवंत होत्या. दिवाणसाहेब याच राजघराण्यांत वडील असल्यामुळें वडीलपणाची मानमर्यादा वगैरे त्यांजकडेच असून त्याप्रमाणें बुवासाहेब महाराजांनीं चालविलें होतें. दिवाणसाहेबही स्वभावतः मोठी महत्वाकांक्षी व अभि-

सईबाई ऊर्फ दिवाणसाहेब.

मानी असून थोडीशी पराक्रमी व ब्राह्मणपणाचा व मुत्सद्दीपणाचा आव घालणारी अशी होती.

आबासाहेब महाराजांस मोहिते सरदारांनीं मारिलें. त्या फंदांत बुवासाहेब महाराजांचें अंग होतें, अशा संशयावरून सईबाई व बुवासाहेब यांचीं मनें परस्पर शुद्ध नसून बुवासाहेब जिवंत असतांच उभयतांमध्यें अनेक लटेबखेडे चालले होते. यांच्या लोभांतील श्री भाऊ महाराज हे पुण्यास जाऊन राहिले असून पुणें व मुंबई दरबारांत त्यांनीं आपलें वळण व वशिलाही चांगला बांधला होता. त्यांस तेथील प्रसिद्ध बाळाजीपंत नातुही अनुकूल होते. तसेंच कोल्हापूर येथील दिनकरराव गाईकवाड व रावजी वांकनीस यांसारखे कित्येक मोठे मानकरी व वजनदार गृहस्थ दिवाणसाहेब यांच्या लगत्याचे होते. आबासाहेब महाराजांच्या आईपासून दिवाणसाहेबांस द्रव्याचा संग्रहही मोठा मिळाला होता. शिवाय बुवासाहेब महाराजांची पट्टराणी बबईसाहेब (अंबिकाबाई) सईबाईसाहेबांची प्रत्यक्ष बहीण होती. खेरीज चिमासाहेब महाराजांची आई बाळंतपणीच मरण पावली. तेव्हां बुवासाहेब महाराजांनीं सईबाई दिवाणसाहेब व बबईसाहेब यांचे ओटींत चिमासाहेबांस घातलें होते.

याप्रमाणें सईबाई दिवाणसाहेबांचें पारडें जड असल्यामुळें तिचा जर राज्यकारभारांत मुळींच हात ठेविला नाहीं, तर आतांच मागील द्वेषाबद्दल राज्यकारणास आरंभ होऊन अनेक बखेडे होण्याचा, व तेणेंकरून राजधानीस व दौलतीस अपाय होण्याचा संभव होता. जरी वास्तविक राज्यकारभारांत घेण्याजोगा दिवाणसाहेबांचा हक्क नव्हता, आणि तारा आईसाहेब, गादीचे मालक बाबासाहेब महाराज यांची मातोश्री असल्यामुळें तिचाच कारभार करण्यास सर्व प्रकारें हक्क पोहोंचत होता, तरी अंतर्गत द्वेष उघडीस येऊन बजबज होऊंनये, व इंग्रजसरकारांनीं येऊन राज्यकारभाराचा बंदोबस्त करण्याची जरूर पडूंनये, याकरितां उभयतांची एकी करून त्यांस आपसांत राजी करावें, आणि उभयतांच्या

रामराव अरवबरनवीस व त्याचे राज्यकारभाराच्या व्यवस्थेविषयीं विचार.

निसबतीचे कारभारी नेमून उभयतांच्या सल्लामसलतीनें सुरळीत व बिनबोभाट कारभार चालावा. हा उत्तम पक्ष आहे, असा त्यावेळचे मुख्य चालक जे रामराव अखबरनवीस यांनीं विचार केला. बुवासाहेब महाराजांनीही मरण समयीं उभयतां धाकटे महाराज व राणीसाहेब यांस त्यांच्याच स्वाधीन करून त्यांस व अष्टप्रधान व मानकरी वगैरे मंडळींस यांच्याच सल्याप्रमाणें चालावें असें सांगितलें होतें. हे इंग्रजसरकार तर्फे कोल्हापूर येथें फार दिवस अकबरनविशीच्या महत्वाच्या कामावर असल्यानें व बुवासाहेब महाराजांच्या अखेर कारकीर्दींत कांहीं दिवस राज्याचा कारभारही केल्यामुळें त्यांचें वजन लोकांत विशेष होतें, व त्यांवर विश्वासही बराच होता. असा विचार करून तारा आई राणीसाहेब वगैरे सर्व राणीसाहेबांकडे रामरावांनीं जाऊन अशी विनंति केली कीं, आपले पुत्र बाबासाहेब व चिमासाहेबमहाराज हे लहान आहेत, याकरितां ते मोठे व प्रौढ होऊन राज्यकारभार हातीं घेईपर्यंत त्यांचें व राजधानीचें या विकटसमयीं रक्षण करून घेतलें पाहिजे. तूर्त प्रसंगीं मागील द्वेष मनांत आणून उपयोगीं पडणार नाहीं. सईबाई दिवाणसाहेब आपणा सर्वांत वडील असून बुवासाहेब महाराजांनींही त्यांजकडेच वडीलपणाची मानमर्यादा चालविली होती. अशा चार गोष्टी सांगून त्यांजविषयीं मनांतील वितुष्ट दवडून टाकून त्यांशीं एकोपा करून घेणें याप्रसंगीं जरूर आहे. यावेळीं त्यांस जर राज्यकारभारांतून मुळींच काढिलें आणि आपण आपल्या निसबतीच्या कारभाऱ्यांकडूनच कारभार चालविण्याचा विचार केला, तर ती गोष्ट इंग्रजसरकारास मान्य होईल किंवा नाहीं, याचा नेम नाहीं व आतांच मागील द्वेषाबद्दल राजकारणास आरंभ होईल. यास्तव त्यांस घरगुती रीतीनें मिळवून घेऊन उभयतांनीं आपापल्या तर्फेचे कारभारी नेमून राज्यकारभार चालवावा, व दिवाणसाहेबांकडे मानमर्यादा पूर्वीप्रमाणें चालवावी, म्हणजे ही गोष्ट इंग्रजसरकारासही मान्य होऊन कोणंत्याही प्रकारें बखेडा होण्यास कारण राहणार नाहीं, अशा प्रकारें समजून सांगितल्यावरून तारा आईसाहेब व त्यांच्या निसबतीचे मानकरी यांनीं या प्रस-

तारा आई राणी वगैरे यांची रामराव समजूत करितात.

लतीस रुकार दिला, आणि सईबाई दिवाणसाहेब यांचाही या मसलतीस रुकार घेऊन अमलांत आणावें, असें सांगितलें.

दिवाणसाहेबांची रामराव समजूत करितात.

नंतर सईबाई दिवाणसाहेब यांजकडे जाऊन त्यांस रामरावांनीं अशी विनंति केली कीं, मागील द्वेष मनांत आणून मनें दूषित ठेवण्याची ही वेळ नव्हे. बुवासाहेब महाराज आतां मरण पावले. बाबासाहेब महाराज व चिमासाहेब महाराज हे लहान असून त्यांजकडे कोणत्याच गोष्टीचा दोष नाहीं. यास्तव उभयतां महाराजांचें सांगोपन व संरक्षण करून आणि राजधानीचीं सर्व कामें आपण व तारा आईसाहेब या उभयतांच्या विचारें यथास्थित व सुरळीतपणें चालवून यश संपादावें. पूर्वी संभाजी महाराजांच्या पश्चात् शिवाजी महाराज लहान असतां ज्या प्रमाणें जिजाआईसाहेब यांनीं राजधानीचीं कामें संभाळून कीर्ति मिळविली, त्याप्रमाणें आपणही कीर्ति संपादिली पाहिजे. तारा आई वगैरे राणीसाहेबांनीं आपल्या विचारें चालण्याचें कबूल केलें आहे, तेव्हां "आपली वडीलपणाची मर्यादा राहिली असतां तुमच्या सल्याप्रमाणें करण्यास आपल्याकडून हरकत नाहीं." असें सईबाई दिवाणसाहेबांनीं शपथपूर्वक वचन दिलें.

या प्रमाणें उभयतांचा रुकार मिळाल्यावर अष्ट प्रधान, मुख्य मानकरी व प्रमुख ब्राम्हण मंडळी यांस ही व्यवस्था कळवून सर्वांची मान्यता घेतली, आणि खालीं लिहिल्याप्रमाणें राज्यकारभाराची व्यवस्था करून रामरावजींनीं अमलांत आणिलें.

राज्यकारभाराची व्यवस्था.

**सईबाई दिवाणसाहेब** सर्व राणीसाहेबांमध्यें वडील असल्यामुळें त्यांजकडे वडीलपणाची मानमर्यादा चालावी, आणि त्यांचे निसबतीचे **दिनकरराव आपासाहेब गाईकवाड** व **रावजी वांकनीस ऊर्फ मंत्री** हे दोन कारभारी व **बाबासाहेब महाराजांची** मातोश्री **तारा आईसाहेब** यांचे निसबतीचे **जिवराव जाधव हवलदार** व **मोरोपंतदादा हुजूरबाजार** हे दोन कारभारी अशा चौघांनीं मिळून एकत्रपणानें कारभाराचें काम चालवावें. हुजूरबाजार यांजकडील १८ कारखान्यांचें काम **हिंदुराव गाईकवाड** यांनीं करावें. जमेनीस फडाचें मुख्य काम **रघाजीराव चव्हाण** हिंमतबहाद्दर यांजकडे असावें व लष्करफडा-

चें काम हणमंतराव निंबाळकर खरडेकर सरलष्कर यांनीं पाहावें. न्यायाधीशाचें काम दादासाहेब जोशीराव व श्रीकराचार्य पंडितराव यांनीं पाहावें. थैल्या यादी वगैरेचें कामावर श्रीपतराव पारसनवीस व चिटणिशीचें कामावर बळवंतराव हंबीरराव यांनीं पेशजी प्रमाणें असावें. एकंदर नऊ पागा व पीलखाना, उष्ट्रखाना, थट्टी वगैरे कामें बुवासाहेब सरनोबत व आबासाहेब जाधव या दोघांनीं सांभाळावीं आणि खर्चास मोबदला देत जाऊन पागेकडील माहालापासून रदकर्जही वारून घेत असावें. ९ पागा व पीलखाना वगैरेकडील जे कोणी लहान मोठे कामगार पेशजीपासून असतील, त्यांजपासून या उभयतांनीं काम घेत असावें. एकंदर ९ पागेंतील लहान मोठे घोडे मिळून २,०००, हत्ती २५।३० व उंटही पुष्कळ असा कारखाना मोठा असून तें सर्व काम बुवासाहेब महाराज खुद्द पाहात असत. आतां पुढें तसें कोणी पाहणारा मालक नसल्यामुळें नासाडी होऊंनये, याकरितां सदर सरनोबत व जाधव हे उभयतां मुख्य मानकरी लोकांतील असून बुवासाहेब महाराजांच्या मर्जीतील व शिवाय संभावीत व पैसेवान होते. यास्तव ते मेहनतीनें सर्व बंदोवस्त ठेवून खर्चासही मोबदला देत जातील, व रद्दकर्जही करून घेतील, म्हणून त्यांची योजना केली होती. जामदारखान्याचे दिमतीस आबाजी बुवा हुजरे, आबा खासबारदार व केसोपंत चुनेकर हे तिघे पूर्वींपासून मुख्य होते. दागदागिने वगैरे हरएक कारखान्याकडे पेशजीपासून जे लोक असतील, त्यांजकडून कामें घेऊन या त्रिवर्गांनीं जामदारखाना सांभाळावा असें ठरविलें.

उभयतां धाकटे महाराज यांजपाशीं नेहमीं भाऊसाहेब चव्हाण, बापूसाहेब हिंमतबहाद्दर, बहिरजी बापूसाहेब, बापूसाहेब सरलष्कर, खंडेराव बाबासाहेब निंबाळकर, भाऊसाहेब सुर्यवंशी, आपासाहेब घाटगे, जोतीराम घाटगे, भीमबहाद्दर वगैरे एकंदर कार्याकारण मुख्य मानकरी मंडळीनीं उभयतां महाराजांकडे राहून त्यांस सर्व प्रकारें सांभाळावें, व रात्रंदिवस पाळी पाळीप्रमाणें राजवाड्यांत हजर राहावें आणि माणकोबा व सदोबा या मुख्य चोपदा-

यांनीं माहाराजांपाशीं नेहमीं असावें, अशी व्यवस्था केली.

पन्हाळगड वगैरे लहान मोठे गड (किल्ले) यांवरील कामगार व मामलेदार यांजकडे पेशजीपासून चालत असल्याप्रमाणें त्यांचे त्यांजकडे चालावे. येणेंप्रमाणें व्यवस्था केल्यावरून जिकडील तिकडे सर्व कामकाजें यथास्थितपणें बिनबोभाट चालूं लागलीं.

बुवासाहेब महाराज मरण पावल्याची खबर कळल्यावर सन १८३८ सालीं डिसेंबर अखेर धारवाडचे पो॰ ए॰ सिमसनसाहेब+ कोल्हापूर राज्याच्या कारभाराविषयीं बंदोबस्त करण्याकरितां कोल्हापुरास आले. ते येण्यापूर्वींच वरील व्यवस्था अमलांत येऊन कारभार सुरू झाला होता. ही सर्व व्यवस्था करण्याचे हेतु व कारणें रामरावजींनीं समजून सांगितल्यावरून त्यांचेही विचारास आलें कीं, हीच व्यवस्था योग्य आहे. नेमलेले कारभारी हे दौलतीचे पुरातन कामगार असून कारभार करण्यास व अंमल चालविण्यास सर्व प्रकारें योग्य आहेत. आणि साहेब येऊन पोहोंचण्यापूर्वींच सर्व आपापलीं कामें पाहूं लागले होते. जमाखर्चाचा तपास करितां साहेबांस असें कळलें कीं, राज्याचा वसूल सारा ३ लाख होत असून साडेचार लाख खर्च ठेविलेला आहे, व दौलतीस सुमारें ५।६ लाख रुपये कर्ज आहे. साहेबांनीं दिवाणसाहेबांची भेट घेतली. तेव्हां दिवाणसाहेबांनीं सांगितलें कीं, चार असामींस कारभारी नेमिलें असून त्यांच्या सल्यानें राज्यकारभार चालला आहे. व आमचा सर्व भार ब्रिटिशसरकारावर आहे. त्यास साहेबांनीं उत्तर दिलें कीं, आपण व मासाहेब या उभयतांनीं जी कारभार चालविण्याची तजवीज केली आहे ही ठीक आहे. जोत्याजीराव निंबाळकर वठारकर आणि राजाज्ञ हेही दौलतींचीं मोठ मोठीं जबाबदारीचीं कामें केलेले आहेत; त्यांसही कारभारी मंडळांत घे-

सिमसन साहेब धारवाडचे पोलिटिकलएजंट कोल्हापुरास येतात.

सिमसन साहेबांचा सल्ला.

---

+ यावेळीं धारवाडचे कलेक्टर यांसच पोलिटिकल एजंट हा हुद्दा असून त्यांजकडे कोल्हापुरचें राज्य व कर्नाटकांतील संस्थानें यांची देखरेख होती.

तल्यास चांगलें होईल असें सुचविलें. तसेंच हल्लीं उत्पन्नापेक्षां खर्च जास्त आहे, तो कमी करावा; फाजील फौज आहे तिला फांटा द्यावा, आणि ८०० पायदळ व ४०० स्वार इतकीच फौज तहनाम्यांतील कराराप्रमाणें ठेवावी. असें सांगून व सईबाई दिवाणसाहेब व तारा आई राणीसाहेब व त्यांचे निसबतीचे कारभारी यांचे सदरहू प्रमाणें कामकाज निभावून घेण्यास जबाबदार आह्मों अशी कबूली घेऊन, या प्रमाणें व्य-

सिमसनसाहेब सरकारास रिपोर्ट करितात.

वस्था कोल्हापुरास अमलांत आली आहे, व ती चांगली आहे, करितां ती व्यवस्था पसंत करून सरकारनें मंजूर करावी. असा मुंबई सरकाराकडे सिमसन साहेबांनीं रिपोर्ट केला. व याच रिपोर्टांत सिमसन साहेबांनीं सरकारास असें कळविलें कीं, रामराव अखबरनवीस यानें महाराजांच्या मरणापासून उत्तम व्यवस्था ठेविली, व सर्व खटलें येवतीहून बंदोब-

रामरावाची शिफारस.

स्तानें करवीरीं आणिलें, व पुढेंही कारभाराची व्यवस्था करण्यास फार मदत केली, व या सर्व गोष्टींत त्यानें आपलें शाहाणपण व दक्षता दाखविली. याकरितां सरकारानें त्याचे आभार मानावे, व हजार रुपयेपर्यंत बक्षीस द्यावें अशी शिफारस केली.

कारभाराबद्दल केलेली सर्व व्यवस्था पसंत करून मंजूर केल्याबद्दल मुंबई सरकारानें तारीख २८ फेब्रुवारी सन १८२१ इसवी रोजीं ठराव केला, आणि त्यांतच सिमसन साहेबांस कळविलें कीं, रामरा-

सरकार व्यवस्था मंजूर करितें.

वांस सरकारचे फार आभार कळवावे. परंतु त्यांस बक्षीस देण्याचें कारण दिसत नाहीं.

या प्रमाणें सरकारचा ठराव होऊन येईपर्यंत सिमसनसाहेब करवीरींच होते. ठराव आल्यानंतर दरबार भरवून सर्वांस कळवि-

दरबार भरून सरकारचा ठराव सांगण्यात येतो.

लें कीं, बाबासाहेब महाराजांस कोल्हापूर राज्याचे मालक असें सरकारानें कबूल केलें आहे, आणि दिवाणसाहेब व तारा आईसाहेब यांनीं आपल्या निसबतीच्या चार कारभाऱ्यांनीं कारभार चालवावा असें सरकारांनीं मंजूर केलें आहे. तर सर्वांनीं त्यांच्या हुकुमांत चालून राजधानीचीं कामें चालविण्यास त्यांस सहाय्य करावें. कारभारी यांस खर्च कमी

करून कांहीं पैसा रदकर्जास द्यावा, व फाजील फौजेस फांटा द्यावा, असें सांगण्यांत आलें आहे. तर त्यासही कोणी हरकत करूंनये.

रताजीराव चव्हाण हिंमतबहाद्दर, भाऊसाहेब सरलष्कर, हिंदुराव गाईकवाड यांचें लक्ष तारा आईसाहेबांकडे होतें. त्यांनीं सिमसनसाहेबांस विनंति केली कीं, तारा आईसाहेब यांची निराळी भेट घेऊन त्यांचे मनोगत ऐकून घ्यावें. परंतु दिवाणसाहेबच राज्यांतील मुख्य कर्ती असून तिच्या हातीं मुख्य अधिकार असल्यानें कारभार चांगला चालेल असें साहेबांच्या मनानें पूर्णपणें घेतलें असल्यानें त्यांनीं दिवाणसाहेबांच्या संमती शिवाय निराळी भेट घेणार नाहीं, व दिवाणसाहेब कारभारी मंडळांतील मुख्य असें आम्हीं समजतों, असें स्पष्ट सांगितलें. परंतु त्यानंतर साहेबांनीं दिवाणसाहेबांची वेगळी गांठ घेऊन सांगितलें कीं, तारा आईसाहेब व इतर राणीसाहेब यांच्या संमतीशिवाय आपला अधिकार अपुरा आहे; यास्तव सर्व राण्यांस खुषी ठेवावें, व ताराआईसाहेबांस दुखवूंनये, अशी सल्ला दिली.

कारभाराची ही व्यवस्था एकंदरींत चांगली झाली होती, असें म्हणतां येत नाहीं. बुवासाहेब महाराजांस राज्याधिकार मिळूंनये. म्हणून दिनकररावानें आरंभींच यत्न केला होता. बुवासाहेबांपाशीं या व्यवस्थेंतीविरुद्ध असल्यानें त्यांच्या सर्व कारकीर्दींत त्याचें आं- ल दोष. ग कारभारांत नव्हतें. व साधेल तेव्हां तो बुवासाहेबांविषयीं गिल्लेच करीत असे. यामुळें त्यावर राज्यांतील लहान थोर लोकांचा भरंवसा नव्हता. त्याचप्रमाणें दिवाणसाहेबांचेंही बुवासाहेबांच्या बायका मुलांवर प्रेम तितपतच होतें. माजी कारकीर्दींत जे प्रमुख होते व ज्यांसच हल्लीं बहुतेक आपापल्या कामावर ठेविलें, त्यांपैकीं कोणावर यांचा विश्वास नव्हता. दिवाणसाहेबांस कांहीं कारभाराचें गम्य व अनुभव नव्हता. तसें जरी दिनकर-रावाविषयीं म्हणतां येत नाहीं; तरी त्यांस लिहितां वाचतां येत नसे. हिशेब ठिशेब कांहीं समजत नसत. त्यांचा पेशा केवळ शिपायगिरीचा असून कारस्थानें करण्याचा होता. दिवाणसाहेब यांच्या मुठींत व अर्ध्या वचनांत. रावजी वांकनीस पटाईत कारकून यांच्या जोडीस आणि मागील कारकीर्दींतील लोकांचें उसनें फेडण्याचें मनांत. अशास कारभारी मंडळांत मुख्य केलें, ही बऱ्याच अंशीं

चूक झाली व ती लौकरच निदर्शनास आली. यास कारभारांतून मुळींच काढिलें, तर यांचीं कारस्थानें लागलींच सुरू होतील, तशीं होऊंनये या हेतूनें रामरावानें हिकमत योजिली होती. त्यांचा हेतु यांस सर्वांच्या डोक्यावर बसवावयाचा नव्हता. परंतु सिमसनसाहेबांच्या लक्षांत ही गोष्ट न येऊन त्यांनीं दिवाणसाहेबांस मुख्य स्थानीं बसवून गादीचे मालक जे महाराज त्यांच्या खुद्द आईस कमीपणा दिला, ही चूक झाली.

ही व्यवस्था फार दिवस सुरळीत चालली नाहीं. **सईबाई दिवाणसाहेब** व **तारा आई राणीसाहेब** यांमध्यें हळू हळू विकल्पास कारण होत जाऊन वैमनस्य पडत चाललें. तथापि **रामराव भिमाजी** कोल्हापुरास अखबरनिवीशीचें कामावर असेपर्यंत हीच व्यवस्था जेमतेम कायम राहिली, व ते असेपर्यंत सईबाई दिवाणसाहेब यांच्या तर्फेच्या कारभाऱ्यांचें पडावें तसें तेज पडेना, व अंमलही सरास चालेना. कोणताही अव्यवस्थितपणा केल्यास अखबरनवीसाच्या मार्फत सरकाराकडे खबर जाऊन आपणावर शब्द येईल ही भीतिही होती, याकरितां दिवाणसाहेबांकडील मंडळींनीं रामरावाचें कोल्हापुराहून उच्चाटन करण्यास व आपल्यास अनुकूल अशा अखबरनवीसाची नेमणूक करून घेण्यास कसे भगीरथ प्रयत्न केले, व ते सिद्धीस गेल्यावर त्यांनीं आपल्या छोट्या कारकीर्दींत माजी बुवासाहेब महाराज यांचा किता घेऊन राज्यांत कसा गोंधळ केला, व अखेर इंग्रजसरकारापर्यंत बोभाटा जाऊन सन १८५४ सालीं **दाजी कृष्ण पंडित** यांस कारभारी नेमण्याची वेळ कशी आली, या विषयीं हकीकत थोडक्यांत खालीं दिली आहे.

सईबाईव तारा बाईयांमध्यें विकल्प.

आरंभीं थोडक्याच दिवसानंतर सईबाई दिवाणसाहेब व तारा आई राणीसाहेब यांमध्यें विकल्पास कारण झालें. दिवाणसाहेब यांनीं सर्व राणीसाहेबांकडील मोहिनी (कोठींतून रोजच्या उपयोगाकरितां पोहोंचणारे जिन्नस) कमी करण्याचें ठरविलें. तसेंच त्यांजकडे चाकरीस गरती बायका व कुणबिणी असतील, त्यांची आपल्या मर्जीप्रमाणें बदलाबदली करण्याविषयीं जिकीर चालविली. यामुळें उभयतांमध्यें स्वाभाविकच विकल्प वाढत गेले.

दिवाणसाहेब यांजकडील मुख्य कारभारी दिनकरराव आपासाहेब गायकवाड यांस अधिकाराचा मद चढून ते बुवासाहेब महाराजांच्या जागींच आपण आहों, असें समजून इतमाम भोगूं लागले. आणि मानकरी वगैरे लोक राजवाड्यांत येतील जातील त्यांस ताजीम न देतां व रामरामही न करितां मालक राजाप्रमाणें वागूं लागले. तसेंच रात्रंदिवस वाड्यांतही राहूं लागले. तेव्हां स्वाभाविकच एकंदर मानकरी लोक बदलून मशारनिल्हे गायकवाड यांच्याशीं विरुद्ध वागूं लागले. यांचे बंधु हिंदुराव गायकवाड यांच्याशीं पूर्वीपासून दिनकररावाचा द्वेष होता. व हल्लीं दिनकरराव मुख्य कारभारी झाले असून त्यांजवर सईबाई दिवाणसाहेब यांची बाहाल मर्जी होती. वर लिहिल्याप्रमाणें दिनकरराव जेव्हां बेपर्वाईनें वागून सर्वांस तुच्छ मानूं लागले, तेव्हां आपल्यास केव्हां दगाफटका करतील याचा नेम नाहीं, असें समजून हिंदुराव गाईकवाड आपले अठरा कारखान्याचें काम पाहण्यास राजवाड्यांत येत तेव्हां नेहमीं हातांत तरवार शिवाय कमरेस जंब्या व पिस्तुल यांसह तयार होऊन समागमें बंदुकबारदार तोडेसुध्दां पेटवून घेऊन येऊं लागले. तेव्हां दिनकररावासही भीति पडली कीं, आपले बंधु एखाद्या वेळीं कज्जा काढून आपणास दगा करतील. या भीतीनें तेही दिवाणसाहेब यांचे चोकींत व राजवाड्यांत सुध्दां खासबारदार व बंदूक बारदार यांस तयार ठेवूं लागले.

दिनकररावाचें वर्तन व त्याचा परिणाम.

त्यांचे जोडीचे दुसरे कारभारी रावजी वांकनीस उर्फ मंत्री यांनींही आपणास मंत्रीपणाचा अष्टप्रधानाप्रमाणें अधिकार मिळाला आहे, असें समजून उद्दामपणाचें व बेपर्वाईचें वर्तन सुरूं केलें. लहान मोठे अम्मलदार व कारकून यांचा पुरा हात न जोडितां अर्ध्या हातानेंच नमस्कार घेऊं लागले, व कोणास ताजीमही देईनात. यामुळें त्यांच्याशींही लोक बदलून जाऊन द्वेषास कारण झालें.

रावजी वांकनीस यांचें वर्तन.

असें झालें तेव्हां ताराआई राणीसाहेब व मानकरी लोक यांनीं अखबरनवीसाकडून सईबाई दिवाणसाहेब व आपासाहेब गाईकवाड यांस सांगितलें कीं, गाईकवाड यांनीं रात्रंदिवस वाड्यां-

त असूंनये. कामकाजापुरतें वाड्यांत येत जावें, व आपल्या योग्यते प्रमाणें वागावें. परंतु तें त्यांच्या मर्जीस रुचलें नाहीं, व उलट दिनकरराव गायकवाड यांनीं असें सांगितलें कीं, आपण मुख्य कारभारी असून आपणावर इतर मानकरी वगैरे लोकांची व आपल्या बंधूची सुद्धां हुकमत नसून सर्वत्रांवर आपली हुकमत आहे, व सर्वांनीं आपले आज्ञेप्रमाणें चाललें पाहिजे. असें त्यांचे बेपर्वाईचें बोलणें पडल्यावर राजा छत्रपतीसारखें दिनकरराव गायकवाडांस वागूं देणार नाहीं, याबद्दल घडेल तसें घडो, असें मानकरी वगैरे लोकांचें निग्रहाचें बोलणें होऊं लागलें, व विकोपास जाण्याचा समय दिसूं लागला. रात्रंदिवस वाड्यांत राहून छत्रपति राजासारखें वागणें हें अमर्यादेस कारण आहे. सर्व मानकरी बेदील झाल्यामुळें एखादे वेळीं परस्पर तरवारी चालून राजवाड्यांत दंगा होईल, असें घरगुति रीतीनेंही पुष्कळांनीं सांगितलें. तथापि तें त्यांनीं कांहीं ऐकिलें नाहीं, व आपल्या प्रकृतीस नीट नाहीं, असा बाहाणा करून वाड्यांतच राहण्याचा क्रम चालू ठेविला. यामुळें दिवसें दिवस अधिकच काम चिरडीस जाऊं लागलें, व बखेडा होण्याचा प्रसंग दिसूं लागला. तेव्हां अखबरनवीसांनीं त्यास वाड्यांत येऊन एके दिवशीं असें निक्षून सांगितलें कीं, आपल्या प्रकृतीस नीट नसेल तर आपल्या घरीं जाऊन औषध उपाय करून आराम पडल्यावर कारभार कामास येत जावें, व आतांच येथून गेलें पाहिजे. म्हणून त्यांजपुढें मेणा आणून ठेविला. जर या वेळीं आपण गेलों नाहीं तर एजंटसाहेबांपर्यंत ही गोष्ट कळून आपल्यावर एखादें कुभांड येईल, या भीतीनें त्यावेळीं घरीं न जातां आपले उपाध्ये जमदग्नी यांचे घरीं राजवाड्यांतून निघून गायकवाड गेले. या कारणामुळें अखबरनवीसाशीं गाईकवाड फार द्वेष करूं लागले.

*गायकवाडाच्या उद्दामपणामुळें मानकरी वगैरे नाखुष होतात.*

तदनंतर **सईबाई दिवाणसाहेब** व त्यांच्या निसबतचे गायकवाड व वांकनीस हे दोघे कारभारी रामरावास बोलावून असें सांगूं लागले कीं, तुम्हीं ताराआईसाहेब वगैरे राणीसाहेब व उभयतां

ताराआईच्या तर्फेच्या कारभाऱ्यांस काढून टाकण्याचा यत्न.

धाकटे महाराज यांजकडे न जातां फक्त आम्हांकडेच येत जात असावें. आणि ताराआई साहेब यांचे तर्फेचे दोघे कारभारी यांस कामांतून काढून मानकरी वगैरे ज्या लोकांस हरएक कामांत नेमिलें आहे, त्यांसही काढून टाकावें, कारण ते आपल्या अनुमताप्रमाणें चालत नाहींत. त्यांच्या बदली आमच्या तर्फेचे दुसरे लोक ठेवितां येतील. तेव्हां रामरावांनीं सांगितलें कीं, ही गोष्ट कधीं घडणार नाहीं. सर्व व्यवस्था एजंटसाहेबांच्या मंजुरीनें व आपल्या कबुलीनें झाली आहे. सबळ कारणाशिवाय त्यांत फेरबदल करितां येणार नाहीं. कैलासवासी बुवासाहेब यांची मुख्य राणी व उभयतां धाकटे महाराज हे मुख्य असून त्यांचा आपला तंटा वाढूनये, व विकोपास जाऊंनये, म्हणून आपल्या विचारेंच उभयतांचा एकोपा केला. असें असून आतां आपण फेर बोलतां व त्यांजकडे जाऊं येऊंनका असें सांगतां, हें बरोबर नव्हे. निरनिराळ्या कामावर नेमिलेले लोक पिढीजादे नोकर असून मोठे संभावीत पाहून सर्वांच्या विचारें नेमिलेले आहेत, याकरितां त्यांस काढितां येणार नाहीं.

रामरावाचें महत्व.

बुवासाहेब महाराज जिवंत असतां व मरणसमयीं देखील रामरावावर भरंवसा ठेवून धाकटे महाराज व सर्व राणीसाहेब आदी करून एकंदरांस महाराजांनीं त्यांच्या स्वाधीन केलें, व अष्टप्रधान, सेनापति व मानकरी वगैरे एकंदर लोकांस त्यांच्या सल्यानें चालावें, असें सांगून महाराज मरण पावले. यांचें इंग्रजसरकारांत वजन चांगलें असून अखबरनविशीच्या महत्वाच्या कामावर असल्यानें तमाम लोकांचा दिल भरंवसा व लक्ष्य यांजकडे असल्यामुळें राजधानींत आपली हुकमत जारीनें चालत नाहीं, व हे येथें असेपर्यंत सररास अंम्मल चालणार नाहीं, असें गाईकवाड व वांकनीस यांस वाटलें. यास्तव कसेंही करून यांची येथून उचलबांगडी करण्याची मसलत केली पाहिजे, असा त्यांनीं विचार केला.

प्रथमतः लोभ दाखवून आपलें कार्य साधून घ्यावें, असा दिवाणसाहेब व त्यांच्या तर्फेचे कारभारी यांनीं घाट घातला. आणि रामरावास बोलावून असें सांगितलें कीं, बुवासाहेब महाराजांनीं तुम्हांस बसापूर व हगिदहाळ हे दोन गांव इनाम दिले आहेत,

ते सररास चालवितों, व दुमाला आज्ञापत्र करून देतों. आणि बुवासाहेब महाराजांच्या पश्चात् आपल्यास वडीलपणाचे वगैरे अधिकार मिळावयास तुम्हीं मदत केली आहे, त्याबद्दल २०,००० रुपये तुम्हांस रोख बक्षीस देतों. तें घेऊन तुम्हीं राजीनामा देऊन आपलें घरीं धारवाडास निघून जावें. तुम्हीं येथून गेल्यावेरीज आमचा अंमल सररास बसत नाहीं. तुमच्या तेजारवाली आपणाकडील दोघे कारभारी यांचे हुकमतींत कोणी लोक चालत नाहींत, याकरितां आम्हीं सांगतों हें मान्य करून व बक्षीस घेऊन येथून जावें. नाहींपेक्षां तुम्हांस येथून काढून टाकण्याविषयीं तजवीज करितां येईल. असें दिवाणसाहेब व उभयतां कारभारी यांनीं साफ सांगितलें. तेव्हां रामरावजींनीं साफ उत्तर दिलें कीं, तुमच्या सांगण्याप्रमाणें बेमानपणा करून आम्हीं येथून जाणार नाहीं. बुवासाहेब महाराजांनीं मरणसमयीं सर्व माझ्या स्वाधीन केलें, त्याकरितां कोणताही बेदा बखेडा होऊन राज्यास अपाय होऊंनये, याकरितां बुवासाहेबमहाराजांच्या राणीसाहेब यांस बहुत प्रकारें समजून सांगून त्यांची व आपली आपसांत राजी केली, व मागील द्वेष काढून टाकून वडीलपणाचे सर्व अधिकार आपणाकडे असावे असें केलें. असें असतां उलट मजला येथून जाण्यास आपण सांगतां हें योग्य नव्हे. आपली हुकमत सोईसोईनें राजधानींत चालेल. आपला अंमल एकदम बसणार नाहीं. राजधानींतील लोक स्वतंत्रपणानें वागलेले आहेत. माया ममतेनें बोलून चालून सर्वांस संतोषवृत्तीनें वागवून घेऊन सर्वांस सोईस लाविलें पाहिजे. आम्हीं इंग्रजसरकारचे ताबेदार नोकर आहों. त्यांच्या हुकमाशिवाय येथून आम्हांस जातां येणार नाहीं.

*रामरावास लोभ वगैरे दाखवून काढण्याचा यत्न करितात.*

दोन गांव व २०,००० रुपये बक्षीस घेऊन रामराव जातात, असें ताराआईसाहेब यांस कळलें, तेव्हां त्यांस फार वाईट वाटलें. हे गेले असतां आपला घात होईल. यांनीं सल्ला दिल्यामुळेंच आपण दिवाणसाहेबांशीं एकोपा करून त्यांजकडे वडीलपणा राखण्यास राजी झालों. परंतु इतक्यांत रामरावांची गांठ पडून मी जात नाहीं, असें त्यांनीं स्पष्टपणें सांगितल्यावरून त्यांस धीर आला.

वरील सर्व हकीकत ताराआईसाहेब यांस व त्यांजकडील कारभा-

त्यांस कळल्यावर त्यांजमध्यें व सईबाई दिवाणसाहेब यांजमध्यें अधिकच द्वेष उत्पन्न झाला. त्याचप्रमाणें दिवाणसाहेब यांजकडील कारभारी गाईकवाड व वांकनीस आणि ताराआईसाहेब यांजकडील कारभारी हवलदार व हुजूरबाजार यांमध्यें हळू हळू द्वेष वाढत जाऊन हरदूकडील लहान मोठे लोक पृथक् पृथक् वागूं लागले. व कोणी कोणास मानीना. या प्रमाणें एकास एक असें विरुद्धपणास कारण होत जाऊन प्रसंगोपात बखेडा होण्याचा रंग दिसूं लागला. तेव्हां एरवाढे वेळीं राजवाड्यांत भांडण कज्जा होऊन तक्रार वाढेल हें जाणून राजवाड्यांतील ख्वासबारदार व बंदूकबारदार लोकांस काढून दरवाज्याबाहेर ठेविलें. आणि हुपरीचे आरब जमादार व शिद्दी जमादार व त्यांचे लोक यांस व कटकोळचे काटक लोक सुमारें ५० करवीरीं होते, त्यांस सुद्धां आणून राजवाड्याच्या दोन्ही चौकांत ठेविले. आणि वाड्याच्या दरवाज्यापाशीं दोन तोफाही आणून ठेवून रामरावांनीं बंदोबस्त केला. हें करणें फारच विपरीत दिसून रामरावांविषयीं त्यांस अधिकच तिटकारा आला.

*राजवाड्यांत आरब व काटक यांस आणितात.*

तेव्हां दिवाणसाहेब व त्यांजकडील उभयतां कारभारी यांनीं सांगलीहून चिंतामणराव आपासाहेब यांजकडील कारभारी हरिहरराव दादासाहेब लागू व बापू नारायण यांस आणून त्यांजकडून रामरावाकडे रदबदली चालविली कीं, दोन गांव व २०,००० रुपये बक्षीस घेऊन निघून जावें. आणि आरब सिद्दी व काटक यांस राजवाड्यांतून काढून द्यावें. त्यांची रदबदली न ऐकतां रामरावांनीं कांहीं कबूल केलें नाहीं. नंतर खुद्द चिंतामणरावांकडे जाऊन त्यांजकडून रामरावांस सांगण्याचा यत्न केला. परंतु रामरावाचें करणें योग्य आहे, व त्यांनीं राजधानीची व्यवस्था चांगली केली आहे, करितां त्यांच्या सल्याप्रमाणेंच चालावें. असें चिंतामणराव आपासाहेबांनींही सांगितलें.

*सांगलीकर व त्यांचे कारभारी यांची मध्यस्थि.*

या प्रमाणें आपले हेतु सिद्धीस नेण्याविषयीं या कामीं निराशा झाल्यावर दिवाणसाहेब व त्यांचे निसबतचे कारभारी यांनीं असें बोलणें काढलें कीं, जामदारख्यान्याची वगैरे झाडाझडती घेऊन सर्व आपल्या जिम्मेस घेतों. यास ताराआईसाहेबांकडील कारभारी यांचा रुकार पडेना, व रामरावांसही ही गोष्ट प्रशस्त दिसेना. ते

म्हणूं लागले कीं, दौलत प्राचीन असून पेशजीपासून झाडाझडती घेण्याची चाल नाहीं. तेणेंकरून भ्रम जाईल, व कदाचित अफरातफर होईल. बुवासाहेब महाराज मरण पावले तेव्हां कार्याकारण सर्व लोक मिळून मोहरा करून जेथील तेथें बंदोबस्तानें ठेविलेलें आहे, व चार चार पहारे नेमिलेले असून सदरहू कामावर पेशजीपासून असणारे कामगार पिढीजादे व विश्वासूक आहेत. याकरितां तूर्त आहे तसें असूं द्यावें. महाराज थोडेबहुत मोठदशेस येऊन त्यांस समजूं लागलें म्हणजे त्यांस घेऊन जें करणें तें करावें. तसें न करितां जलदी केली तर बदलामीस कारण होईल, व कदाचित् तंटाबखेडा वाढेल. याप्रमाणें हा मनोगत सिद्धीस न गेल्यामुळें रामरावावर इतराजी होण्यास आणखीं कारण झालें.

गायकवाड व बांकनीस यांचा जामदारख्यान्याची झाडाझडती घेण्याचा यत्न.

महाराजांचा अभ्यास चांगला चालावा व त्यांनीं इंग्रजी भाषाही शिकावी, याकरितां चांगल्या विद्वान् व योग्य शिक्षकाची नेमणूक करावी, असा मुंबई सरकारानें ठराव केला. त्यावरून दादोबा पांडुरंग मराठी व्याकरणाचे कर्ते हे त्यावेळीं एल्फिन्स्टन कालेजांत असून त्यांचा अभ्यास तेथें पुरा झाला होता. त्यांनीं ही जागा आपणास मिळावी असा अर्ज केला, व त्यांची या जागेकरितां त्यावेळच्या बोर्ड आफ् एज्यूकेशननें सरकारास शिफारस केली. परंतु सरकारची मंजुरी येण्यापूर्वी त्यांस सुरतेस हेडमास्तरची जागा मिळाल्यावरून ते तिकडे गेले. म्हणून एल्फिन्स्टन कालेजांत शिकलेले दुसरे विद्वान् गृहस्थ केशव नरसिंह देशपांडे यांस महाराजांस शिकविण्याकरितां सन १८४१ सालीं दरमहा १२० रुपये पगारावर शिक्षक नेमिले.

महाराजांस शिकविण्याकरितां शिक्षकाची नेमणूक

रत्नाजीराव चव्हाण हिंमतबहाद्दर, भाऊसाहेब सरलष्कर व हिंदुराव गायकवाड सरखवास हे त्रिवर्ग ताराबाई साहेब यांच्या पक्षाचे असल्यामुळें त्यांस कोल्हापुरांतून बाहेर काढावें, असा विचार मनांत आणून घांटांतून चोरटे लोक रत्नागिरी जिल्ह्यांत फार जाऊं लागले होते, त्यांच्या बंदोबस्ताकरितां घाट संभाळण्याच्या नोकरीवर जाण्याविषयीं या त्रिवर्गास दिवाणसाहेबांनीं हुकूम केला. परंतु ते म्हणाले कीं,

महाराज स्वारीस निघाले म्हणजे त्यांजबरोबर आम्हीं जाऊं. असल्या प्रकारची नोकरी आम्हांस सांगण्याची वहिवाट नाहीं. या प्रकारें जिकडून तिकडून आपला अंमल चालण्यास हरकती येऊं लागल्या, व या सर्व हरकतींस रामराव कारण आहे, अशी त्यांची खात्री झाली. तेव्हां रामराव ताराआई राणीसाहेबांस गोषांत जाऊन भेटतात, व त्यांशीं खलबतें करितात, तारा आईसाहेब व त्यांच्या पक्षाचे लोक कारभारांत हरवक्त अडचणी आणतात व काम सुरळीत चालूं देत नाहींत, तर याचा विचार सरकारांनीं करावा. अशा मतलबाच्या थैल्या. दिवाणसाहेबांनीं सरकाराकडे पाठविल्या. तेव्हां एजंटसाहेब कोल्हापुरास आले. त्यांनीं ताराबाईची भेट घेऊन हरकती न करण्याविषयीं सल्ला दिला, व त्रिवर्ग सरदारांस घांटावर नोकरीस जाण्याविषयींही सांगितलें. तथापि कांहीं जम बसेना. पुढें मालवण येथें कोल्हापूरच्या लोकांनीं चोरी केली होती, त्यांच्या तपासाकरितां सिमसनसाहेब आपल्याबरोबर आनंदराव नगरकर ठाण्याचे मामलेदार व चिंतोपंत लघाटे बेळगांव जिल्ह्यांतील मामलेदार यांस घेऊन कोल्हापुरीं आले. या उभयतांकडे गायकवाड यांनीं वळण बांधून सिमसन साहेबांच्या मनांत ताराआईसाहेब व रामराव यांविरुद्ध गिल्ले पूर्णपणें भरवून दिले होतेच. येथें त्याप्रमाणें दिवाणसाहेबांनीं समक्ष कळविल्यावरून त्यांची खात्री झाली. त्यांनीं रामरावास एकदम बेळगांवास निघून जाण्याविषयीं हुकूम दिला, व त्यांच्या जागीं विनायकपंत या नांवाच्या मनुष्यास अखबरनविशीचें कामावर नेमिलें.

चव्हाण, सरलष्कर व हिंदुराव गायकवाड हे घांटावर नोकरीस जात नाहींत.

सिमसनसाहेब कोल्हापुरास येतात, व रामरावास बेळगांवास परत पाठवितात.

एकहातीं कारभार असल्याशिवाय सररास अंमल चालणार नाहीं. हें तत्व मनांत आणून सरकारास सिमसनसाहेबांनीं असा रिपोर्ट केला कीं, दिवाणसाहेब व तिच्या तर्फेचे कारभारी यांजकडेच सर्व अधिकार असावा. ताराआई साहेबांकडील जिवराव जाधव हवालदार व मोरोपंत हुजूर बाजार यांनीं आपण होऊनच कारभारांतील अंग काढलें आहे, व त्यांपैकीं हवालदार तर मरून गेले आहेत, याकरितां त्यांच्या जागीं दुसरे

दिवाणसाहेबांस पूर्ण अखत्यार देतात.

कारभारी न नेमितां दिवाणसाहेबांकडेच पूर्ण अखत्यार असावा, आणि पुढें मागें जरूरच पडल्यास राजाज्ञा यांस मात्र तिसरे कारभारी नेमावें. ही गोष्ट मुंबई सरकारांनीं मंजूर केल्यावर अमलांत आली, व गायकवाड यांस आपल्या इच्छेप्रमाणें वर्तन करण्यास सररास मोकळीक झाली.

दिवाणसाहेबांची सररास कारकीर्द.

नंतर यांनीं बुवासाहेब महाराजांचा कित्ता घेऊन राज्यांत हरएक बखेडे व जुलूम करण्यास आरंभ केला. कोणत्याही तऱ्हेचा खर्च कमी नकरितां सर्व खात्यांत खर्च वाढविला. चांकनीस व गायकवाड यांनीं आपले पगार दुप्पट करून घेतले, व जिकडे तिकडे आपले आप्त व सोयरे कामावर नेमिले. दिवाणसाहेबांनीं आपल्या खासगीकडेही खर्च वाढविला, परंतु तारा आईसाहेब व धाकटे महाराज यांजकडील नेमणुका थोड्या कमी केल्या, व तारा आईसाहेबांस हरएक प्रकारें त्रास देऊं लागले. त्यांजकडे कोणी गेला आला कीं त्याचें पारपत्य करावें, त्यांस वेळेवर खर्चास देऊंनये, व त्यांचा कोणत्याही प्रकारें मान राखूंनये. महाराजांस शिक्षण देण्याकरितां शिक्षक नेमावा, असें सरकारचें लिहून आलें, तरी त्याचीही तजवीज करण्याचें मनावर घेतलें नाहीं. सन १८४० सालीं उभयतां महाराजांच्या मुंजी झाल्या. त्या निमित्तानें अस्ताव्यस्त खर्च केला. तारा आई राणीसाहेबांस आपले डागदागिने विकून योग्यरीतीनें आपला निर्वाह करण्याची वेळ आली. रयतेवर जिकडे तिकडे जुलूम होऊं लागला. नजराणे घेऊन न्याय विकण्याची व इनामें देण्याची व पूर्वींचीं राखण्याची वहिवाट सररास सुरू झाली. मागील हिशेब तयार होईनात, व पुढेंही हिशेब नीटपणें ठेवीत नव्हते. बुवासाहेब महाराज वारले तेव्हां दौलतीस सुमारें साडेसाहा लक्ष रुपये कर्ज होतें. तें वारण्याविषयीं सरकारचा सक्त हुकूम होता तरी सुमारें एक लाख कर्ज मात्र २।३ वर्षांत वारलें गेलें. बुवासाहेब महाराजांचा मुख्य सावकार जो जोत्याजीराव नाईक निंबाळकर वगरकर यानें सन १८२७ सालापासून जें कर्ज दिलें होतें, त्याचा एकंदर हिशेब सुमारें सवातीन लाख होतो, अशी जी यादी त्यानें सरकाराकडे पाठविली होती, तिची रुजुवात घेऊन तोड करावी, व हप्तेबंदीनें रुपये देण्याचा ठराव करावा,

अशाबद्दल लिहून आलें असून त्याजबद्दल कांहींच तजवीज कारभारी यांनीं केली नाहीं. कोल्हापुरचे जैन व लिंगाईत लोक यांनीं आपलीं धर्मकृत्यें चालविण्यास ब्राम्हणासच बोलवावें, अशी त्यांजवर सक्ति करूं लागले. तेव्हां त्यांनीं सरकाराकडे जे गिल्हे केले, त्याजबद्दल कारभाऱ्यांस विचारिलें असतां त्यांनीं जबावच पाठविले नाहींत. पूर्वीं बुवासाहेब महाराजांच्या वेळीं जितक्या पागा होत्या, त्याहून जास्त पागा करून खर्च वाढविला. सातारचे महाराज श्री महालक्ष्मीचे दर्शनास करवीरीं आले त्यावेळीं कांहीं खर्च करूंनये, असा सरकारचा हुकूम असतां सुमारें १५,००० रुपये त्यांच्या निमित्य खर्च केला. गुन्हेगार अपराधी लोकांची योग्य रीतीनें चौकशी न करितां हवे त्यांस कैदेंत टाकूं लागले, व हद्दपार करूं लागले. हवीं त्याचीं इनामें काढून घेऊन हवीं त्यास देऊं लागले. खजिन्यावर दरवडा पडला असा बोभाट करून जामदारखान्यांतील दागिने कारभारी यांनीं नाहींसे केले. असा अनेक रीतीनें कोल्हापुरास धुमाकूळ चालला. तेव्हां ताराआईसाहेबांकडून वरचेवर सरकाराकडे थैल्या जाऊं लागल्या, व तिणें यापैकीं बराच मकार सरकारच्या नजरेस आणिला, व लोकांकडूनही फार गिल्हे गेले. तेव्हां याबद्दल योग्य तपास करणें सरकारास भाग पडलें.

सिमसनसाहेबांची बदली व टाऊनसेंड साहेबांची एजंटाचे जाग्यावर नेमणूक.

सिमसन साहेबांनीं नगरकर व लघाटे यांस बरोबर घेऊन येऊन कोल्हापुरास जी एकतर्फी चौकशी केली, रामरावास एकदम कोल्हापुरांतून काढिलें, व त्यावर आरोप ठेवून चौकशी करण्याविषयीं आणि दिवाणसाहेबाकडेच सर्व अखत्यार असावा, अशाविषयीं जो रिपोर्ट केला होता तो सर्वांशीं सरकारास पसंत न पडून, मुंबई सरकारानें सिमसन साहेबांची सोलापुरास बदली केली व त्यांच्या जागीं टाऊनसेंड साहेब यांस एजंटाचे कामावर नेमिलें. परंतु रामरावावरील आरोपाची चौकशी करावी व दिवाणसाहेबांकडे कोल्हापूर दौलतीचा सर्व अखत्यार असावा, या गोष्टी मंजूर केल्या होत्या. त्यांचा परिणाम असा झाला तेव्हां कोल्हापुरीं समक्ष जाऊन सर्व अहवाल पाहावी, व पुढें व्यवस्था काय करावी याविषयीं रिपोर्ट करावा, असा टाऊन्सेंड साहेबांस सन १८४२

साली सरकारचा हुकूम आला. परंतु टाऊन्सेंडसाहेब लौकरच रजेवर गेले, आणि त्यांच्या जागीं रील्हज्साहेब तपास करण्याकरितां करवीरीं आले.

कोल्हापुरीं आल्यावर वाड्यांत कामकाज कोणत्या शिस्तीनें चालतें, हें प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहावें, या हेतूनें ते वाड्यांत आले. तेव्हां जिकडे तिकडे शेंकडों कारकून बसले आहेत, त्यांपुढें कागद व वह्या पसरलेल्या आहेत, दौती व वाळुदाण्या जवळ आहेत, व काम झपाट्यानें चाललें आहे असा रंग दिसला. त्यार्थाशापुढें जाऊन त्यांजपुढील कागद उचलून पाहिले, तों त्यांपुढें कैद्यांच्या नांवनिशीची यादी मात्र होती. एका खटल्याचे कागद पाहण्यास त्याच्या शिरस्तेदाराकडून घेतले; त्यांत पाहातात तों असक्यास अमुक सजा दिली आहे, या शिवाय जास्त कांहीं दिसलें नाहीं. आणखी पांच चार खटल्याचे कागद पाहिले. तों त्यांतही बहुतेक असाच प्रकार नजरेस पडला.

*टाऊन्सेंड साहेब रजेवर गेल्यामुळें रील्हजसाहेब कोल्हापुरीं तपासास येतात.*

*न्यायाची पद्धत.*

साक्षीदारांचीं नांवें असलीं तर त्यांच्या जबान्या नाहींत, अपराध्यावर जे आरोप केले असतील ते शाबीत कसे झाले याचाही उल्लेख नाहीं अशी तऱ्हा त्यांच्या नजरेस पडली, व असेंच काम आज दोन तीन वर्षें चाललें असावें असें दिसलें. तेथून जमाबंदीकडे गेले. तेथेंही हाच प्रकार नजरेस आला. रोजकीर्द नियमानें लिहिलेली नव्हती, व खर्चीच्या रकमांचीं टांचणें मात्र होतीं. सन १८३१ सालचा हिशेब सन १८४२ सालीं व साहेब गेले त्याचे दिवशीं संपविलेला दिसला. शाई ताजी व त्यावर घातलेली वाळू अद्याप पडली नव्हती. त्यांत तरी तपशील कांहीं नव्हता. महाल मनत्यानें दिलेले असल्यानें महालांतूनही नीटसे हिशेब येत नसून तोंत्रिक टांचणेंच येत, व तीच दरबारांत कबूल होत. याचीं कारणें विचारितां वांकनीस यांस कांहीं सांगतां आलें नाहीं. रोजकीर्द कां नाहीं, व दरमाही हिशेबांत ठोकळ रकमाच कां लिहिलेल्या आहेत, याचें कारण विचारितां प्रत्येक खात्याकडे आहलेल्या रकमेची एकदर ठोकळ रक्कमच एकंदर हिशेबीं मांडण्याची आमची वहिवाट आहे असें उत्तर दिलें. दिवाणसाहेब व गायकवाड यांस लिहितां वाचतां वगैरे कांहीं येत नसल्यामुळें यांची सर्व जबाबदारी वांकनीस यांजवरच होती. वांकनीस यांनींही बाळकृष्ण बापूराव व काशी शंकाजी या आ-

*हिशेबी काम.*

*वांकनीस व त्याचे दोन कारकून.*

पल्या दोन कारकुनांवर सर्व सोंपविलें होतें, व ते हवीतशी ढवळाढवळ करीत असत; व याबद्दलही पुष्कळ गिल्ले एजंटाकडे गेलेले होते. त्याचाही प्रत्यय साहेबांस यावेळीं आला. कारण पुष्कळ ठिकाणीं जबाब विचारले असतां या दोघांस विचारल्याशिवाय वांकनीस यांस हिशेबांतील नपशिलाचीं कारणें फारशीं सांगतां येत नव्हतीं.

ह्या सर्व प्रकार पाहून साहेबांची अशी खात्री झाली कीं, दौलतीच्या पैशाची उधळपट्टी चालली आहे. मागील कारकीर्दींतील कर्जाची फेड होत नाहीं. शेंकडों अंमलदार व तसेच कारकून असून हिशेबसुद्धां बरोबर ठेवलेले नाहींत. मागील सालचे हिशेब तयार झाले नाहींत, लोकांची दाद लागत नाहीं, व न्याय बरोबर होत नाहीं, व जेथें होतो तेथें त्यांत जुलूम होतो. ही व्यवस्था दूर करण्याकरितां वांकनीस व त्यांचे दोन कारकून यांस कारभारांतून काढून टाकावें, व हा सर्व बखेडा मोडून बंदोबस्त होण्यास योग्य उपाय म्हटला म्हणजे कारभाऱ्यांवर एक युरोपियन अंमलदार नेमून त्याच्या हातीं सर्व अधिकार ठेवावा, असें त्यांस वाटलें. परंतु इतक्या पल्यास एकदम न जातां दिवाणसाहेबांस रीजन्सीचे मुख्य ठेवून कारभारी नेमणें ते पोलिटिकल एजंटानीं नेमावे, अशी सरकारकडे शिफारस केली. कारण कोल्हापूर राज्याचा कारभार योग्य रीतीनें व चांगला चालावा, याची जबाबदारी सर्वस्वीं इंग्रजसरकारावर महाराजांचे पालक या नात्यानें होती. याकरितां हल्लीं जो अव्यवस्थितपणा चालला आहे, तो दूर करणें हें सरकारचें कर्तव्य कर्म आहे. यांतच एजंटांनीं असें सुचविलें होतें कीं, दिनकररावास कारभारी कायम ठेवून वांकनिसाच्या जागीं मोरोपंत हुजूरबाजार यास कारभारी नेमावें. सरकारांनीं एजंटांचें म्हणणें सर्व मान्य करून वांकनीस व त्याचे दोन कारकून बाळकृष्णबाबुराव व काशी शंकाजी यांस काढून टाकण्याबद्दल तारीख १ सपटंबर १८४२ रोजीं ठराव केला. दिनकररावांस कायम ठेवून मोरोपंत यांस नवीन नेमण्याचेंही मंजूर केलें, त्याशिवाय पुढील गोष्टी अमलांत आणाव्या असें सरकारांतून लिहून आलें. (१) सर्व खर्चाच्या बाबी निक्या ठरवून द्याव्या. (२) एजंटांनीं कोल्हापूरचे हिशेब तपासण्यास हवे तेवढे कारकून नेमावे, व त्यांजकडून तिमाही

नवीन व्यवस्थेबद्दल शिफारस.

वांकनीस व त्याचे कारकून यांस काढून हुजूरबाजारास नेमितात.

हिशेब आणवून घ्यावे, व त्यांत फाजील खर्च दिसल्यास लागलेंच लिहून पाठवावें. (३) जोत्याजी नाईक निंबाळकर यांचें कर्जाचा निका हिशेब करून त्याजकडे जे महाल वहिवाटीस आहेत, त्यांचा हिशेब घेऊन बाकी देणें किती हें काढावें, आणि हसेबंदी करून वसुलांतून हप्त्याची रक्कम देत जावी. याचप्रमाणें दुसऱ्या कर्जदारांचीही व्यवस्था करावी. (४) दरसाल जमाखर्च आणि रदकर्ज यांचा नक्का सरकाराकडे पाठवावा. (५) न्यायाचें काम चांगलें चालण्याकरितां न्यायखात्यावर चांगला व वाकबगार न्यायाधीश नेमून न्याय करण्यापुरता त्याचा अधिकार रीजंट व कारभारी यांपासून स्वतंत्र ठेवावा. मात्र मोठ्या शिक्षेस रीजंट यांची मंजुरी घ्यावी. (६) सरकारमार्फत रीजंटीमध्यें एक नेटीव्ह एजंट असावा. त्यानें कामाकाजांत हात न घालतां काम कसें चाललें आहे तें एजंटास कळवावें. (७) कारभाऱ्यानें हरएक सर्व महत्वाच्या बाबतींत पोलिटिकल एजंटाचा सल्ला घेत जावा.

खर्चवेचाबद्दल वगैरे सरकारचा ठराव.

याच सालीं दुसरी एक महत्वाची गोष्ट घडून आली. पोलिटिकल एजंटांनीं महाराजांची भेट घेण्याची जी आजपर्यंत पद्धत चालत आली होती, ती ब्रिटिश अधिकाऱ्यांस साहजीकच फार अपमानकारक वाटत होती. ती बंद करावी अशाविषयीं एजंटाच्या कुरकुरी वरचेवर सरकाराकडे जात होत्या. त्यावेळीं एजंट भेटावयास आले म्हणजे त्यांस बूट काढावे लागत, महाराज त्यांस सामोरे जात नसत, व आपल्या जाग्यावरच बसले राहून मुजराही करीत नसत, व एजंट आले म्हणजे त्यांजकडे कांहीं लक्ष न देतां त्यांचा कांहीं मानमरातबही ठेवीत नसत. म्हणजे एखादा रयत जसा भेटीस जातो, त्याप्रमाणें एजंटसाहेबांस भेट घ्यावी लागत असे. ही चाल बंद करावी, असा तारीख २७ आगस्ट १८४२ सालीं ठराव केला, व तेव्हांपासून महाराजांनीं दरवाजापर्यंत सामोरें जाऊन एजंटांस आणावें, व एजंटाच्या भेटीस महाराज जातील तेव्हां एजंटांनीं महाराजांस सामोरें जाऊन आणावें, अशी पद्धत सुरू झाली.

भेटीच्या पद्धतींत फेरफार.

ही व्यवस्था सात आठ महिने चालली. तथापि त्यापासून राज्यांत कांहीं सुधारणा झाल्याचा रंग दिसेना. मोरोपंत हुजूरबाजा-

यांचें कारभारांत कांहीं चालूं न देतां आपणच मन मानेल तसा कारभार दिनकरराव गाईकवाड हे करूं लागले. मागील साल चे हिशेब तयार करण्याची तजवीज दृष्टीस पडली नाहीं. यांच्या विरुद्ध जे गिल्हे येत त्यांविषयीं एजंटाकडून जबाब विचारले असतां उत्तरेंच जात नसत. लिंगाईत व जैन लोकांवरील जुलूम बंद न झाल्यामुळें त्यांनींही फार गिल्हे एजंटसाहेबांकडे केले. तेव्हां पुनः टाऊनसेंन्ड साहेब कोल्हापुरास येऊन दिवाणसाहेबांची भेट घेतली आणि सांगितलें कीं, दिनकरराव गाईकवाडांस कारभारांतून काढून टाकिलें पाहिजे, तर त्याच्या जागीं दुसऱ्या कोणत्या योग्य मनुष्यास नेमावा, तें कळवावें. तेव्हां दिवाणसाहेबांनीं सांगितलें कीं, दिनकररावावर माझा पूर्ण भरंवसा आहे, व त्यासारखा दुसरा योग्य मनुष्य दौलतींत नाहीं. तेव्हां साहेबांनीं फार दिलगिरी दर्शवून स्पष्ट सांगितलें कीं, "गाईकवाडांचा अनुभव आज तीन वर्षें आला आहे, व त्यावरून तो कारभाराच्या कामास अगदीं निरुपयोगीं आहे, अशी खात्री झाली आहे. यास्तव राजाज्ञ, मोरोपंत हुजूरबाजार व हिंदुराव गाईकवाड या त्रिवर्गांस कारभारी नेमावें" मोरोपंत हुजूरबाजार हे जरी रावजी वांकनिसा इतके हुषार व शहाणे नव्हते, तथापि फार शांत, सालस व प्रामाणीक असून कोणत्याही खटपटींत किंवा कारस्थानांत न पडतां इमानानें काम करणारे असे योग्य मनुष्य होते. रामचंद्रराव राजाज्ञ यांचे वडील नारायणराव राजाज्ञ यांस सन १८२७ सालीं ब्रिटिशसरकारच्या हुकमानें बुवासाहेबांच्या कारकीर्दींत कारभारी नेमिलें होतें, व त्यांचे वडील रत्नाकरपंत आपा हे कोल्हापूरच्या शिवाजी महाराजांच्या वेळीं मुख्य कारभारी असून त्यांनीं जीं मोठमोठीं कामें करून कीर्ति मिळविली त्याचें वर्णन पूर्वार्धांत आलेंच आहे. या प्रमाणें राजाज्ञ हे पिढीजादे कारभारी असल्यानें कोल्हापुरांतील बखेडे मोडून कामाची शिस्त लावतील असें साहेबांस वाटलें. महाराज मराठे असल्यानें एक कारभारी मराठा सरदार असणें जरूर आहे, असें साहेबांस वाटल्यावरून त्यांनीं दिनकररावांचे पुतणे हिंदुराव गाईकवा-

कारभाराची नवीन व्यवस्था चांगली अमलांत येत नाहीं.

टाऊनसेंड साहेब बंदोबस्ताकरितां करवीरीं येतात.

गायकवाडांस काढून राजाज्ञ व हुजूरबाजार यांस कारभारी नेमण्याविषयीं सल्ला देतात.

ज्ञ यास निर्भेर कारभारी नेमावें. असें मनांत आणिलें. हिंदुराव हा जरी दिनकररावाचा द्वेष करीत होता, तथापि त्याच्या कारकीर्दीत कोणत्याही कारस्थानांत पडला नव्हता. हा पहिल्या दर्जाचा सरदार असून पोक्त, हुषार व पिढीजादा सरखवाशीचें काम करणारा होता. दिवाणसाहेबांनीं मोरोपंत व हिंदुराव यांस कबूल केलें, परंतु राजाज्ञास नेमण्याविषयीं त्या कबूल होईनात. त्याच्या जागीं न्यायाधीश पंडितराव किंवा त्यांचे कारकून यांस नेमावें, असें सांगितलें. परंतु ते दिनकररावाच्या तर्फेचे असल्यानें उपयोगीं नाहींत राजाज्ञच या कामास योग्य आहेत, त्यांसच नेमण्याविषयीं कबूली द्यावी. व दिनकरराव गाईकवाड व रावजी वांकनीस यांस कोल्हापुरांतून आपल्या गांवीं जाण्याविषयीं हुकूम करावा व याबद्दल थैली द्यावी. तेव्हां (१) राजाज्ञ यांस तूर्त मुख्य कारभारी आणि हिंदुराव व मोरोपंत यांस दुय्यम कारभारी नेमिलें आहे. (२) मागील कारभारी रावजी वांकनीस व दिनकरराव गाईकवाड यांस कोल्हापूर शहरांतून बाहेर घालविलें, आहे. (३) व शेणोलकर यांच्या जागीं नवीन वकील नेमिला आहे, या प्रमाणें थैली दिली. तेव्हां ती थैली साहेबांनीं परत पाठवून सांगितलें कीं, तूर्त शब्द काढून टाकून कायमच्या नेमणुका केल्या आहेत अशी थैली पाठवावी. तशीन येईल तर आम्हीं कारभाऱ्यांच्या स्वतंत्रपणें नेमणुका करूं, व तुम्हांस कारभारांत हात घालूं देणार नाहीं. साहेबांच्या सल्याप्रमाणें दिवाणसाहेबांनीं थैली पाठविली नाहीं. तेव्हां साहेबांनीं या तिघांच्या नेमणुका करून दिवाणसाहेबांस कांहीं न विचारतां कारभार चालवावा, असा हुकूम दिला. व नवे कारभारी ता° ३१ जानेवारी १८४३ इसवीपासून काम पाहूं लागले. त्याच प्रमाणें दिनकरराव, रावजी वांकनीस व सदाशीवपंत शेणोलकर या तिघांस दोन दिवसांचे आंत कोल्हापुरांतून निघून जावें, असा हुकूम फर्माविला. अशी व्यवस्था करून सरकाराकडे रिपोर्ट केला, व ही व्यवस्था मंजूर केल्याबद्दल तारीख ६ मार्च सन १८४३ चा मुंबई सरकारचा ठराव झाला. हा ठराव येऊन दिवाणसाहेबांचा अधिकार गेला, तेव्हां खुद्द महाराजांच्या

ही सल्ला दिवाणसाहेब कबूल करीत नाहींत.

दिवाणसाहेबांचा अधिकार काढून घेऊन राजाज्ञ यांस मुख्य कारभारी नेमितात

घराण्याव्यतिरिक्त दुसऱ्या कोणाच्या हाताखालीं दुय्यम नात्यानें काम करणें आमच्यासारख्या कदीम जुन्या नोकरांस योग्य नाहीं, व राजाज्ञाच्या हाताखालीं काम करण्यास आपण खुषी नाहीं; असें म्हणून मोरोपंत हुजूरबाजार यांनीं राजीनामा दिला, आणि रामचंद्रराव बापूसाहेब राजाज्ञ व हिंदुराव बाबासाहेब गायकवाड हे दोघेच कारभार करूं लागले.

राजाज्ञ यांचा कारभार.

राजाज्ञ काम पाहूं लागल्यावर त्यांस असा हुकूम दिला होता कीं, खर्च कमी करावा, न्याय देण्याची पद्धत सुधारावी, मक्त्यानें महाल देण्याची वहिवाट बंद करून व सावकारांकडील महाल काढून घेऊन मामलेदार नेमावे, व त्यांजकडून महालचीकची वहिवाट करवावी. जैन व लिंगाईत यांच्यावरील जुलमाची चौकशी करून यथान्याय त्यांचा बंदोबस्त करावा. जरूर पडेल त्यावेळीं सरकारचे अखबरनवीस यांची सल्ला घेत जावी.

यांच्या कारकीर्दीच्या मुळारंभींच कोल्हापुरास स्वारांनीं थोडा दंगा केला. राजाज्ञ यांनीं असा हुकूम केला कीं, स्वारांनीं नियमानें कामावर हजर व्हावें, सर्वांनीं घोडे दाखवावे. त्यांच्या चंदीवैरणीचा हिशेब दाखवावा, नाहींपेक्षां नेमणूक बंद होईल. ही गोष्ट स्वारांस न रुचून त्यांनीं हुकूम अमान्य केला, व बखेडा आरंभिला. कारण मागील अंदाधुंद कारकीर्दींत पुष्कळ स्वार घोडेसुद्धां न ठेवितां मोफत नेमणूक खात होते. तेव्हां राजाज्ञानीं एजंटास लिहून बेळगांवाहून महंमद घोरी रिसालदार व ५० हत्यारबंद स्वार असे आणविले, परंतु ते येण्यापूर्वींच स्वार शरण आले.

राजाज्ञांच्या हातूनही कांहीं म्हणण्यासारखी सुधारणा होण्याचें चिन्ह दिसेना. त्यांच्या हातून मागील हिशेबही तयार झाले नाहींत, प्रांताची जमाबंदीही झाली नाहीं, खर्चही कमी करवला नाहीं; जैन व लिंगाइतांची दाद घेण्याविषयीं फार निकडीचें लिहून आलें, तरी त्याबद्दल त्यांनीं कांहीं निकाल केला नाहीं. पंत अमात्यांस कोल्हापुरास आणून महाराजांबरोबर त्यांचा अभ्यास चालवावा, म्हणून हुकूम झाला असतां तसें तीन महिनेपर्यंत केलें नाहीं; व महाराजांची भेट पंत अमात्यांनीं घेतेवेळीं त्यांस फार खर्च पाडविला. आपलें महत्व वाढण्याकरितां ताराआई राणीसाहेबांस रीजंट नेमावें, व रावजी महारा-

जांस आपल्याबरोबर कारभारी नेमावें, अशाविषयीं राजाज्ञांनीं मुंबईस खटपट चालविली. सारांश त्यांच्या बारा तेरा महिन्यांच्या कारकीर्दीत कांहीं फरक दिसून आला नाहीं. तेव्हां टाऊनसेंड साहेबांनीं इंग्रजसरकारचा नोकर कोल्हापुरास मुख्य कारभारी नेमावा, अशी शिफारस केली. ही गोष्ट सरकारानें मान्य करून कोणास कारभारी नेमावें त्याचें नांव नमूद करून पाठवावें, आणि अखबरनवीस यांनीं कोणत्याही प्रकारची दवळादवळ करूं नये म्हणून त्यांस पाहिजे तर कारभारी मंडळांतच नेमावें, आणि महाराजांकडील खासगीची व्यवस्था सुरळीत चालण्याकरितां कारभारी मंडळांत एका मराठे सरदाराचीही नेमणूक व्हावी, असा ठराव केला. इतक्यांत मेहेरबान टाऊनसेन्डसाहेब यांची बदली होऊन त्यांच्या जाग्यावर रीव्हजसाहेब यांची नेमणूक झाली. त्यांनीं सरकारचे ठरावाप्रमाणें **दाजी पंडीत** धारवाड जिल्ह्याचे दफ्तरदार यांस दरमहा ५०० रुपयांवर मुख्य कारभारी नेमावें, व त्यांच्या हाताखालीं हिंदुराव गायकवाड यांस दरमहा ३५० रुपयांवर महाराजांच्या मुख्यत्वें खासगीकडील काम पहाण्यास नेमावें, आणि काशिनाथ पंत काळे यांनीं अखबरनवीशीचें काम करून शिवाय कारभाऱ्याचेंही काम करावें, आणि त्यांस सरकारी पगार ९१ रुपये मिळत आहे. ते मिळून शिवाय कोल्हापूर दरबारातून १०९ रुपये असे एकंदर त्यांस २०० रुपये मिळावे. अशी शिफारस केली. या शिफारसी सरकारानें सन १८४४ माहे फेब्रुवारी महिन्याचे ९ वे तारखेस मंजूर केल्या, व त्या प्रमाणें मेहेरबान रीव्हजसाहेब पोलिटिकल एजंट हे कोल्हापुरीं आले. सन १८४४ सालच्या मार्च महिन्यांत मोठा दरबार भरवून सर्वांस मागील पांच वर्षांची स्थिति कळविली, व त्या काळांत ब्रिटिश सरकारानें कोल्हापूर राज्याची व्यवस्था सुधारण्याकरितां काय काय खटपट केली, तेंही सांगितलें. त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं, म्हणून आपल्या पूर्ण भरंवशाचे असे **दाजी कृष्ण पंडित** यांस मुख्य कारभारी नेमिलें आहे, तर सर्वांनीं त्यांच्या हुकुमांत वागून त्यांस मदत करावी, असें सांगून त्यांच्या हवालीं खजिन्याच्या किल्ल्या केल्या.

ब्रिटिश सरकारचा नोकर कारभारी नेमण्याविषयीं शिफारस.

दाजी पंडीत यांची नेमणूक मार्च १८४४

त्यांनीं खजिन्याचा चार्ज घेतला तेव्हां खजिन्यांत कांहीं थैल्या भरलेल्या, कांहीं अर्ध्या, कांहीं १/३ अशा मिळाल्या. थैल्यांची जी यादी होती त्याशीं व रोख रकमेशीं मुळींच मेळ नव्हता. रोजकीर्द पाहतां जानेवारी १८४४ महिन्यापासून शिल्लक बाकी काढलेली नव्हती, व रोजकीर्द लिहिलेली नव्हती, व कीर्दीवर सह्याही नव्हत्या. खजिन्यांत एकंदर सुमारें १६,००० रुपये रोख होते. पुढें हिशेब तपासतां पंडित यांच्या नजरेस असें आलें कीं, नजराणे घेऊन इनाम गांवें व जमिनी सोडून देण्याचा क्रम मागील एक सालच्या कारकीर्दींत सररास चालला होता. व त्या प्रमाणें सुमारें ९॥ हजार रुपयांचीं इनामें सोडून दिल्याचें आढळलें. त्याविषयीं राजाज्ञा यांस विचारितां त्यांनीं सांगितलें कीं गेले ५।७ महिने इनामाची वगैरे व्यवस्था हिंदुराव पाहात होते. हिंदुरावांस विचारितां त्यांनीं सर्व कृत्याबद्दल मी जबाबदार आहें, असें सांगितलें; परंतु मी हें दुसऱ्याच्या सांगण्यावरून केलें आहे, असेंही दर्शविलें. याची खबर काशिनाथपंत काव्यांनीं एजंटास कळविली नव्हती, म्हणून स्वाभाविकच त्यांचा संशय एजंटांस आला. हिंदुरावांस तर लागलेंच कामावरून दूर केलें, आणि याचा बारीकरीतीनें तपास करूं लागले. तों कोणी रामभाऊ करमरकर या नांवाचा मनुष्य कोल्हापुरीं काशिनाथपंताच्या लग्यानें २ वर्षींपूर्वीं आला असून काशिनाथपंताच्या घराजवळच राहात असे, व त्यांजकडे व हिंदुरावांकडे वरचेवर जात येत असे. व प्रांतांत फिरून ज्यांचीं इनामें जप्त झालीं असतील त्यांजकडून नजराणे आणून त्यांचीं इनामें सोडवून देत असे, असें समजलें. त्यावरून काशिनाथपंत काव्याचें अंग यांत आहे असें खास समजून त्यांसही कामांतून दूर केलें, आणि एकटे दाजी पंडित सर्व कारभार पाहूं लागले.

पंडित यांनीं चार्ज घेतला त्या वेळची स्थिति.

या प्रमाणें रावबहादूर पंडित यांचा अंमल स्वतंत्र व एक हातीं झाला. तथापि त्यास राज्यांत सुधारणा करण्यास अनेक अडचणी होत्या. त्यांविषयीं चार शब्द लिहिले म्हणजे पुढें जो बिकट प्रसंग कोल्हापूर प्रांतावर गुदरला, त्याचीं कारणें वाचकांच्या लक्षांत येतील.

यावेळची कोल्हापूरची स्थिति.

**बुवासाहेब महाराज** गादीवर बसले तेव्हांच राज्यांत दुफळी हो-

ऊन कांहीं जाणते लोक त्यांस अनुकूल व कांहीं प्रतिकूल असे झाले. त्यांच्या कारकीर्दीचें जें मागें वर्णन केलें आहे, त्यावरून सहज दिसून येईल कीं, त्यांच्या वेळेपासून हुजूरच्या करड्या अमलांत ढिलाई वाढत जाऊन तिचा **सईबाई** ऊर्फ **दिवाणसाहेब** यांच्या कारकीर्दींत कळस झाला. हुजूरचा दाब व हुजूरची देखरेख कमी पडत गेल्यामुळें, प्रांतांतील अम्मलदार बरेच स्वतंत्रपणें वागत असत. मामले वगैरे मक्त्यानें देत, व हिशेब वगैरे नितपतच हुजूर जात. प्रत्येक गडावर एकेक मामलेदार असे, व त्याजकडे दिवाणी, मुलकी, फौजदारी वगैरे अंमल असत. त्यांच्या स्वाधीन गडाच्या रक्षणार्थ ठेविलेले गडकरी असत. यामुळें त्यांच्या जोरावर मामलेदारांसही बेपर्वाईनें वागण्याची संवय लागून गेली. फौज इतकी जास्त होती कीं, तिचा खर्च भागत नसे. अठरा कारखान्याकडेही महाल तोडून दिलेले होते, व त्यांवरील अम्मलदारांनीं त्याबदला खर्चास देऊन रदकर्ज वारून घेत जावें, अशी वहिवाट होती. यामुळें त्यांसही त्या त्या महालचे आपण राजे आहों, असें वाटत असे. सरदार, मानकरी, शिलेदार, वगैरे यांवरही हुजूरचा अम्मल चालावा तसा चालत नसे. अशा ठिकाणीं पंडित यांस सरसास अम्मल बसवून ब्रिटिश इलाख्यांतील शिस्त बसवावयाची होती. खर्च कमी करावयाचा होता, बऱ्याच फौजेस फांटा द्यावयाचा होता, हिशेब चालू सालावर आणून पुढें वेळच्या वेळेस तयार व्हावे असें करावयाचें होतें, मक्त्यानें महाल मामले देण्याची वहिवाट मोडावयाची होती, आणि जी ढिलाई आज २०।२५ वर्षें सतत चालली होती तेथें करडा अम्मल बसवावयाचा होता. याकरितां त्यास जें करावयाचें होतें तें किती बिकट काम होतें याची सहज कल्पना होईल.

या शिवाय दुसऱ्या कांहीं बऱ्याच मोठ्या अडचणी पंडितांच्या मार्गांत होत्या. **सईबाई दिवाणसाहेब** यांस कारभारांतून मुळींच काढल्यामुळें नवीन कारभाऱ्यास होतील तितक्या हरकती करण्यास ती तयारच होती. तसेंच तिच्या वतीचे कारभारी **दिनकरराव गाईकवाड** व **रावजी बांकनीस** यास केवळ कारभारांतूनच काढिलें होतें असें नाहीं, तर त्यांस कोल्हापुरांतूनही हांकून दिलें होतें. यामुळें नवीन कारभाऱ्या-

स होतील तितक्या हरकती करण्यास ते तयारच होते. यां चिवर्गांनीं सहा सात वर्षे कारभार केल्यामुळें त्यांस अनुकूल अशी मंडळी राज्यांत बरीच होती. शिबंदींतील व गडावरील लोकांस मन मानेल तशी पुंडाई करण्याची संवय लागली होती. त्यांस तसें करूं न देण्याचा इलाज केल्यास त्यांचे हात वळवळतीलच हें स्वाभाविक होतें.

शिवाय ज्या कोल्हापूरकरांस आज कित्येक वर्षे ढिल्या अमलांत वागण्याची चट लागली होती, त्यांवर एकदम व एकसहा करडा अंमल बसविल्यानें त्यांस तें साहजीकच आवडण्याजोगें नव्हतें. पंडित हे करड्या इंग्रजी अमलांत वहिवाटलेले असल्यामुळें त्यांनीं इकडे एकदम करडा अंमल बसविण्यास व कारभारांत मोठे फेरफार करण्यास सुरुवात केली. कोणत्याही राज्यकारभारांत मोठमोठे फेरफार करणें ते धीरेधीरे व सावकाश करावे लागतात. तसें न करितां पंडित यांनीं फार घाई केली. जुन्या व्यवस्थेचा पालट करण्यास युक्तियुक्तीनें आरंभ केला असता, तर पुढें जे कोल्हापुरावर मोठें संकट आलें तें कदाचित आलें नसतें. वास्तव सन १८४४ च्या बंडास कांहीं अंशीं वरील प्रकार कारण झाला, असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. पंडित हे फार हुषार कामगार होते. यांस एका सरळ मार्गानें जावें, वरिष्ठांचा हुकूम एकसहा अमलांत आणावा. या पलीकडे यांचें ज्ञान नव्हतें. जेथें अलगर्जीपणाचा कारभार आज कित्येक वर्षे चालला होता अशा ठिकाणीं लोकांस फार न दुखवितां व त्यांचीं मनें दूषित न करितां व आपल्या प्रतिपक्ष्यांस दंगा करण्यास सवड न मिळूं देतां युक्तीनें व्यवस्थित कारभार कसा सुरू करावा, हें त्यांस माहीत नव्हतें. त्यांनीं जर दुसऱ्या मराठी राज्यांत काम केलें असतें तर आज कित्येक वर्षे चालत आलेली पद्धत एकदम मोडण्यास कधीं यत्न केला नसता. खऱ्या मुत्सद्यानें प्रथम दोन चार गडांवरील मामलेदार काढून त्यांवर एक मामलेदार नेमिला असता. त्याचा परिणाम कसा होतो तें पाहून पुढें हात घातला असता. तसेंच माजी कारभारी मंडळ दिवाणसाहेब, गायकवाड व वांकनीस यांस एकदम कारभारांतून काढून राज्यांतच राहूं दिलें असल्यानें ते स्वाभाविकच हरकती करणार. तर त्यांचा उपद्रव दूर करण्याचाही यत्न करावयास पाहिजे होता. असो.

ज्या प्रांताच्या आसपास आपली फौज नाहीं. व फौज तत्काळ आणण्याच्या

सोयी नाहींत, अशा ठिकाणीं आपला एकटा अंमलदार पाठविणें यांत इंग्रजसरकारचीही चूक झाली. आपल्या अम्मलदारानें एकादी नवी शिस्त सुरू केली. परंतु ती लोकांस न आवडल्यामुळें ते आड आले व बिथरले, तर ती शिस्त अमलांत आणण्यास अंमलदारास फौजेचें पाठबळ लागतें. कोल्हापूर राज्यांतील फौज व सरदार तर पंडितांच्या कब्ज्यांत व हुकुमांत होते असा अर्थ नव्हता. यांस बेलाशक त्यांनीं कैद करून मुसक्या बांधिल्या तरी त्यांस प्रतिबंध करविण्यास पंडितांपाशीं कांहीं साधन न ठेवितां व या विषयीं कांहीं बंदोबस्त न करितां एकट्या पंडितांस कोल्हापुरास पाठविलें, यांत इंग्रजसरकारचीही चूक झाली. व या चुकीचे परिणाम कोल्हापूर राज्यास पुढें कित्येक वर्षें भोगावे लागले, व राज्याची फार खराबी झाली. या बंडाची अथपासून इतिपर्यंत साद्यंत माहिती आम्हांस मिळावी तशी मिळाली नाहीं. दाजी पंडितांस कैद केल्यापासुन बंड मोडेपर्यंत सर्व काम पोलिटिकल एजंट व स्पेशल कमिशनर यांच्या मार्फत चालत होतें. यामुळें ही माहिती इंग्रज सरकारच्या दप्तरीं असून महाराज सरकारच्या दप्तरीं नाहीं. यास्तव मेजर ग्रेहाम यांनीं आपल्या स्टयाटिस्टिकल रिपोर्टांत व सर ली ग्रांड जेकब यांच्या पुस्तकांतून मुख्यतें घेतली आहे. म्हणून ही फारच त्रोटक व अर्धवट आहे, हें सांगण्यास नको.

इंग्रज सरकारची चूक.

दाजी कृष्ण पंडित यांनीं या सर्व गोष्टींचा विचार न करितां एकंदम राज्यांतील सर्व जुन्या शिस्ती बदलण्यास आरंभ केला, यांत संशय नाहीं. तथापि हे जर माजी कारभाऱ्यांप्रमाणें अप्रामाणिक व ढिले असते, आणि दरबारांतील लोकांस रयतेवर जुलूम करण्यास आड न येते आणि जेव्हां मागें इंग्रज सरकारानें राजाज्ञ यांस कारभारीनेमिले तेव्हां ते ज्या प्रमाणें वागले तसे वागले असते, तर त्यांची कारकीर्द निदान त्यांस हितकारक झाली असती, व त्यांस जीं दुःखें व संकटें भोगावीं लागलीं त्यांचा प्रसंग येता नसता. परंतु पंडित फार प्रामाणिक व सरळ पडले. सरदार व कामगार यांनीं अन्यायानें व जुलमानें रयतेस वागविलें तर त्यांची ती वर्तणूक उघडीस आणून त्यांस शासन करूं लागले, व पुढें तसें न होऊं देण्याविषयीं तजवीज ठेवूं लागले. कोल्हापूरचें राज्य कांहीं दिवस चालावें, व तें काळाच्या घशांत पडूं नये, याकरितां इंग्रजसरकारच्या हुकुमावरून रा-

दाजी पंडितांच्या सुधारणा.

ज्यांत अनेक सुधारणा करण्यास पंडितांनीं सुरुवात केली. प्रांतांतील मामलेदारांनीं अमक्या शिस्तीनें काम करावें, असें ठरविलें. कारखान्याकडील व शिबंदीकडील अंमलदारांनीं वेळच्या वेळीं कामावर हजर राहावें. मानकरी व शिलेदार यांनींही नियमानें कामावर यावें. कारखान्याकडे महाल तोडून दिले होते, व मोबदला खर्चास देऊन महालच्या वसुलांतून रद कर्ज वारून घेत जाण्याची वहिवाट बंद केली. हिशेब वेळच्या वेळीं पाठविण्याबद्दल सक्त हुकूम दिले. आपल्या मदतीस बाहेरून कांहीं हुषार व भरंवशाचे कारकून व कामदार आणिले. खर्च कमी करण्याकरितां कांहीं फौज कमी करण्याच्या व कांहीं मामलेदार कमी करण्याच्या उद्योगास लागले. या लहानशा प्रांतांत एकंदर एकवीस मामलेदार होते. बहुतेक प्रत्येक गडावर एकेक स्वतंत्र मामलेदार होता. ते मोडून सर्व प्रांताचे सहा विभाग करून प्रत्येक पेट्यावर एकेक मामलेदार नेमिला. येणेंकरून साहजीकच दोन तीन गडांची व्यवस्था एका मामलेदाराकडे आली. यावरून आपलें महत्व जातें, असें गडकऱ्यांस वाटून हेंच बंड होण्यास साक्षात् कारण झालें.

कोल्हापूर इलाख्यांतील सर्व किल्ल्यांवर त्यांचे संरक्षणार्थ कांहीं गडकरी असत. त्यांच्या उदरनिर्वाहार्थ त्यांस जमिनी तोडून दिलेल्या होत्या. ते आपल्या किल्ल्याच्या बळकटीच्या जोरावर निर्भय, बेफाम व शिरजोर असे झाले होते. आपल्या हक्कास कोणी काडीमात्र अडथळा केल्यास ते एकदम किल्ल्याचे दरवाजे बंद करून हुजूरच्या अधिकाऱ्यांस जुमानीनातसे होत. कोल्हापूरचा पहिला शिवाजी याच्या कारकीर्दीपासून हीं त्यांचीं बंडें मोडण्यास कोणी यत्न केला नव्हता, व बंडवाले गडकरी लोकांचें म्हणणें बहुतेक अशा प्रसंगीं कबूल होत गेलें. हें त्यांच्या विशेष बेपर्वाईचें मुख्य कारण असावें असें वाटतें.

बंडाचीं कारणें.

पंडितांनीं गडइंग्लज हें पेट्याचें मुख्य ठिकाण करून तेथच्या मामलेदाराकडे सामानगडची व्यवस्था दिली. तेव्हां आपल्या गडाचा अंमल दुसरीकडे जाणार हें पाहून गडकऱ्यांस आपलें महत्व जातें, असें वाटलें. हा वेळपावेतों प्रत्येक गडास एकेक वेगळा मामलेदार असून त्याकडे किल्ल्याचा शिक्का मोर्तब वगैरे वेगळें असे, व त्याच्याच अमलाखालीं किल्ल्याखालचा मुलूख असे. ही सर्व व्यवस्था मोडून जेव्हां दोन दोन तीन तीन

राठी ... आणे

गडांवर जास्त अधिकार देऊन एकच मामलेदार नेमिला. तेव्हां त्यास व त्याच्या कामगारांस गडावर येण्याची त्यांनीं मनाई केली.

या बंडांत दिवाणसाहेब व तिच्या पक्षाचे मानकरी यांचें अंग जरी उघडपणें नव्हतें तरी बंडवाल्यांस यांची फूस होती, असा संभव दिसतो. माजी कारभारी दिनकरराव गायकवाड व रावजी वांकनीस यांनीं गडकऱ्यांस व दुसऱ्या शिबंदीच्या लोकांस चिथावून दिलें असें पुढें उघाडीस येऊन त्यांस अशीरगडावर पाठविलें होतें. ते सर्व एक ठिकाणीं रात्री खलबत करण्यास जमत. सुभाना निकमास त्यांनीं सामील करून घेतला होता. आसमंतातच्या संस्थानिकांकडे आपणास मदत मिळण्यासाठीं वकील व पत्रें पाठविलीं होतीं. त्यांत सातारचे महाराज व सांगलीचे चिंतामणराव आपासाहेब यांजकडे गेलीं होतीं आणि अशी अफवा उठविली होती कीं, कोल्हापूरच्या आसपास १०० कोसांत ब्रिटिश सरकारचा एकही शिपायी नाहीं.

सामानगड व भुदरगड किल्ल्यांवर बंड.

सन १८४४ सालच्या जुलई महिन्यांत सामानगड व भुदरगड यांवरील गडकऱ्यांनीं किल्याचे दरवाजे बंद करून बंडाचें निशाण उभारिलें, आणि आपापल्या गडावर स्वतंत्र मामलेदार मागूं लागले. या बंडांत मुख्य रामजी जाधव, दौलतराव घोरपडे, बापूजी बाजीराव सुभेदार, गोविंद व्यंकाजी फडणीस, गणेश मुरार मुजूमदार. यशवंत आपाजी फडणीस, मुंजापा कदम, जोतबा आयरे इत्यादि होते, असें म्हणतात. यांचें पारपत्य करण्यास कोल्हापुराहून सरलष्कर व हिंमत बहाद्दर यांस फौज देऊन पाठविलें. परंतु सामानगडकऱ्यांनीं त्यांचा पराभव केला. येणेंकरून गडकऱ्यांस जास्तच दम येऊन त्यांस दुसरे लोक येऊन मिळूं लागले, आणि ते दारु गोळा जमवूं लागले. ही हकीकत रीव्हजसाहेब पोलिटिकल एजंट यांस कोल्हापुराहून लिहून जातांच त्यांनीं हणमंतराव या नांवाच्या एका नेटिव ऑफीसरास गडकऱ्यांची भेट घेऊन त्यांचें काय म्हणणें आहे तें ऐकून घेण्यास पाठविलें. त्यांस गडकऱ्यांनीं तीन मैलांच्या आंतच येऊं दिलें नाहीं. त्यानें युक्तीनें आपला एक कारकून व शिपायी यांस गडावर पाठविलें त्यांस गडकऱ्यांनीं पाहाऱ्यांत ठेविलें, आणि गडाच्या आसपास तीन चार मैलांत कोणास फिरकूं देईनात. गडकरी शरण येऊन किल्ला स्वाधीन करतील, तर त्यांस अभय मिळेल, व त्यांच्या तक्रारींचा योग्य विचार केला जाईल, असें गडकऱ्यांस अधिकाऱ्यांनीं सांगून पाठवि-

बंडवाले हिंमत बहाद्दरचा पराभव करितात.

लें असतां त्यांनीं ऐकिलें नाहीं. आपणावर प्रस्तुत अंमल कोणाचा आहे, व त्यांच्या शक्तीचें स्वरूप काय आहे, याचा विचार न करितां आपले किल्ले अजिंक्य व दुर्धर आहेत, अशी पोकळ घमेंडी बाळगून गडकरी किल्यांत स्वस्थ राहिले.

बंडवाल्यांस सामील होणार नाहीं अशी कोल्हापुरास फौज नाहीं. बुवासाहेबांचा वचक व दाब होता, तसा आतां कोणाचा नाहीं. सरदार व त्यांची फौज यांवर भरंवसा ठेवितां येत नाहीं. नवीन कारभाऱ्यांचा अधिकार लोक मानीत नाहींत, अशी अवस्था पाहून या बंडवाल्यांस शिक्षा करून त्यांची खोड मोडावी, व सर्व प्रांतांत कडक अंमल बसवावा, यासाठीं इंग्रज सरकारास हात घालणें प्राप्त पडलें व तारीख ७ सप्टंबर रोजीं कोल्हापुरास फौज नेण्याबद्दल हुकूम सुटला, व रीव्हजसाहेबांनीं आपले असिस्टंट अंडरसन साहेब यांसही पाठविलें. त्या प्रमाणें कर्नल वालेस साहेब मद्रास फौजेंतील १२०० लोक व चार गरनाळा घेऊन सपटंबरच्या १९ व्या तारखेस सामानगडास येऊन दाखल झाले.

इंग्रज सरकारची फौज सामानगडास येते.

चोहोंकडून कडे तुटलेले आहेत अशा सह्याद्रीच्या अलग फांट्यावरील खडकावर गडइंग्लजेपासून ३॥ मैलावर सामानगड बांधिलेला आहे. या डोंगराची उंची २६०० फूट आहे. गडाचा तट दगडी आहे. तटाची रुंदी बरीच असून ८ पासून २० फूटपर्यंत उंची होती, व एकंदर घेर सुमारें २ मैल होता. हा किल्ला जरी लहान होता, तरी बराच बळकट होता. निजाम, पटवर्धन व निपाणीकर हे हा किल्ला घेण्यास बारा वर्षें यत्न करीत होते. हीच कायती गडाची मुख्य बळकटी होती. इतर फौजफांटा व दारुगोळा यथायथाच होता. कारण ३५० गडकरी १० तोफा १०० बंदुक बारदार व २०० तरवारवाले इतकी तयारी यावर होती. तारीख २१ रोजीं एकाएकीं छापा घालून पेटा घेतला व किल्लाही घेण्याची तयारी होती. परंतु किल्ला हस्तगत होण्यापुरती सामुग्री नव्हती. यास्तव सर्व फौज किल्यासभोवतीं नळ देऊन आंतील मनुष्य बाहेर व बाहेरील मनुष्य आंत जाऊनये अशा बंदोबस्तानें राहिली. आणि कर्नल वालेस साहेबांनीं बेळगांवाहून मोरचे लावण्याच्या तोफा पाठवून देण्याविषयीं वरिष्ठांस लिहिलें.

सामानगडावर हल्ला.

इतक्यांत सपटंबरच्या २२व्या तारखेस सरलष्कर यांजबरोबर जी फौज भुदरगडावर कोल्हापुराहून रवाना झाली तिजवर भुदरगडावरील गडकऱ्यांनीं एकाएकीं छापा घालून त्यांस मागें हटविलें. व त्यांतील बऱ्याच लोकांस मारिलें. सुभाना निकम भुदरगडकऱ्यांस ३०० लोकांनिशी मदत करीत होता. यापासून बंडवाल्यांस आपल्या शक्तीविषयीं जास्तपण पोकळ भरंवसा आला. त्यांस आणखी लोक येऊन मिळूं लागले. आणि चोहोंकडील लोक फितूर झाले, व बंडवाल्यांचा पक्ष सबळ होत चालला.

भुदरगडकरीस-रलष्करचा पराभव करितात

चोंहोंकडून फौज इकडे रवाना करण्याविषयीं हुकूम गेले. अकटंबरच्या आठव्या तारखेस जनरल डिल्यामोटी साहेब आले व त्यांनीं सर्व फौज आपल्या स्वाधीन करून घेतली. अकराव्या तारखेस मोरचे लावण्याच्या चार तोफा सामानगडास येऊन पोहोंचल्या.तोफा दाखल होतांच त्यांवर जी सख्ती किंवा जुलूम झाला असेल किंवा त्यांचें जें म्हणणें असेल, तें सर्व समक्ष भेटींत निवेदन करावें अशी सवड मे॰ रीव्हजसाहेब कमिशनर यांणीं बंडवाल्यांस दिली. परंतु कोल्हापुराहून लौकरच कुमक येईल; या आशेनें भेटीस आतां येतों, घटकेनें येतों, असें लांबणीवर टाकूं लागले. ही टाळाटाळी पाहून किल्यावर हल्ला करण्याचें ठरलें. दुसऱ्या दिवशीं म्हणजे १२ व्या तारखेस तोफा किल्यावर लावून भडिमार सुरू केला. सायंकाळचे आंत तटास खिंड पाडिली, आणि १३वी तारीख उजाडली नाहीं तोंच आंत छापा घालून किल्ला घेतला. गडकऱ्यांच्या हातून फार वेळ टिकाव धरवला नाहीं. कारण त्यांची जमान थोडी होती,व युद्ध सामुग्री नव्हती, व कोणीकडून कुमकही आली नाहीं. किल्याचे आसपास जे बंडवाले जमले होते, त्यांस मद्रासच्या स्वारांच्या पांचव्या पलटणींतील एका कंपूनें ठार केलें.

सामानगडावर मोर्चे लावून गड घेतात.

सामानगड व भुदरगड यावर बंड उभारण्याचें काम सिद्धीस गेल्यावर गायकवाड व वांकनीस हे खुद्द कोल्हापुरास बंड करण्याच्या उद्योगास लागले. या कृत्यास सखाराम घाटगे धाकटे महाराजांचे मामा व बाबाजी आयरेकर जमादार यांस त्यांणीं सामील करून घेतलें. त्यांनीं शिबंदीच्या सर्व लोकांस सामील करून घेऊन कोल्हापुरास बंड केलें.

त्याचा उपक्रम असा केला. कांहीं शिबंदीचे लोक कोल्हापूर मामलेदाराकडे गेले व आपणास खर्चास पैसा द्या, म्हणून फार उद्धट- पणानें मागूं लागले. तेव्हां मामलेदार त्यांस घेऊन कार- भाऱ्यांकडे गेले. तेथें त्यांनीं उद्धटपणाची व दांडगाईची क- माल केली. आम्हांस खर्चास पैसा द्या." न्हाईतर तुमा बामनांसनी धरू- नशानी आतांच कैद करतुंया. भाईरच्या बामनांनीं येऊनशानी आमा- सनी लय भंडावलेंया." अशीं उद्धट भाषणें बोलून कारभारी व मामले- दार यांच्या गचांड्यांस हात घालून धरिलें व त्यांच्या आणि पंडितांनीं आ- णलेल्या दुसऱ्या सर्व कारकुनाच्या मुसक्या बांधून नेलें. आणि त्यांच्या प- क्षाच्या सर्व लोकांस वाडा बंद केला, व जिकडे तिकडे पाहारे ठेवून महा- राजांसही वाड्यांत कोंडिलें. महाराजांनीं त्यांचा फार निषेध करून असें न करण्याविषयीं फार सांगितलें. परंतु तें त्यांनीं न ऐकतां वाड्याचे दरवाजे बंद करून शहर रक्षणाचे उपाय योजूं लागले. बंडवाल्यांनीं दिनकरराव गा- यकवाड व रावजी बांकनीस यांस कारभारी नेमून घाटगे व आचरेकर यां- नी सर्व फौजेचें आधिपत्य स्वीकारिलें. त्यांनीं तुरुंगांतील कांहीं कैद्यांस मु- क्त केलें. त्यांतच यम्या मांग या नांवाच्या एका प्रसिद्ध चेरडाची विडी का- ढून त्यास पागोटें दिलें. त्यानें तीन चारशें लोकांनिशी सुभाना निकमास घे- ऊन येतों असें वचन दिलें. या प्रमाणें कोल्हापुरास बंड झाल्याचें ऐकून सामानगडकऱ्यांस आशा आली होती, कीं आपणास कोल्हापुराहून कु- मक मिळेल, या घमेंडीवर त्यांनीं त्या वेळीं कमिशनर साहेबांची भेट घेण्या- ची त्यावेळीं टाळाटाळी केली (पुरवणी पहा.)

कोल्हापुरास बंड. दाजी पंडितास बं- डवाले कैद करितात.

**रीव्हझसाहेबांस** मदत करण्याकरितां जाइंट कमिशनर या नात्यानें क- र्नल **आउटराम साहेब** सामानगडावरील छाप्याचे पूर्व दिवशीं छावणींत ये- ऊन दाखल झाले. गड घेतल्यावर या उभयतांनीं असा जाहीरनामा प्रसिद्ध केला कीं, "कांहीं मुख्य बंडवाले शिवाय करून बाकी सर्वांस शरण आल्या- स माफी मिळेल." परंतु त्यापासून कांहीं उपयोग झाला नाहीं.

सामानगड घेतल्यावर कर्नल आउटरामसाहेब व कर्नल **बालेससा- हेब** ५०० लोकांनिशी कागलास आले. **दाजी पंडितांस** पावनगडावर कैद करून ठेविलें होतें. त्यांस कैदेंतून मुक्त करावें, व महाराज आणि जे दुसरे सरदार बंडवाल्यांस सामील नव्हते त्यांस

इंग्रजी फौज को- ल्हापुरास येते.

बंडवाले व फितुरी लोकांपासून उपद्रव होऊं देऊंनये; असा त्यांचा कागलास येण्याचा हेतु होता.

जनरल डिल्यामोटी साहेबांच्या हाताखाली मुख्य फौज होती. ती यांस येऊन कागलास लौकर मिळाली नाहीं. भुदरगडावरील गडकऱ्यांनीं सुमारें दहा दिवसांपूर्वी चिकोडी परगणा व तेथील सरकारी खजिना लुटून फस्त केला होता. म्हणून भुदरगडावर चाल करून जावें किंवा कोल्हापुराकडे जावें, या विचारांत डिल्यामोटी साहेब पडून ते तारीख २० आक्टोबरपर्यंत सामानगडाहून निघाले नाहींत. चिकोडीस रावजी दामोदर हे तेव्हां मामलेदार होते.

कागलचे कारभारी गुलाम घोशखान ऊर्फ खानसाहेब यांच्या विद्यमानें शिबंदीच्या लोकांशीं बरेंच बोलणें झाल्यावर आणि कर्नल वालेस साहेबांस आणखी कुमक आल्यावर तारीख २५ आक्टोबर रोजीं दाजी पंडितांस इंग्रजांनीं कैदेंतून सोडविलें; आणि कोल्हापूरचे तरुण महाराज, त्यांची मातोश्री व काकी आणि दुसरे पुष्कळ सरदार शहरांतून येऊन ब्रिटिश सरकारच्या छावणींत जाऊन राहिले. बाबाजी आयरेकर व त्याचे हाताखालील लोक यांनीं महाराज वगैरे इंग्रजांकडे जात असतां खूब हरकत केली. परंतु ती सर्व निष्फळ झालीसें पाहून आयरेकर ५०० लोकांनिशी तेथून पळून जाऊन भुदरगडच्या बंडवाल्यांस मिळाला.

दाजी पंडितास मुक्त करून महाराजांस छावणींत आणितात.

बाबाजी आयरेकर आणि दुसरे मुख्य बंडवाले यांस माफी दिली नव्हती. म्हणून किल्ला हस्तगत करण्यास जी सामुग्री पाहिजे ती सर्व सामुग्री जमवून जेव्हां जनरल डिल्यामोटी साहेब भुदरगडास आले, तेव्हां हत्यारें ठेवून शरण या म्हणजे माफी मिळेल, असें गडकऱ्यांस सांगून पाठवून किल्याच्या एका दरवाज्यापुढें तळ देऊन वाट पाहात राहिले. तेव्हां आयरेकर आणि त्यांचे अनुयायी संधि साधून तेथून पळाले. परंतु बाकी भुदरगड किल्यावरील गडकरी आपल्या जमिनी व हक्क चालविण्याच्या करारावर रघुनाथ यशवंत म्हेसकर यांच्या खटपटीनें शरण आले. बाबाजी आयरेकर पळून गेल्यामुळें दंगा कमी न होतां अधिकच पेटला. कारण आयरेकर भुदरगडाहून जो पळाला, तो थेट पन्हाळ्यास आला, व तेथील गडकऱ्यांस वश करून गडावर तळ देऊन राहिला. कोल्हापूर प्रांतांतील सर्व गडांत पन्हाळगड फार बळकट आहे यामुळें गडावरील

भुदरगडकरी शरण येतात.

लोकांस त्याच्या दुर्धरपणाविषयीं अशी घमेंडी होती कीं, गडावर कोणीही चालून आला तरी त्याच्या हातीं किल्ला लागूं देणार नाहीं.

नवंबरच्या २५ व्या तारखेस जनरल **डिल्यामोटी साहेब** मिस्तर **रिव्ह्ज साहेब** आणि कर्नल **आउटराम** या कमिशनरांसह पन्हाळ्यास आला, आणि पन्हाळगडास वेढा दिला. या गडावर कर्नल **ओव्हन्स** पन्हाळ्यावर हल्ला. साहेब साताऱ्याचे रेसिडेंट यांस कैद करून ठेविलें होतें. या अनुभविक गृहस्थाची दक्षिणमहाराष्ट्रांत स्पेशल कमिशनरच्या जाग्यावर नेमणूक झाल्याकारणानें ते साताऱ्याहून थोड्या लोकांनिशी म्यान्यांतून कोल्हापुरास येत असतां वाटेंतच नवंबरच्या १७ व्या तारखेस त्यांस बंडवाल्यांनीं दाणेखिंडींत पकडून पन्हाळगडावर कैद करून ठेविलें होतें.

दोघां कमिशनरांनीं ओव्हन्स साहेबांची मुक्तता करण्याकरितां पुष्कळ यत्न केला. या साहेबांस सोडून द्या आणि स्वाधीन व्हा असें गडकऱ्यांस सांगितलें. गडकऱ्यांनीं ओव्हन्स साहेबांस सोडून दिलें. परंतु गडाच्या दुर्धरपणाच्या घमेंडीवर दरवाजे बंद करून कमिशनरांनीं सांगितलेल्या अटींवर स्वाधीन होण्याचें नाकबूल केलें.

यामुळें इंग्रजांचे फौजेनें गडावर हल्ला सुरू केला. नवंबरच्या २७ व्या तारखेस नेटा घेतला. नंतर डिसेंबर महिन्याच्या १ ल्या तारखेस सकाळीं तटावर मोर्चे सुरू केले. माऱ्याची जागा कोठें आहे याचा शोध लागतांच किल्यावर भडीमार करून त्याच दिवशीं दोन प्रहरच्या आंत मोठ्या पन्हाळा घेतला शूरत्वानें किल्ला इंग्रजांनीं घेतला. इतक्यांत बंडवाल्यांची एक टोळी शेजारच्या पावनगड किल्यावर पळून जाऊन आश्रा घेण्याचा यत्न करीत असतां त्यांच्या पाठीमागें इंग्रजांची फौज इतक्या नेटानें लागली कीं, त्याच दिवशीं संध्याकाळच्या आंत त्यांनीं तोही किल्ला घेऊन बंडवाल्यांचा अगदीं मोड करून टाकिला. बाबाजी आयरेकर आणि दुसरे ७० मुख्य बंडवाले पन्हाळगडावरच्या हल्ल्यांतच ठार झाले होते. आणि गडाच्या आसपासच्या मैदानांत इंग्रजी फौजेच्या टोळ्या ठेविल्या होत्या त्यांनीं जे दुसरे लोक पळून जात होते त्यांस कैद केलें.

पन्हाळगड हस्तगत झाल्यावर तेथून सुमारें ७० मैलांवर रांगणा किल्ला आहे, तो घेण्यास डिसेंबरच्या पांचव्या तारखेस कर्नल **वालेस साहेब** थोडी फौज घेऊन निघाले. ते ९ व्या तारखेस तेथें जाऊन पोहोंचले. त्याच

दिवशीं त्यांणीं पेरा घेतला. दुसऱ्या दिवशीं रात्रीं दोन तोफा आणि दोन गनळ किल्ल्यावर लावितांच त्यांच्या भडिमारानें गडकरी किल्ला सोडून वाडीच्या जंगलांत पळून गेले. विशाळगड किल्ल्यावर जी फौज पाठविली होती, त्या फौजेच्या स्वाधीन गडकऱ्यांनीं तो किल्ला पूर्वींच केला होता. या प्रमाणें कोल्हापूर प्रांतांतील बहुतेक मुख्य किल्ले हस्तगत होऊन गडकरी आणि बंडवाले जिकडे तिकडे पळून गेले, व कांहीं मारले गेले, आणि बाकी कैद झाले. यामुळें निदान या प्रांतांत स्वस्थता होऊन येथील लढाई संपली.

*गंगणा व विशाळगड घेतात.*

परंतु जे बंडवाले वाडीच्या जंगलांत पळाले होते, ते तेथच्या बंडवाल्यांस मिळाले. आणि त्यांनीं बरेच दिवस त्रास दिला, व टिकाव धरिला. त्यांशीं मोठ्या निकराचें युद्ध पुष्कळ दिवस होऊन **मनोहार** आणि **मनसंतोष** हे बळकट किल्ले हस्तगत झाले आणि बंडाचें बीं मोडून लढाईचा शेवट झाला. जे बंडवाले गोव्यांस पळाले होते, त्यांसही गोंवेसरकारानें कैद केलें.

या प्रमाणें बंडें मोडून जिकडे तिकडे शांतता झाल्यावर आतां पुढें व्यवस्था कशी करावी, या विषयीं विचार करणें इंग्रज सरकारास भाग पडलें. त्यावेळीं हिंदुस्थान सरकारानें एतद्देशीय राज्यें खालसा करण्याचा उपक्रम थोड थोडा सुरू केलाच होता. हेंही राज्य आपण लढाई करूनच घेतलें आहे, तेव्हां हेंही खालसा करावें, असें हिंदुस्थान सरकारच्या मनांत आलें. परंतु तसें करण्यास दुसरीं सबळ कारणें कांहीं नव्हतीं. श्रीमंत बाबासाहेब महाराज औरस पुत्र असून वयानें लहान होते; व स्वभावानें शांत व धिमे असून मागील बंडांत यांचा कोणत्याही प्रकारें संबंध नव्हता. यामुळें त्यावेळचे पोलिटिकल एजंट मे. **रीव्हजसाहेब** यांनीं उदार मनानें सरकारास आपला प्रतिकूल अभिप्राय कळविला. दुष्ट, हरामखोर, व अविचारी अशा लोकांनीं हें बंड केलें होतें. यांत अल्पवयी महाराजांचे कोणत्याही प्रकारें भाग नसतां त्यांस याबद्दल प्रायश्चित्त भोगावयास लावणें म्हणजे मोठा अन्याय होईल. यास्तव राज्य खालसा न करितां महाराजास कारभारांत घेऊन त्यांच्या नांवें राज्यकारभार चांगल्या रीतीनें चालण्याकरितां योग्य तजविजी सरकारानें कराव्या; त्या कोणत्या याविषयीं

*पुढील व्यवस्थेविषयीं सरकारचा ठराव.*

ही उल्लेख करून सरकाराकडे रिपोर्ट केला. त्याचा अखेर विचार होऊन राज्य खालसा करण्याचें रहित करून हिंदुस्थान सरकारानें असा ठराव केला कीं, मागील बंड मोडण्यास सरकारास झालेला खर्च सुमारें १५ लक्ष रुपये दरसाल दर शेंकडा ५ रुपये व्याजानें कोल्हापूर सरकारानें निकाल करून द्यावा. कोल्हापुरास इंग्रजसरकारची छावणी असावी व तिजमध्यें एक पलटण असावी. छावणीच्या लोकांस घरें दारें वगैरे बांधून देण्याचा खर्च कोल्हापूर सरकारानें द्यावा. राज्याचीं सर्व सूत्रें सरकारच्या हातीं राहावीं; व महाराजांस तूर्त कारभारांत घेऊंनये, व पुढें महाराजांच्या हातीं कारभार कधींही देऊंनये. कोल्हापुरास पोलिटिकल सुपरिंटेंडेंट या नांवाचा इंग्रज अमलदार नेमून त्याच्या देखरेखी खालीं सर्व कारभार चालावा. महाराज व राजवाड्यांतील इतर आप्त यांच्या खासगी खर्चाकरितां व लवाजम्याचे खर्चाकरितां ऐंशी हजार रुपयांची नेमणूक करून द्यावी. आणि सर्व राज्यकारभार महाराज सरकारच्या नांवें न चालतां पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांच्या नांवें चालावा, व त्यांचा साक्षात् मुंबई सरकाराशीं पत्रव्यवहार चालावा. महाराजांचा दर्जा व मानमरातब वगैरे सर्व पूर्वीप्रमाणें ठेवावें.

कारभाराची नवीन व्यवस्था.

या ठरावास अनुसरूनच मे० रीव्हजसाहेबांच्या शिफारशीनें खानदेशांतील भिल्लांचे पलटणीवरील कमांडर क्यापटन ग्रेहामसाहेब (ज्यांस पुढें मेजर हा किताब मिळाला.) यांस सन १८४५ सालीं पहिल्यानें पोलिटिकल सुपरिंटेंडेंट नेमिलें आणि दाजी कृष्ण पंडित यांस कारभाऱ्याचे कामावर कायम केलें. आणि मागील बंडांत फार नेकीनें वागले म्हणून त्यांस दोन शालजोड्या सरकारानें बक्षीस दिल्या. अशी व्यवस्था करणें सरकारास भाग पडलें. यांत फारसें आश्चर्य नाहीं, व अशी व्यवस्था झाली त्यापासून कोल्हापूर राज्याचेंही हित झालें. कारण कोल्हापूर प्रांतांत बुवासाहेब महाराजाच्या वेळेपासून जी अव्यवस्था वाढत चालली होती, तिचा कळस दिवाणसाहेबांच्या कारकीर्दींत होऊन अखेर परिणाम राज्यांत बंड झालें. ती अव्यवस्था मोडण्याकरितां जरी इंग्रज सरकारानें आपल्यातर्फे मशारनिल्हे पंडित यांस कारभारी नेमिलें, व त्यांनीं खर्च कमी करणें, राज्यांत बंदोबस्त करणें, लुच्चे, लबाड व खटपटी लोकांस शिक्षा करणें इत्यादि सुधारणा करण्याचा उपक्रम आरंभिला होता; तथापि त्यांचा अमल सरराम न चालतां बंद झाले. याकरितां सरकारची छावणी ठेवून राज्यावर एक

मुख्य व स्वतंत्र इंग्रज अंमलदार नेमल्याशिवाय सररास अंमल बसून फार दिवसांपासून रुझलेले अव्यवस्थेचें बीं मोडावयाचें नाहीं, असें सरकारास स्वाभाविकच वाटलें, व त्याचा परिणामही फार चांगला झाला, हें हल्लींच्या स्थितीवरून कोणीही कबूल करील.

पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांची नेमणूक झाल्यावर ब्रिटिश इलाख्याच्या धरतीवर मुल्की, दिवाणी, फौजदारी अशीं पृथक् पृथक् खातीं करून पृथक् पृथक कामगार नेमून कामाची वांटणी केली. आरंभीं दाजी कृष्ण पंडित मुख्य कारभारी यांजकडे मुलकी वगैरे खात्याची व्यवस्था सोंपविली. फौजदारी कामाकरितां एक न्यायाधीश नेमून त्यास फोजदारी खटल्यांची चौकशी करून ३ वर्षेपर्यंत शिक्षा देण्याचा अधिकार दिला. याच्या निकालावर अपील व मोठ्या गुन्ह्यांची चौकशी पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांजकडे होत असे, व त्यांस सेशनजज्जाचा अधिकार असे. दाजी पंडितांनीं सहा पेटे केले होते ते कायम ठेवून पेट्याचे मामलेदार यांसही चिल्लर फौजदारी गुन्ह्यांची चौकशी करून शिक्षा देण्याचा अधिकार दिला, व त्यांजवर अपील न्यायाधीशाकडे व्हावें असें ठरविलें. प्रत्येक पेट्यास एकेक फौजदार नेमिला, व त्याचे हाताखालीं शिबंदीचे (लष्करफडचे) लोक दिले. न्यायाधीशीचे जाग्यावर ब्रिटिश इलाख्यांतून जनार्दन हरी कीर्तने यांस नेमिलें आणि लष्करफड हें निराळें खातें ठेवून त्याजवर ईश्वरराव ऊर्फ बाबासाहेब निंबाळकर यांस मुख्य कामगार नेमिलें. आजपर्यंत दिवाणी व फौजदारी अशीं कामें एकच अंमलदार करीत. ती शिस्त मोडून दिवाणी कामाकरितां कोल्हापुरास एक सदरअमीन आणि कडगांव व शिरोळ येथें २ मुनसफ नेमिले. आणि सदर अमीनास १०,००० व मुनसफांस ५,००० रुपये पर्यंत दाव्यांचा निकाल करण्याचा अधिकार दिला. कोल्हापूरच्या सदर अमीनाच्या जाग्यावर खालसांतून आणलेले बाळाजीपंत गोखलेयांसनेमिलें यांच्यावर अपील पोलिटिकल सुपरिंटेंडेंटाकडे व्हावें, व त्याच्या निकालावर अपील मुंबई सरकाराकडे व्हावें असें ठरविलें. सर्व खात्याचीं कामें सन १८२७ च्या कायद्यांस अनुसरून चालावीं असाही सरकारचा ठराव झाला.

सन १८४५ सालीं महाराजांची बहीण आऊबाई आक्का यांचें लग्न रामचंद्रराव पाटणकर यांशीं झालें. या लग्नास सुमारें २४-२५

हजार रुपये खर्च झाला. त्यापैकीं बरीच रक्कम इनामदार व सरंजामीदार यांवर दुस्तपट्टी बसवून वसूल केली होती. यांचेच पुत्र नागोजीराव यांस बाबासाहेब महाराजांनीं पुढें दत्तक घेऊन त्यांचें नांव राजाराम महाराज असें ठेविलें. आऊबाई आक्का तारीख १४ आगस्ट १८५३ इ॰ रोजीं मरण पावली व तेव्हांपासून तिच्या पुत्रास बाबासाहेब महाराजांनीच बाळगिलें होतें. महाराजांची जनक मातुश्री ताराबाई राणीसाहेब ही याच सालीं तारीख २५ आगस्ट रोजीं मरण पावली, व यांच्या क्रियेकडे सुमारें १५००० खर्च झाला. महाराजांचीं व त्यांच्या वहिणीचीं लग्नें व आपत्यें.

बायजाबाई शिंदे ग्वाल्हेरकर यांनीं आपली नात बाबासाहेब महाराजांस देण्याविषयीं बोलणें सुरू केलें. परंतु फ़ुकट नाद लावून अखेर तें लग्न जमलें नाहीं. याकरितां पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांस राग आला. सन १८४७ सालीं एप्रिल महिन्यांत सातारचे जहागीरदार खाशाजीराव पाटणकर यांच्या कन्येशीं बाबासाहेब महाराजांचें आणि नरशिंगराव शिंदे नेसरीकर यांच्या कन्येशीं चिमासाहेब महाराजांचें अशीं दोन लग्नें मोठ्या कडाक्यानें झालीं. या दोन्हीं लग्नांस मिळून सुमारें ८५,००० रुपये खर्च झाला. त्या पैकीं सुमारें २६,००० रुपये शेंकडा १० प्रमाणें दुस्तपट्टी बसवून जमविले. ३८००० हजार रुपयांचें जामदारखान्यांतील दागिने घेतले. आणि बाकी २०१२१ हजार रुपये मात्र रोख खजिन्यांतून खर्च केले. नाद लावून बायजाबाई शिंदे यांनीं लग्न मोडलें त्याबद्दल पोलिटिकल अधिकाऱ्यांस राग आला. म्हणून तो राग शमविण्याकरितां शिंदे यांनीं आपल्या वकिलाबरोबर सुमारें ४३,००० रुपये किमतीचा अहेर महाराजांस लग्नाचे वेळीं पाठविला.

सन १८४८ सालीं तारीख २४ आगस्ट रोजीं बाबासाहेब महाराजांस पुत्र झाला, व त्यावेळीं सुमारें १०,००० रुपये खर्च करून बारसें मोठ्या कडाक्यानें केलें. परंतु तो मुलगा पुढें मार्च महिन्यांत मरण पावला. पुढें दुसरा मुलगा झाला. तोही १० दिवसांच्या आंतच मरण पावला.

याच सालीं बाळाबाई आक्कासाहेबांचें नारायणराव घाटगे सर्जाराव कागलकर यांच्याशीं लग्न झालें, व या लग्नास सुमारें ४२,००० रुपये खर्च झाला. पैकीं सुमारें २०,००० रुपये दुस्तपट्टी बसवून वसूल केले, व बाकी खजिन्यांतून खर्च केला. यांचे भाग्यशालि पुत्र जयसिंगराव आबा-

**साहेब** हे कागलच्या थोरल्या घराण्यांत दत्तक होऊन पुढें कोल्हापूरचे रीजंटीचे जाग्यावर त्यांची नेमणूक झाली; व त्यांचेच विजयशालि पुत्र कोल्हापूर घराण्यांत दत्तक होऊन हल्लीं गादीवर आहेत.

सन १८५३ सालीं बडोदेकर गायकवाड यांनीं आपली कन्या **रवाशीबाई** ही महाराजांस देण्याविषयीं बोलणें लाविलें. पोलिटिकल सुपरिंटेंडेंट व दाजी पंडित यांनीं हें लग्न कोल्हापूर दौलतीस झेपणार नाहीं, म्हणून नकार केला. तेव्हां गायकवाड यांनीं आपण सर्व खर्च लावून लग्न करितों, असें कळविलें. तेव्हां यास **बाबासाहेब महाराजांची** कबूली असल्यास लग्न ठरवावें, असा मुंबई सरकारचा ठराव झाला. नंतर सन १८५४ इसवी सालांत सुमारें २,००० माणसांसह महाराजांची स्वारी बडोद्यास गेली, व बडोद्यास तारीख १७ मे सन १८५४ रोजीं मोठ्या थाटानें लग्न झालें. गायकवाडांनीं महाराजांस चार लाख रुपये हुंडा दिला, व आपल्या कन्येच्या खर्चाकडेही चांगली नेमणूक करून दिली. या न-

महाराजांचें बडोद्यास दुसरें लग्न.

व्या राणीसाहेबांचें नांव **अहल्याबाई** असें ठेविलें. यावेळीं आगगाडी नव्हती, व रस्तेही चांगले नव्हते. यामुळें लोकांचे फार हाल झाले, आणि गायकवाडांनीं दिल्यापेक्षांही मनस्वी खर्च झाला. या स्वारींत जातां येतां बरींच माणसें मेलीं. त्यांतच पंत अमात्य मोरेश्वरराव बावडेकर यांचे जनक पिते हेही वारले. महाराज बडोद्यास सुमारें एक वर्ष राहून नंतर परत आले. परत येतांना मुंबईस जाऊन गव्हरनर साहेबांची गांठ घेऊन आपणास मुखत्यारी द्यावी, म्हणून महाराजांनीं सन १८५४ तारीख २८ दिजंबर रोजीं प्रथमतः थैली दिली. यावेळीं जमाबंदीची स्थिति नीट नाहीं, व कर्जही फिटलें नाहीं: करितां तूर्त विचार करितां येत नाहीं असा जबाब आला.

सन १८५५ सालीं नवंबरच्या १३ व्या तारखेस **बाबासाहेब महाराजांची** पट्टराणी प्रसूत होऊन दुसरा पुत्र झाला. यावेळींही बारसें कडाक्यानें केलें. व सुमारें ७,००० रुपये खर्च झाला. यावेळींही इनामदार व जाहागीरदार यांजवर शेंकडा ५ रुपये पट्टी बसविली होती.

सन १८५८ सालीं बडोद्यांच्या राणीस पुत्र झाला. त्यावेळींही समारंभ केला, व १० कैदी सोडिले. परंतु तोही मुलगा वारला. महाराजांची सावत्र आई कमळजाबाईसाहेब सन १८६० सालीं तारीख १० सपटंबर रोजीं मृत्यु पावली.

महाराज व त्यांचे बंधु यांचे शिक्षण व सरदारांचा वर्ग.

महाराजांचा अभ्यास चांगला चालावा, व त्यांस इंग्रजी शिकवावें, म्हणून त्यांस शिकविण्याकरितां प्रसिद्ध दादोबा पांडुरंग यांस सरकारांनीं दरमहा १२० रुपयांवर सन १८४० सालीं ट्यूटर नेमिलें. परंतु त्यांस सुरतेस बढतीची जागा मिळाल्यावरून ते आले नाहींत. तेव्हां एलफिस्टन कालेजांतील शिकलेले केशव नरसिंह देशपांडे यांस ट्यूटर नेमिलें, व हे उभयतां महाराजांस शिकवीत असत. पुढें सन १८४४ सालीं जें बंड झालें त्या बंडांत बंडवाल्यांनीं यांसही पकडून बराच मार दिला. व महाराज त्यांस सामील झाले नाहींत म्हणून यांस फार त्रास दिला, व त्यामुळें ते अजारी झाले होते. ते बंडाच्या धामधुमींत रजा घेऊन गेले, ते परत आले नाहींत. म्हणून त्यांच्या जोगीं मे. पोलिटिकल सुपरिंटेंडेंटांचे हेडक्लार्क नाना आत्माराम यांस अक्टिंग ट्यूटर नेमिलें, व तेच ट्यूटरचें काम पुढें बरेच दिवस करीत होते. यांच्या हाताखालीं बाबासाहेब महाराजांचा अभ्यास चांगला होत चालला. परंतु चिमासाहेब महाराज मात्र वरचेवर आजारी पडत, व त्यांचें अभ्यासाकडे नीट लक्षही नसे. यामुळें त्यांचा अभ्यास व्हावा तसा होत नव्हता. पुढें सन १८५२ सालीं नाना मोरोजी यांस महाराजांचे ट्यूटर नेमिलें. बाबासाहेब व चिमासाहेब यांचा एकत्र अभ्यास चालेना, व उभयतांचें इतर गोष्टींतही पटेना. तेव्हां त्यांस वेगळें ठेवून त्यांजला ३० रुपयांवर एक ट्यूटर नेमिला. महाराजांबरोबर आऊबाई आकांचे भ्रतार रामचंद्रराव पाटणकर हेही अभ्यास करूं लागले. हें पाहून इतर सरदारांच्या मुलांसही विद्याभ्यास करावा असें वाटूं लागलें. तेव्हां सरदारांच्या मुलांकरितां सरदारांचा वर्ग स्थापन केला.

कोल्हापूर इन्फंट्री.

सन १८४४ सालचें बंड मोडल्यावर शिबंदीचे लोक व गडकरी यांस कमी केले तेव्हां खुद्द कोल्हापूर सरकारची कांहींच फौज नाहींशी झाली, व सोडलेले फार लोक रिकामे राहिले. याकरितां कोल्हापूर इन्फंट्री (गांवखात्याची पलटण) म्हणून नवीन फौज ठेवावी, असा सरकारचा हुकूम झाला. त्यांत इलाख्यांतील व दुसरे बाहेरचे लोक व शिबंदींतून सोडलेले लोक यांची भरती केली, आणि या पलटणींत सुमारें ५०० लोक ठेविले. त्या लोकांस खालसा इलाख्यांतील युरोपियन पलटणी प्रमाणें पोषाख व हु-

त्यारें देऊन त्यांस कवाईतही शिकविण्याची तजवीज केली. या पलटणीवरील मुख्य अधिकार पोलिटिकल सुपरिंटेंडेंटाकडेच ठेविला, व त्यांचे हाताखालीं साक्षात् पलटणीवर सेकंड इन् कम्यांड या हुद्याचा युरोपियन अधिकारी दरमहा ६०० रुपयांवर नेमिला, व एक अडज्यूटंट ४१८ रुपये पगारावर नेमिला. त्यांत नेटिव अंमलदार व शिपाई यांचे पगार खालीं लिहिल्या प्रमाणें ठरविले.

सुभेदार ३५ रुपये, जमादार २४ रु०, हवालदार १० रु०, नाईक ८ रु०, शिपाई ६ रु०, भिस्ती ६ रु०, व ड्रम अँड फाइफमेजर ११ रुपये.

लाल डगल्याचा रिसाला.

मेजर ग्रेहाम यांच्या कारकीर्दींत कोल्हापुरास जे स्वार व शिलेदार होते, त्यांचा लाल डगल्याचा रिसाला झाला. त्यांत ३५० स्वार होते, व त्यानिमित्य ७०,००० रुपये खर्च होत होता. यांत सुमारें ८५ शिलेदार होते. पूर्वी संस्थानिकांच्या नोकरीच्या स्वारांची पलटण घोडनदीस होती व त्यावर दाजीसाहेब घोरपडे हे रिसालदार होते. त्या पलटणींत कोल्हापूरचे स्वार होते. पुढें कोल्हापूर, सातारा व दुसरे संस्थानिक यांच्या स्वारांची मिळून एक पलटण भरावी, असें ठरून तिची स्थापना कलादगीस झाली, व तिला सदर्न मराठा हार्स असें नांव दिलें. इकडील लोक तिला हिरव्या डगल्याची पलटण म्हणत. यांत कोल्हापूरच्या ८५ शिलेदारांपैकीं ४५ गेले. बाकीच्यांस नेमणुका व पेनशन देऊन काढिलें. या पलटणीवर माल्कम साहेब कम्यांडर होते. व दाजीसाहेबांचा मुलगा मुरारराव हा रिसालदार होता. कोल्हापूर सरकारास या पलटणींतील स्वारांबद्दल २९,००० हजार रुपये द्यावे लागत. मुररावास एका स्वारानें रात्रीं ठार मारिलें. यामुळें त्याच्या बायकोस कोल्हापूर सरकारांतून २०० रुपये पेनशन दिलें. पुढें कलादगीचा रिसाला मोडला, तेव्हां कोल्हापूरचे स्वार कमी झाले. आणि फक्त लाल डगल्याचा रिसाला मात्र कायम ठेविला.

बंडाच्या धामधुमींत ज्यांवर बंडांत सामील असल्याचा वहीम दिसला, अशा शेंकडों लोकांस कैद करून ठेविलें होतें. त्यांत दिनकरराव गायकवाड, रावजी वाकनीस, नारायणराव खानविलकर, कृष्णराव घोरपडे, सटवाप्पा नाईक वडगांवकर, सखाराम घाटगे सर्जाराव वगैरे कित्येक सरदार, आणि गडकरी, कारकून वगैरे शेंकडों लोक होते. त्या सर्वांची चौकशी

करण्याकरितां मुंबई सरकारानें मेहेरबान कम्बलेन या साहेबांस नेमिलें, व त्यांजपुढें चौकशीचें काम सन १८४६ अखेर चाललें होतें. चौकशी अंतीं दिनकरराव भाऊ कमाड व रावजीराव कनीस यांवर बंडांत सामील असल्याचा आरोप शाबीद झाल्यावरून त्यांस अशीरगड किल्ल्यावर नेऊन कैदेंत ठेविलें, व त्यांची उत्पन्नें सरकारांत खालसा केलीं, व त्यांच्या बायकामुलांस नेमणुका करून दिल्या. त्याच प्रमाणें खानविलकर, घोरपडे सरंजाम वगैरेंसही शिक्षा झाल्या, व त्यांचींही उत्पन्नें जप्त केलीं. सईबाई ऊर्फ दिवाणसाहेब या बंडवाल्यांस सामील असल्याविषयीं पुरावा मिळाल्यावरून त्यांसही कोल्हापुराहून काढून अहमदनगरास पाठवावें असें ठरलें परंतु पुढें त्यांस पुण्यासच राहण्यास परवानगी दिली, व दरमहा ५०० रुपये नेमणूक करून दिली. त्यांस पुण्यास पाठविण्याचें ठरलें तेव्हां आबासाहेब महाराजांची दुसरी पत्नी जिजाबाई राणीसाहेब यांनींही पुण्यास त्यांजबरोबर आपण जाण्याचा आग्रह धरिला, व त्यावरून त्यांसही पुण्यास राहण्यास परवानगी दिली. सन १८६१ सालीं दिवाणसाहेबांनी कोल्हापुरीं परत जावें असा ठराव झाला. परंतु त्याच भरीं अकटोबरच्या २२व्या तारखेस पुण्यासच त्या मरण पावल्या. दिवाणसाहेबांचा अंत पुण्यास झाल्यावर जिजाबाई राणीसाहेब ऊर्फ बयासाहेब महाराज परत करवीरीं आल्या, व रविवारच्या वाड्यांत राहात होत्या. त्या सन १८८२ सालीं तारीख २३ आक्टोबर रोजीं कैलासवासी झाल्या.

सन १८४४च्या बंडांत सामील असलेल्या लोकांस शिक्षा.

गडकरी वगैरे सुमारें २५० लोकांवर अपराध शाबीद होऊन त्यांस शिक्षा देण्यांत आल्या, व त्या सर्वांच्या जमिनी जप्त केल्या. यामुळें त्यांचीं कुटुंबें अगदीं निराश्रित झालीं. याकरितां त्यांपैकीं कित्येकांस पोटगा देण्यांत आल्या. सन १८४७ सालीं धारवाड तुरुंगांत कैदेंत असल्यापैकीं सुमारें १२८ इसमांस माफी देऊन सोडिलें. खाजीराव चव्हाण हिंमत बहादूर, बुवा गाईकवाड सरखवास वगैरे कित्येक सरंजामदारांवर बंडांत सामील असल्याचा वहीम आल्यावरून त्यांचे सरंजामही जप्त केले होते. परंतु त्यांजवर अपराध शाबीद होण्यापुरता पुरावा मिळाला नाहीं म्हणून त्यांपैकीं कित्येकांचें एकेक वर्षाचें उत्पन्न दंडादाखल घेऊन सरंजाम सुरू केले त्या रीतीनें सन १८४६।४७ सालीं ४०

पासून ५० हजार रुपये पर्यंत रक्कम वसूल आली. विशाळगड संस्थानांतील पुष्कळ लोकांचें आंग बंडांत असल्याविषयीं वहीम आल्यावरून तेथील कारभारी शिवाय करून बाकी लहान थोर सर्व नोकरांस कैद् करून त्यांची चौकशी केली, आणि जे दोषी ठरले त्यांस शिक्षा दिल्या; आणि विशाळगड संस्थान खालसा करून कोल्हापूर राज्यांत सामील करावें, व त्यांचा घांटाखालील मुलूख ब्रिटिश सरकारांत घ्यावा. असा रिपोर्टही झाला होता. परंतु तसें झालें नाहीं तरीं संस्थान फार वर्षेपर्यंत प्रतिनिधीच्या स्वाधीन केलें नाहीं.

निळकंठराव जप्तमुलूख, जोत्याजीराव निंबाळकर वाठारकर, दौलतराव भोंसले सिंचकर आणि गणू चोपदार हे चार असामी बंडांत सामील असून फरारी झाले होते. त्यांस सन १८५३ सालीं पकडले व शिक्षा दिल्या. गणू चोपदार यास पकडण्यासाठीं ५०० रुपयांचें इनाम लावलें होतें. तसेंच सन १८४४ सालच्या बंडांतील मुख्य चालक दिनकरराव गाईकवाड, रावजी वांकनीस, लालसिंग गोसावी आणि सखाराम घाटगे या पैकीं पहिल्या दोघांस पूर्वींच अशीरगडावर पाठविलें होतें, व तिसऱ्यास फांशी दिलें होतें, आणि चौथा फरारी झाला होता. तो आठ नऊ वर्षांनीं ग्वाल्हेरीस आपण होऊन हजर झाला. त्याजकडून जामीन घेऊन त्यास तेथेंच राहण्यास परवानगी दिली. यास पकडण्याकरितां २,००० रुपयाचें बक्षीस लाविलें होतें.

सन १८५४ सालीं दाजी कृष्ण पंडित कारभारी हे आजारी पडून रजेवर गेले, व तिकडेच वारले. तेव्हां त्यांच्या बायका मुलांस द-

---

* दाजी पंडित यांच्या नोकरीची हकीकत अशी आहे. दाजी पंडितांस इसवी सन १८२० सालीं, अहमदनगर येथें कारकुनीची जागा मिळाली. तेथेंच त्यास पुढें ३० रुपये पगार झाला. नंतर रेव्हिन्युकमिशनरचे आफिसांत ५० रुपयांवर नेमिलें पुढें तेथेंच १०० रुपयांवर अव्वलकारकून झाले नंतर सन १८४० सालीं नवंबर महिन्यांत नाशीक कलेक्टरच्या कचेरींत १५० रुपयांवर दफ्तरदार झाले. येथें दोन वर्षे काम केल्यावर सन १८४२ सालीं यांस दरमहा ३०० रुपयांवर धारवाड कलेक्टरचे दप्तरदार नेमिलें, व तेथून सन १८४४ सालीं मार्च महिन्यांत (पुढें चालू.)

रमहा १०० रुपये प्रमाणें पेनशन देण्याविषयीं इंग्रज सरकाराकडून ठरा-व झाला. त्यांच्या जागीं त्या वेळचे न्यायाधीश जनार्द- [illegible]जी पंडितांस[illegible]न हरी कीर्तने यांस अक्टिंग कारभारी नेमिलें, व पगा[illegible] [illegible]गून झालेले कार ३५० रुपये केला. यांच्या न्यायाधिशीचे जाग्यावर [illegible]रभारी. रावजी दामोदर यांस अक्टिंग न्यायाधीश नेमिलें. कीर्तने हेच कारभाऱ्याचे कामावर सन १८५८ पर्यंत होते. सन १८५७ सालीं नवंबरच्या २७ व्या तारखेस एका आरबानें कीर्तने यांचे पोटांत जंब्या मारला. त्यांतून ते वांचले आणि नंतर ते पेनशन घेऊन गेले. ते गेल्यावर कांहीं दिवस कारभाऱ्याची जागा मुळींच कमी करून त्यांचें काम करण्यास एक दप्तरदार पगार रुपये २५० व एक युरोपियन असिस्टंट व एक नेटिव एजंट अ-

---

कोल्हापुरास दरमहा ५०० रुपयांवर कारभारी नेमिलें. कोल्हापूर येथें बंडांत त्यांस फार त्रास सोसावा लागला. तरी ते फार नेकीनें वागले, म्हणून त्यांस सरकारनें १००० रुपये किमतीच्या दोन शालजोड्या बक्षीस देण्याकरितां पाठविल्या परंतु त्या त्यांनीं घेतल्या नाहीं. पोलिटिकल सुपरिंटेंडेंट नेमिल्यावरही त्यांस मुख्य कारभाऱ्याचे जागीं कायम केलें. एकंदर नोकरी २८ वर्षे झाल्यावर सन १८४८ सालीं आजारी पडून रजेवर गेले. आणि सन १८४९ सालीं जानेवारी महिन्यांत पेनशनचा अर्ज पाठविला. तो पाठवितांना पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यानीं अशी शिफारस केली कीं, यांस इंग्रज सरकारांतून १०० रुपये व कोल्हापूर सरकारांतून २०० रुपये या प्रमाणें पेनशन मिळावी. तसेंच कोल्हापूरच्या रकमेबद्दल २,००० वसुलाचा गांव त्यांस व त्यांच्या मुलांस चालवावा. आणि मुलांच्या मागें परत यावा, असा बाबासाहेब महाराजांचा अभिप्राय असल्यानें कळविलें परंतु तें कांहीं कबूल न करितां त्यांच्या नोकरीच्या व पगाराच्या मानानें १६५ रुपये पेनशन मिळेल. परंतु नोकरी ३० वर्षे पुरी झाल्यास २५० रुपये पेनशन मिळेल, असें लिहिलें. आपण मरेपर्यंत सुद्धां नोकरी करण्यास तयार आहों. मात्र माझ्यामागें माझ्या कुटुंबास १०० रुपये पेनशन द्यावें, असें पंडितांनीं सरकारास कळवून ते नोकरीवर रुजु झाले. पुनः सन १८५४ सालीं आजारी पडून रजेवर गेले, व पेनशनचा अर्ज केला. आतां ३० वर्षे पुरी झाल्यामुळें इंग्रज सरकारांतून ८३६५८४ रु० आणि कोल्हापूर सरकारांतून १६६.०५१०६८ रु० पेनशन [illegible] परंतु याचा उपभोग न घेतां ते १८५४ सालीं [illegible] महिन्याच्या १५ व्या तारखेस वारले. तेव्हां त्यांच्या मुलांस व बायकोस १,००० रुपये ग्राच्युइटी व दरमहा १०० रुपये पे[illegible] कोल्हापूर खजिन्यांतून (पुढे चालू)

ने अंमलदार नेमले जाऊन सर्व काम पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांच्या आफीसांतच होऊं लागलें. पुढें सन १८६१ सालीं महाराजांच्या नांवें कारभार चालविण्याचें ठरल्यावर सन १८६३ सालीं महाराजांस पूर्ण अखत्यार देण्यापूर्वींच रामराव नरसिंह वाडपत्रे दक्षिणभागाच्या कमिशनरचे दप्तरदार यांस दरमहा ५०० रुपये पगारावर सन १८६२ सालीं कारभारी नेमिलें व तेच बाबासाहेब महाराजांचे हयातीपर्यंत होते.

मेजर ग्रेहामसाहेब सन १८४९ सालीं आजारीपणाच्या रजेवर गेले, व त्यांचे जागीं मे० अंडरसन साहेब हे अकिंग पो० सु० झाले. मे० ग्रेहामसाहेब सन १८५२ अखेर रजेवरून परत आले, व त्यांनीं कोल्हापुरीं आल्यापासून कोल्हापूर इलाख्याच्या माहितीचा सरकारच्या हुकुमावरून जो रिपोर्ट लिहिण्यास आरंभ केला होता तो पुरा करून सरकाराकडे पाठविला, व पुढें तो सरकारानें प्रसिद्ध केला. यांत कोल्हापूर इलाख्याची सर्व प्रकारची इतकी भरपूर माहिती आहे कीं, तो सुमारें ४० वर्षांचा जुना झाला, तरी अद्याप उपयोगीं पडतो. यांतच प्रथमतः कोल्हापूर इलाख्यांतील अनेक प्राचीन शिलालेख छापले, व त्यावरून कोल्हापूर इलाख्याचें प्राचीनत्व स्थापित झालें. सन १८५३ सालीं पुनः मे० ग्रेहाम साहेब रजेवर गेले, व रजेवर असतांच माल्टा येथें मरण पावले.

पोलिटिकल सुपरिंटेंडेंट.

त्यांच्या जागीं मे० जार्ज माल्कम यांची अकटिंग प्रमाणें सन १८५३ सालीं नेमणूक होऊन नंतर ते कायमही झाले. पुढें माल्कमसाहेबांची कलादगीचे रिसाल्यावर बदली झाल्यावर कोल्हापुरास कर्नल माह्यानसाहेब यांस सन १८५६ तारीख २८ आक्टोबर रोजीं पो० सु० नेमिलें. सन १८५६ सालीं हे रजेवर गेले तेव्हां त्यांच्या जाग्यावर मे० राबर्टसनसाहेब यांस पो० सु० नेमिलें. पुढें सन १८५९ सालीं यांची सुरतेस कलेक्टरचे जाग्यावर नेमणूक झाली. तेव्हां बेळगांवचे फ० अ० कलेक्टर मे० ह्याव-

---

थावे, आणि मुलगा अगोदर मेला तर बायकोस ५० रुपये चालवावे, असें ठरलें. ...पासून अखेर पर्यंत हे फार इमानें इतबारें वागले, व कोल्हापुरांत बं-धारणा केल्या. त्यांचे स्मरण इकडील वृद्ध लोकांस अद्याप पावेतों आहे.

लाकसाहेब यांस पोलिटिकल सुपरिंटेंडेंट नेमिले. सन १८६९ सालीं महाराजांच्या नांवें कारभार चालविण्याचें ठरल्यावर पोलिटिकल सुपरिंटेंडेंट हा हुद्दा मोडून पोलिटिकल एजंट हा हुद्दा चालू केला, व मेन्ड्यावलाक साहेब हेच कोल्हापूरचे पहिले पोलिटिकल एजंट झाले.

पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांची नेमणूक झाल्यावर त्यांजकडे मागील अन्यायाबद्दल वारंवार फिर्यादी येऊं लागल्या. तेव्हां फिर्यादींची चौकशी करण्यास व फिर्यादी घेण्यास कांहीं पंच असा ... इनामें व देणग्या, करून त्यांजकडे त्यांच्या शिफारशी वरून म... त्यांची व्यवस्था करावी असा ठराव झाला कीं, बुवासाहेब महाराजांनी जे ठराव केले असतील, त्यांत हात घालूं नये. आणि सईबाई ऊर्फ दिवाणसाहेबांच्या कारकीर्दीत जे अन्याय होऊन जप्त जमा झाली असतील, त्यांविषयीं मात्र चौकशी व्हावी. त्याप्रमाणें चौकशी करून दिवाण साहेबांचे ठराव फिरविले, आणि जप्त केलेलीं इनामें खुलीं केलीं. त्याच प्रमाणें बुवासाहेब महाराजांनीं दिलेलीं इनामें कायम करून दिवाणसाहेबांच्या कारकीर्दीत दिलेल्या देणग्या सर्व हिसकावून घेतल्या. या पद्धतीनें सुमारें पहिल्या एक दोन वर्षांत १०,००० रुपयांचीं इनामें खालसा केलीं.

ब्रिटिश इलाख्यांत सन १८४१ सालीं इनाम कमिशन नेमलें जाऊन इनामाची चौकशी सुरू झाली. त्यास अनुसरून सन १८५८ सालीं कोल्हापूर इलाख्यांत इनाम चौकशी सुरू झाली. त्यावेळीं प... इनाम चौकशी प्रथमतः सर्व इनामदारांच्या सनदा हजर करून नोंदून ... घेतल्या. त्याच प्रमाणें इनामदार वारल्यावर इनामें जप्त करून वारसा चौकशी करण्याची पद्धत सुरू केली.

मोल्याजीराव नाईक निंबाळकर, लालगिरी गोसावी, ... वगैरे अनेक सावकारांचें बुवासाहेबांनीं कर्ज काढिलें होतें, व कित्येकांकडे वहिवाटीस महालही लावून दिले होते. त्या सर्वांच्या कर्जाचे हिशेब करून तोडी केल्या. कोणास हमेषदीनें रक्कम देण्याचें ठरविलें, व कोणास कांहीं नक्त नेमणुका महाल्यांत देण्याचें ठरविलें, आणि सर्व गांव व महाल मोकळे केले. सुमारें सवा चार लाख रुपये कर्ज देणें काढून त्यांपैकीं पहिल्या दोन सालांतच सुमारें दीड लाख फेडिलें, व बाकीच्याचीही पुढें हळू हळू सर्व फेड केली.

सन १८५४ सालचें बंड मोडण्यास ब्रिटिश सरकारास सुमारें १५ लक्ष रुपये खर्च आला. तो सर्व कोल्हापूर सरकारानें द्यावा, व तें कर्ज फिटे पर्यंत दरसाल दर शेंकडा ५ रुपये प्रमाणें व्याज द्यावें, असें ठरविलें! या कर्जाची कांहीं तोड झाली नाहीं, व कांहीं सूटही दिली नाहीं, व हप्तेबंदीही करण्याचें न ठरवितां व्याज घेण्याचें ठरविलें! एवढी मोठी रक्कम सव्याज फिटते कशी ही पोलिटिकल सुपरिंटेंडेंटास नेहमींची काळजी असे. कारण हें कर्ज फेडणें जसें अवश्य होतें, तसें राज्यांत सुधारणा करणेंही अवश्य होतें. हीं दोन्ही कशीं साधतात, व एवढी मोठी रक्कम कशी फिटते, याची नेहमी पंचाइत वाटे. कारण माजी महाराजांनीं इनामें व सरंजाम देऊन जवळ जवळ दोन तृतीयांश मुलूख दुमाला झाला होता. यामुळें वसूल थोडा येत असे, व वसूल वाढण्यासही मार्ग नव्हते. बाबासाहेब महाराजांसही या कर्जाबद्दल मोठी भीति वाटत होती,व कर्ज फिटेपर्यंत राज्य हवालीं करणार नाहींत हें त्यास पक्कें समजून चुकलें होतें. परंतु अशा बिकट समयीं राज्याचीं सर्व सूत्रें इंग्रज सरकारच्या हातीं होतीं म्हणूनच कर्ज फेडण्याचा व राज्यांत सुधारणा करण्याचा असे दोन्ही उद्योग सुरू होते. बंडांत सामील असल्याविषयीं ज्यांवर शाबिदी झाली, त्यांचीं इनामें खालसा केलीं. सरळ वारस नसला म्हणजे इनामें व सरंजाम जप्त केले. दिवाणसाहेबांनीं दिलेलीं इनामें काढून घेतलीं. एक वेळ विशाळगड व इचलकरंजी हीं संस्थानें खालसा करण्याचा घाट आणिला होता. इचलकरंजी संस्थान तर खालसा करून कर्जाबद्दल ब्रिटिश सरकारास द्यावें, असें एकदां ठरविलें होतें. कागल पैकीं वाळवें संस्थान तर खालसा केलेंच. महाराजांनीं मुखत्यारी मिळण्याविषयीं सरकाराकडे थैली लिहिली कीं, कर्ज फिटेपर्यंत विचार करितां येत नाहीं, असें उत्तर मिळे. एक वेळ तर महाराजांचे सासरे गायकवाड यांनीं राहिलेल्या कर्जास आपण जामीन राहतों आणि महाराजांस मुखत्यारी द्यावी, असें बोलणें लाविलें होतें. या प्रमाणें इनामदार, संस्थानिक, व सरंजामदार व खुद्द कोल्हापूरचें राज्य यांवर अनेक गंडांतरें या कर्जामुळें आलीं होतीं. तथापि सर्वांचें निवारण होऊन कोल्हापूरचें राज्य व त्यांतील पोट संस्थानें हीं कायम राहून बाबासाहेब महाराजांस मुखत्यारी देतेवेळीं थोडें कर्ज राहिलें होतें, व तेंही त्यां-

णीं आपल्या ह्यातींत फेडून मरण काळीं खजिन्यांत शिल्लक टा-किली होती.

पंधरा लाखांचें व्याज दरसाल पाऊण लाख होई. यामुळें जरी दरसाल दीड लाख किंवा दोन लाख असें सवडी प्रमाणें कर्ज फेडण्याचा क्रम चालला होता, तरी वरींच वर्षे फेड झाली नाहीं. सन १८४७ सालापर्यंत २ लाख दिलें. याच प्रमाणें दरसाल लाख पन्नास हजार देत गेले, तरी सन १८५३ सालीं सुमारें साडे पंधरा लाख शिल्लक होतेंच. म्हणून या वेळीं खालसा करण्याविषयीं हुकूम झालेलें इचलकरंजी संस्थान कायमचें ब्रिटिश सरकारास कर्जा ऐवजीं देऊन कोल्हापुरास कर्जमुक्त करण्याचा विचार निघाला. तसें न होतां थोडथोडी फेड दरसाल होत जाऊन सन १८६१ सालीं महाराजांच्या नांवें कारभार चालविण्याचें ठरलें, तेव्हां सुमारें ७ लाख कर्ज राहिलें; व सन १८६२ सालीं महाराजांस मुखत्यारी देऊन कोल्हापूरचें राज्य हवालीं केलें, तेव्हां साडे पांच लाख कर्ज राहिलें होतें.

बुवासाहेब महाराज व सईबाई दिवाणसाहेब यांच्या कारकीर्दींत सरकारी शाळा मुळींच नव्हत्या. सरकारी खर्चानें शाळा ठेवून मजेस शिक्षण देणें हें एक सरकारचें कर्तव्य आहे, असें पूर्वी समजत नसत. पोलिटिकल सु॰ यांनीं खालसा इलाख्यांतून दोन हुषार मराठी मास्तर आणून कोल्हापूर येथें सन १८४८ सालीं दोन सरकारी मराठी शाळा स्थापन केल्या. अद्याप बाहेर गांवीं कोठें शाळा नव्हत्या. पुढें मि॰ अंडरसनसाहेब अ॰ पो॰ सु॰ यांच्या कारकीर्दींत कोल्हापूर येथें सन १८५० सालीं नेटिव लायब्ररी स्थापन झाली. लायब्ररीकरितां इमारत बांधण्यासाठीं वर्गणीनें सुमारें ३००० रुपये जमा केले. आणि हल्लीं डाक्टरसाहेबांचा बंगला आहे तेथें लष्करांतील व गांवांतील लोकांस लायब्ररी उपयोगी पडावी, अशा हेतूनें मध्येंच लायब्ररीकरितां इमारत बांधिली. कारण तेव्हां लष्कर व शहर या दोहों ठिकाणचे वर्गणीदार होते. सन १८५२ सालीं एक शिळा छापखाना स्थापन केला, व ज्ञानसंग्रह या नांवाचें मासिक पुस्तक नाना मोरोजी हे प्रसिद्ध करूं लागले. पुढें सन १८५३ सालीं कोल्हापूर येथें इंग्रजी शाळा स्थापन

सुधारणा.

मराठी शाळा.

नेटिव लायब्ररी.

छापखाना.

झाली, व तिजवर कृष्णराव चांफाजी यांस हेड मास्तर नेमिलें. बाहे-
इंग्रजी शाळा. र गांवीं मराठी शाळा स्थापन करून त्यांवर देखरेख
करण्याचें काम मधुनतः इंग्रजी शाळेचे हेडमास्तर यांस सांगितलें; व
पुढें शाळांची संख्या वाढली, तेव्हां नारायण रामचंद्र करंदीकर उर्फ
नाना गुरुजी यांस डेप्युटि इन्स्पेक्टर नेमिलें. याच समयास कोल्हापुरास
मुलींची शाळा. एक मुलींची शाळाही स्थापन केली. याच सालीं वर्तमान-
संग्रह या नांवाचें मराठी वर्तमानपत्र सुरू झालें. तें पत्र इंग्रजी शाळे-
चे हेडमास्तरच चालवीत होते. कृष्णराव चांफाजी यांची आठवण अ-
द्याप अनेक वेळ निघते. कारण त्यांच्या हाताखालचे त्या वेळचे कि-
त्येक विद्यार्थी उदाहरणार्थ रा० रा० महादेव गोविंद रानडे, बाबाजी
लक्ष्मण सावंत, विठ्ठल नारायण फाटक, महादेव मोरेश्वर कुंटे, अण्णा
मोरेश्वर कुंटे, विनायक जनार्दन कीर्तने, बळवंतराव कीर्तने वगैरे विद्यार्थी फार
विद्वान होऊन नांवा लौकिकास चढले आहेत. यांच्या नंतर आत्माराम ना-
रायण व नंतर श्रीधर विठ्ठल दाते हे हेडमास्तर झाले.

शाळांची संख्या हळू हळू वाढत चालली, ती सन १८५८ सालीं
एकंदर नऊ शाळा प्रांतांत असून त्यांत ३९९ विद्यार्थी शिकत होते.
पुढील सालीं शाळांची संख्या १५ व विद्यार्थ्यांची संख्या ७०७ झा-
ली. याच सालीं एक बाळ शाळा (बाळ विद्यार्थी ५०) व एक मुस-
मुसलमानी शाळा. लमानी शाळा (विद्यार्थी ३०) अशा दोन नवीन शाळा
झाल्या तसेंच कोल्हापूरच्या मुलींच्या शाळेंत ९० मुली शिकत होत्या; व
भुदरगड येथें एक शाळा स्थापिली, तिजमध्यें २२ मुली होत्या. स-
न १८५९ सालीं शाळांची संख्या १७ व विद्यार्थ्यांची संख्या११७२
झाली होती.

शाळा घालून प्रजेस विद्यासंपादनाच्या सोयी करणें हें सर-
कारचें कर्तव्य आहे, असें पूर्वीचे राजे समजत नसत. त्याच प्रमाणें
प्रजेच्या आरोग्याकरितां तजविजी करणें हेंही राजकर्त्यांच्या कर्तव्यां-
त गणिलें जात नसे. म्हणून प्राचीन काळीं राजे लोक उत्तम वैद्यास
आश्रय देऊन जवळ बाळगीत. परंतु त्याचा प्रजेस उपयोग व्हावा, अ-
शी कांहीं तजवीज करीत नसत. हीं दोन्हीं कामें सरकारानें करा-
वीं असें आतां सर्वांस मान्य झालें आहे. गोर गरीब व म्हार चांभार

वगैरे हलक्या जातीच्या रोग्यांस तर औषधें मिळण्याच्या कांहीं सोयी नव्हत्या. या करितां कोल्हापूर येथें सन १८४८ सालीं मेजर ग्रेहाम यानीं एक धर्मार्थ दवाखाना स्थापिला. त्यावर एक ब्राउन या नांवाच्या हुषार डाक्टरास सिव्हिलसर्जन नेमिलें, व त्यांच्या हाताखालीं दोन हास्पिटल असिस्टंट व कंपाउडर ( औषधें तयार करून देणारे) व इतर नोकर ठेविले; आणि आल्या गेल्या रोग्यांची परीक्षा करून औषधें द्यावीं व जे गरीब असतील त्यांस दवाखान्यांत ठेऊन खाणें पिणें व दवा देऊन उस्तवारी व्हावी, अशी व्यवस्था केली. दवाखान्यांतील इंग्रजी औषधें प्रथमतः लोक घेत नव्हते. परंतु लोकांची हळू हळू श्रद्धा वसत जाऊन, मुख्यत्वें गोरगरीबांस दवाखान्याचा फार उपयोग होऊं लागला. याशिवाय तुरुंगांतील कैद्यांकरितां एक व इन्फंट्रींतील शिपायांकरितां एक असे दोन छोटे दवाखाने ( डिस्पेन्सऱ्या) स्थापिले. त्याच प्रमाणें तुरुंगाची चांगली व्यवस्था करून त्यावर एक नाझर नेमिला; व त्याची देखरेख प्रथम न्यायाविभागाकडे व नंतर डाक्टराकडे दिली. दवाखाना.

सन १८४८ साली सर्व राज्यांत एका पद्धतीचीं वजनें व मापें सुरू केलीं.

सन १८५३ सालीं मोहतर्फा किंवा आल्या गेल्या मालावरील जकात सर्व राज्यांत बंद केली.

सन १८५४ सालीं कोल्हापुरास तारआफिस स्थापन झालें, आणि पुणे व बेळगांवाकडे बातमी पाठविण्याची सोय झाली.

कोल्हापूर शहर सुधारण्याकरितां सन १८५४ सालीं कोल्हापुरास एक म्युनिसिपल कमेटी स्थापन केली. त्यांत पो. सु. व कारभारी हे मुख्य असून शिवाय शहरांतील ६ सभ्य गृहस्थ होते. या प्रमाणें पेट्यांत डिस्ट्रिक्ट कमेट्या नेमिल्या. म्युनिसिपालकमेटी.

कोल्हापुराहून बेळगांव, सातारा, व मिरज या शहरांकडे जाण्याचे कोल्हापूर हद्दींतील रस्ते बांधिले. तसेंच फोंडे घांटास जाण्याचा रस्ता बांधिला. कोल्हापुराहून पेट्यांच्या मुख्य ठिकाणीं व मुख्य घाटमंडपांच्याच्या मुख्य ठिकाणीं जाण्यायेण्याचे रस्ते बांधिले. हे रस्ते हल्लींच्या प्रमाणें पक्के नसून नद्या नाल्यांस पूल बांधले नव्हते, व सर्वच ओझ्याच्या गाड्या सहज रीतीनें जाण्यायेण्या जोगे नव्हते. परंतु बैलांच्या वाहतीस रस्ते.

चांगले होते, व त्यांच्या योगानें बैलांची वाहती वाढली.

या प्रमाणें राज्यांत सुधारणा करण्याचा क्रम झपाट्यानें चालला असतां सन १८५७ सालीं कोल्हापुरावर दुसरें एक गंडांतर आलें. या सालीं बंगाल इलाख्यांत काळ्या पलटणीचे लोक बिथरून त्यांनीं बंड केलें होतें. याच वेळीं इंग्रज सरकारची कोल्हापुरास २७वी काळी पलटण होती. या पलटणींतील शिपायी तारीख ३१ जुलई रोजीं रात्रीं बिथरले. या दिवशीं रात्रीं पलटणींतील कांहीं लोक बदलून छावणीमध्यें लुटालूट करूं लागले. छावणींतील सरकारी खजिना लुटून सुमारें ४०,००० रुपये नेले, व छावणींत आणखीं पुष्कळ दंगा केला. या पलटणीवर या वेळीं कर्नल पावेल हे कमांडर होते. हे साहेब मेसरूम मध्यें असतां रात्रीं एकाएकीं एका जमादारानें त्यांस बंडाची वर्दी कळविली. त्यावरून ते सर्व बायका मुलांसह पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांच्या बंगल्यांत जमले. या वेळीं कर्नल माहान हे पो. सु. चे जागयावर होते. यांनीं रेसिडेन्सीच्या बंदोबस्ताकरितां लाल डगल्याच्या रिसाल्यांतील स्वार व कोल्हापूर इन्फंट्रीचे लोक आणून बंडवाले या बंगल्याकडे येण्यापूर्वींच बंदोबस्तास ठेविले होते. बंडवाल्यांस हें वर्तमान समजतांच ते इकडे आले नाहींत. पलटणींतील साहेब लोक रेसिडेन्सीकडे पळून आले. त्यांपैकीं २ साहेब फोंडे घांटाचे रस्त्यानें पळून जाऊन सोळांकूर या गांवीं एका देवळांत जाऊन राहिले होते. बंडवाले रेसिडेन्सीच्या मार्गाकडून शहरांत गेले, व तेथें रविवार वेशींत जाऊन दरवाजे उघडण्याविषयीं पाहारेकऱ्यांस सांगूं लागले. परंतु दरवाजे कोणी उघडले नाहींत. कारण लष्करांतील बंडाची गुणगुण कळतांच कीर्तने अक्टिंग कारभारी यांनीं वेशीचा उत्तम बंदोबस्त ठेविला होता.

*सन १८५७साली बंडाची धामधूम.*

*साहेब लोक रेसिडेन्सींत आश्रा घेतात.*

सकाळीं उजाडल्यावर कोल्हापूर इन्फंट्रीचे लोक व रिसाल्याचे स्वार बरोबर घेऊन पोलिटिकल सुपरिंटेंडेंट साहेब स्वतः व सेकंड इन् कम्यांड स्नायडरसाहेब व डा. ब्राउन्टन, सिव्हिलसर्जन हे त्यांचा पाठलाग करीत आले. तेव्हां बंडवाले वेशी सोडून पुढें चालते झाले. ते पद्माळे तलावाजवळील श्री राधाकृष्णाचे देवालयाकडे गेले. (या देवालयास तेव्हां पागा म्हणत. का-

*पो.सु. इन्फंट्रीचे लोकांस घेऊन बंडवाल्यांवर जातात.*

रण या देवळाच्या सभोंवार घोडे बांधण्याची पागा होती.) तेव्हां त्यांची व त्यांचा पाठलाग करणाऱ्या लोकांची गोळा गोळी झाली, व बंडवाले पागेंत शिरून त्यांनीं दरवाजे बंद केले. पाठलाग करणाऱ्या लोकांस लढाईचा प्रसंग माहीत नसल्यामुळें गोळागोळी होतांच ते लोक इकडे तिकडे पळूं लागले. पोलिटिकल सुपरिंटेंडेंट घोड्यावर होते. त्यांच्या घोड्यास गोळी चाटून गेली. व घोडा बुजाला. त्यामुळें त्यांस त्यावेळीं माघारें फिरावें लागलें.

बंडवाले राधाकृष्णाचे देवळांत आश्रा घेतात.

बंडवाले त्याच दिवशीं दोन प्रहरीं फोंडेघांटच्या रस्त्यानें निघून गेले. ते लोक दुसऱ्या दिवशीं सोळांकुरास जाऊन देवळांत जे तीन साहेब लोक पळून जाऊन राहिले होते, त्यांस गोळ्या घालून त्यांनीं ठार मारिलें व मुर्दे नेऊन नदींत टाकिले. त्यांपैकीं दोन मुड्दे वाहात जाऊन कागल संस्थानांतील एका गांवीं लागले. तिसऱ्याचा मुडदा मिळाला नाहीं. दोन मुर्दे कागल संस्थानच्या गांवांत मिळाल्यावर तेथें पुरून टाकले. यांत ले. हिटफिल्ड हे एक होते. हल्लीं यांच्या आप्तांनीं त्यास पुरल्या जाग्यावर कबर बांधण्याकरितां सामान विलायतेहून पाठविल्यावरून कबर बांधण्यांत आली आहे.

बंडवाले सोळांकुरास जाऊन ३ साहेबांस मारतात.

बंडवाले पुढें वडिवड्याकडे जात असतां वाघोटण्याहून फौज येत आहे, असें समजतांच त्यांपैकीं सुमारें २५ लोक तारीख १० आगस्टरोजीं परत कोल्हापुरास येऊन पूर्वीच्या पद्माळ्यावरील देवळांत (पागेंत) दरवाजे बंद करून राहिले. त्या पूर्वी बेळगांवाहून लेफ. केरसाहेब सदर्न मराठा हार्स पैकीं ५० स्वार बरोबर घेऊन इकडे आले होते. त्यांस ही खबर लागतांच त्यांनीं दरबारच्या दोन तोफा घेऊन आपले स्वार व कोल्हापूर इन्फंट्रीचे शिपाई यांसह त्या देवळावर हल्ला केला. संध्याकाळपर्यंत तोफांचा भडिमार केल्यावरही तट पडेना. तेव्हां ले. केरसाहेब बरोबर २१३ स्वार घेऊन एका चोरवाटेनें आंत शिरले. तेव्हां एका बंडवाल्यास गोळी घालून ठार मारिलें. त्याबरोबर कांहीं आपणावर आपणच गोळ्या घालून घेऊन ठार झाले, व अन्नाशिवाय उपाशीं मरत असलेल्या चार असामींस पकडलें. देवळांत सारे २५ शिपाई असतांच त्यांनीं लढून इतका वेळ टिकाव ध-

बंडवाले परत येऊन राधाकृष्णाचे पागेंत राहतात.

पागेवर हल्ला करून बंडवाल्यांस धरितात.

निका होता.

बंडाबद्दल इंग्रज सरकारास वर्दी पोहोंचतांच मे· कर्नल जेकब साहेब यांस स्पेशल कमिशनर नेमून बंडाच्या बंदोबस्तास इकडे पाठविलें. ते इकडे येतात इतक्यांत गोरे पलटणीच्या दोन टोळ्या इकडे येऊन दाखल झाल्या. नंतर त्यांच्या समक्ष आगस्ट ग्रेरीस २७ व्या काळ्या पलटणींतील शिपायांचीं हत्यारें काढून घेतलीं. पुढें जेकबसाहेबांच्या मागण्यावरून पायदळ, घोडेस्वार, तोफखाना वगैरे ५००० युरोपियन सैन्य कोल्हापुरास आलें. नंतर जेकब साहेब यांनीं कोर्ट मार्शल भरवून चौकशी सुरू केली. नंतर ज्यांवर गुन्हा शाबीद झाला, त्यांस त्याप्रमाणें कांहीं लोक तोफेच्या तोंडी दिले, कांहीं लोकांस ताशेरा केला, व कांहीं लोकांस फांशीं दिले.

जेकबसाहेब कमिशनर होऊन येतात.सप्टेंबर१८५७. कोर्ट मार्शल भरून बंडवाल्यांस शिक्षा करितात.

या प्रमाणें चौकशी सुरू असतांच कोल्हापुरा नजीकच्या गिरगांवच्या लोकांनीं बंड करण्याची मसलत करून तारीख ५ दिजंबर १८५७ रोजीं रात्रीं तटावरून शहरांत शिरले, व राजवाड्यापुढें तोफा आणून आंत दारू भरूं लागले. इतक्यांत कोल्हापूर इन्फंट्रीचा खजिन्याजवळ पाहारा होता. त्यांतील एक शिपायी बाहेर येऊन त्यानें एक गोळी मारली, व तेणेंकरून त्याचा पुढारी जो फिरगू शिंदा हा मरण पावला. हें वर्तमान मे· जेकबसाहेबांस कळतांच ते शनवार वेशीजवळ लोक घेऊन आले. आणि तोफा लावून वेस फोडिली व आंत शिरले. नंतर वाड्यासमोर येऊन बंडवाल्या लोकांपैकीं कांहींस धरून वाड्यासमोर आणलें, आणि ड्रमहेड कोर्ट मार्शल भरून त्यांची चौकशी केली, व कित्येकांस तोफेच्या तोंडीं दिलें, व कांहींस ताशेरा करून मारले. या प्रमाणें बंडाचा निकाल करून फौज माघारी गेली.

गिरगांवच्या लोकांचें बंड ता· ५ दिजंबर१८५७.

हें दुसरें बंड होण्यापूर्वी रावबहादूर जनार्दन हरी कीर्तने यांचे आंगावर शिबंदी (लष्करफडे) पैकीं एका आरबानें कांहीं बोलाचालीवरून सन १८५७ तारीख २७ नवंबर रोजीं जंब्यानें वार केला. त्यामुळें ते बरेंच आजारी पडले. पुढें त्या आरबास चौकशी करून काळे पाण्यावर पाठविलें, व कीर्तने कारभारी हे दूर होऊन पेनशन घेऊन गेले.

कीर्तने यांस एक आरब जंब्या मारतो.

पुढें जेकबसाहेब पोलिटिकल सुपरिंटेंडेंट व कर्नल माहान साहेब

यांचा मतभेद झाला, व सरकारांनीं त्यांच्या अधिकारांत कमजास्त केल्यामुळें ते आजारीपणाची रजा घेऊन विलायतेस गेले. नंतर त्यांचे जाग्यावर मि॰ ए॰ डब्ल्यू॰ राबर्टसन यांस पोलिटिकल सुपरिंटेंडेंट नेमण्यांत आलें, व यांस मे॰ जेकब साहेबांच्या सल्यानें सर्व कामकाज करावें असा हुकूम झाला.

बाळासाहेबांचे जागीं राबर्टसन येतात.

नंतर बापू साळोंखे ओलडगल्याचा रिसालदार याजवर बंडांत सामील असल्याचा आरोप आला, व त्यास वहिमावरून पांच वर्षें पर्यंत हद्दपार करण्यांत आलें. तीं पांच वर्षें ते बेळगांव येथें जाऊन राहिले, व ते परत आल्यावर त्यांस कोल्हापुर येथें न राहतां वाशी ह्या त्यांच्या इनाम गांवीं राहण्याबद्दल परवानगी मिळाली. यांस हल्लीं कोल्हापुरास येण्याची परवानगी मिळाली आहे.

बापू साळोंखे यांस हद्दपार करितात.

नंतर चिमासाहेब महाराज यांचें आंग बंडवाल्यांस होतें, असा बोभाटा झाल्यावरून गुप्त चौकशी केली. त्यावरून यांस येथें ठेवणें निर्भय होणार नाहीं, असें दिसल्यावरून त्यांस कोल्हापुराहून नेऊन कराचीस ठेविलें. प्रथमतः चिमासाहेबांस नेण्याची सर्व तयारी करून त्यांस रेसिडेन्सीमध्यें बोलावून नेलें, आणि त्यांस कांहीं एक न विचारतां व न पुसतां एकदम म्यान्यांत बसवून बंदोबस्तानें वाघोटणें बंदरास रवाना केलें, व तेथें आगबोटींत बसवून मुंबई जवळ आदिव बेटांत उतरविलें: आणि तेथून दुसऱ्या आगबोटींतून कराचीस रवाना केलें, व कराचीस पाइंट मनोरा येथें ठेविलें. पुढें सन १८५९ सालीं त्यांजकरितां २०,० रुपये खर्चून बंगला बांधिला व त्यांत ते मरेपर्यंत होते. त्यांस दरमहा ५०० रुपये नेमणूक ठरविली होती. त्यांचें कुटुंब नेसरीकर शिंदे यांची मुलगी ते गेल्यावर तीन वर्षांनीं मरण पावली. आणि चिमासाहेब सन १८६९ सालीं मरण पावले. यांचे कारभारी फडणीस यांनीं चिमासाहेबांच्या अंतर्गत बेताविषयीं कांहीं सांगावें म्हणून त्यास ठाण्यास ठेवून त्यांचे फार हाल केले. परंतु ते कांहीं कबूल झाले नाहींत. तेव्हां त्यांस अखेर काळेपाण्यावर पाठविलें. चिमासाहेब जात्या शूर व सशक्त होते. त्यांस घोड्यावर उत्तम बसतां येत असून बोथाटी फार चांगली खेळत. यांच्या आंगीं मराठ्या वीरांचीं बरींच लक्षणें होती, परंतु धोरणी व विचारी नसून फार उद्धट होते; म्हणून त्यांनीं आपणावर हें संकट ओढून आणिलें.

चिमासाहेब महाराजांस कराचीस पाठवितात.

असें वाटतें, परतु खुद्द चिमासाहेबांस कांहीं न विचारतां केवळ एक न- फीं पुराव्यावरून त्यांस कराचीस पाठविण्याचें अन्यायाचें काम झालें. असें म्हणावें लागतें.

अळतें पेट्यांतील वाठारचे इनामदार निंबाळकर हे मागील बंडांत सामील होते, अशी मागाहून बातमी लागली. तेव्हां ते ग्वाल्हेरीस होते. तेथून धरून आणून त्यांस कोल्हापुरास नजर कैदेंत ठेविलें. त्यावर कां- हीं शाबीद झालें नाहीं. तरी त्यांनीं कोल्हापुरास राहूंनये, व पांच वर्षे पर्यंत आपली वर्तणूक चांगली ठेवीन अशाबद्दल त्यांजकडून ५,००० रुपयांचा जामीन घ्यावा व वाठार गांव जप्त करावा, असा ठराव झाला. त्याचा भाऊ आकोजीराव यानें सरकारास अर्ज केल्यावरून पुढें नि- म्मा गांव त्यास सोडून दिला. पांच वर्षें पुरीं झाल्यावर कोल्हापुरास येऊ- न त्यानें आपला हिस्सा सुटण्याबद्दल पुष्कळ खटपट केली. परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं.

हा मनुष्य शहाणा व हुषार असून याचें वास्तविक अंग बंडांत न- व्हतें, असें सांगतात. परंतु उगाच लांब लांब गप्पा मारणारा होता. आ- पल्या वाड्यांत बसून प्रत्येक जमादार, सुभेदार किंवा शिपाई जो भे- टेल, त्यांशीं इंग्रज सरकाराविरुद्ध रिकाम टेंकड्या बाता छाटीत असे. यामुळें त्यावर हा वहीम आला, व सदर चौकशी झाली.

कित्येक बंडवाल्यांनीं हिंमतबहाद्दराचेंही नांव घेतलें होतें व त्याव- रून त्याजवरही आरोप आला होता. परंतु चौकशी अंतीं कांहीं शा- बीद झालें नाहीं.

सन १८५७ सालीं बंडाच्या धामधुमीमुळें वसूल न होतां बाकी फा- र थकली होती. म्हणून ठाणे जिल्ह्यांतील नायब दप्तरदार लक्ष्मण का- शीनाथ केळकर यांस सरकारानें बाकी वसूल करण्यासाठीं मुद्दाम को- ल्हापुरास पाठविलें. हेच पुढें पो. सु. यांचे हाताखालीं दप्तरदार झाले.

या प्रमाणें जिकडे तिकडे शांतता झाल्यावर जेकबसाहेब गोमांत- कास गेले. ते जाण्यापूर्वी कोल्हापूर राज्यांत पुढें कारभाराची कशी व्य- वस्था करावी, याबद्दल सरकारास रिपोर्ट केला. त्यावरून राबर्टसनसा- हेब कायमचे पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांच्या मार्फत कारभाराची व्यव- स्था ठरून रिपोर्ट यावा असें सरकारचें उत्तर आल्यावरून [illegible]

व्यवस्था खालीं लिहिल्या प्रमाणें केली.

कारभाराची
नवी व्यवस्था

कारभाऱ्याची जागा कमी करून त्यांचें निराळें आफीस होतें तसें न ठेवितां आपल्या हाताखालीं एक दप्तरदार या नांवाचा कामगार नेमून त्याच्या सहाय्यानें सर्व कारभार आपल्या आफिसांत साक्षात् आपल्या देखरेखीखालीं चालविण्याचें सुरू केलें, आणि पोटसंस्थानिकांकडील सर्व पत्रव्यवहार आपणाकडे परभारें चालावा, असें ठरविलें. ठाणे जिल्ह्यांतून आणलेले लक्ष्मण काशिनाथ केळकर यांस दरमहा २५० रुपये पगारावर दप्तरदार नेमिलें, व कारभारी कचेरींत चालत असलेलें सर्व काम आपल्या कचेरींत चालवूं लागले. शिरोळ व अळतें या दोन पेट्यांचा एकच पेटा करून एक मामलेदाराची जागा कमी केली, व यांतील कांहीं काम दुसरीकडे दिलें. न्यायाधीशाची जागा कमी करून पांच पेट्यांचे उत्तर भाग व दक्षिण भाग असे दोन विभाग करून उत्तरभागावर एक असिस्टंट पोलिटिकल सुपरिटेंडेंट या हुद्याचा युरोपियन कामगार नेमिला. त्याजकडे उत्तरभागांतील मामलेदारांवर देखरेख करून सर्व मुलकी, फौजदारी काम करावें असें ठरविलें. या जाग्यावर डब्ल्यु राबर्टसन खालसांतील असिस्टंट कलेक्टर यांस दरमहा ५५० पगार व १२५ रुपये भत्ता अशी नेमणूक करून नेमिलें. दुसऱ्या दक्षिण भागावर डेप्युटि पोलिटिकल सुपरिंटेंडेंट या नांवाचा कामगार नेमून त्याजकडे त्या भागचें मुलकी व फौजदारी काम दिलें. या जाग्यावर कीर्तने यांच्या पश्चात् अकटिंग कारभाऱ्याचें काम करीत असलेले रावजी दामोदर यांस नेमिलें. हे पूर्वी पोलिटिकल सुपरिंटेंडेंटचे शिरस्तेदार होते, व नंतर कोल्हापूरचे न्यायाधीशही होते. यांस दरमहा पगार २५० रुपये ठरविला.

खासगी खात्याकडील १८ कारखान्यावरील निरनिराळे कामगार कमी करून सर्वांचें मिळून एक खासगी खातें करून त्यावर एक खासगी कारभारी नेमिला. रावजी दामोदर यांस अक्टिंग कारभारी नेमिल्यावर त्याचे न्यायाधिशीचे जाग्यावर बाळाजी विश्वनाथ गोखले हे होते. त्यांस न्यायाधीशाची जागा कमी केल्यावर या नव्या खासगी कारभाऱ्याचे जाग्यावर नेमिलें व खासगी नेमणूक ८०,००० रुपयांची होती. तीही थोडी जास्त वाढविली.

या वेळीं महाराजांचे शिक्षक विश्वनाथ कृष्णनाथ धुरंधर उर्फ भाईदा-

दार होते. त्यांस खासगी कारभारी नेमावे अशी महाराजांची इच्छा दिसते, असें पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांस कळलें. परंतु तशी जागा न करण्याविषयीं भाईसाहेबांस पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांनीं सल्ला दिली, व त्यांस आपल्या कचेरींत ट्रान्सलेटरची जागा दिली.

जमाबंदी

ब्रिटिश सरकारचे मार्फत करवीर इलाख्याचा कारभार होऊं लागल्यापासून जमाबंदी म्हणजे राज्याचा एकंदर वसूल सन १८४७ सालापासून सन १८५९ सालापर्यंत कसा वाढत गेला तें खालीं दाखविलें आहे.

| साल. | वसूल. | साल. | वसूल. |
|---|---|---|---|
| सन १८४७ | ६,५२,०१६ | सन १८५५ | ५,५४,६४५ |
| ” १८४८ | ६,६१,५६६ | ” १८५६ | ६,४७,९८१ |
| ” १८५० | ५,४७,१६४ | ” १८५७ | ६,९२,८५६ |
| ” १८५२ | ५,४९,३०२ | ” १८५८ | ८,११,७६६ |
| ” १८५४ | ५,४७,३९४ | ” १८५९ | ७,४७,२५९ |

दारूकलालीचा कारखाना.

मे. राबर्टसन साहेबांनीं दारू कलालीची भट्टी सरकारी स्थापन केली. ती भट्टी उंचभावास घालून त्याबद्दल दरग्यालनास ८९ आणे प्रमाणें ड्यूटी घेण्याचें ठरविलें. यांत सुमारें ३०,००० रुपये फायदा झाला.

स्टांप.

सन १८२७ च्या कायद्याप्रमाणें दिवाणी कामांत स्टांप सुरू केलें. पूर्वी दाव्याचे मानानें स्टांपाबद्दल पैसा घेत असत. हल्लीं तें बदलून स्टांपावर फिर्यादी सुरू व्हाव्या असें ठरलें. यांत दरसाल साधारण मानानें १०,००० रुपये नफा झाला.

नक्त वसुलाची वहिवाट.

या पूर्वी जमिनीचा सारा पिकाचे मगदुराप्रमाणें गल्ला घेण्याची पद्धत होती, त्यामुळें जमिनी पड राहिल्यास वसुलास तूट येत असे. ती वहिवाट मोडून सर्व वसूल नक्त घेण्याचें ठरविलें.

इनाम चौकशीची सुरुवात सन १८४९ सालीं सुरू झाली आहे. त्यांत पूर्वी फक्त सनदा नोंदण्याचेंच काम सुरू होतें. परंतु हल्लीं इनाम कमिशनर साहेबांकडून रुळी आणवून चौकशी सुरू केली आणि आजपर्यंत जप्तींत आलेला पैसा सरकार जमा करून रद्दकर्जांत फेडून टाकला.

किरकोळ अहवाल.

सन १८५३ साली कोल्हापूर प्रांतांत अतिशय पर्जन्य पडून फार नासाडी झाली. अशी अतिवृष्टि पूर्वीच्या गेल्या ३०।४० सालांत कधींही झाली नव्हती. या अतिवृष्टीनें या इलाख्यांतील लोकांचें सात आठ लाखांचें नुकसान झालें. या वर्षी कृष्णानदीस महापूर येऊन नदी तटाकचे पुष्कळ गाव वाहून गेले, व घरें पडलीं. अतिवृष्टीनें जुनें धान्य नाश पावल्यामुळें बाहेरून फार धान्य आणावें लागलें, व जकात दोन महिने माफ करावी लागली, आणि शेतकऱ्यांस सूट द्यावी लागली.

सन १८५६ साली कोल्हापुरास महामारीचा फार उपद्रव झाला, व लोकही अतिशय मेले.

या वेळीं गूळ सुमारें ३२,००० रुपयाचा बाहेर जात असे, आणि ६५००० रुपयांचें धान्य बाहेरून या प्रांतांत येत असे, असा अंदाज सन १८५४ सालीं केला होता. याच सालीं कोल्हापूर प्रांताची लोकसंख्या सुमारें ५,४६,१५८ होती, व जननाची संख्या ६८१ व मरणाची संख्या १०४६ होती.

मे. ह्यावलाक साहेब पोलिटिकल सुपरिंटेंडेंट होतात.

सन १८६१ सालीं राबर्टसनसाहेब पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांस सुरतेस कलेक्टरची जागा मिळाली, व त्यांचे जागीं बेळगांवचे फर्स्ट असिस्टंट कलेक्टर ह्यावलाकसाहेब यांस पोलिटिकल सुपरिंटेंडेंट नेमिलें, व ते मे अखेर कामावर रुजू झाले. या वेळीं आपणास मुखत्यारी मिळावी, अशी महाराजांनीं थैली दिली, व ती राबर्टसन साहेबांनीं आपल्या रिपोर्टा बरोबर पाठविली. आपल्या रिपोर्टांत त्यांनीं महाराज हुषार व प्रौढ असून काम करण्यास लायख आहेत, व राज्य कारभार हवालीं करण्यास हरकत नाहीं, असें नमूद केलें होतें. नंतर महाराजांनीं ह्यावलाकसाहेबां मार्फत दुसरी थैली पाठविली.

त्यावरून लार्ड क्यानिंग गव्हरनर जनरल साहेब कलकत्ता, यांजकडून मुंबईचे गव्हरनर सरजार्ज क्लार्क यांस आपण खुद्द करवीरास जाऊन महाराजांस पाहून रिपोर्ट करावा, असें गुप्तपणानें लिहून आलें. त्यावरून पुणें, सातारा, या सरळ मार्गानें करवीरास न येतां फलटण, सांगली, मिरज या मार्गानें गव्हरनरसाहेब कोल्हापुरास आले ते आ-

त्यावर रीतीप्रमाणें भेटी झाल्या व पुढें दोन तीन दिवस पर्यंत खासगी

सर जार्ज क्लार्क मुंबईचे गव्हरनर कोल्हापुरास येऊन महाराजांचे लायखीबद्दल रिपोर्ट करितात.

रीतीनें भेटी घेऊन नंतर कोल्हापुराहूनच हिंदुस्थान सरकारास महाराजांच्या लायखीबद्दल आपली खात्री करून घेतल्याचा रिपोर्ट केला. त्यानंतर दोन महिन्यांनीं महाराजांच्या हवालीं राज्यकारभार करावा, असा हिंदुस्थान सरकारचा ठराव झाला. त्या प्रमाणें पुढें महाराजांच्या हातीं कारभार आला. त्याची हकीकत खालीं दिली आहे.

**बाबासाहेब महाराजांनीं** आपलें वर्तन सर्वदां चांगलें ठेवून व अभ्यासही चांगला करून जेजे पोलिटिकल सुपरिंटेंडेंट झाले, त्यांजकडून नेहमीं चांगलें म्हणवून घेतलें. कोणीही पोलिटिकल आफिसरास त्यांजवि-

बाबासाहेब महाराजांस मुखत्यारी मिळते.

षयीं कुरकूर करण्यास जागा राहिली नव्हती, व सर्वांनीं त्यांजविषयीं चांगले रिपोर्ट केले होते. दुष्ट व दुर्व्यसनी लोकांस जवळ करून कोणत्याही फंदांत किंवा दुर्व्यसनांत शिरले नाहींत. यांनीं इंग्रजीचा अभ्यास बराच केला होता. साहेब लोकांबरोबर इंग्रजींत त्यांस बोलतां येत असे. थोडा फारसीभाषेचाही अभ्यास केला होता. त्यांच्या हयातींत कोल्हापूर प्रांतीं सन १८४४ व १८५७ सालीं दोन मोठीं बंडें झालीं. तथापि यांचें आंग त्यांत बिलकूल नसून त्यांनीं इंग्रजसरकारावर पूर्ण भरंवसा ठेवून आपली वागणूक चोख ठेविली, व याचमुळें कोल्हापूरचें राज्य बचलें, यांत संशय नाहीं. आपले धाकटे बंधु चिमासाहेब हे उच्छृंखळ व हूड स्वभावाचे होते. तरी त्यांस वारंवार सदुपदेश करून होतां होईल तितकें संभाळून घेत; व त्यांनीं आपणापासून वेगळें राहूं नये, याबद्दल ते यत्न करीत. पुढें ते अनावर झाले, व यांच्याबरोबर एका शिक्षकाच्या हाताखालीं अभ्यास करण्यास सुद्धां राजी होईनात, तेव्हां मात्र त्यास निराळा शिक्षक नेमण्यास कबूली दिली. सन १८५३ सालापासूनच उभयतां महाराजांचें बनेनासें झालें. तेव्हां पुढें सन १८५५ सालीं दरमहा ३० रुपये पगारावर एक निराळा शिक्षक चिमासाहेब महाराजांकरितां नेमिला. जसजसे महाराज मोठे होऊन त्यांस समजूं लागलें, त्याप्रमाणें आपणास आतां मुखत्यारी मिळावी, व आपण राज्यकारभार चालवावा, असें त्यांस वाटूं लागलें. महाराजांचें वय २५ वर्षांचें होऊन गेलें, तरी त्यांचे स्वाधीन राज्य करण्याविषयीं कोणी कांहींच गोष्ट काढीना. ते-

व्हां वडोद्याहून लग्न करून परत येतांना सन १८५५ सालीं महाराज मुंबईस आले, आणि गव्हरनरसाहेबांची स्वतः गांठ घेऊन आपणास मुखत्यारी द्यावी, अशाबद्दल समक्ष बोलले, व मागाहून थैली दिली. परंतु त्यांचा विचार होऊन असें उत्तर आलें कीं, अद्याप कर्ज फार आहे, व जमाबंदीची स्थिति सुधारावी तितकी सुधारली नाहीं. याकरितां अशा प्रसंगीं आपल्या हवालीं राज्य करून घेण्यांत कांहीं फायदा होणार नाहीं.

नंतर ८०,००० रुपयांत खासगीकडील खर्च भागत नाहीं, याकरितां ती नेमणूक तरी वाढवावी, अशी सरकारास थैली पाठविली. पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांणींही अभिप्राय दिला कीं, नेमणुकीपेक्षां हमेष खर्च जास्त होतो, व उभयतां महाराजांची लग्नें वगैरे झाल्यानें खर्च वाढला आहे, तर नेमणूक वाढवावी. परंतु सरकारनें स्पष्ट लिहिलें कीं, ८०,००० रुपयांतच सर्व खासगीचा खर्च ठेविला पाहिजे. नेमणूक वाढविण्यास तूर्त सवड नाहीं. तेव्हां महाराजांनीं पुनः थैली लिहिली कीं, सर्व नेमणूक माझ्या हवालीं करावी, म्हणजे खर्च नेमणुकीच्या आंत ठेवण्याची तजवीज करितों, व त्याप्रमाणें करण्यास थैली दिली. याचा विचार चालला होता, इतक्यांत सन १८५७ चें बंड झालें व खासगीकडील मुखत्यारी देण्याचें प्रकरणही लांबणीवर पडलें. शेवटीं चिमासाहेब महाराजांस कराचीस पाठवून जिकडे तिकडे शांतता झाल्यावर सन १८५८ सालीं मे. राबर्टसनसाहेबांच्या शिफारसीवरून महाराजांस खासगीकडील मुखत्यारी दिली, व ८०,००० रुपयांची रक्कम त्यांच्या हवालीं करूं लागले. त्यांजकडे एक स्वतंत्र खासगी कारभारी नेमिला, व त्यास वाड्यांतील गुन्हेगारांस ५० रुपये दंड व तीन महिन्यांची सजा इतकी शिक्षा देण्याचा अधिकार दिला; आणि पोलिटिकल सुपरिंटेंडेंटाच्या मंजूरीनें ५०० रुपये दंड व एक वर्ष कैद देण्याचा अधिकार दिला. याचसालीं महाराजांनीं सर्व राज्याची मुखत्यारी मिळण्याबद्दल पुनः दोन थैल्या लिहिल्या. तेव्हां ब्रिटिश सरकारानें बसण्याचा घोडा एक व गाडीचे घोडे २ असे आदरपूर्वक महाराजांस नजर पाठविले; व महाराजांच्या थैल्यांचा विचार होऊन अखेर अखत्यार देण्याविषयीं कसा ठराव झाला, तें मागें सांगितलेंच आहे. हा ठराव झाल्यावर महाराजांच्या हवालींकारभार करणें तर कारभार सुरळीत चालावा, व ब्रिटिश सरकारचें राहिलेलें कर्ज फिटावें, अशी कोणत्या प्रकारें व्यवस्था करितां येईल, याबद्दल रिपोर्ट ह्यावलाक साहेबांकडे मागितला. तेव्हां त्यांनीं सन १८६० सालीं सरकारास रिपोर्ट पाठविला कीं, आ-

ज ६।७ लाख रुपये ब्रिटिश सरकारचें कर्ज देणें आहे तें फेडण्यास दरसाल एक लाख रुपये देण्याचें महाराजांनीं कबूल केलें आहे, व त्या प्रमाणें फेड होण्यास कांहीं हरकत नाहीं. हल्लीं सर्व कारभार पोलिटिकल सुपरिंटेंडेंट, दसरदार, नेटिव येजंट, शिरस्तेदार व चिटणीस यांच्या मदतीनें आपल्या नांवें चालवितात तें बंद करून पूर्वीं प्रमाणें स्वतंत्र एक कारभारी नेमून त्यांनीं महाराजांस बरोबर घेऊन महाराजांचे नांवें सर्व कारभार दोन वर्षें चालवावा, आणि महाराजांस अनुभव आल्या म्हणजे त्यांस पूर्ण अखत्यार द्यावा. पोलिटिकल सुपरिंटेंडेंट हा हुद्दा मोडून पोलिटिकल एजंट हा हुद्दा चालू करावा, आणि महाराजांकडे पूर्ण अखत्यार देईपर्यंत एक युरोपियन असिस्टंट दरमहा ८०० रुपये पगाराचा द्यावा, व कोणत्या शर्तीवर पुढें कारभार हवालीं करावयाचा त्या कराराच्या मसुदाही पाठविला

यांचें म्हणणें सरकारानें मंजूर केलें, आणि सन १८६१ सालीं विजयादशमीच्या मुहूर्तावर सर्व कारभार महाराजांच्या नांवें चालू झाला, व महाराज पोलिटिकल एजंटाबरोबर कारभार पाहूं लागले. पुढें कारभारी नेमून त्याचें निराळें आफीस करावयाचें राहिलें. त्यास सरकारांनीं असें स्पष्ट दर्शविलें होतें कीं, एजंटांनीं आपणाच कोणाची पसंती न करितां महाराजांस कारभारी पसंत करूं द्यावा, आणि सरकारानें योग्यायोग्य पाहून मंजूर किंवा नामंजूर मात्र करावा. त्या प्रमाणें महाराजांस सांगतांच महाराजांनीं प्रथम नाना मोरोजी यांस कारभाऱ्याची जागा देण्याकरितां पसंत केलें. सरकारास यांचें नांव पसंत पडलें नाहीं. तेव्हां दक्षिणभाग कमिशनरचे दसरदार रामराव नृसिंह ताडपत्रे यांस पसंत केलें. सरकारास हे गृहस्थ मान्य होऊन, त्यांची नेमणूक दरमहा ५०० रुपयांवर झाली. या प्रमाणें कारभारी यांचें स्वतंत्र आफीस करून सर्व शिस्त बसल्यानंतर पुढील करारनाम्यांतील शर्ती महाराजांनीं कबूल केल्या म्हणजे महाराजांस पूर्ण अखत्यार देण्याचें सरकारांनीं मंजूर केलें. महाराजांनीं शर्ती कबूल केल्या आणि सन १८६२ सालीं नवंबर महिन्याचे १८ वे तारखेस सर्व राज्यकारभार मोठा दरबार भरून महाराजांच्या हवालीं केला, व महाराजांस व त्यांच्या प्रजेस फार आनंद झाला, व हा प्रसंग महाराजांनींही मोठ्या समारंभानें साजरा केला:—

# करारनामा.

कोल्हापूरच्या महाराजांनीं आपल्या राज्याचा कारभार पाहण्याची इच्छा दर्शविल्यावरून व महाराज हल्लीं वयांत आले असून त्यांनीं ब्रिटिश सरकाराबरोबर एकनिष्ठा दाखविली, व त्यांत विशेषें करून सन १८५७।५८ सालचे दंग्यांत ज्यावेळीं महाराजांचे बंधु चिमासाहेब यांचें आंग बंडवाल्यांस सामील असल्याचा संशय आला, तेव्हांही यांनीं आपली एकनिष्ठा ढळूं दिली नाहीं, यावरून नामदार गव्हरनर इन् कौन्सिल यांणीं असा ठराव केला आहे कीं, कांहीं गोष्टी या करारनाम्यांत लिहिल्या आहेत त्या खेरीज करून कोल्हापूरचा राज्यकारभार महाराजांचे हवालीं करावा, व या करारनाम्यावर महाराजांनीं सही करावी.

महाराजांचे दौलतीची मुखत्यारी सोंपविण्याचे प्रकरणी नामदार गव्हरनर इन्कौन्सिल यांचे विचारास येतें कीं, कारभारी जो नेमण्याचा त्याविषयीं शर्थ ठरविण्याची जरूर नाहीं. कारण कीं आपला कारभारी हा केवळ ब्रिटिश सरकाराकडून नेमलेला किंवा त्यांचाच नोकर असावा असें नाहीं. ही गोष्ट महाराजांस सहजच अधिक संतोषाची होईल खरी, परंतु ही मोठी अगत्याची गोष्ट आहे कीं, कोल्हापूर महाराजांच्या स्वाधीन झालेलें जें राज्य त्यांतील जो मुख्य कारभारी तो आरंभीं कांहीं दिवसपर्यंत तरी ब्रिटिश सरकारांनीं सर्व प्रकारें पसंत केलेला माणूस असला पाहिजे.

सदरीं लिहिल्या अन्वयें जीं ठरावाचीं कलमें कबूल केल्याविषयीं महाराजांस सही करावी लागेल तीं येणेंप्रमाणें:—

१. कोल्हापूरचे महाराज यांनीं सर्व अगत्याचे बाबतींत ब्रिटिश सरकारची सल्ला व उपदेश जे कोल्हापूर येथील ब्रिटिश सरकाराचे कामगाराचे मार्फत देण्यांत येतील ते कबूल करून अमलांत आणले पाहिजेत.

२. महाराजांच्या राज्यकारभारांत हल्लीं प्रमाणेंच एक खासगी कारभारी असावा. त्याचे हिशेब पृथक् ठेवून दरवर्षीचे दौलतीचे हिशेबांत एक रकमेनें दाखल करीत जावें.

३. दरबारचें परइलाख्यांतील कोर्टांशीं (कोडतांशीं) काम चालणें जाहल्यास पोलिटिकल एजंट यांचे मार्फतीनें चालावें.

४. जमाबंदी प्रकरणी सर्व काम महाराजांच्या हातीं असावें, व ब्रिटिश सरकारच्या रदकर्जाविषयींची तजवीज त्यांनींच करावी. ती अशी कीं, एक लाख कंपनी रुपयांहून कमी हप्ता देऊंनये.

५. ब्रिटिश सरकारच्या कर्जाचा निकाल होईपर्यंत महाराजांनी जमिनीची नवीन देणगी देऊंनये.

६. कोल्हापूर इन्फंट्रीची हल्लींची व्यवस्था आहे ती कायम ठेवण्याची; ह्मणजे हल्लीं प्रमाणेंच ब्रिटिश सरकारच्या कामगाराचा तिजवर हक्क वगैरे असावा व सदर्नमराठा हार्स रिसाल्यापैकीं जे लोक कोल्हापुरांत आहेत त्यांच्या खर्चाबद्दल जी रकम द्यावी लागते, ती जोंपर्यंत ते लोक करवीर इलाख्यांत ठेवणें जरूर वाटेल तोंपर्यंत महाराजांनीं देत जावी.

७. हल्लींचीं तीन दिवाणी इनसाफाचीं नेटिव्ह कोर्टें (कोडतें) कायम ठेवून शिवाय एक अपील कोडत असावें, व त्यास महाराजांचें कोडत असें नांव द्यावें. ह्या शिवाय महाराज आणि ब्रिटिश एजंट ह्या उभयतांचें मिळून एक कोडत असावें. त्यांनीं फक्त मोठमोठाले सरदार लोकांवर ज्या फिर्यादी पडतील त्यांचा निकाल करावा. मामलेदार लोकांस हल्लींप्रमाणेंच लहानसहान फौजदारी खटल्यांचे निकालाविषयीं अखत्यार असावा. त्याहून भारी गुन्ह्याचे चौकशी करितां एक न्यायाधीश कोडत असावें, व जशी मुदत ठरविण्यांत येईल तशी त्यांनीं शिक्षा द्यावी. परंतु तीन वर्षांहून जास्ती मुदतीची कैदेची शिक्षा देणें झाल्यास त्यास महाराजांची मंजूरी असावी, व मृत्यूची शिक्षा देणें झाल्यास ती सरकारच्या मंजूरीकरितां पाठवीत जावी.

८. कित्येक मोठमोठाले जाहागीरदार ह्मणजे विशाळगडकर प्रतिनिधि, बावडेकर पंत अमात्य, कागलकर, इचलक-

जीकर, कापशीकर, तोरगलकर, सरलष्कर नारायणराव कागलकर व हिम्मतबहाद्दर हे कांहीं बाबतींत पोलिटिकल एजंट साहेबांचे देखरेखीखालीं असावयाचे असें समजलें पाहिजे. परंतु प्रसंगानुसार एखादे कामाच्या हकीकतीवरून हरकत नसल्यास सदरहू देखरेख महाराज सरकारच्या सल्यानें होत असावी. या सरदार लोकांच्या ताब्यांत मृत्यूची शिक्षा किंवा सात वर्षांहून जास्त कैदेची शिक्षा देण्याजोगे जे फौजदारी खटले होतील, ते सरकारांत रवाना होण्याकरितां पोलिटिकल एजंटसाहेब यांजकडे चौकशीस येत जावे. ह्या सरदार लोकांवर परभारा हुकमत चालावी म्हणून जें नमुद केलें आहे त्यावरून व जे कोणी सरदार अल्पवयी असतील त्यांचें पालन करण्याचें कामही पोलिटिकल एजंटसाहेब ह्यांचे देखरेखीनें होण्याचें आहे, यावरून महाराजांचे स्वामीपणाचे जे हक्क आहेत त्यांत कोणत्याही प्रकारें व्यत्यय आणण्याचा बिलकूल हेतु नसून फक्त राज्याची व्यवस्था चांगली असावी व पूर्वीच्या काळीं ज्या तंट्यांमुळें वारंवार दंगेधोपे व रक्तस्राव होत असत अशा प्रकारचे तंटे होऊंनयेत इतकाच हेतु आहे.

९. ब्रिटिश सरकारचे विचारास जोंपर्यंत जरूर वाटेल तोंपर्यंत एजन्सीखातें म्हणजे पोलिटिकल एजंटसाहेब ह्यांचा खुद्द व त्यांचे कचेरीचा पगार वगैरे बद्दलचा खर्च महाराज सरकारांनीं देतजावा. व कोल्हापूर छावणीमध्यें ब्रिटिश सरकारांनीं लष्कर ठेविलें आहे त्यास राहण्याकरितां वगैरे ज्या इमारती बांधण्यांत व दुरुस्त करण्यांत येतील त्याबद्दलचा खर्च महाराजांनीं दिला पाहिजे.

---

महाराजांस पूर्ण अखत्यार देण्यापूर्वीच लार्ड क्यानिंगसाहेब यांजकडून बाबासाहेब महाराजांस दत्तकाबद्दल सनद इसवी सन १८६२ सालीं मिळाली. " जेव्हां औरस संतती नसेल तेव्हां आपल्या घराण्याच्या चालीप्रमाणें व धर्माप्रमाणें दत्तक घेतला अ- दत्तकाची सनद मिळते सन १८६२.

मतां सरकार मंजूर करील." अशा आशयाचा सनदेंत मजकूर होता. ही सनद ध्यावलाक साहेबांनीं दरबार भरवून समारंभानें महाराजांस दिली.

तोफांची सलामी कोणकोणास किती द्यावयाची याजबद्दल हिंदुस्थान सरकाराकडून एक ठराव आला. त्यांत बाबासाहेब महाराजांच्या नांवावर १७ तोफा लिहिल्या होत्या. तेव्हां पोलिटिकल एजंट यांनीं महाराजांच्या इच्छेवरून

तोफांची सलामी. सन १८६३।६४.

सरकारास असा रिपोर्ट केला कीं, महाराजांच्या नोकरांचे नोकर शिंदे, होळकर व गायकवाड यांस जास्त तोफा असून महाराजांस कमी ठेवणें बरोबर नाहीं. हे खुद्द शिवाजीचे वंशज असल्यानें यांची मानहानी होते. निदान त्यांच्या इतक्या यांस तोफा असणें अवश्य आहे. सरकारकडून याचा असा जबाब आला कीं, शिंदे, गायकवाड वगैरे सरकारच्या फार उपयोगीं पडले आहेत तसे कोल्हापूरचे महाराज पडले नाहींत. तथापि आपल्या शिफारसीवरून कोल्हापूरच्या महाराजांस १९ तोफांची सलामी मंजूर करण्यांत आली आहे.

महाराजांस मुखत्यारी मिळाल्यानंतर सरकारची छावणी उठविण्याबद्दल लिहून आलें होतें, परंतु महाराज सरकारचें मत लष्कर कोल्हापुरासच असावें,

सरकारची छावणी.

व आपण विशेष खर्च देऊं, असें असल्यावरून तें लष्कर तसेंच कर्वीरास राहिलें. पुढें अफगाणिस्थानच्या लढाईच्या वेळीं तें लष्कर उठून लढाईस गेलें. व त्यानंतर एक दोन वर्षांनीं १०० गोरे लोक आणून ठेविले होते. पुढें सन १८८४।८५ च्या सुमारास तेही गेले.

काळे डगल्याचे रिसाल्याचे खर्चाबद्दल २०,००० रुपये सरकारांत घेत होते, ते यांच्या कारकीर्दीत माफ झाले. परंतु पोलिटिकल एजंटसाहेबांनीं हे

काळे डगल्याच्या रिसाल्याचा खर्च माफ होतो.

रुपये लोकोपयोगी कामाकरितां निराळे काढून ठेवून तिकडे लावावे, असा रिपोर्ट केला. परंतु महाराज सरकारास अभिप्राय विचारल्यावरून त्यांनीं आम्हीं पाहिजे त्या वेळीं लोकोपयोगी कामाकरितां रुपये देऊं असा अभिप्राय दिल्यावरून सरकारांनीं हे रुपये माफ केले.

महाराज सरकारच्या मुखत्यार कारकीर्दींत वाळवें संस्थानचे मालक विश्वा-

वाळवें संस्थान खालसा होतें.

रराव घाटगे हे मरण पावल्यावर त्यांची पत्नी रमाबाई यांनीं एक मुलगा दत्तक घेतला. त्यास सरकारची मंजुरी नव्हती. म्हणून महाराज सरकारच्या इच्छेवरून घेतलेला दत्तक सरकारानें नाक-

नूल केला, व वाळवें संस्थान खालसा करण्यांत आलें. यामुळें सरकारची २०,००० रुपये जमाबंदी वाढली.

पोलिटिकल सुपरिंटेंडेंटाच्या कारकीर्दींत फक्त पड जमिनी लागवडीस आणि- ल्या. ज्या जमिनी लागवड करण्याजोग्या होत्या, त्यांचा सारा ठरविला आणि का- ळीचा वसूल करण्यांत महत्वाची सुधारणा केली. परंतु जमिनीच्या मनामकारांत, मापांत किंवा साऱ्याच्या दरांत कांहीं फेरफार झाला नव्हता. रा- मरावजी कारभार पाहूं लागल्यावर असें आढळून आलें कीं, गांवच्या हिशेबींन- मूद असल्यापेक्षां जास्त जमीन पुष्कळांकडे लागवडीस आहे, जमिनीची प्रतवा- री बरोबर केलेली नाहीं, व सारा कांहींएक नियमित पद्धतीनें ठरविलेला नाहीं. म्ह- णून पुनः पाहाणी व मोजणी करून साऱ्याचे दर नवीन ठरवावे, असें जरूर वा- टलें व त्याप्रमाणें रामरावजींनीं डागवारी (म्हणजे जमिनीची मोजणी करून प्र- तवारी लावणें व सारा ठरविणें) सुरू केली, व हें काम बाबासाहेब महाराज हक्क होई पर्यंत चाललें. डागवारीवरून जिराइत जमिनीस दरबिघ्यास चार आण्या- पासून २२ $\frac{1}{2}$ रुपयां पर्यंत आणि बागाइतास ७ रुपयां पासून ४३ $\frac{1}{2}$ रुपयांप- र्यंत सरकार दस्त ठरविण्यांत आला. येणेंकरून जमाबंदी सुमारें १,७५,००० रु- पये वाढली.

डागवारी.

दरसाल एक लाख रुपये प्रमाणें ब्रिटिश सरकारचें सर्व कर्ज इसवी सन १८६५ अखेर बाबासाहेब महाराजांनीं फेडून टाकिलें.

कर्जाची फेड.

सन १८६५ सालांत कोल्हापूर व सदर्न मराठा कंट्री या दोन्ही एजन्सी ए- कत्र केल्या. त्यावेळीं असा ठराव झाला कीं, पोलिटिकल ए- जंट यांचा पगार ३,००० रुपये असावा. त्यापैकीं १,८०० रु- पये करवीर सरकारानें द्यावे, व २०० रुपये ब्रिटिश सरका- रांतून मिळावे. त्याचप्रमाणें एस्टाब्लिशमेंटचा खर्च महारा- ज सरकार व ब्रिटिश सरकार यांनीं निम्मेनिम प्रमाणें द्यावा.

कोल्हापूरव सदर्न मराठा कंट्री या दोन्ही एजन्सी कोल्हापुरास एकत्र होतात.

सन १८६५ सालीं नामदार सर बार्टल फ्रिअरसाहेब मुंबईचे गव्हरनर यां- ची स्वारी इकडे आली, आणि ४।५ दिवस कोल्हापुरास मुक्काम होता. त्यावेळीं दरबार भरला होता. यावेळीं महा- राज सरकारची राज्यव्यवस्था वगैरे पाहून फारच खुष झा- ले. नंतर ते सदर्नमराठा कंट्रीमध्यें जाऊन जेव्हां बेळगांवास दरबार भरला, त्यावेळीं त्यांनीं महाराज सरकारची फार तारीफ केली आणि

नामदार सर बार्टल फ्रियर कोल्हापुरास येतात. इसवी सन १८६५.

इतर सरदारांनीं त्यांचा कित्ता घ्यावा असें सर्वांस सांगितलें.

बेळगांव येथें तारीख २८ नवंबर सन १८६५ रोजीं कर्नाटक प्रांतांतील सरदार व मानकरी यांच्या मुलाखतीकरितां जो दरबार भरविला, त्यावेळीं नामदार गव्हरनर साहेबांनीं जें भाषण केलें त्यांत कोल्हापूरच्या शिवाजी ऊर्फ बाबासाहेब महाराजांविषयीं पुढील उल्लेख केला होता. "मी नुकताच कोल्हापुरास गेलों होतो, व तेथें कोल्हापूरच्या शिवाजी महाराजांनीं आपल्या राज्याचा साक्षात् कारभार चालविण्याची योग्यता दाखविल्यावरून मला फार आनंद झाला. आपणास माहीत आहेच कीं, त्यांच्या वडिलांच्या वेळीं व ते मोठे होईपर्यंत कोल्हापूर प्रांतांत जिकडे तिकडे गोंधळ व अव्यवस्था माजली होती. त्यानंतर ब्रिटिश सरकारानें राज्यकारभार स्वतः हातीं घेऊन प्रांतांत जिकडे तिकडे व्यवस्था केली, आणि महाराजांच्या हवालीं सर्व कारभार केला. महाराजांस इंग्लिश गृहस्थांबरोबर इंग्रजींत खासगी व सार्वजनिक विषयांवर भाषण करितां येतें इतकेंच नसून राजवाड्यांत खुद्द आपल्या देखरेखी खालीं सरदार व राज्यांतील मुख्य कामगार यांच्या मुलांचा वर्ग काढून त्यांस इंग्रजी शिक्षण देण्याचें काम चालविलें आहे. इंग्रज सरकारच्या हातीं राज्यकारभार असतां मे. ग्रेहामपासून ल्यावलाक साहेबांपर्यंत जे निरनिराळे कोल्हापुरास पोलिटिकल सुपरिंटेंडेंट झाले, त्यांनीं पुत्रवत् काळजी घेऊन जें त्यांस शिक्षण दिलें, त्या प्रकारचें आपल्या सरदारांच्या मुलांस शिक्षण मिळावें अशी इच्छा त्यांची आहे. कोल्हापूरचे महाराज राज्यांतील सर्व खात्यांवर स्वतः देखरेख करितात. लोकांस न्याय देतात, व लोकांची वेळेवर दाद घेऊन कारभार चांगला चालवीत आहेत. व तेणेंकरून लोक सुखी व संतुष्ट आहेत असें दिसून आलें.

गव्हरनर साहेबांचे महाराजांविषयीं उद्गार.

**नाइट कम्यांडर आफ् दि स्टार आफ् इंडिया** असा महाराजांस सन १८६६ सालीं सरकारांतून देण्याबद्दल थैली आली. परंतु चांद येण्यापूर्वीच महाराज सरकार हक्क झाल्यामुळें ती परत गेला.

नाइटकम्यांडर आफ् दिस्टार हा किताब मिळतो.

महाराजांस मुतखड्याचा विकार होता. त्याच्या योगानें त्यांची प्रकृति बिघडत जाऊन सन १८६६च्या आगस्ट महिन्याच्या ४थ्या तारखेस पहांटेस त्यांचा काळ झाला. मरणाच्या पूर्वीं त्यांनीं एक मृत्युपत्र

महाराजाचा मृत्यु.

केलें होतें. त्यांत मरणापूर्वी एक दिवस दादासाहेब पाटणकर यांचा मुलगा नागोजीराव पाटणकर (आऊबाई आक्का यांचा मुलगा) ऊर्फ तात्यासाहेब यांस दत्तक घेतले; व त्याचें नांव राजाराम महाराज ठेविलें असें लिहिलें होतें. यांस एकंदर चार मुलगे झाले होते. ते सर्व मरून गेले होते. मृत्युपत्रांत आणखी त्यांनीं आपल्या जवळच्या लोकांस वगैरे सुमारें २०,००० रुपये किमतीचीं इनामें* करून दिलीं होतीं. पुढें सरकारास रिपोर्ट करून झालेला दत्तक बरोबर आहे किंवा नाहीं, याजबद्दल दादासाहेब भोंसले यांच्या तक्रारीवरून वाटाघाट होऊन पोलिटिकल एजंट यांच्या अभिप्रायाकरितां प्रकरण आलें. पुढें त्यांनीं योग्य अभिप्राय दिल्यावरून हिंदुस्थान सरकारास तार केली. त्यावरून त्यांनीं दत्तक मंजूर केल्याची तारीख २१ आगस्ट रोजीं तार आली. पुढें महाराज असावध असतां दत्तक घेतला, अशी तक्रार निघाली. परंतु ती तक्रार नामंजूर झाली.

राजाराम महाराजास दत्तक घेतात.

---

* श्री करवीर निवासिनीस ५०० रुपये. श्री काशीविश्वेश्वरास १,००० रुपये. बाळाबाई आक्कासाहेब यांस ५००० रु० व त्यांच्या मुलीस १००० रुपये. अंतर महाल बगडाजी व तिचे बंधु भाऊ अमृता सुरवशी यांस हल्लीं पोंचतात त्या नेमणुका पोंचाव्या. व शिवाय ३००० रुपयांचा गांव भाऊ अमृता यास वंशपरंपरा चालावा. बाळकृष्ण अनंत कुंभोजकर यांस मंत्री हा किताब दिला. व पालखी भालदार वगैरे ठेवण्यासाठीं ३००० रुपये वसुलाचा गाव व गोकुळाष्टमीचे उत्साहाकरितां १००० रुपयांचा गांव चालावा. या पैकीं ३०० रुपये इनाम व हल्लींचा ५० रुपये पगार त्यांचे कारकून नारो रघुनाथ यांस चालावा. रामरावजी ताडपत्री यांस १२०० रुपयांचा गाव. आबा वाशीकर यांस ५०० रुपयांची जमीन. गोविंद चिमणाजी यांस ३० रुपये दरमहावर नेमिलें. सखाराम चिमणाजी यांनीं वाडी रत्नागिरीचे (जोतीबाचे) कामावर असावें. धर्मादाय इनामें गोविंदशास्त्री पेंडसे २०० रुपये. व्यासाचार्य सांगलीकर १५० रु० बाळभट बिन रामशास्त्री १०० रुपये. यास चालावीं. नेमणुका दौलतराव इंगळे ४० रु०, खंडेराव इंगळे १५ रु०, आपाजीराव गायकवाड २० रु०, बळवंतराव यादव १५ रु०, केशवराव गायकवाड ५ रु०, बळवंतराव घाटगे १० रु०, बाबुराव पाटणकर ३० रु०, मानाजी पाटील २८८ रु०, यशवंत राव निंबाळकर २० रु०, हुजरे मिळून ६५ रु०, आपाजी पिशवीकर २० रु० अशा दरमहा चालाव्या. वासुदेवभट धर्माधिकारी यांस ६०० रु० तैनात. हिंदुराव घाटगे यांस ८० बिघे जमीन इनाम. या शिवाय कोल्हापुरास अन्नछत्र घालण्यासाठीं व वाडीस माधोकी घालण्यासाठीं बरीच रक्कम खर्च करावी असें नमूद होतें.

सन १८६६ सालीं महाराज मरण पावण्यापूर्वीच कर्नल अंडरसनसाहेब यांस पोलिटिकल एजंट नेमिलें. परंतु पुणे येथें पब्लिकवर्क्स कान्फरन्स भरलें होतें. त्यामुळें ते इकडे लागलेच आले नव्हते. परंतु ते आक्टोबर अखेर आले.व त्यानंतर महाराजांनीं कांहीं इनामें करून दिलीं. त्यांजबद्दल प्रकरण पोलिटिकल एजंट यांच्या अभिप्रायाकरितां आलें. त्याप्रमाणें त्यांनीं तपास करून बाळाबाई आक्कासाहेब यांस व त्यांच्या मुलीस ६००० रुपये आणि अंतरमहालच्या स्त्रियांस व त्यांच्या भावांस १२०० रुपये अशा नेमणुका तहाहयात चालवाव्या. असा रिपोर्ट केला. तेव्हां बाकी उत्पन्नें मुंबई सरकारानें चालविण्याचें नाकबूल केलें.परतु विलायत सरकाराकडे प्रकरण गेल्यावरून त्यांनीं असें लिहिलें कीं, महाराजांस कर्ज फेडल्यानंतर इनाम देण्यास अधिकार होता. त्याप्रमाणें त्यांनीं दिलेलें इनाम चालवणें योग्य आहे. परंतु मुंबई सरकारचा अभिप्राय विरुद्ध आहे सबब हल्लींचे महाराज वयांत आल्यावर याचा त्यांनीं विचार करावा, असा ठराव झाला. लोक सांगतात कीं, राजाराम महाराजांचें असें म्हणणें होतें कीं, आपणास मुखत्यारी मिळाल्यावर “ मी पहिली गोष्ट ही करीन कीं, हीं दिलेलीं उत्पन्नें चालवीन.”

बाबासाहेब महाराज हे शरीरानें जरी लठ्ठ नव्हते, तरी सदृढ व बळकट असे होते. हे मोठे समजदार, शाहाणे, धूर्त परंतु कमी उदार असे होते.हे कधीं रागाच्या स्वाधीन होत नसत. हे शांत असून यांच्या तोंडातून अपशब्द कधींही येत नसत. यांस शिकारीचा अत्यंत शोक होता. हे दुर्व्यसनी नव्हते. फक्त यांची एक गरप मात्र होती. हे शुद्ध मराठी भाषा बोलत असत. आणि यांस इंग्रजी भाषेचें ज्ञानही बरेंच असे. यांची स्वधर्मावर फार श्रद्धा असे. हे किंचित भित्रे असत. सुधारणेच्या कामीं यांचें नेहमीं मागें पाऊल असे. हे स्वभावानें फार नम्र असत. यांस बुद्धिबळें खेळण्याचा फार नाद असे. यांस कुस्त्या पाहण्याची फार हौस असे. मोठ मोठे पहिलवान पदरीं बाळगून कुस्त्या करवीत. हे बुद्धिवान् असून यांस हिंदुस्थानी भाषा चांगली येत असे. दिवाणी कोर्टाचे ठराव स्वतः आपल्या हातानें लिहीत असत. हे स्वरूपानें मध्यम प्रतीचे असून ठेंगणे होते. कारभाराची पूर्वीची शिस्त सर्व कायम ठेवून खर्च वेच फार बाताबेतानें करून सर्व कर्ज फेडिलें, व खजिन्यांतही बरीच शिल्लक केली होती. यांनीं आपल्या हातीं कारभार घेतल्यापासून राज्य कोणत्याही बा-

बाबासाहेब महाराजांचा स्वभाव.

वतींत मागें न पडतां त्याचें पाऊल पूर्वीच्या कारकीर्दीप्रमाणें पुढेंच पडत चालले होतें.

सन १८४३ सालीं एप्रिल महिन्याच्या २५ व्या तारखेस (चैत्रवद्य ११ रोज मंगळवार शके १७६५) प्रतिनिधि मरण पावले. तेव्हां त्यांचें कुटुंब राधाबाई साहेब यांनीं माधवराव या नांवच्या मुलास दत्तक घेतलें व त्याचें नांव कृष्णाराव असें ठेविलें. या दत्तकास त्या वेळचे कोल्हापूरचे कारभारी यांणीं मान्यता देऊन महाराजांचें आज्ञापत्र दिलें. या दत्तकास कंपनी सरकारानें मान्यता दिली नाहीं, व कोंकणांतील प्रतिनिधीचें उत्पन्न जप्त केलें. पुढें सन १८४४ सालीं जेव्हां बंड झालें त्यांत विशाळगडावरील गडकरी व इतर नोकर लोक बंडवाल्यांस सामील असल्याचा संशय घेऊन एक कारभारी शिवाय करून बाकी सर्वांस कैद केलें. आणि चौकशी करून ज्यांवर गुन्हा शाबीद झाला, त्यांस शिक्षा दिल्या. या बंडांत राधाबाई साहेबांचेंही आग असावें, असा अंदेशा आला. त्यावरून दत्तक मंजूर न करितां फक्त नेमणुका देऊन सर्व संस्थानचा कारभार पोलिटिकल सुपरिंटेंडेंट मार्फत भास्कर नीळकंठ यांस कारभारी नेमून चालू केला व खर्च कमी केला. देवस्थान धर्मादाय वगैरे नेमणुका निम्मे चालू ठेविल्या.

विशाळगड संस्थान.

बंडांत विशाळगडकर व त्यांचे लोक असल्याबद्दल शाबीद झालें. तेव्हां त्यावेळचे पोलिटिकल एजंट यांनीं पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांची नेमणूक होण्यापूर्वींच सरकाराकडे असा रिपोर्ट केला होता कीं; मागील वंशांतील अस्सल किंवा दत्तक वारस मान्य करणें किंवा अगदीं नवीन प्रतिनिधि नेमणें हें कोल्हापूर दरबारच्या मर्जीवर आहे. यास्तव हल्लींच्या कोल्हापूरच्या स्थितींत नवीन प्रतिनिधि नेमण्याची जरूरी नाहीं. विशाळगड संस्थानांवर राजद्रोहाचा आरोप अनेक वेळां आला असल्यामुळें कृष्णराव हा दत्तक रद्द करावा. आणि कोंकणांतील यांचा मुलूख ब्रिटिश सरकारानें खालसा करावा; आणि घांटावरील सुमारें ५६००० रुपये वसुलाचा मुलूख कोल्हापूर इलाख्यांत खालसा करून कोल्हापूर सरकारानें जें ब्रिटिश सरकारचें कर्ज द्यावयाचें आहे, तें फेडण्याकडे याचा विनियोग करावा. याचा विचार मुंबई सरकाराकडे दोन तीन वर्षे चालला. दरम्यान ग्रेहामसाहेबाची नेमणूक झाल्यावर त्यांस अभिप्राय विचारल्यावरून त्यांनीं असा आपला अभिप्राय दिला कीं; पूर्वींच्या कित्येक वर्षांच्या अव्यस्थित व अंदाधुंदीच्या कारकी-

र्दीमुळें व त्या नंतरच्या बंडाच्या धामधुमीमुळें लोकांचा दिल भरंवसा सरकारावरचा उडाला आहे. हल्लीं जिकडे तिकडे शांतता होऊन कारभार शिस्तीनें चालू लागल्यापासून नुकताशा कोठें सरकारावर लोकांचा भरंवसा बसत चालला आहे. अशा समयास अशा तऱ्हेचें हें कृत्य केल्यानें लोकांच्या व इतर सरदार व सरंजामीदार यांच्या बेभरंवशास व हवालदीलपणास कारण होईल. शिवाय बंडाच्या वेळीं विशाळगडकर हे मयत असून त्यांची पत्नी व तिनें कोल्हापूर दरबारच्या कारभाऱ्यांच्या सल्यानें घेतलेला लहान दत्तक पुत्र असे होते. याकरितां त्यांच्या लोकांच्या अपराधाबद्दल त्यांस शासन होऊनये. अखेर या सर्व गोष्टींचा विचार होऊन झालेला दत्तक नजराणा घेऊन मान्य करावा, रत्नागिरी जिल्ह्यांतील दुतर्फा अमलाची एकतर्फी करून तिकडील उत्पन्न खालसा करावें आणि बाकी ⅔ बद्दल नक्त नेमणूक २०,००० रुपये रत्नागिरी तिजोरींतून पोहोंचावी, आणि कोल्हापूर दरबारच्या मार्फत कारभार चालवून सर्व कर्ज फिटून व्यवस्था लागेपर्यंत संस्थान मालकाचे हवालीं करूनये, असा ठराव झाला. तेव्हां सन १८४८ सालीं कोल्हापूर येथें कृष्णराव यांस प्रतिनिधि पदाचीं वस्त्रें दिलीं व ३५००० रुपये नजराणा घेतला. या पूर्वींच भास्कर नीळकंठ यांची कारभाऱ्याचे जाग्यावर नेमणूक होऊन पोलिटिकल सुपरिंटेंडेंट मार्फत कारभार चालू झाला होता. यावेळीं सुमारें ७५००० रुपये वसूल होऊन त्यापेकीं सुमारें ७०००० रुपये खर्च होत असे, व बाकी शिल्लक पडूं लागली होती. यामुळें नजराणा घेण्यापुरती शिल्लक गेल्या तीन चार वर्षांत मिळून पडली असावी. याच वेळीं संस्थानास एकंदर कर्ज किती आहे, त्याचा तपास करितां सुमारें २०।२५ लाख कर्ज आहे असें आढळलें. शेवटीं सावकारांचे हिशेब वगैरे पाहून त्यांची ३।४ लाखांवर तोंड करून हातेबंदी केली. आणि दरसाल वसुलांतून सुमारें ३०००० रुपये प्रमाणें देऊन फेड करण्याचें ठरवून त्यांजकडे असलेले गांव वगैरे हिसकावून घेतले.

पुढें सन १८५३ सालीं गणेश विठल तांबे यांस कारभारी नेमिलें. कृष्णाराव प्रतिनिधि यांचें वय जरी सुमारें २८।२९ वर्षांचें झालें होतें, तरी ते कारभारांत वगैरे कांहीं मन घालीत नव्हते, व जात्या स्वभावानें फार साधे व भोळसर होते. शेवटीं त्यांचें कर्ज वगैरे फिटून संस्थान भरभराटींत आलें, व कारभारही आपणास मिळावा, अशी इच्छा कृष्णरावांनीं दर्शवि-

ली. तेव्हां सन १८६१ सालीं तारीख २८ मार्च रोजीं त्यांच्या हवाली संस्थान करून त्यांस मुखत्यारी दिली, व तेचं बाबासाहेब हक्क होईपर्यंत कारभार करीत होते. मुखत्यारी देतेवेळीं ५००० रुपये नोकरी अंश दरसाल देण्याचा व घाटांतील जकातीवरील हक्क सोडण्याचा असे करार करून घेतले.

कोल्हापूर राज्याची व्यवस्था इंग्रज सरकार पाहूं लागलें तेव्हां बावड्याच्या गादीवर रघुनाथराव गोविंद होते. ते सन १८४५ सालीं वारले. पुढें सन १८४७ सालीं नवंबर महिन्यांत माधवराव लक्ष्मण नंदगावकर यांचा मुलगा रामराव वय वर्षे १५ यांस पुढील करारावर बावड्याचे गादीवर दत्तक दिला. (१) संस्थानांतून जाणाऱ्या व येणाऱ्या मालावर जकात माफ करावी. (२) कंपनीचें नाणें संस्थानीं सुरू करावें. (३) रत्नागिरी जिल्ह्यांतील दुतर्फी गांव सोडून देऊन त्याच्या मोबदला नक्त नेमणूक घ्यावी, व तीस हजार रुपये करवीर सरकारास नजराणा द्यावा. बावड्यास दिनकर रघुनाथ यांस कारभारी नेमिलें. बावडे संस्थानचा या वेळीं वसूल सुमारें ४७,००० रुपये होत असून ३९,००० रुपये खर्च वजा जातां सुमारें ८,००० रुपये शिल्लक राहात असत. बावडेकरास सुमारें ३०,००,००० रुपये कर्ज होतें. त्याची पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांनीं ५०,००० रुपयांवर तोड करून हसेबंदी केली.

गगनबावडा.

सन १८५२ सालीं रामराव पंत अमात्य वारले. तेव्हां मोरेश्वरराव यांस दत्तक घेऊन गादीवर बसविलें. आणि १०,००० रुपये नजराणा घेतला. आणि कोल्हापूर इन्फंट्रीचे खर्चाकरितां दरसाल ३८०० रुपये द्यावे, असा ठराव केला. आणि मोरेश्वर रावांस कोल्हापुरीं ठेवून त्यांचा विद्याभ्यास चालविला.

सन १८५५ सालीं बावडेकर पंत अमात्य यांचा रत्नागिरी जिल्ह्यांतील त्रिंबक गांव व दुसऱ्या कांहीं बाबी जप्त केल्या होत्या त्या सोडून द्याव्या, म्हणून ठराव झाला. बावडेकरांनीं आपली नेमणूक वाढवून द्यावी व सर्व खर्च आपल्या हुकुमानें व्हावा अशी विनंति केली. तेव्हां त्यांची नेमणूक १६०० रुपये होती, ती वाढवून २५०० रुपये केली, व संस्थानचें कर्ज वगैरे फिटून संस्थान भरभराटींत आलें तेव्हां मोरेश्वरराव यांस सन १८६१ सालीं मुखत्यारी दिली. त्यावेळीं नोकरी अंश ३४२०

रुपये दरसाल देण्याचें व घांटांतील जकाती माफ करण्याचे करार करून घेतले. या वेळीं बावडे संस्थानचा एकंदर वसूल ५०,००० रुपये होत होता.

सन १८५४ सालीं दिनकर रघुनाथ यांस इचलकरंजीस नेमिलें. तेव्हां शिरोळचे मामलेदार अंताजी रघुनाथ यांस बावड्यास कारभारी नेमिलें. बाबासाहेब हक्क झाले तेव्हां मोरेश्वररावच गादीवर होते.

कागलकर सखाराम घाटगे याणें आपली मुलगी बायजाबाई इचें दौलतराव शिंद्याशीं लग्न करून दिलें. व शिंद्याच्या वशील्यानें सन १८०० सालीं रामचंद्रराव पटवर्धन यानें आपले वडील परशुराम भाऊ याचा व-
कागल
धाचा सूड घेण्याकरितां आपली व पेशव्यांचा फौज व शिंद्याचीं कवाईत शिकलेलीं पलटणें आणून कोल्हापुरास वेढा दिला होता व कोल्हापुरावर मोठें संकट आलें होतें, त्या समयीं वेढा उठविण्याच्या कामीं सखाराम घाटगे महाराजांच्या उपयोगीं पडले, व त्याबद्दल कागल संस्थानचा मोठा भाग मिळविला वगैरे हकीगत मागें आलीच आहे. (पूर्वार्ध पृष्ठ १२३-१२९ पहा.). या सुमारास कागल संस्थानचे मालक जयसिंगराव ऊर्फ हिंदुराव बाबासाहेब घाटगे हे आपली बहीण बायजाबाई हिच्या पाशीं ग्वाल्हेरीसच राहात होते व त्यांस तिकडे सुमारें १२०००० चा सरंजामही होता. पुढें ग्वाल्हेर सोडून दिल्लीस राहूं लागले, व मरेपर्यंत तिकडेच होते. त्यांच्या तर्फे कागलास गुलाम घोसखान यानांवाचा पठाण कारभारी होता, व त्यानें संस्थानचा कारभार चांगल्या प्रकारें चालविला होता. सन १८४४ सालच्या बंडांत हा इंग्रज सरकारच्या व महाराज सरकारच्या चांगला उपयोगीं पडला. कोल्हापुरास फार धामधूम व दंगा चालला असतां तशा प्रसंगीं मोठ्या धैर्यानें कोल्हापुरास येऊन उभयतां महाराजांस व त्यांच्या आयांस घेऊन सुरक्षितपणें कर्नल आउटराम यांच्या छावणींत पोंचविलें, व त्यांची सर्व प्रकारें व्यवस्था ठेविली. पुढें क० आउटराम यांच्याही हा पठाण शिपाई अनेक प्रकारें उपयोगीं पडला. याकरितां ग्रेहामसाहेबांचो पोलिटिकल सुपरिंटेंडेंट या जागेवर नेमणूक झाल्यावर त्यांनीं सरकाराकडे त्याची शिफारस करून त्यास सरकारचें आभार प्रदर्शक पत्र व ३०० रुपये किंमतीच्या दोन शालजोड्या देवविल्या. पुढें जयसिंगराव घाटगे यांनीं त्यास कोण्णूर हा गांव

इनाम दिला. हा गांव त्यांच्या पश्चात त्यांच्या मुलाकडे चालला नाहीं. मुलास फक्त ४० रुपये पेनशन दिलें.

सन १८४४ सालीं हिंदुराव बाबांची आई मरण पावली, व याच सालीं कागल संस्थानची शाखा बावडें संस्थान याची मालक रमाबाई ही मरण पावली. तिणें घेतलेला दत्तक मंजूर केला नाहीं व संस्थान खालसा करून कोल्हापूर राज्यांत सामील केलें.

गुलाम घोसखान हा फार वृद्ध झाल्यामुळे त्याच्या हातून कारभार नीट रीतीनें चालेनासा झाला व सन १८५४ सालीं तो मरण पावला. तेव्हां त्याच्या जागीं गडइंग्लज पेट्याचे अव्वल कारकून व पुढें नारायणरावसाहेब घाटगे यांचे कारभारी दामोदर पर्वतराव यांस कारभारी नेमिलें, व त्यांसच हिंदुराव बाबांनीं कायम केलें. हिंदुराव बाबा सन १८५५ सालीं ग्वाल्हेरीस निवर्तले. यांची पत्नी पार्वतीबाई ही बायजाबाई शिंदे यांजबरोबर उज्जनीसच होती. तिणें आपणास दत्तक घेण्यास परवानगी मिळावी, म्हणून सरकाराकडे थैली पाठविली. नारायणराव घाटगे हे हिंदुराव बाबाच्या हिशास आपला हक्क सांगूं लागले. हिंदुराव बाबा मरण पावल्याची खबर कळतांच कोल्हापुराहून कामगार पाठवून खजिना वगैरे तपासून यादी केल्या, व पुढें पूर्वींच्या कारभाऱ्यासच कायम करून काम चालविलें. मात्र त्याच्या हाताखालीं कोल्हापुराहून एक शिरस्तेदार नेमिला. इचलकरंजीकर बायांनीं कोर्ट आफ् डायरेक्टरकडे थैली पाठवून दत्तकाबद्दल जें काम चालविलें होतें, त्याचा निकाल होईपर्यंत सरकारांनीं कागल दत्तक प्रकरणाचा कांहींच निकाल केला नाहीं. पुढें इचलकरंजीकरांस दत्तक द्यावा, अशाबद्दल कोर्ट आफ् डायरेक्टर यांचा ठराव झाल्यावर कागलकर पार्वतीबाई यांसही दत्तक घेण्याविषयीं मंजूरी दिली. दामोदर पर्वतराव यास काढून टाकून विनायक रघुनाथ काळे यांस कारभारी नेमिलें. दत्तक देतेवेळीं दोन वर्षांचें उत्पन्न दोन हप्त्यांनीं नजराणा द्यावा, दरसाल २,००० रुपये नोकरीअंश द्यावा, आणि खालसा केलेल्या बावडें संस्थानावर हक्क सांगूंनये, असे करार करून घेऊन पार्वतीबाईचे मांडीवर गोविंदराव केळवलकर यांस दत्तक दिलें, व त्यांचें नांव सखारामराव घाटगे असें ठेविलें. कागल संस्थानचें यावेळीं उत्पन्न ६०,००० रुपये होतें. सखाराम घाटगे याचें गजेंद्रगडकर यांच्या मुलीशीं लग्न करून तिचें नांव सुंदराबाई ठेविलें. सखाराम घाटगे हे सन १८६४ सालीं आक्टोबर महिन्यां-

न वारले. तेव्हां बाबासाहेब महाराजांनीं सरकारास कळवून नारायणराव घाटगे कागलकर व आपली भगिनी आक्कासाहेब यांच्या मुलास कागलच्या गादीवर दत्तक देऊन त्यांचें नांव जयसिंगराव आबासाहेब ठेविलें.

केशवराव तात्यासाहेब इचलकरंजीकर हे आपण कोल्हापूरच्या महाराजांपासून अगदीं स्वतंत्र आहों असें स्थापन करण्याकरितां वरचेवर सरकाराकडे येल्या पाठवीत, व कोल्हापूर करांचें वर्चस्व कांहीं केल्यानें कबूल करीत नसत. परंतु अखेर सरकारचा ठराव झाला. तेव्हां इचलकरंजी करांनीं कोल्हापूरकरांची ताबेदारी पतकरली.

इचलकरंजी संस्थान.

यांनीं आपल्या संस्थानची व्यवस्था चांगली ठेविली नव्हती. गांवांचीं गांवें गहाण टाकून मनस्वी कर्ज केलें होतें, व खर्चीवेचासही पैसा शिल्लक नव्हता. शेवटीं पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांनीं संस्थानचा सर्व हिशेब पाहून एकंदर कर्जाचा अंदाज केला तो सुमारें २५ लाख रुपये झाला. त्याची चार लाखांवर तोड करून दरसाल ३०,००० रुपयांचा हप्ता देत जावा असें ठरविलें. या वेळीं या संस्थानचा वसूल सुमारें ६२,००० रुपये होत होता,

सन १८५२ सालीं केशवराव तात्यासाहेब वारले. तेव्हां रावजी विसाजी कुपरीकर यांस त्यांचे कुटुंबाचे मांडीवर दत्तक दिलें, व त्यांचें नांव व्यंकटराव असें ठेविलें. यावेळीं पुढील करार करून घेतले; (१) कोल्हापूर सरकारास ६०,००० रुपये नजराणा द्यावा; (२) मोह तर्फा अगर आले गेले मालावरील जकात माफ करावी; (३) कोल्हापूर इन्फंट्रीचे खर्चीकडे दरसाल २,००० रुपये द्यावे; (४) कंपनीचें नाणें संस्थानीं सुरू करावें.

केशवरावाची पत्नी यशोदाबाई यांच्या संमतीनें नाना कृष्ण मुजूमदार यांस कारभारी नेमिलें, व दरसाल १५ हजार रुपये कर्ज वारावें असा सक्त हुकूम दिला. पुढें त्याचे जोडीस रंगोपंत केळोसकर यांस जाईंट कारभारी नेमिलें. या दोघांच्या हातूनही संस्थानांत बंदोबस्त होईना. याकरितां सेनापतींचे शिरस्तेदार भीमराव यांस कारभारी नेमिलें, व त्यांनीं कारभार चांगला केला. यावेळीं संस्थानचा वसूल सुमारें ६८,००० होत असून ५२,००० खर्च वजा जाऊन १६,००० शिल्लक राहात असे. पुढील सालीं म्हणजे सन १८५३ मध्यें व्यंकटराव घोरपडे इचलकरंजीकर वारले. तेव्हां इचलकरंजी संस्थान खालसा करून कोल्हापूर राज्यांत सामील करावें, आणि कोल्हापूरकरांनीं इचलकरंजीकरांचें जें वाजवी कर्ज असेल,

तें फेडावें, असा मुंबई सरकारानें ठराव केला. पुढें इंग्रजे सरकारचें कोल्हापूर सरकारास जें जबर देणें आहे, त्याच्या फेडीच्या मोबदला इंग्रज सरकारास कोल्हापूरकरांनीं हें संस्थान द्यावें, अशी शिफारस होऊन सन १८५६ सालीं मुंबई सरकारचा ठराव झाला, आणि ही गोष्ट अमलांत आणण्याकरितां रेव्हिन्युकमिशनरकडे लिहून गेलें. तेव्हां व्यंकटरावांची दत्तक आई यशोदाबाई व तिची सासू गंगाबाई यांनीं दत्तक घेण्याविषयीं थैली पाठविली. परंतु ती कबूल न करितां मंजुरी मिळणार नाहीं, असें तारीख ३० एप्रील सन १८५६ रोजीं उत्तर आलें. व बायांस अनुक्रमें सुमारें १२००व१२०० व व्यंकटरावाची बायको आनूबाई हिला १,००० रुपये या प्रमाणें नेमणुका द्याव्या, आणि २१२ लाख रुपये कर्ज देणें राहिलें आहे तें फेडावें. असें उत्तर येतांच बायांनीं विलायतेस कोर्ट आफ् डायरेक्टरकडे थैल्यांवर थैल्या पाठवून दत्तक घेण्यास मंजुरी मिळावी, याबद्दल खटपट चालविली. त्यामुळें तिकडील अखेर निकाल होईपर्यंत इचलकरंजी संस्थान खालसा करण्याचा हुकूम तहकुब ठेविला. परंतु संस्थानचा सर्व कारभार कोल्हापूर दरबारमार्फत चालला. याच सालीं इचलकरंजीकरांचा कोंकणांतील म्हापण हा इनाम गांव त्यांच्या विधवा बायांस चालविणें बरोबर आहे. याकरितां त्याची व्यवस्था इंग्रज सरकार मार्फत होऊन वसूल त्यांस दिला जाईल, असें ठरवून तितकी रक्कम त्यांच्या नेमणुकींतून दिली जाईल, असें कोल्हापूर दरबारानें ठरविलें. पुढें बायांच्या जिकिरीवरून राबर्टसनसाहेब पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांनीं सन १८५९ सालीं त्यांच्या नेमणुका जवळ जवळ दुप्पट वाढविल्या.

भीमराव यांच्या हातून कारभार नीट चालेना. म्हणून बावड्याचे कारभारी दिनकर रघुनाथ यांस सन १८५४ सालीं इचलकरंजीस कारभारी नेमिलें.

इचलकरंजीकर बायांच्या थैल्यांचा अखेर विचार होऊन कोर्ट आफ् डायरेक्टर्सनें इचलकरंजीकर बायांनीं दत्तक घ्यावा, असा ठराव केला. ही दत्तक घेण्याची मंजुरी तारीख १७ जानेवारी सन १८६२ रोजीं इचलकरंजीस कळविण्यांत आली, व त्याप्रमाणें व्यंकटराव यांस यशोदाबाईचे मांडीवर दत्तक देऊन इचलकरंजी संस्थानचे मालक ठरविलें. आणि संस्थान खालसा करण्याचें अरिष्ट टळलें. परंतु दुर्दैवानें व्यंकटराव लौकर-

च वारले, व त्यांची बायको आनुबाई सुमारें नऊ वर्षांची होती. नव्या दत्तकाबद्दल आनूबाई व यशोदाबाई यांची एकवाक्यता होईना. आनूबाई एका मुलास दत्तक घेईन म्हणे, व यशोदाबाई दुसऱ्यास घ्यावा म्हणे. असा दोघींचा वाद चालला, तेव्हां पोलिटिकल सुपरिंटेंडेंटांनीं यशोदाबाईनें पसंत केलेला मुलगा मान्य केला, व त्यास दत्तक घेण्याविषयीं सरकारची मंजुरी आणवून, आनूबाई त्यास दत्तक घेण्याचें कबूल करीना, म्हणून तिला एकीकडे ठेवून यशोदाबाईचे मांडीवर हुपरीकर जोशी यांच्या मुलास दत्तक देऊन गोविंदराव आबासाहेब घोरपडे हें नांव ठेविलें व त्यांस इचलकरंजी संस्थानचे मालक करून त्यांच्या विद्याभ्यासाची व संस्थानच्या कारभाराची व्यवस्था केली.

---

# राजाराम महाराज.

(इसवी सन १८६६ ते १८७० पर्यंत.)

शिवाजी ऊर्फ बाबासाहेब महाराज यांनीं अंतकाळीं मे. पोलिटिकल एजंट व रावबहादूर रामराव ताडपत्री कारभारी या उभयतांस कळवून आपली भगिनी आऊबाई आक्का हिचा १६ वर्षांचा मुलगा नागोजीराव पाटणकर यांस यथाविधि दत्तक घेऊन राजाराम छत्रपति असें नांव ठेविलें. हा दत्तक सरकारांनीं मंजूर करून सन १८६७ च्या आक्टोबरच्या २९ व्या तारखेस पुण्यास मोठा दरबार भरला. तेथें राजाराम महाराजांस मोठ्या समारंभानें पोषाख वगैरे देऊन कोल्हापूरच्या गादीवर बसविल्याचें नामदार सर बार्टल फ्रिअर मुंबईचे गव्हरनर यांनीं सर्वांस कळविलें. त्यावेळीं नामदार गव्हरनर साहेबांनीं राजाराम महाराजांस उद्देशून भाषण केलें, व त्याचें आभारपूर्वक महाराजांनीं उत्तर दिलें, तें खालीं दाखल केलें आहे.

राजाराम महाराजांच्या दत्तविधानास मंजुरी.

पुण्यास दरबार भरतो व महाराजांस वस्त्रें देतात.

राजाराम छत्रपति महाराजः— आपली स्वारी पुण्यास आली त्याबद्दल मला फार आनंद झाला आहे, व मी आपला अंतःकरणापासून सत्कार करितों आणि माजी शिवाजी महाराज यांचा काळ झाल्यामुळें जें सरकारास दुःख झालें आहे, त्याचें शमन होण्यास आपली भेट कारणीभूत होईल, असें मी समजतों. आपण त्यांचे पुत्र होऊन मोठ्या व जोरधमीच्या अशा अधिकारामत पावलां आहां. मराठ्यांच्या इतिहासांत प्रसिद्ध अशा एका घराण्याचे आपण मुख्य आहां, व आपणास पुष्कळ चांगल्या प्रांतावर व लाखों प्रजेवर राज्य करावयाचें असून आपण ज्या रीतीनें राज्य कराल, त्यावर त्यांचें सुख अवलंबून राहील. आपणावर ही मोठी जबाबदारी लहानपणींच येऊन पडली आहे म्हणून ती जबाबदारी चालविण्यास आपल्यास परमेश्वर शाहाणपण व सामर्थ्य देवो. अशी मी परमेश्वरापाशीं प्रार्थना करितों. आपणास सहाय्य करण्याकरितां आपल्या वडिलांचा कित्ता आपल्या पुढें आहे. राज्यांत कारभाराची उत्तम शिस्त बसविलेली आहे. रामराव व दुसरे कामगार यांसारख्या इमानी व अ-

महाराजांस उद्देशून गव्हरनरसाहेबांचें भाषण

नुभविक नोकरांचें आपणास सहाय्य आहे. आणि या सर्वांहून जास्त कर्नल अंडरसन साहेबांसारख्या अनुभविक रेसिडेंटाची सल्लामसलत मिळणार आहे. कर्नाटक प्रांतांतील इतर भागीं अंडरसनसाहेबांनीं जी मोठमोठीं कामें केलीं आहेत, त्यांवरून त्यांची माहिती आपणास असेलच. आणि मला अशी खात्री आहे कीं, ब्रिटिश सरकारचा जसा त्यांजवर भरंवसा आहे, त्या प्रमाणें ते लौकरच आपल्याही पूर्ण भरंवशास पात्र होतील. आपणास मी मनापासून अशी सल्ला देतों कीं, त्यांस आपण आपले उत्तम दोस्त असें समजून आपणास ज्या ज्या अडचणी व हरकती येतील त्या त्या त्यांस कळवीत जावें. आपले वडील लहान होते तेव्हां ग्रेहामसाहेबांनीं जी राज्यांत चांगली व्यवस्था केली, त्याबद्दल कोल्हापूरचें राज्य त्यांचें किती ऋणी आहे, व अगदीं अलीकडे आपले वडील व मे. ह्यावन्लाकसाहेब या उभयतांमध्यें परस्पर किती प्रेम व विश्वास होता हें थोडें बहुत खुद्द आपणासही माहीत आहे. तर या गोष्टी आपण विसरूंनये. रीजन्सीशिवाय राज्याचा सर्व कारभार चालविण्यास आपण योग्य आहां असा अभिप्राय मे. अंडरसन साहेबांकडून लौकरच येईल, अशी मला उमेद आहे. आपल्या वडिलांनीं आपल्या शिक्षणाबद्दल जी शाहाणपणानें व्यवस्था केली आहे, त्याप्रमाणें अभ्यास पुरा करण्यास ज्या प्रमाणें आपण झटाल त्या मानानें ही वेळ लौकर किंवा अवकाशानें येणार आहे, हें आपण लक्षांत वागविलें पाहिजे, अशी आपणास माझी विनंति आहे. एक वर्षापूर्वी कोल्हापूर येथें आपणास पाहिलें होतें. त्याहून हल्लीं फारच ज्यास्त अभ्यास आपला झाला आहे, असें पाहून फार आनंद झाला. आपली प्रथम भेट होतांचआपण मला सुचविलें कीं, आपल्याशीं इंग्रजींत बोलावें व आपण इंग्रजींत उत्तरें देऊं. यावरून मला असें वाटतें कीं, कोल्हापूरच्या गादीवर बसणें हा केवळ पोकळ मान किंवा रिकामा किताब आहे. हें आपण पूर्णपणें जाणत आहां, असें यावरून दिसतें, व त्याबद्दल मला फार आनंद होतो. चांगलें शिक्षण मिळून व चांगलें वर्तन ठेवून दिलेल्या अधिकाराचा दुरुपयोग न करितां सदुपयोग करितील अशी पक्की खात्री झाल्याशिवाय ब्रिटिश सरकार कोणासही राज्याधिकार देणार नाहीं, हें खचित आहे. आपल्या पूर्वी जे राजे कोल्हापूरच्या गादीवर बसले त्यांपैकीं कोणासही आपल्या इतका मान व वैभव हीं मिळालीं नव्हतीं, व त्यांजवर आतांच्या इतकी जबाबदारीही न-

व्हती. हें आपण नेहमीं लक्षांत ठेविलें पाहिजे. पूर्वींच्या राजांचा अधिकार जरी अप्रतिबंधित व अतिशय होता, तरी तो राजधानीपासून थोड्या अंतरापर्यंत मात्र चाले. दरबारीं कांहीं विश्वासघात होऊन कारस्थान उत्पन्न होईल, किंवा राज्यावर बाहेरून घाला येईल, याची बिलकूल भीति न वाळगतां राजधानी सोडून आज जसे आपण आलां त्या प्रमाणें दूर जाण्याची छाती त्यावेळीं कोणासही झाली नसती. आपल्या पूर्वजांची राजधानी सातारा किंवा पेशव्यांची राजधानी पुणें या ठिकाणीं पूर्वीं जाणें झाल्यास मार्गांत कती धोके असत, तें आपल्या दरबारीं जे जुने पुराणे लोक असतील ते आपणास सांगतील. परंतु आतां महाराजांची स्वारी कोठेंही गेली तरी ब्रिटिश सरकारच्या रक्षणाखालीं असते. आणि केवळ सुखसोईस व थाटमाटास अवश्य लागेल, त्याहून जास्त लवाजमा घेण्याची जरूरी पडत नाहीं. हत्यारें पात्यारें न घेतां आतां आपण काश्मिराहून लंकेस जाऊं शकतां व मार्गांत कोणाचा उपद्रव किंवा हरकत होऊं शकत नाहीं. कारण तसें कोणी केल्यास शिक्षा होईल, हें भय आहे. इतकेंच नाहीं तर या प्रमाणें पृथ्वीवरील युरोप किंवा अमेरिका या खंडांतील अशा कोणत्याही सुधारलेल्या दूरच्या प्रदेशीं गेलां तरी सर्व ठिकाणीं मांडलिक राजाप्रमाणें आपला सत्कार होईल, व रक्षण होईल, इतकेंच केवळ नाहीं, तर ब्रिटिश राज्याच्या रक्षणाखालीं असलेल्यास जसा पाहुणचार मिळावा व त्याचें रक्षण व्हावें तसें होईल.

हें भाषण झाल्यावर नामदार साहेबांनीं महाराजांस पानपान दिला, व तोफांची सलामी झाली. नंतर महाराजांनीं खालील उत्तर इंग्रजींत दिलें.

नामदार साहेब— आपण जें माझें प्रेमपुरःसर स्वागत केलें व आजच्या सुमुहूर्तावर आपल्या हातानें जो मला बहुमान मिळाला, त्याबद्दल मी अंतःकरणपूर्वक आपले आभार मानितों. माझी राजनिष्ठा कायम राहील आणि या मोठ्या राज्याच्या राजछत्राखालीं ईश्वरकृपेनें मला जें मोठें स्थान मिळालें त्या स्थानास मी योग्य आहें. असें दाखविण्याची माझी इच्छा आहे, असें आपण महाराणीसाहेबांस कळवावें, अशी आपणास माझी विनंति आहे. माझ्यावर आतां राज्यभाराचें जे जोखीम पडलें आहे, तें मी पूर्णपणें जाणत असून ज्या प्रसिद्ध राजपुरुषाच्या अकाली मरणाबद्दल आपण सर्व हळहळत आहों, त्याच्या नांवालौकिकास शोभण्याजोग्या रीतीनें हा राज्यभार वाहतां येण्यास मला किं-

महाराजांनीं गव्हरनरसाहेबांचे भाषणास दिलेलें उत्तर

ती झटलें पाहिजे, हें मी समजून आहें. आपण जे चार उपदेशपर शब्द बोललां, ते मी कधींही विसरणार नाहीं. महा मराणी शिवाजी महाराजांच्या घराण्याचें हित व्हावें, व त्याचा मान रहावा. आणि तसेंच त्या घराण्याचे अमलाखालचे सरदार व लोक यांचें कल्याण व्हावें, असें अंतःकरणपूर्वक इच्छिणाऱ्या मातापितरांच्या उपदेशाप्रमाणेंच हा आपला सदुपदेश मजवर पडलेलें जोखमीचें काम करण्यास मला मार्ग दाखवील, व उमेद देईल. ब्रिटिश सरकारच्या आश्रयास कोल्हापूरचें राज्य किती ऋणी आहे, हें जाणून माझ्या दरबारीं जे पोलिटिकल एजंट असतील त्यांस राज्यकारभाराविषयीं सल्ला मसलत विचारणें हें माझें कर्तव्य आहे, असें नेहमीं समजेन. आणि या माझ्या मोठ्या स्थानीं आल्याबरोबर कर्नल अंडरसन साहेबांसारखे दयाळू व अनुभविक कामगार मला दोस्ती करण्यास व सल्लामसलत देण्यास मिळाले आहेत हें माझें सुदैवच समजतें. परमेश्वराच्या आशिर्वादानें व ब्रिटिश सरकारच्या दोस्तीनें व बाहेदारीनें जें हें मोठें राज्य आज मला मिळालें आहे, तें जशाचें तसें गरवीन, अशी मला खात्री वाटत आहे.

पुण्याहून परत आल्यावर राजाराम महाराजांच्या विद्याभ्यासाकरितां काय विशेष तजविजी कराव्या याचा विचार करून कर्नल अंडरसन साहेबांनीं असें ठरविलें महाराजांस साक्षात् शिकविण्याकरितां एक ट्यूटर असावा, व त्याच्या शिक्षणावर वगैरे देखरेख ठेवण्याकरितां एक युरोपियन कामगार असावा. महाराजांस वाड्यांत न ठेवितां बाहेर एका बंगल्यांत ठेवावें. म्हणजे वाड्यांतील हलक्या लोकांचा त्यांस सहवास होणार नाहीं. त्या वेळच्या सरदारांच्या वर्गांतून काढून त्यांस निराळें शिकवावें असा संकेत करून अंडरसन साहेबांनीं सरकारास अशी शिफारस केली कीं, महाराजांच्या अल्प वयात राज्यकारभारास मदत करण्याकरितां व महाराजांच्या विद्याभ्यासावर देखरेख करण्याकरितां आपणास एक असिस्टंट द्यावा. ही गोष्ट सरकारानें मंजूर केली, आणि त्या कामावर वेस्टसाहेब महीकांठचे असि॰ पोलिटिकल एजंट यांची कोल्हापूर येथें नेमणूक झाली. तसेंच त्या वेळचे मुंबईचे डायरेक्टर सर अलेक्झांडर ग्रांट यांच्या शिफारशीवरून शेट जमशेटजी नवरोजी ऊनवाला एम्. ए. यांची नेमणूक ट्यूटरच्या जागीं झाली. हे वेस्टसाहेब यांच्या नजरेखालीं साक्षात् शिकविण्याचें काम करीत होते.

महाराजांच्या शिक्षणाची व्यवस्था.

महाराज पूर्वी वाड्यांत रहात असत. त्यांस रेसिडन्सी नजीक एका बंगल्यांत (नंबर १ चा बंगला) नेवून ठेविलें, व त्यांजपाशीं नोकर लोक असावयाचे तेही चांगले पाहून निवडले. येथेंच राहून, महाराज अभ्यास- करीत, व रिकाम्या वेळीं वाड्यांत जाऊन राणीसाहेबांच्या वगैरे भेटी घेत. परंतु मुक्कामास वाड्यांत कधीं रहात नसत. महाराज जन्मापासून वाड्यांतच होते, व कै० बाबासाहेब महाराजांनींच त्यांस लहानाचे थोर केलें, व आपण निपुत्रिक मरण पावले, तेव्हां पुढें यांसच गादी मिळावी, या हेतूनें त्यांनीं त्यांजकडून विद्याभ्यासही करविला होता. राजाराम महाराजांची जनक मातोश्री लहानपणींच वारल्यापासून बाबासाहेबांची दुसरी भगिनी व यांची मावशी आक्कासाहेब व राणीसाहेब ह्या उभयतां यांवर फार ममता करीत होत्या, व त्यांचा लळा यांस फार होता. यामुळें स्वाभाविकच राजाराम महाराजांस त्यांपासून दूर राहाणें प्रथमतः अवघड वाटलें. परंतु लौकरच त्यांस आपलें नवीन राहण्याचें ठिकाण आवडूं लागून तें त्यांस इतकें बरें वाटूं लागलें कीं, पुढें सन १८६७ सालीं दिजंबर महिन्याच्या १७ व्या तारखेस आक्कासाहेब मरण पावल्या, तेव्हां त्यांचा १० वर्षांचा मुलगा दत्ताजीराव आबासाहेब व मुलगी ८ वर्षांची यांसही आपल्याबरोबर बंगल्यांतच राहण्यास नेलें. कारण यांची त्यांवर भावाबहिणीप्रमाणें ममता होती.

महाराजांची वडील दत्तक मातोश्री सुंदराबाई राणीसाहेब या सन १८६६ सालींच दिजंबरच्या २१ व्या तारखेस मरण पावल्या. पुढें सन १८६७ सालीं मार्च महिन्यांत श्री० मुधोजीराव नाईक निंबाळकर संस्थान फलटण यांच्या आठ वर्षांच्या मुलीशीं महाराजांचें पहिलें लग्न झालें, व त्यांचें नांव ताराबाई राणीसाहेब असें ठेविलें. महाराजांचें वय १८ वर्षांचें झालें होतें. म्हणून याहून मोठ्या मुलीशीं महाराजांचें दुसरें लग्न करणें योग्य दिसलें. व त्याप्रमाणें सन १८६७ सालीं मार्गशीर्ष महिन्यांत गोपाळराव सरलष्कर यांच्या बहिणीशीं महाराजांचें दुसरें लग्न झालें, व यांचे नांव सकवारबाई राणीसाहेब असें ठेविलें. ताराबाई राणीसाहेब लहान असल्यामुळें फलटणास पित्याच्या घरींच रहात होत्या, व सकवारबाई राणीसाहेब महाराजांबरोबर बंगल्यांत राहूं लागल्या.

महाराजांचें लग्न.

गादीवर बसण्यापूर्वींच महाराजांचा बराच अभ्यास झाला होता, व त्यांचें इंग्रजी भाषेचें ज्ञानही बरेंच होतें यामुळें त्यांच्या शिक्षणाचें काम बरेंच

हलकें झालें होतें. शिवाय महाराजांस ज्ञान संपादन करण्याची उत्कट इच्छा असे, व ते अभ्यास फार मन लावून व झटून करीत असत. यांचें वय बरेंच असल्यामुळें यांस फार नवीन विषय शिकविण्याची योजना न करितां जो पाया पूर्वीं घालण्यांत आला होता. त्याप्रमाणेच अनुक्रम चालू ठेविला. तथापि फार विषय न घेतां जे थोडे विषय शिकावयाचे ते त्यांच्या मनावर चांगले ठसावे; या विषयीं त्यांचे शिक्षक विशेष काळजी घेऊं लागले. हिंदुस्थानचा व त्यांत मुख्यत्वें मराठ्यांचा इतिहास त्यांस चांगला अवगत झाला होता. इंग्लंदच्या इतिहासा वरीलही कांहीं पुस्तकें त्यांनीं वाचलीं होतीं. आणि इंग्लंदांतील प्रवासाचीं बुकें वाचून इंग्लंदास जाण्याच्या इच्छेचें बीजारोपण त्यांच्या मनांत झालें, व तें शेवटीं त्यांनीं तडीसही नेलें. त्यांस इंग्रजी पुस्तकें वाचण्याची फार गोडी लागली, व त्यांकरितां चांगलीं चांगलीं पुस्तकें निवडून वरचेवर त्यांच्या उपयोगाकरितां आणवीत असत. त्याचप्रमाणें प्रत्याहिक इंग्रजी वर्तमानपत्रें व सप्ताहिक मराठी पत्रेंही ते नियमानें वाचीत; आणि येणेंकरून पृथ्वीवर काय घडामोडी चालल्या आहेत त्यांचीही माहिती करून घेत. साहेबलोकांच्या वारंवार भेटी व्हाव्या व त्यांजबरोबर चालू विषयावर भाषण करावें याचीही त्यांस अभिरुचि फार लागली. ब्यांड स्टांडवर नेहमी जात, व तेथें असतां साहेब व मडमा यांशीं मोकळ्या मनानें बोलत चालत. त्याचप्रमाणें आपल्या पदरच्या विद्वान् कामदारांनीं येऊन भेटावें व त्यांजबरोबर त्यांच्या आवडत्या विषयावर भाषण करावें, हेंही त्यांस आवडत असे. परंतु त्यावेळीं इंग्रजी शिकलेले व विद्वान् असे एतद्देशीय कामगार हल्लीं प्रमाणें नव्हते. त्यावेळीं न्यायाधीश व हायस्कूलचे हेडमास्तर हे दोनच काय ते सुशिक्षित व विद्वान् असे नेटिव कामगार होते. ते महाराजांकडे बरेच वेळां जात, व त्यांशीं महाराज मोठ्या आनंदानें भाषण करीत बसत, व जाते वेळीं पुनः फुरसतीच्या वेळीं यावें असें सांगत. पोलिटिकल एजंट व दुसरे साहेब लोक मोठा खाना देत; तेव्हां ते मोठ्या आनंदानें त्या वेळचें गाणें बजावणें ऐकण्यास व दुसऱ्या करमणुकांमध्यें मिसळण्यास मोठ्या उत्सुकतेनें जात. काड्रील या नांवाचा नाचही ते शिकले होते, व तो त्यांस बराच अवगत झाला होता. साहेब लोकांशीं वारंवार संघट्टन ठेविल्यामुळें इंग्रजी बोलण्याची त्यांच्या आंगीं फार सफाई आली होती; व इंग्रज लोकांचे रीतरीवाजही त्यांस पूर्ण अवग-

महाराजांचा अभ्यास व दिनचर्या.

त झाले होते.

शारीरिक व्यायाम व करमणुकी महाराजांस मिळाव्या, याविषयीं त्यांच्या पालकांनीं योग्य तजवीज केली होती. बिलियर्ड खेळण्याकरितां एक बिलियर्ड टेबल आणून दिलें होतें. क्रोके व क्रिकेट हे खेळही ते खेळत असत. त्यांत क्रोकेचा खेळ तर त्यांस फार आवडे व तो ते नेहमी खेळत. परंतु याहून त्यांस शिकारीची फार आवड होती. त्यांनीं वारंवार शिकार करावी, यांविषयीं त्यांस उत्तेजनही देण्यांत येत असे. आपले लोक किंवा साहेब लोक यांस घेऊन ते वारंवार शिकारीस जात. यांस घोड्यावर बसण्याचीही फार हौस असे, व घोडे फेरण्याचा व्यायाम ते नेहमी घेत. मेदोवृद्धीनें स्थूल होण्याचा कल त्यांच्या शरीरांत असल्यामुळें व्यायाम घेण्याची जरूरी त्यांची त्यांसच वाटूं लागली होती.

महाराजांचा स्वभाव व वर्तन.

ते स्वभावतः फार ममताळू होते. ते जात्या मनमिळाऊ असून जे लोक त्यांजवळ असत त्यांजवर ते फार ममता करीत. अशा स्वभावांच्या इतर पुरुषांप्रमाणें कोणत्याही गोष्टींविषयीं यांच्या अंगीं दृढबुद्धि वसत नसे, व कोणी कांहीं सांगितलें कीं लागलेंच त्यांचें मन फिरे. यामुळें त्यांच्या पालकांस फार भीति वाटत असे. त्यांच्या जवळ राहणारे नोकर व त्यांच्या बरोबर राहणारे सोबती यांची निवड करितांना फार खबरदारी घेण्यांत येत असे. तथापि ज्यांस एतद्देशीय दरबाराची माहिती आहे, ते सहज कबूल करितील कीं; कोणत्याही राजाचे सवंगडे व नोकर असावे तसे उत्तम मिळणें ही गोष्ट फार मुष्कीलीची असते. तथापि कोणतीही चांगली गोष्ट सांगितली असतां महाराज नेहमी ऐकत, आणि ब्रिटिश सरकाराकडून चांगलें म्हणवुन घ्यावें, अशी त्यांस फार इच्छा होती. यामुळें त्यांच्या स्वभावांत जें वर सांगितलेलें व्यंग होतें, त्यापासून वाईट परिणाम न घडण्यास वरील गोष्टी बऱ्याच कारणीभूत होतील, अशी त्यांच्या पालकांस फार आशा होती. हे ज्यावेळीं मुंबई, पुण्याकडे जात, त्यावेळीं आपल्या वर्तनानें व हुशारीनें लोकांकडून चांगलें म्हणवून घेत. सन १८६८ सालीं आक्टोबर महिन्याचे ९ व्या तारखेस त्यावेळचे मुंबईचे गव्हरनर नामदार फिट्‌जेरल्ड साहेब यांनीं जो मोठा दरबार भरविला, त्या दरबारास राजाराम महाराज गेले होते, व त्यावेळीं गुजराथ व दक्षण या प्रांतांतील राजे व सरदार लोकांनीं हबशी देशांतील स्वारींत जो इंग्रजांस जय मिळाला, त्याबद्दल आनंदप्रदर्शक मानपत्र नामदारसाहेबांस दिलें. तें खुद्द राजाराम

महाराजांनींच अस्खलित व मोठ्या स्वरानें दरबारांत वाचलें, व त्याबद्दल लोकांनीं त्यांची फार तारीफ केली.

तारीख १५ माहे मे सन १८६९ इसवी रोजीं कराचीस असलेले महाराजांचे चुलते चिमासाहेब महाराज मरण पावले, व त्यांचें उत्तरकार्य वगैरे कोल्हापुरास झालें. कराचीस त्यानीं कांहीं कर्ज काढिलें होतें, तेंही राजाराम महाराजांच्या इच्छेवरून कोल्हापूर खजिन्यांतून वारण्यांत आलें. याच सालीं कोल्हापुरास महामारीचा फार उपद्रव झाला होता, व तिचें ठाणें पर्जन्यकाळ सुरू होईपर्यंत होतें. या वेळीं जरीमरीनें कोल्हापूर शहरीं व बाहेर फार लोक मेले; व त्यांतच येथील हास्पिटलावरील डाक्टर अंडिंगसाहेब हे मरण पावले.

चिमासाहेबांचा मृत्यु. सन १८६९

महाराजांस प्रथमारंभीं केवळ शाळेंत जे विषय साधारणपणें शिकवितात, त्या विषयांतच शिक्षण देण्याचा क्रम चालविला होता. व त्यांत त्यांची गति वर सांगितल्या प्रमाणें बरीच झाली. पुढें ते जसे मोठे झाले. तेव्हां सरकारी कामकाजाची माहिती करून देऊन पुढें जो अधिकार चालवावयाचा आहे, तो अधिकार चालविण्यास योग्य होतील, असें शिक्षण देण्याची वेळ आली, असें दिसलें. त्याप्रमाणें आठवड्यांतून कांहीं नियमित दिवशीं त्यांचे गार्डियन वेस्टसाहेब यांचे कचेरींत ते नेमानें जात, व तेथें मुलकी, दिवाणी व फौजदारी जें काम चालत असे, तें प्रथमतः फक्त पाहात असत. त्याच प्रमाणें पोलिटिकल एजंट व त्यांचे असिस्टंट यांच्या कोर्टांत जेव्हां महत्वाच्या खटल्यांच्या चौकशा चालत, तेव्हांही ते खटले पाहण्याकरितां त्यांस बोलावीत. असें पाहतां पाहतां त्यांच्या आंगीं स्वतः काम करण्याची योग्यता आली, व खटल्यांची स्वतः चौकशी करून ते निकाल करूं लागले. सन १८६९ सालापासूनच महाराजांस मुखत्यारी देण्याविषयींची वाटाघाट सुरू झाली; व मुखत्यारी देण्यापूर्वी सर्व खात्यांत लोकांचे पगार वगैरे ठरवून व्यवस्था करावी, आणि रामराव ताडपत्रे वारल्यापासून जी कारभाऱ्याची जागा रिकामी होती, त्या जागीं कारभाऱ्याचीही नेमणूक करावी, असा विचार ठरला. त्या प्रमाणें सन १८६९ सालीं सर्व खात्यांतील कामगारांचे व नोकरांचे पगार वगैरे वाढवून व ठरवून कायमची व्यवस्था केली व स्टेट कारभाऱ्याचे जागीं १०० रुपयांवर ब्रिटिश इलाख्यांतील हुषार व अनुभविक अशा गृहस्थाची नेमणूक करण्यास सरकारची मंजूरी मागितली, व सर्व हि-

महाराज कारभाराचें काम पाहूं लागतात.

शेब पुरे करण्याकरितां एक दप्तरदार नेमून हिशेब पुरे केले. आणि सन १८७० च्या जानेवारी महिन्यांत महाराजांच्या हवालीं खासगी खातें केलें, व खासगीकारभारी यांस खुद्द महाराजांच्या हुकमानें सर्व काम पाहावें असा हुकुम दिला. परंतु महाराजांची विलायत पाहण्यास जाण्याची इच्छा फार होती. यामुळें मुखत्यारी घेऊन विलायतेस जावें किंवा विलायतेहून परत आल्यावर मुखत्यारी घ्यावी, या विषयीं विचार उत्पन्न झाला. आलीकडे बहुतेक महत्वाच्या कामीं मे. एजंटसाहेब महाराजांचा विचार घेत असत, व त्यांच्या विचारेंच पुष्कळ गोष्टी करीत असत.

महाराजांस खासगीकडील मुखत्यारी मिळते.

महाराजांच्या विचारेंच हायस्कुलाकरितां मोठी व सुशोभित अशी इमारत राजवाड्यानजीक बांधावी, असें ठरलें. याकरितां राजवाड्यानजीक लोकांचीं पुष्कळ घरें घेऊन जागा मोकळी केली; आणि म्यांट साहेब इंजनियर यांच्या हातून इमारतीचा नकाशा व अंदाजपत्रक वगैरे करवून तारीख १५ फेब्रुवारीं सन १८७० रोजीं सायंकाळीं इंग्रजी ५॥ वाजतां राजाराम महाराजांच्या हातून इमारतीच्या पायाचा पहिला दगड बसविण्याचा समारंभ करण्यांत आला. त्या वेळीं कर्नल अंडरसन साहेब यांनीं जें भाषण केलें, व त्यास महाराजांनीं जें उत्तर दिलें, तीं दोन्हीं वज्याच महत्वाचीं असल्यामुळें खालीं दिलीं आहेत. या समारंभाचे वेळीं कर्नल अंडरसन साहेबांनीं कोल्हापूर विद्याखात्याच्या हकीगतीचा खालील रिपोर्ट वाचला:-

हायस्कूलच्या पायाचा दगड बसविण्याचा समारंभ.

ह्या इमारतीचा पहिला दगड बसविण्यास आपण आरंभ करण्यापूर्वी कोल्हापूर इलाख्यांत विद्येचा फैलाव कसकसा होत चालला आहे, याविषयीं चार शब्द सांगावे अशी माझी मनापासून इच्छा आहे.

कर्नल अंडरसन साहेबांचें भाषण.

सन १८४५ सालीं विशेष कारणें घडून ब्रिटिश सरकारानें या इलाख्याचा कारभार कांहीं दिवस आपल्या हातीं घेतला. तेव्हां कोल्हापूर इलाख्यांत सरकारी शाळा नव्हत्या. त्या वेळीं या इलाख्यांत इतकी अव्यवस्था व कोल्हापूरकरांस इतकें कर्ज झालें होतें कीं, कारभार करण्यास ज्या इंग्रज अंमलदारांस नेमिलें त्यांचे सर्व यत्न प्रथमतः राज्यांतील बखेडा मोडून कारभाराची चांगली शिस्त बसवावी व खजिन्यांत शिल्लक पाडावी यांकडे विशेष लक्ष लागलें होतें. तथापि या इलाख्यांत ज्या सुधारणा करणें त्यांत शेजारच्या ब्रिटिश इलाख्यांत लोकांस

शिक्षण देण्याच्या जशा सोयी आहेत, तशा या इलाख्यांतही कराव्या, अशी त्यांची पहिल्यापासून इच्छा होती. सन १८४८ सालीं कोल्हापूर इलाख्यांत चार मराठी शाळा स्थापिल्या, आणि सन १८६३ सालीं माजी बाबासाहेब महाराजांनीं आपल्या हातीं राज्यकारभार घेतला, तेव्हां शाळांची संख्या १८ पर्यंत वाढली होती. पुढें यांपैकीं चार शाळांत सन १८६६ सालीं ह्यावलाकसाहेबांचे शिफारशीनें इंग्रजी शिकविण्याचें सुरू केलें. या सर्व शाळांत मिळून त्या वेळीं १००० विद्यार्थी शिकत होते.

कोल्हापूर शहरीं इंग्रजी शाळा स्थापन करण्याची जरूर आहे असा माजी अंडरसन साहेब त्या वेळचे अक्टिंग पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांनीं सन १८५० सालीं ठराव केला, व पुढील सालीं ग्रेहाम साहेबांनीं ती स्थापन केली. त्यावेळीं प्रथमतः या शाळेंत सारे १९ विद्यार्थी होते. परंतु सन १८६६ सालीं हल्लींचें हायस्कूल स्थापन करण्याचा विचार निघाला, तेव्हां विद्यार्थ्यांची संख्या ९८ पर्यंत वाढली होती.

अल्पवयी सरदारांच्या शिक्षणाकरितां कोल्हापूर शहरीं सन १८६३ सालीं एक शाळा स्थापन करण्यांत आली. यांत विद्यार्थ्यांची संख्या नियमित नव्हती, असें दिसतें. एका वेळीं हींत विद्यार्थ्यांची संख्या २५ पर्यंत झाली होती. परंतु सन १८६६ सालीं जेव्हां माजी डायरेक्टरसाहेब शाळा पाहण्यास आले, तेव्हां फक्त ९ मुलें या शाळेंत होतीं.

सन १८५४ सालीं माल्कमसाहेब पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांणीं कोल्हापूर शहरीं एक मुलींची शाळाही घातली. परंतु कांहीं दिवसांनीं मुलींची संख्या कमी होत गेली, असें दिसतें. आणि सन १८६६ सालीं जेव्हां सर ए. ग्रंट शाळा पाहण्यास आले, तेव्हां या शाळेचें नांव मात्र राहिलें होतें.

आपल्या वडिलांच्या दुःखकारक मृत्यूमुळें व आपल्या अल्पवयामुळें पुनः ब्रिटिश सरकाराकडे या इलाख्याचा कारभार गेला, व येथें पोलिटिकल एजंटच्या जागीं माझी नेमणूक होऊन माझ्या स्वाधीन हा कारभार झाला. तेव्हां माझ्या पूर्वींच्या अमलदारांनीं शिक्षणाच्या सोयी करण्याकरितां जे जे उपाय योजिले होते, ते तसेच चालवावे, व त्यांची वृद्धि करावी, हें आनंदकारक काम करणें माझ्या हातीं आलें आणि त्यांच्यापेक्षां माझा उद्योग जास्त यशस्कर झाला असला तर तो केवळ पूर्वींच्या काळापेक्षां हल्लींच्या काळांत जास्त गोष्टी अनुकूल असल्यामुळें होय. पूर्वीं कोल्हापूर सरकारावर कर्जाचें मोठें

ओझें पडलें होतें. यामुळें ज्या सुधारणा करतां आल्या असत्या, व निःसंशय झाल्या असत्या अशीं पुष्कळ सुधारणेचीं कामें करण्यास पैसाच वांटणीस येत नसे. परंतु ज्या अनेक ब्रिटिश कामगारांकडे कोल्हापूरचा कारभार सोंपविण्यांत आला होता, त्यांच्या उत्तम कारभारामुळें आणि तसेंच आपले वडील बाबासाहेब महाराज यांच्या सुव्यवस्थित कारभारामुळें कोल्हापूर सरकारचें सर्व कर्ज फिटलें, आणि जेव्हां येथील कारभाराचा संबंध मजकडे आला, तेव्हां जमाबंदीच्या भरभराटीच्या काळास आरंभ झाला होता. विद्यावृद्धि करण्यास या काळची स्थितिही फार अनुकूल होती. खुद्द या संस्थांनीं राजघराण्यांतील पुरुषांमध्यें व इतर साधारण लोकांमध्यें शिक्षणाच्या सोयी जास्त करणें जरूर आहे, अशी बळकट इच्छा उत्पन्न झाली होती. ही गोष्ट सरकारासही फार इष्ट आहे, हेंही मला माहीत होतें. नामदार सर बार्टल फ्रिअर यांणींही या कामीं सहाय्य करण्याचें स्वतः खात्रीपूर्वक मला सांगितलें व सर ए. ग्रँट माजी डायरेक्टर यांनींही या कामीं जी योग्य मदत लागेल ती करण्याचें वचन दिलें. हल्लींचे डायरेक्टर पीलसाहेब हेही कोल्हापूर इलाख्यांतील विद्याखात्याविषयीं तशीच कळकळ बाळगितात.

मराठी व इंग्रजी शाळा यांची स्थिति सुधारण्यासाठीं त्यांवर योग्य व चांगली देखरेख होणें हें फार महत्वाचें असतें. ग्रँटसाहेबांच्या शिफारशीवरून इंग्रजी जाणणारा एक डेप्युटि एज्युकेशनल इन्स्पेक्टर कोल्हापूरइलाख्याकरितां नेमण्यांत आला. आणि या जागीं बाळ परशुराम पंडितासारख्या हुशार व योग्य मनुष्याची निवड झाली हें कोल्हापूर इलाख्याचें मोठें भाग्य समजतों. याच प्रमाणें शाळांवर नेमण्याकरितां चांगले शिक्षक तयार करणें हेंही अवश्य आहे, असें मला वाटलें. आणि लोक मला दूषणें ठेवितील, याची पर्वा न करितां शाळेवर नेमण्याकरितां चांगला शिक्षक मिळेपर्यंत एकही नवीन शाळा स्थापावयाची नाहीं, असा मी निश्चय केला. दुसऱ्या एतद्देशीय संस्थानांकरितां ब्रिटिश इलाख्यांतून चांगले शिक्षक मिळविण्यास अतिशय अडचणी येतात याचाही मला पूर्वी अनुभव आला होता. याकरितां शिक्षक तयार करण्यासाठीं एक ट्रेनिंगस्कूल स्थापन करण्याचा निश्चय केला. आणि बाळ परशुराम पंडित आणि त्यांनीं ट्रेनिंगस्कुलाकरितां निवडलेले मास्तर यांच्या उद्योगानें कोल्हापूर इलाख्यांतील व शेजारच्या कां-

हीं प्रांतांतील शाळांस आतां चांगले शिकलेले पंतोजी मिळूं लागले आहेत. हल्लीं कोल्हापूर इलाख्यांत इंग्रजीमराठी व शुद्ध मराठी मिळून ३२ शाळा आहेत, व त्यांत गेल्या डिसेंबर महिन्यांत जवळ जवळ २,००० विद्यार्थी शिकत होते. हल्लीं ट्रेनिंगस्कुलांत ५६ विद्यार्थी आहेत. आणि यांपैकीं पुष्कळांचें शिक्षण पुरें होत आलें आहे. म्हणून या सालीं २० नवीन शाळा घालतां येतील, व पुढील सालीं याहूनही जास्त घालतां येतील. या ट्रेनिंगस्कुलांतून कोल्हापूर इलाख्याकरितां जे मास्तर देण्यांत आले, त्या शिवाय दुसऱ्या संस्थानांकरितां सात दिले.

चांगल्या मास्तरांची संख्या जसजशी मिळत जाईल त्या प्रमाणें शाळांची संख्या १०० पर्यंत लागलीच वाढवितां येईल. या इलाख्याची पाहणी व तरमबंदी करून जो शेतकऱ्यांवर लोकलफंड बसविण्यांत येत आहे, त्याचा जो हिसा विद्याखात्याकडे खर्च करावयाचा त्यांतूनच मुख्यत्वें करून या शाळांचा खर्च चालविला जाईल. हा वेळपर्यंत ज्या ज्या ठिकाणीं शाळा सुरू केल्या, त्या त्या ठिकाणच्या शाळांत मुलें एकदम पुष्कळ जमलीं, आणि पुष्कळ गांवांकडून शाळांकरितां अर्ज आले आहेत.

इंग्रजी अभ्यासा विषयीं पाहातां जी इंग्रजी शाळा पूर्वी स्थापन केलेली होती, तिनें इकडच्या लोकांचा निर्वाह होत नाहीं असें दिसलें. कोल्हापूर शहरची लोक संख्या सुमारें ५०,००० असून त्यांत सरदार लोकांचीं व खाऊन पिऊन सुखी अशा लोकांचीं घराणीं बरींच आहेत. कोल्हापूर व भोंवतालच्या प्रदेशांतही विद्येपासून होणारे फायदे पूर्णपणें समजणारे असे ब्राम्हण व इतर लोक असणारीं अशीं बरींच गांवें आहेत. अशा स्थितींत कोल्हापुरास दुसऱ्या प्रतीचें हायस्कूल स्थापन करणें इष्ट होईल, असें सर ए. ग्रँट यांस वाटलें, व त्यांच्या म्हणण्यास माझेंही पूर्ण अनुमोदन पडलें. त्याप्रमाणें सन १८६७ सालीं जून महिन्यांत हायस्कुलाची स्थापना झाली. आणि हायस्कूलच्या हेडमास्तरच्या जाग्यावर माहादेव मोरेश्वर कुंटे यां सारख्या हुषार, विद्वान् व आस्थेनें काम करणाऱ्या गृहस्थांची नेमणूक झाली, हेंही कोल्हापूरचें मोठें सुदैव समजतों. मशारनिल्हे कुंटे यांनीं शाळा चांगली चालविली आहे. व मुंबई इलाख्यांतील विद्याखात्याचे डायरेक्टर यांच्या साक्षात् देखरेखीखालीं शाळा असल्यामुळें शाळा अद्यापपर्यंत फार चांगली चालली आहे, व पुढें तिची अशीच भरभराट होत जाईल, अशी मला उमेद आहे.

गेल्या डिसेंबर महिन्यांत हायस्कुलांत विद्यार्थ्यांची संख्या २५३ होती. इतक्या मुलांचा समावेश होण्याजोगी इमारत नसल्यामुळें हायस्कुलास आजपर्यंत फार अडचणी सोसाव्या लागल्या. त्या अडचणी आतां दूर होण्याची वेळ आली आहे, त्याच इमारतीच्या पायाचा दगड बसविण्यास आपणास विनंति करण्यापूर्वी आणखी एक दोन गोष्टींस अनुलक्षून चार शब्द सांगतों. या प्रांतांतील मुलांस चांगलें शिक्षण मिळण्याच्या कामीं जें हायस्कूल फार उपयोगीं झालें आहे; त्या संबंधीं बऱ्याच सांगण्यासारख्या गोष्टी आहेत. परंतु त्या सर्वांचा उल्लेख करूं गेल्यास वेळ फार लागेल.

या इलाख्यांतील सरदार व जहागीरदारांस शिक्षण देण्याचा उत्तम मार्ग कोणता या विषयीं मी बरेच दिवस विचार करीत होतों, आणि अनुभवा अंतीं माझा ग्रह असा झाला आहे कीं, सार्वजनिक शाळांत त्यांस घातल्यानें त्यांचें फार हित होईल व कित्येकांस घरीं शिकविण्यास सहाय्य करण्यासाठीं शिक्षकांच्याही नेमणुका कराव्या. ग्रँटसाहेबांसही माझे विचार पसंत पडले, आणि सरदारांची शाळा मोडून सरदार व जहागीरदार यांच्या मुलांस सार्वजनिक शाळांत घालावें, व त्यांनीं सार्वजनिक शाळांतील वर्गांत बसून इतर मुलांबरोबर अभ्यास करावा, असें ठरविलें. या फेरफाराचे परिणामही चांगले झाले आहेत. हल्लीं हायस्कुलामध्यें ८ सरदार व जहागीरदार अभ्यास करीत आहेत, व त्यांत इचलकरंजीकर व आपले मेहुणे सरलष्करबहाद्दूर हे फार हुषार दिसत आहेत. दुसऱ्या शाळांमध्यें २० सरदार व जहागीरदार शिकत आहेत; व त्यांतच बावडेकर पंतअमात्य व आपले मामा भाऊ कागलकर आहेत. आमचे असिस्टंट क्याप्टन वेस्ट हे त्यांच्या शिक्षणावर देखरेख करितात. म्हणून त्यांचेही सरदार लोक ऋणी आहेत.

स्त्रीशिक्षणाची हयगय झाली असेंही घडलें नाहीं. कोल्हापूरच्या मुलींच्या शाळेंत ६१ मुली असून ही शाळा चांगल्या स्थितींत आहे. आपली मावशी कै॰ आक्कासाहेब यांनीं या शाळेस चांगला आश्रय दिला. म्हणून ही शाळा त्यांची बरीच ऋणी आहे. शाळेंतील हुषार विद्यार्थ्यांमध्यें त्यांच्या मुलीची गणना होते. आपल्या मातोश्री राणीसाहेब यांचेंही या शाळेकडे पहिल्यापासून चांगलें लक्ष आहे. शाळेची व्यवस्था पाहण्याकरितां एक चांगली कमेटी नेमलेली आहे, व महादेव मोरेश्वर कुंटे हायस्कूलचे हेडमास्तर, जमशेदजी नवरोजी ऊनवाला आपले ट्यूटर, बाळ परशुराम पंडित इन्स्पेक्टर, गोविंद अमृत रानडे खासगी का-

रभारी. आणि विनायक रघुनाथ काळे सदरअमीन हे तिचे मेंबर आहेत. या सर्वांपेक्षांही नेस्ड्रापसाहेब व वेस्टसाहेब यांच्या मडमा शाळेंतील मुलींस शिक्षण देण्याचे कामीं फार मदत करितात. यामुळें त्यांचेही या शाळेवर फार उपकार झाले आहेत.

कोल्हापूर शहरांमध्यें शाळांस हव्या तेवढ्या इमारती नाहींत. ही उणीव दूर करणें हें एक मोठें काम होतें. हळू हळू ही अडचण दूर होत चालली आहे. सुमारें १७ शाळागृहें बांधण्यांत आलीं आहेत. व इलारव्याच्या निरनिराळ्या भागीं कांहीं बांधण्याचीं कामें चाललीं आहेत. हायस्कुलाकरितां इमारत बांधण्याचें काम लौकरच्च हातीं घेणें विशेषेंकरून इष्ट होतें. व त्याकडे एकदम मी लक्ष दिलें. कित्येक अनिवार्य कारणांमुळें ही इमारत बांधण्याचें काम सुरू करण्यास इतके दिवस लागले. शाळागृहांचे नकाशे करण्याचा म्यांटसाहेबांस फार अनुभव आहे, करितां त्यासच या इमारतीचा नकाशा तयार करण्यास सांगावें, अशी म्यांटसाहेबांनीं शिफारस केली. ही गोष्ट सरकारांनीही मान्य केली. परंतु त्यांच्या हातीं दुसरीं कामें असल्यामुळें एकदम हें काम त्यास हातीं घेतां आलें नाहीं. या इमारतीकरितां जाग्याची योजना करण्याचें कामही मोठ्या अडचणीचें झालें. कोल्हापूर शहर फार दाटीनें वसलें असल्यामुळें या शहरांत चांगली जागा मिळणें मोठें मुष्किलीचें होतें. शिवाय आपली इच्छा होती कीं, इमारत शोभिवंत व्हावी, व राजवाड्यापासून फार दूर नसावी. यामुळें पुष्कळ घरें घेऊन पाडावीं लागलीं. आणि राजवाड्याचा नगारखाना व दुसऱ्या इमारती याशीं मेळ पडण्याजोगी इमारत बांधण्याची ढबही विशेष प्रकारची घरावी लागली. या सर्व अडचणी शेवटीं दूर झाल्याबरोबर इमारतीचें काम सुरू करण्यास मी दिवसगत लाविली नाहीं. आतां आपण ज्या इमारतीचा पहिला दगड बसविणार ती इमारत कोल्हापूर शहरास कायमचें भूषण होईल, अशी मला खात्री आहे. रजपुतस्थानांत ही पद्धत पूर्णतेस आली आहे, त्या सारासिनिक पद्धतीची ही इमारत होईल. ज्यांनीं इमारतीचा नकाशा केला, तेच इमारत बांधण्याचें काम पाहण्यास सुदैवानें येथें आले आहेत. नंतर इमारत बांधण्याच्या कामाची कशी व्यवस्था केली आहे हें सांगून शेवटीं विद्यावृद्धिविषयीं जें जें मी करीत आहें, त्यांत केवळ आपल्या मनांतील हेतु सिद्धीस नेत आहें, असें म्हणून साहेब बसले.

[library stamp]

यास महाराजांनीं खालील उत्तर दिलें.

आतां जें आपण फार महत्वाचें व सुरस भाषण केलें, त्यावरून आजचा हा समारंभ करण्यास मला मनःपूर्वक आनंद होत आहे, हें मी आपणास सांगण्याचेंच कायतें राहिलें आहे. ज्या इमारतीचा नकाशा मयांट साहेबांनीं तयार केला आहे व ज्याच्या पायाचा पहिला दगड आतां आपण बसविणार तसल्या सुंदर इमारतीनें कोल्हापूर शहरास मोठी शोभा येणार आहे, व अशी इमारत विद्यादानाच्या कामास लागणार याबद्दल मला जास्त आनंद वाटत आहे. आपण दर्शविल्याप्रमाणें जेव्हां या इलाख्यांत शिक्षण देण्याच्या कामीं हयगय होत होती, ती वेळ आतां गेली, व मला वाटतें कीं, आतां पुढें तशी वेळ कधींही यावयाची नाहीं. आणि आतां विद्येस किती मान मिळत आहे, याची ही सुंदर इमारत कायमसाक्ष राहील. विद्यावृद्धि हें किती महत्वाचें काम आहे, हें मी पूर्णपणें जाणत आहें. आणि विद्यावृद्धीपासून होणारे फायदे लोकांस मिळावे याकरितां माझ्या हातून होतील तितके प्रयत्न करण्यास मी कमी करणार नाहीं, हें आपणास खात्रीपूर्वक सांगतों. आपण जी तपशीलवार हकीगत वाचली, त्यावरुन अल्पकाळांत सुद्धां अधिकारी कोणत्याही कामीं मनापासून झटले तर तें काम किती लौकर सिद्धीस जाऊं शकतें, हें यावरून स्पष्ट दिसत आहे. आणि मला अशी आशा आहे कीं, विद्यावृद्धीच्या महत्वाच्या कामास जें आलीकडे उत्तेजन देण्यांत आलें आहे, तें अल्पकालिक होणार नाहीं. परंतु ज्याप्रमाणें लोकांच्या जुन्या समजुती नाहींशा होत जातील, व विद्येचा प्रकाश जिकडे तिकडे पडत जाईल, त्याप्रमानानें या कामास दिवसेंदिवस अधिकाधिक नवी बळकटी व जोर येत जाईल.

महाराजांचें उत्तर.

कोल्हापूर इलाख्यांत विद्यावृद्धि करण्यासाठीं आपला व ज्यांचें आपणास सहाय्य मिळालें त्यांचा मी फार ऋणी समजतों. या इलाख्याच्या हिताकरितां उदार मनानें जे आपण मनापासून श्रम करीत आहा, तेणेंकरून या इलाख्यांतील लोकांत आपलें नांव अमर होऊन राहील असें मला वाटतें. या शिवाय आणखी कांहीं स्मारकाची जरूरी राहिली असली तर हायस्कूल व ज्या दुसऱ्या अनेक शाळा आपण स्थापन केल्या आहेत, त्या शाळा आणि पश्चिम हिंदुस्थानांतल्या उत्तम इमारतींत गणली जाण्याजोगी जी हायस्कूलची इमारत होत आहे, ही इमारत यांच्यायो-

गानें आपलें नांव नेहमी लोकांच्या स्मरणांत राहील.

त्याकरितां आपण येथें जमलों, आह्मी तें काम करण्याची वेळ झाली. याकरितां आणखी बोलून आपला वेळ न घेतां या इमारतीस परमेश्वराचा पूर्ण आशिर्वाद मिळो, अशी जी आपण इच्छा प्रकट केली, तिचा पुनरुच्चार करून पुरे करितों. असें म्हणून महाराजांनीं पायाचा दगड बसविला.

सदर समारंभ झाल्यावर दोन दिवसांनीं महाराजांची स्वारी महाराणीसाहेबांचे द्वितीय चिरंजीव ड्यूक आफ एडिंबरो हे मुंबईस येणार होते त्यांच्या मुलाखतीकरितां जाण्यास तारीख २१ फेब्रुवारी रोजीं निघाली. त्याप्रसंगीं महाराणीसाहेबांच्या पुत्राचा सन्मान करण्याकरितां जे एतद्देशीय राजेरजवाडे व सरदार जमले होते, त्या सर्वांमध्यें महाराजांचें तेज विशेष पडलें. आणि कोल्हापूर येथील हायस्कूलच्या पायाचा दगड महाराजांनीं बसविल्याची हकीकतही याच वेळीं वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाल्यानें स्वाभाविकच पुष्कळांचें लक्ष महाराजांकडे गेलें.

ड्यूक आफ एडिंबरो यांच्या मुलाखतीसाठीं महाराज मुंबईस जातात.

राजाराम महाराजांनीं राणीच्या या द्वितीय पुत्राच्या आगमनाचें स्मारक म्हणून ४५००० रुपये देणगी देऊन दरमहा २५ रुपयांच्या सहा स्कालरशिपी स्थापून त्यांस आल्फ्रेड स्कालरशिपी असें नांव दिलें. आरंभीं राजाराम हायस्कुलांतून म्याट्रिक्युलेशन परीक्षेंत जे दोन पहिले विद्यार्थी पसार होत त्यांस दोन स्कालरशिपी देत असत. पुढें कालेज होऊन युनिव्हर्सिटीच्या दोन परीक्षा येथें होऊं लागल्यापासून, फक्त बी॰ ए॰ च्या परीक्षेस जाणारास १५ रुपयांच्या स्कालरशिपी देतात, व बाकी दरमहा १० रुपयांच्या ७ स्कालरशिपी येथें कालेजांत देतात.

पुढें विलायतेस जाण्याचा व मुखत्यारीचा पक्का विचार ठरल्याशिवाय मुंबईहून जावयाचें नाहीं असा त्यांनीं निश्चय केला. यामुळें त्यांचें मुंबईस दोन अडीच महिने राहणें झालें, व तेणेंकरून मुंबईच्या मोठमोठ्या विद्वान् लोकांच्या व बडेलोकांच्या ओळखी झाल्या, व त्या सर्वांवर हे मोठे सुशिक्षित व हुशार राजपुत्र आहेत अशी छाप बसली. हे जेव्हां विलायतेस जाण्याचा आपला हेतु लोकांस सांगत तेव्हां ते म्हणत कीं, यांची मनाची इच्छा मनांतच जिरून जाईल, आणि प्रत्यक्ष कधीं तडीस जा-

णार नाहीं. कारण विलायतेचा प्रवास करण्यास हिंदूंस धर्माच्या, हवेच्या,व दुसऱ्या हजारों अडचणी असतात. त्या सर्व अडचणी एकीकडे ठेवून त्यांनीं विलायतेस जाण्याचा पूर्ण निश्चय केला. आणि विलायतेहून आल्यावर मुखत्यारी घ्यावी. आणि विलायतेस आपण मुखत्यारीनें राज्य करीत असतां जसा मान मिळावयाचा तसा मिळण्याविषयीं तजवीज राहील, असें वचन नामदार गव्हरनरसाहेबांनीं दिल्यावरोबर निघण्याची तयारी करून वेस्ट साहेब,त्यांचे पारशी ट्यूटर जमशेटजी नवरोजी, नानासाहेब इंगळे आणि हकीमसाहेब वगैरे ११ नोकर यांसहवर्तमान तारीख २२ मे सन १८७० रोजीं आगबोटींत बसून विलायतेस जाण्यास महाराज निघाले. या प्रमाणें त्यांचा दृढ निश्चय पाहून सर्वांस मोठें आश्चर्य वाटलें, व त्यांनीं त्यांची वाहावा केली. राजे व सरदार लोकांनीं तर तोंडांत बोटेंच घातलीं.

महाराज विलायतेस जाण्यास निघतात.

मुंबईहून निघाले ते एडन, सुवेझ व अलेक्झांड्रिया यांवरून भूमध्य समुद्रांतून मार्सेल्स बंदरीं उतरून तेथून थेट पारिस शहरीं गेले, व तेथें तारीख १२ जून १८७० रोजीं पोंचले. त्या दिवशीं व दुसऱ्या दिवशीं पारिस शहर व तेथील कांहीं चमत्कार पाहून तारीख १४ रोजीं सकाळीं बलोन व फोक्स्टोन मार्गानें ब्रिटिशचानल मधून लंडनास जाण्यास निघाले ते सायंकाळीं सात वाजतां लंडनास पोहोंचले. सुमारें आगस्ट अखेर पर्यंत येथेंच लंडन येथील व इतर ठिकाणचे चमत्कार पाहात राहिले. तारीख ३० आगस्ट रोजीं स्काटलंड पाहण्यास गेले. तेथून परत लिव्हरपुलास येऊन तें शहर पाहिलें व पुनः तारीख ७ सपटेंबर रोजीं लंडनास आले. सपटेंबर व आक्टोबर महिना राहून स्वारी लंडनाहून तारीख १ नवंबर रोजीं माघारी परतली. विलायतेंत असतां एक दिवस सुद्धां व्यर्थ न घालवितां महाराणीसाहेब, राजपुत्र, प्रधान मंडळ, बडे लोक, हिंदुस्थानांतून गेलेले कामदार वगैरे पचावन मंडळींच्या भेटी घेऊन सर्वांच्या ओळखी करून घेतल्या. दर्शनीय सर्व स्थळें, गिरण्या, कारखाने वगैरे पाहून अतिशय माहिती मिळविली होती. डोव्हर येथें सकाळीं ११ वाजतां आगबोटींत बसून आस्टेंड येथें दोन प्रहरीं ३ वाजतां उतरले. या सफरींत समुद्र फार खवळला असल्यामुळें यांस अतिशय लागला. येथें दोन दिवस राहून येथील च-

महाराज लंडन येथें पोहोंचतात.

लंडनाहून परत निघतात.

मत्कार पाहिले. वाटर्लूची लढाई झाली, तें स्थळ पाहण्यास गेले. तारीख ५ रोजीं आगगाडींतून निघून कोलोन शहरीं उतरले. येथेंही एक दोन दिवस राहून येथील चमत्कार पाहिले. व लोकांच्या रीतिभाति व राज्यव्यवस्था पाहिली. जर्मन लोकांत व इंग्लिश लोकांत व त्यांच्या राज्यपद्धतींत व लष्करीखात्यांतील भेद त्यांच्या नजरेस पडला. याच सुमारास फ्रान्स व जर्मनी यांमध्यें लढाई झाली असल्यानें कैदी करून आणलेल्या फ्रेंच लोकांस त्यांणीं येथें पाहिलें. तारीख ७ रोजीं फ्रांकफोर्टास गेले. तेथेंही एक दिवस राहून तारीख ९ रोजीं म्युनिच शहरास गेले. येथें दोन दिवस राहून तारीख १२ रोजीं इन्स्ब्रक येथें सकाळीं आले. म्युनिच येथें अतिशय थंडी पडत होती, व येथेंच त्यांनीं प्रथमतः बर्फ किंवा हीम पडतांना पाहिलें. इन्स्ब्रक येथें आल्यापासून त्यांची प्रकृति बिघडून कंबरेखालील आंग निर्जिव झालें, व जी रोजनिशी ते पारिस येथें पोंहोंचल्यापासून रोज लिहीत होते, ती त्यांस लिहितां येईना. पुढें तारीख १६ पर्यंत ते सांगत तेवढें ट्यूटर टिपून ठेवीत होते. त्यांस ताप येऊन संधिवायूचा विकार बळावत चालला, व त्यांस खुर्चीवरून फिरवावें लागूं लागलें. तारीख १६ रोजीं इन्स्ब्रक येथून निघून बाट्झन येथें स्वारी आली. आपल्याबरोबरचा मुसलमान हकीम याच्या शिवाय दुसऱ्याचें औषध महाराज घेईनात. महाराज आजारी पडून वायूनें कंबरेखालचें आंग निर्जिव झालें, तरी मनांत भीति बाळगण्याजोगें दुखणें आहे असें कोणास वाटलें नाहीं. कारण जरी आंग निर्जिव झालें, तरी ठणका वगैरे कांहीं नव्हता. आणि हकीमाच्या उपायांनीं थोडा आराम पडत चालला होता. तेथून व्हेनिस येथें गेले. तेव्हां खुर्चीवरून कित्येक इमारति व स्थळें पाहण्यास त्यांस जातां आलें. परंतु कांहीं विशेष आराम वाटेना. व्हेनिस पाहून फ्लारेन्स येथें आले, व दुखणें जास्त बळावलें. तेव्हां युरोपियन डाक्टरांचें औषध घेण्याचें त्यांनीं कबूल केलें व त्यांच्या औषधानें कांहीं गुण पडत आहे असें दिसूं लागलें. परंतु एकाएकीं दुखण्यानें उलट खाली व महाराज अत्यावस्थ झाले. तेव्हां इटलींतील दोन प्रसिद्ध डाक्टरांस प्रकृति दाखवून उपाय चालू केले. त्यानें कांहीं गुण वाटूं लागला. परंतु तो

कोलोन येथें जातात.

म्युनिच शहरास जातात.

इन्स्ब्रक येथें आले व प्रकृति बिघडली.

व्हेनिस पाहून फ्लारेन्स येथें येतात व तेथें मृत्यु पावतात.

कायम न राहतां तारीख ३० नवंबर रोजीं संकाळीं त्यांनीं एकाएकीं देह ठेविला.

महाराज याप्रमाणें मरण पावल्यावर त्यांच्या प्रेताचें दहन करण्याविषयीं कांहीं अडचणी उत्पन्न झाल्या. इटलींत प्रेतें पुरण्याची सर्व साधारण पद्धत होती. त्या प्रमाणें प्रेताची व्यवस्था करणें हें स्वाभाविकच महाराजांबरोबरच्या नोकरांस प्रशस्त वाटेना. इतकेंच नाहीं तर हिंदुधर्माप्रमाणें प्रेताचें दहन करण्याशिवाय दुसरा कोणताही मार्ग त्यांस पसंत पडेना. इटलींत तर शेंकडों वर्षांत कधीं प्रेत जाळल्याचें लोकांनीं ऐकिलें सुद्धां नव्हतें. फ्लारेन्सच्या म्युनिसिपालिटीचा तर असा कायदा होता कीं, पेटींत घालून प्रेत पुरलें नाहीं तर दोन वर्षांची सजा होईल. अशा अडचणींत वेस्टसाहेबांनीं इंग्लंडांतील ब्रिटिश सरकारचे वकील सर आगष्टस पागेट यांस कळवून त्यांनीं फ्लारेन्सचे सिंडिक सिनीयर पेरोझी यांस सांगितलें. नंतर या उभयतांनीं एका अंमलदारापासून दुसऱ्या अंमलदाराकडे या प्रमाणें हकीकत कळवीत कळवीत शेवटीं प्रधान मंडळापुढें हा प्रश्न गेला. आणि प्रेताचें दहन करण्याबद्दल एकदांची परवानगी मिळाली. तेव्हां दुसऱ्या दिवशीं तारीख १ दिजंबर रोजीं सकाळीं मरण पावल्यापासून सुमारें २४ तासांनीं आर्नो नदीच्या कांठीं राजाराम महाराजांचें प्रेत नेऊन चितेवर हिंदुधर्माप्रमाणें त्याचें दहन केलें. या प्रमाणें राजाराम महाराजांस परद्वीपीं, परधर्मी लोकांत मृत्यु येऊन सशास्त्र तर राहूं द्या, परंतु बाह्यात्कारी हिंदुधर्माप्रमाणें शेंकडों अडचणींचें निवारण केल्यावर दहन करितां आलें. यावरून यःकश्चित् मनुष्य मेला तर त्याची दाद कितपत लागेल, हें उघडच दिसतें. प्रेत दहन झाल्यावर त्यांच्या अस्थि गोळा करून रक्षेचें विसर्जन केलें आणि नंतर हिंदुस्थानांत आल्यावर अस्थि भागिरथींत नेऊन यथाविधि टाकिल्या. हें वर्तमान करवीरास कळल्यावर येथें पालाशविधि करून यथासांग क्रियाकर्मांतर करण्यांत आलें.

प्रेत दहनास अडचणी.

प्रेत दहन करितांत व अस्थि घेऊन बरोबरची मंडळी हिंदुस्थानांत येते. कोल्हापुरीं क्रिया करवितात.

राजाराम महाराज मरण पावले त्याच दिवशीं तारेनें कोल्हापुरास बातमी आली; व ही बातमी येतांच अकस्मात् एखादा धरणीकंप व्हावा अशी सर्व शहरची अवस्था झाली. त्यांचे मातोश्रीस, उभय पत्नींस व त्या-

च्या आम्हांस जें दुःख झालें, व राजवाड्यांत जो एकच आकांत उडाला. तो वर्णन करणें अशक्य आहे. त्यांच्या दोहों पत्न्यांपैकीं एक ल्हानच असून तिचा यांचा समागम घडला नव्हता. परंतु दुसऱ्या पत्नीचा यांच्याशीं विलायतेस जाईपर्यंत समागम होता व त्यांस एक कन्या होऊन मरण पावली होती. यांस तर किती दुःख झालें असेल याची कल्पना वाचकांनींच करावी. तसेंच महाराजांची मावशी आक्कासाहेब यांचे चिरंजीव आबासाहेब (माजी रीजंट) व त्याची बहीण या दोघांस महाराजांनीं ल्हानपणापासून जवळ बाळगिलें होतें, व भावाबहिणीप्रमाणें ते त्यांजवर ममता करीत होते. त्यांस किती वाईट वाटलें असेल हें उघड दिसत आहे. तसेंच आपण श्रमानें वाढविलेलें झाड फळें येण्यापूर्वीच पडलें याबद्दल खुद्द अंडरसन साहेबांसही फार वाईट वाटलें. सर्व शहरच्या लोकांत एकच कल्होळ झाला. ज्याच्या त्याच्या तोंडी दुःखोद्गाराशिवाय कांहीं नाहीं, असें होऊन सर्व लोकांस मोठी चुटपुट लागून राहिली. हातीं तोंडी आलेल्या व होतकरू आपल्या राजावर अशी एकाएकीं आकाशची कुऱ्हाड पडल्याचें वर्तमान ऐकून ल्हानापासून थोरापर्यंत सर्व लोक फार हळहळले, व ढळढळां रडले, व कांहीं दिवस शहर कसें अगदीं निस्तेज दिसत होतें. यावरून फ्लॉरेन्स शहरीं त्यांजबरोबरची नानासाहेब इंगळे प्रभृति मंडळी, जमशेटजी ट्यूटर व वेल्समाहेब यांची या प्रसंगानें काय अवस्था झाली असेल याचें अनुमान सहज होईल. याच शहरीं व प्रांतींसें काय सर्व हिंदुस्थानांत हें वर्तमान ऐकून कोणासही वाईट वाटल्यावांचून राहिलें नाहीं. कारण यांची माहिती हिंदुस्थानच्या सर्व भागीं लोकांस झाली होती. यांच्या एवढ्या मोठ्या दरजाच्या एतद्देशीय राजानें विलायतचा प्रवास करण्याचें धाडस केल्याचें हें पहिलेंच त्यावेळीं उदाहरण असल्यानें पुष्कळांचें लक्ष यांकडे लागलें होतें. यामुळें यांच्या मरणानें सर्व हिंदु देशाची व राष्ट्राची हानि झाली, असें सर्वत्र म्हणूं लागले. इतकी विद्या व इतका जगाचा अनुभव संपादन केल्यामुळें व यांच्या आंगीं जात्या फार शहाणपण, हुषारी व धूर्तता असल्यामुळें हे फार चांगले राज्यकर्ते होतील, व स्वानुभवानें इतरांस उत्तम कित्ता घालून ठेवितील, अशी जी राजे रजवाडे वगैरे लोकांस आशा उत्पन्न झाली होती, ती हा मोहरा हरपल्यामुळें समूळ नाहींशी झाली.

यांच्या मरणानें कोल्हापुरांतील लोकांस झालेलें दुःख.

म्हणून सर्वांस फार वाईट वाटलें; आणि तसेंच यांच्या पूर्वी कपुरथळ्याचे महाराज विलायतेस जातांना वाटेंतच मरण पावले होते; व हे तर विलायतेपर्यंत निर्विघ्नपणें जाऊन परत येत असतां वाटेंत मरण पावले. यावरून दुसऱ्या एतद्देशीय राजांस युरोपचा प्रवास करण्यास धैर्य होणार नाहीं. व तिकडील सुधारलेल्या देशांचा परिचय करून घेतां येणार नाहीं. याबद्दलही पुष्कळांस वाईट वाटलें.

यांच्या अंगीं नम्रता, सौजन्य व धूर्तता इतकी होती कीं, जे त्यांस नेहमी भेटत, व ज्यांचा नेहमीं त्यांशीं परिचय होता, त्यांची गोष्ट सोडून दिली तरी ज्यांची ज्यांची एक दोन वेळ गांठ पडली असेल त्यांच्या मनांत सुद्धां ते आपल्या विषयीं नेहमी चांगला ग्रह उत्पन्न करीत. त्यांस कोणी भेटला व त्यानें त्यांजविषयीं नाक मुरडलें व त्यांजविषयीं त्याचा वाईट ग्रह झाला असें कधींही झालें नाहीं. विलायतेस राजघराण्यांतील पुरुष व स्त्रिया यांच्या बडे लोकांच्या बड्या कामदारांच्या मोठमोठ्या विद्वानांच्या व हिंदुस्थानांतून परत गेलेल्या कित्येक अंमलदारांच्या अशा त्यांनीं भेटी घेतल्या, व त्या सर्वांवर आपल्या अप्रतिम गुणांनीं त्यांनीं आपली छाप बसवून सर्वांकडून वाहवा म्हणवून घेतलें. व ही गोष्ट खुद्द त्या वेळचे इंडियाचे अंडरसेक्रेटरी ग्र्यांट डफसाहेब यांनीं कामन्स सभेंत बोलून दाखविली.

यांचा स्वभाव व विलायतच्या प्रवासापासून त्यांजवर झालेले परिणाम.

वेस्टसाहेब महाराजांपाशीं आरंभापासून अखेरपर्यंत होते. विलायतेंतही ते यांच्या सन्निध सर्वदां होते. आणि युरोपच्या प्रवासाचे परिणाम त्यांच्या मनावर कसकसे होत जात आहेत तें मोठ्या काळजीनें व कौतुकानें पहात होते. यांपैकीं बरेच परिणाम त्यांची हस्तलिखित जी रोजनिशी इंग्रजींत प्रसिद्ध झाली आहे, तिजवरून निदर्शनास येतात. तथापि रोजनिशींत केवळ रोज काय पाहिलें व केलें आणि कोणाच्या भेटी घेतल्या अशा तऱ्हेचा त्रोटक मजकूर मुख्यत्वें टिपून ठेवीत, व याहून जास्त टिपण्यास वेळ सांपडत नसे. परंतु हें तरी लहान सहान काम नव्हतें, व हें त्यांनीं फार नियमानें केलें होतें. मोठमोठ्या लोकांपैकीं सुद्धां असें किती करीत असतील याचा वानयाच आहे. असो, यामुळें त्यांच्या मनावर जे निरनिराळ्या वेळीं ग्रह झाले व विचार मनांत आले, ते सर्व रोजनिशींत असण्याचा संभव नाहीं. तथापि विलायतेस गेल्यावर त्यांनीं जीं पत्रें आपल्या हिंदुस्थानांती-

ल मित्रांस व आप्तांस लिहिलीं, त्यांत त्यांच्या मनावर झालेले ग्रह व मनांत आलेले विचार बरेच आढळतात. त्यांनीं एका पत्रांत लिहिलें होतें कीं, विलायतेस आल्यापासून कोल्हापूरचा राजा आपल्या मुलखाबाहेर किती यःकश्चित पुरुष आहे, हें मला पूर्णपणें समजलें, असें मोठ्या नम्रतेनें दर्शित केलें होतें. अवलोकनानें व विचारानें त्यांच्या मनाचा आकुंचितपणा जाऊन त्याला जी विशालता आली, व जो विकास झाला, त्याची ही साक्ष आहे. परंतु यांहूनही त्यांस या प्रवासानें फार फायदा झाला होता. आपले राजकर्ते इंग्रज लोक आपापल्या घरीं कसे वागतात, कसे राहतात, विलायतेंतील अनेक संस्था कशा भरभराटींत आहेत, या संस्था परदेशांतून आणून कशाबशा स्थापलेल्या नसून ज्यांची उत्पत्ति तेथूनच होऊन तेथेंच कशा पूर्णदशेस आल्या आहेत, ज्यांच्या राज्यावर सूर्य कधीं मावळत नाहीं, अशा राजघराण्याचा साक्षात् परिचय करून घेऊन त्यांचें आचरण व रिवाज पाहून यांजविषयीं जो पूर्वीं सन्मान होता, व पूज्यबुद्धि होती, तीं दोन्ही परिचयानें कमी न होतां अधिक दृढतर झाली; अशा अवाढव्य राज्याचा कारभार करणारे प्रधान किती साध्या रीतीनें वागतात, व तेणेंकरून आपल्या मोठेपणांत कांहीं कमी होत नाहीं, असें कसें समजतात. आपल्या इलाख्यांत तर महाराजांनीं कोणाचा मुजरा परत केला कीं, कमीपणा येतो. हा जो येथें लोकापवाद आहे, याशीं याची तुलना कशी होते. इत्यादि गोष्टि पाहून व ऐकून त्यांच्या विचारांनीं महाराजांच्या मनावर फार उत्तम संस्कार झाला होता. त्यांनीं विलायतेस गेल्यावर इंग्लंडचे मुख्य प्रधान व हिंदुस्थानचे मुख्य सेक्रेटरी आफ् स्टेट यांस हातांत छत्र्या घेऊन बरोबर शिपाई प्यादे वगैरे कोणास न घेतां आगगाडीच्या स्टेशनावर पायीं जातांना पाहिलें. तेव्हां तर त्यांस फार कौतुक वाटलें, व हे एवढे मोठे राज्याधिकारी असून हलकटा प्रमाणें वागतात. हें कांहीं योग्य नाहीं असें त्यांस प्रथमतः वाटलें. परंतु त्यांस तेथें लौकरच अनुभवास आलें कीं, मोठेपणा व अधिकार केवळ डामडौल केल्यानें येतो, व राहतो असा अर्थ नाहीं. अशा अनेक गोष्टी पाहून त्यांच्या आचरणांत व नित्याच्या वागणुकींत दिवसेंदिवस फार फरक पडत जाऊन आपण कोणी मोठे दोड्डाचार्य असून इतर आपल्याहून फार कमी आहेत असा मूळचा ग्रह होता, तो जाऊन आपल्या लोकांशीं सुद्धां जास्त सौजन्यानें व प्रेमानें वागलें पाहिजे, व

दुसऱ्याची मुर्वत राखून त्यांजविषयीं विचार करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे; असे विचार त्यांच्या मनांत बिंबले, व हे त्यांच्या उपजत ममताळू स्वभावास फार साहजीक व स्वाभाविक होते. ज्यांचा महाराजांशीं निकटसंबंध होता. त्यांच्या नजरेस या गोष्टी विलायतेंतच येऊं लागल्या होत्या.

स्त्रीशिक्षण व स्त्रीस्वातंत्र्य यांविषयीं त्यांचे विचार ठरले ते.

हिंदुस्थानांत मुसलमानांच्या अनुकरणानें मराठ्यांमध्यें जो गोषा आला आहे तो त्यांस पूर्वींपासून आवडत नसे व व त्यांतून स्त्रियांस मुक्त करावें याविषयीं त्यांनीं निश्चय केला होता. विलायतेस गेल्यावर तर ही गोष्ट करणें फारच अवश्य आहे, असें त्यांच्या मनावर जास्त ठसून आपणच याचा कित्ता घातला पाहिजे असें त्यांस वाटलें. आपल्या घराण्यांतील स्त्रियांस शिक्षण देण्याकरितां महाराजांनीं विलायतेहून निघते वेळीं एक सुशिक्षित स्त्रीची निवड केली, आणि आपल्या स्त्रियांस शिक्षण मिळून त्या लोकांत वागण्यास योग्य होतांच त्यांस तशी मोकळीक द्यावयाची असा त्यांनीं आपला निश्चय प्रकट केला होता. सारांश विलायतच्या प्रवासानें त्यांचें इंग्रजलोकांविषयीं प्रेम वाढलें, व त्यांचे सद्गुण त्यांस चांगले समजले. आपल्या स्वदेशाविषयींचा व लोकांचा अभिमान काडीमात्र कमी न होतां त्यांमध्यें काय उणेपणा व दोष आहेत, हें त्यांस स्पष्टपणें कळूं लागलें, व आपल्या शक्त्यनुसार या दोहोंचीही सुधारणा करण्यास यत्न करीन असा त्यांनीं निश्चय केला. त्यांस विलायतचा प्रवास इतका आवडला कीं, आपण पुनः विलायतेस जावें असा त्यांचा पूर्णनिश्चय झाला होता.

मुंबईसरकारचे दुःखकारक उद्गार.

राजाराम महाराज मरण पावल्याचें वर्तमान तारायंत्रद्वारें हिंदुस्थानांत आल्याबरोबर मुंबई सरकारानें महाराजांच्या मरणामुळें अत्यंत दुःख झाल्याविषयीं प्रसिद्ध करून त्यांच्या वयाच्या वर्षांइतक्या २० तोफांची सलामी देण्याचा ठराव केला. तसेंच या मरणापासून जसें आपल्यास तसें आम्हांसही अत्यंत दुःख झालें. असें दरबार भरवून राणीसाहेबांस वगैरे कळवावें, अशी नामदार व्हाइसराय साहेबांकडून तार आली. तदनंतर खुद्द महाराणीसाहेबांच्या आज्ञेवरून हिंदुस्थानचे स्टेटसेक्रेटरी नामदार ड्यूक आफ् आरगाईल यांजकडून महाराजांच्या मातोश्रीस पत्र आलें. त्यांतील मजकूर असा होता.

" आपले चिरंजीव कोल्हापूरचे महाराज यांच्या दुःखकारक मरणाची

वार्ता ऐकून जें अत्यंत दुःख झालें व वाईट वाटलें तें आपल्यास कळवि-
ण्याविषयीं मला मलिकामा आजमा महाराणीसाहेबांची आज्ञा झाली आ-
हे. ते विलायतेंत आले तेव्हां त्यांचा आदरसत्कार करण्यां-
त महाराणीसाहेबांस फार आनंद झाला होता. आणि ते
हिंदुस्थानांत परत गेल्यावर त्यांची प्रकृति चांगली राहू-
न दिवसें दिवस योग्यतेस चढत जातील व जो महत्वाचा प्रदेश त्यांच्या स्वा-
धीन आहे, त्याचा राज्यकारभार सुधारण्यासाठीं उदार मनानें यत्न करीत आ-
हेत अशी सुवार्ता वेळोवेळीं ऐकूं येईल, अशी आशा उत्पन्न झाली होती.
परंतु सर्व शक्तिमान् परमेश्वरास तें आवडलें नाहीं, व त्याच्या अगदीं वि-
परीत घडून आलें. महाराजांसारख्या सुशील व होतकरू राजाच्या हातून
आपल्या देशबांधवांचें फार कल्याण झालें असतें. व त्यांस फार महत्वा-
च्या कामीं ते उपयोगीं पडले असते. व पुढें होणाऱ्या राजांस चांगला कि-
त्ता त्यांनीं घालून दिला असता. स्वदेशीं जाऊन राज्यकारभार हातीं घेण्यापूर्वी-
च ऐन भर ज्वानींत अशी आकाशची त्यांजवर कुऱ्हाड पडली, हें वर्तमा-
न ऐकून सर्वांस अत्यंत दुःख झालें आहे. राणीसाहेब आपणांवर तर
हा खरोखरच अतिदुःखकारक व असह्य प्रसंग आला आहे, परंतु आ-
पणास मी खात्रीनें सांगतों कीं, आपल्याप्रमाणेंच महाराणीसाहेबांस-
ही अंतःकरणापासून अत्यंत दुःख झालें आहे. त्याचप्रमाणें या दुःखका-
रक वार्तेनें मलाही फार वाईट वाटलें आहे.

ड्यूक आफ आर्गाईल यांचें दुःखप्रदर्शक पत्र.

ही दुःखकारक वार्ता हिंदुस्थानांत येऊन थडकली, तेव्हां कोल्हापूर हाय-
स्कूलचे हेडमास्तर माधवरावजी कुंटे हे मुंबईस युनिव्हर्सिटीच्या परीक्षें-
त गुंतले होते. त्यांस तेथें हें वर्तमान कळतांच फार दुःख
झालें. कारण त्यांचा साक्षात समागम व परिचय महा-
राजांशीं झालेला होता. त्यांणीं तेथेंच मनांत निश्चय के-
ला कीं, आतां लौकरच कोल्हापुरास परत जाऊन मोठी स-
भा भरवावी, आणि महाराजांचें नांव चिरकाल लोकांपुढें राहील अशा त-
ऱ्हेचें कांहीं तरी योग्य व कायमचें स्मारक करण्याविषयीं यत्न करावा. ते-
व्हां पुण्याहून कोल्हापुरीं येण्यास आगगाडी नव्हती व टांगेही नव्हते.
छकडा गाडीनें भात आठ दिवस लागत. म्हणून मुंबईहून आगबोटीनें र-
त्नागिरीस आले, व तेथून भाड्याच्या घोड्यावरून चवथे दिवशीं कोल्हापुरा-

कोल्हापूर येथें महाराजांच्या स्मारकांकरितां भरलेली सभा.

स येऊन पोहोंचले. येथें आल्यावर पोलिटिकल एजंट, कारभारी न्यायाधीश, मुख्य सरदार व मानकरी यांच्या भेटी घेऊन सभा भरविण्याविषयीं सर्वांची संमति घेतली. व तसेंच कर्नाटकांतील सांगलीकर, मिरजकर, जमखंडीकर, कुरुंदवाडकर यांसही आमंत्रणें केलीं. त्यांस दुखवट्याकरितां कोल्हापुरास यावयाचेंच होतें. व हा स्मारक करण्याचा विचारही त्यांस पसंत पडला. त्याप्रमाणें तारीख १८ डिसेंबर सन १८७० रोजीं हायस्कुलच्या जुन्या इमारतींत मोठी जंगी सभा भरली. सभेचें अध्यक्षस्थान श्री० जमखंडीकर यांणीं स्वीकारिलें. सभेस निवर्ग कुरुंदवाडकर व मिरजकरही आले होते. सभेंत भाषणें होऊन राजाराम महाराजांच्या अकालीं मरणानें जें सर्वांस दुःख झालें. तें प्रदर्शित करून त्यांचें कांहीं योग्य स्मारक करण्याचा विचार ठरला आणि सभेंत सर्वानुमतें पुढील ठराव झाले.

१. कैलासवासी महाराजांच्या मातोश्रीस सभेच्या वतीनें दुःख प्रदर्शक पत्र पाठवावें.

२. स्मारक करण्याचा हेतु सिद्धीस नेण्याकरितां कांहीं गृहस्थांची कमेटी नेमावी; व तिला **राजाराम छत्रपति स्मारक कमेटी** असें नांव द्यावें.

३. वर्गणीची यादी फिरवून जो फंड जमा होईल त्यास **राजाराम महाराज छत्रपति स्मारकफंड** असें नांव देऊन त्याच्या व्याजांत कोल्हापूर हायस्कुलांतील गरीब विद्यार्थ्यांपैकीं जे फार हुशार असतील त्यांस स्कालरशिपी म्हणजे पगारी जागा देण्याकडे व्यय करावा. या विषयींचे विशेष नियम पोलिटिकल एजंट व डायरेक्टरसाहेब यांनीं करावे.

त्या बैठकीसच आठ हजार रुपयांचे आंकडे पडले. त्यांत खुद्द जमखंडीकर आपासाहेबांनीं तीन हजार व निवर्ग कुरुंदवाडकरांनीं एकेक हजार असे घातले होते. या फंडाची रकम अखेरीस एकवीस हजार रुपये जमली. व त्याच्या व्याजांत हायस्कुलांत दरमहा ५ रुपयांच्या सहा व ४ रुपयांच्या दहा स्कालरशिपी स्थापण्यांत आल्या. राजाराम स्कालरशिपा.

याच प्रमाणें मुंबईसही दुःखप्रदर्शन करण्याकरितां व स्मारक करण्या-

करितां फ्रामजी कावसजी इनस्टिट्यूट या इमारतींत मोठी सभा भरली आ-
मुंबईस सभा. णि त्या सभेंत खालीं लिहिल्याप्रमाणें ठराव झाले:

१. कोल्हापूरचे राजाराम महाराज छत्रपति यांच्या आकस्मिक व अकाली मृत्यूनें सर्व मतीच्या लोकांस जें अत्यंत व खरोखर दुःख झालें तें ही सभा लिहून ठेवीत आहे. महाराजांचा सुशील स्वभाव, विनय आणि हुषारी, यांच्या योगानें प्रसिद्ध शिवाजी महाराजांच्या घराण्याचे ते योग्य व सन्माननीय प्रतिनिधि असून त्या घराण्याचें एक भूषणच होते. यांचें वय जरी फार नव्हतें, तरी यांनीं इंग्रजी भाषेचा अभ्यास फार मन लावून केला होता. तेणेंकरून अर्वाचीन शास्त्रें व कलाकौशल्यें व राज्य चालविण्याच्या सुधारलेल्या अर्वाचीन पद्धति यांची चांगली माहिती करून घेऊन आपल्या उच्च दरजास सर्वतोपरी योग्य होण्याकरितां आपल्याकडून होईल तितकी खटपट करण्यास त्यांनीं आळस केला नव्हता. आपलें शिक्षण पुरें करण्याकरितां हजारों अडचणी एकीकडे ठेवून युरोपास जाण्याचेंही त्यांनीं धाडस केलें होतें. ( असें धाडस आजपर्यंत फारच थोड्या हिंदुराजांनीं केलें आहे. ) आणि येणेंकरून आपल्या प्रजेचें व एकंदरींत सर्व महाराष्ट्राचें त्यांच्या हातून अत्यंत हित होईल, आणि हिंदुस्थानच्या राजांस राज्य चांगलें चालविण्याचा कित्ताच घालून देतील अशी सर्वांस आशा उत्पन्न झाली होती. परंतु स्वदेशीं परत येऊन आपल्या राज्याचा कारभार हातीं घेण्याची वेळ अगदीं जवळ आली आहे, असें या देशाच्या सर्व लोकांस वाटलें होतें. व सर्व राष्ट्रास आनंद देणारा तो सुदीन केव्हां येतो, याकडे सर्वांचे डोळे लागले होते अशा वेळीं भयंकर मृत्यूनें या जगांतून त्यांस नेलें. याकरितां या दुःखकारक गोष्टीनें सर्व राष्ट्राची हानि झाली आहे, असें ही सभा समजत आहे.

२. सद्गुणी व लोकप्रिय अशा या सुशिक्षित राजपुत्रास सर्वांकडून जो बहुमान मिळत होता, व त्यांच्या आकस्मिक मृत्यूनें जें सर्वांस अत्यंत दुःख झालें आहे, त्याचें योग्य स्मारक या शहरीं उभारण्याची तजवीज करण्याकरितां एक कमिटी नेमून हा उद्देश तडीस नेण्याविषयीं तीस विनंति करावी.

३ महाराजांच्या मातोश्रींस व त्यांच्या उभयतां राण्यांस जें असह्य दुः-

ख झालें आहे,त्याप्रमाणेंच सर्व देशास दुःख झालें आहे. हें प्रदर्शित करण्याकरितां त्यांस दुःखप्रदर्शक पत्र पाठवावें.

४. सभेचे हेतु तडीस नेण्याकरितां व वर्गणी जमा करण्याकरितां एक कमिटी नेमावी.

मुंबईस पुढें याबद्दल कोणतें स्मारक केलें हें कांहीं समजलें नाहीं.

*अधिकाऱ्यांनीं केलेलीं स्मारकें.*

सदरशिवाय कोल्हापूरच्या हायस्कुलास त्यांच्या स्मरणार्थ राजाराम हायस्कूल असें नांव दिलें. व पुढें येथें कालेज झाल्यावर त्यासही राजाराम कालेज असें नांव देण्यांत आलें. व हायस्कूल इमारतींत राजाराम महाराजांचा संगमरवरी दगडाचा पुतळा बसविला. त्यांच्या विलायतच्या प्रवासाचें विस्मरण होऊनये म्हणून त्यांची हस्तलिखित इंग्रजी रोजनिशी छापून प्रसिद्ध केली. फ्लारेन्स येथें आर्नो नदीच्या कांठीं जेथें राजाराम महाराजांच्या प्रेताचें दहन झालें, तेथें ३०।३५ हजार रुपये खर्चून सुंदर छत्री बांधिली आहे. व तिची व्यवस्था तेथील म्युनिसिपालिटीनें फार उत्तम ठेविली आहे असें माजी रीजंट आबासाहेब हे यूरोपांत गेले तेव्हां पाहिल्याचें खुद्द सांगत होते.

# शिवाजी महाराज.

(इसवीसन १८७१ ते १८८३ प॰)

राजाराम महाराज मरण पावले तेव्हां अंतकाळीं त्यांनीं पुढील व्यवस्था कशी करावी, याबद्दल कांहीं लिहून ठेविलें नव्हतें. यामुळें दत्तक कोणास घ्यावें याविषयीं त्या वेळचे पोलिटिकल एजंट कर्नल अंडरसनसाहेब यांस विचार करणें भाग पडलें. दत्तक घेण्यास कोण योग्य आहेत कोणाकोणाचा हक्क आहे, व राणीसाहेब यांस कोण पसंत पडतो, याचा पुरा विचार होण्यास सुमारें १० महिने २२ दिवस लागले. व तितका काळ कोल्हापूरची गादी रिकामी होती. याच वेळीं थोरले शिवाजी महाराज यांचे बंधू व्यंकोजी यांचें घराणें तंजावरास आहे. त्यांपैकीं व्यंकोजीच्या मुलीच्या वंशजांपैकीं एका पुरुषानें कोल्हापुरचे गादीस आपला हक्क आहे, यास्तव आपणास गादी मिळावी; किंवा निदान आपणास दत्तक तरी घ्यावें, असा मुंबईसरकाराकडे अर्ज केला होता. परंतु कोल्हापूरच्या गादीस कोणत्याही रीतीनें हक्क पोहोंचत नाहीं; व पुरुष संतति असतां स्त्रीसंततिपैकीं दत्तक घेणें सशास्त्र नाहीं असा त्यांस जबाब मिळाला. नंतर इकडील प्रांतांतील भोंसले घराण्यांतील सर्व मुलें पाहून राणीसाहेबांच्या संमतीनें रवानवट घराण्यांतील **दिनकरराव सावर्डेकर** यांचे पुत्र **नारायणराव** यांस मुंबईसरकारच्या हुकुमानें पसंत करून श्री॰ फलटणकर यांची कन्या ताराबाई कै॰ राजाराम महाराज यांची वडील राणी हिच्या मांडीवर तारीख २३ आक्टोबर सन १८७१ इसवी रोजीं दसऱ्याच्या मुहूर्तानें दत्तक दिला, व त्याचें नांव **शिवाजी महाराज** असें ठेविलें. याच घराण्यांतील मुलगा पूर्वी सन १७६२ सालीं **जिजाबाई** राणीसाहेब यांणीं दत्तक घेतला होता. व हें घराणें शाहाजीचा दुसरा मुलगा **शरफजी** याचा वंश होय. हा दत्तकसमारंभ मोठ्या थाटानें झाला. समारंभास श्री॰ फलटणकर, मिरजकर व कोल्हापूर इलाख्यांतील सर्व जहागीरदार व मानकरी आले होते. याच दिवशीं कोल्हापूर येथें श्री॰ तात्यासाहेब मिरजकर यांस मुखत्यारी देण्याचाही समारंभ झाला.

दत्तकाची निवड व दत्तकसमारंभ.

माजी महाराजांच्या वेळचे त्यांचे गार्डियन वेस्टसाहेब यांची शिवाजीम-

हाराजांच्या विद्याभ्यासावर देखरेख ठेवण्याकडे योजना झाली, परंतु त्यास मोठ्या हु-
द्याची जागा मिळून ते लौकरच गेले. तेव्हां त्यांच्या जागीं मे० ग्रामिकसाहेब ब्रिटिश
इलाख्यांतील अ० जज्ज यांस सन १८७२ सालीं महाराजांचे गा-
र्डियन नेमिलें, व ते महाराजांच्या विद्याभ्यासावर देखरेख ठेवूं
लागले. महाराजांस साक्षात शिकविण्याकरितां रा० रा० यशवंत वासुदेव आठले
एम्० ए० यांस टयूटर नेमिलें. महाराजांबरोबर अभ्यास करण्यास, फिरण्यास, व खे-
ळण्यास त्यांच्याच बरोबरीचे मोठ्या घराण्यांतील सरदार असावे, म्हणून श्री०
बाबासाहेब सावंतवाडीकर सरदेसाई आणि श्री० बाळासाहेब घोरपडे मुधो-
ळकर यांसही त्यांच्या ट्यूटरांसह कोल्हापुरास विद्याभ्यासाकरितां आणून ठेवि-
लें. महाराज, वाडीकर व मुधोळकर या त्रिवर्गांनीं एकाच बंगल्यांत रहावें अशी
योजना केली. प्रथमतः महाराजांनीं घरीं सकाळीं ट्यूटरांबरोबर अभ्यास करावा
व दोन प्रहरीं शाळेंत जाऊन शाळेंतील मुलांबरोबर अभ्यास करावा, असा
क्रम ठेविला. या दोन सरदारांशिवाय महाराजांबरोबर खेळण्यास वगैरे जास्त
सवंगडे असावे म्हणून कोल्हापूर शहरांतील बाळासाहेब गायकवाड व बुवा-
साहेब भोंसले आणि म्हैसाळ येथील केदारराव आपासाहेब शिंदे आणि नि-
पाणीचे शिधोजीराव आपासाहेब निपाणीकर मिरजेचे बा-
बासाहेब कोन्हेरराव पटवर्धन, यांसही महाराजांबरोबर अभ्या-
स करण्याकरितां महाराजांचे बंगल्यानजीकच मुद्दाम नवी इमारत बांधून ठेवि-
लें. याप्रमाणें कांहीं दिवस अभ्यास चालल्यावर शाळेंत जाऊन इतर मुलां-
बरोबर व्हावा तितका चांगला अभ्यास होत नाहीं; असें दिसल्यावरून महारा-
जांच्या बंगल्यानजीक अभ्यास-बंगला या नांवाची एक इमारत आणि त्या-
नजीकच गार्डियन यांस रहाण्याकरितां एक बंगला अशा
दोन इमारती बांधून महाराज व त्यांच्या बरोबर शिकणारे
सरदार यांस शाळेंतून काढून अभ्यास बंगल्यांत निरनि-
राळे वर्ग करून ट्यूटरांकडून शिकविण्याचा क्रम सुरू केला. ट्यूटरांशिवाय मे-
हेरबान ग्रामिकसाहेब गार्डियन हेही खुद्द रोज तास दोन तास इंग्रजी शि-
कवूं लागले. येणेकरून स्वतंत्ररीतीनें महाराजांचा व त्यांच्या बरोबरीच्या स-
रदारांचा अभ्यास बराच चांगला होऊं लागला.

*महाराजांचे विद्याभ्यासाची व्यवस्था.*

*महाराज शाळेंत जातात.*

*शाळेंतून काढून निराळें शिकवूं लागतात.*

मेहेरबान ग्रामिकसाहेब महाराजांस व इतर सर्व सरदारांस घोड्यावरू-
न वरचेवर फिरावयास नेत, व शिकारीसही नेऊन असत. सुट्टीच्या वेळीं [illegible]

ल्हापूर येथें असलेल्या ब्रिटिश सरकारच्या पलटणींतील एका हवालदाराकडून त्यांस कवाईत शिकवीत होते, त्याचप्रमाणें रिसाल्यावरील ड्रिलमास्तराकडून घोड्यावरील कवाईतही शिकविण्याचा क्रम सुरू होता. दर आठवड्यास एक दोन वेळ रेसिडेन्सीकडील जिमखान्यांत जाऊन साहेबलोकांबरोबरही खेळ खेळत असत. व मधून मधून क्रिकेट खेळण्याचाही परिपाठ ठेविलेला होता. महाराजांस लौकरच घोड्यावर चांगलें बसतां येऊं लागलें; आणि घोड्यावरील व पायीं कवायतींत त्यांची गति बरीच झाली. त्यांस निशाणही चांगलें मारतां येऊं लागून शिकारीचीही बरीच आवड जडली.

महाराजांचा खेळ व व्यायाम.

कोल्हापूरच्या आसपासचा प्रदेश दाखविण्याकरितां दरसाल दिपवाळी जाहल्यावर कोठें तरी दोन तीन आठवडे बाहेर फिरावयास गार्डियन व कधीं कधीं एजंटसाहेब महाराजांस त्यांच्या बरोबरीच्या सरदारांसह घेऊन जात. एक वर्षी मांगली, मिरज, कुरुंदवाड, वाडी वगैरे पाहण्यास नेलें होतें. एक वर्षी मुधोळ, गोकाक वगैरेकडे नेलें होतें. एक वर्षी बेळगांव, धारवाड, विजापूरकडे नेलें. उष्णकाळांत कोल्हापूर प्रांतांतील निरनिराळा भाग दाखविण्यास नेत. आणि सह्याद्रीवर कोठें तरी थंड जागीं शिकार वगैरे करण्याकरितां कांहीं दिवस ठेवून अखेरीस पन्हाळ्यास आणीत. याप्रमाणें मलकापूर, गोलिवणें, चांदेल, आंबा, विशाळगड, भुदरगड, रांगणा, दाजीपूर, बावडा, आजरें, आंबोली वगैरे सर्व ठिकाणें यांस दाखवून आणिलें होतें. वाद्यविद्येची थोडी अभिरुचि लागावी, म्हणून मिसमाइसी नांवाची मडम जी राणीसाहेबांस शिकविण्याकरितां आणिलेली होती, तिजकडून पियानो वाजविण्यास कांहीं दिवस महाराजांस शिकवीत होते.

आसपासचा प्रदेश पाहणें.

रा॰ रा॰ यशवंत वासुदेव आठले गेल्यावर त्यांच्या जागीं रा॰ रा॰ अच्युत नारायण आजगांवकर यास महाराजांचे ट्यूटर नेमिलें होतें. महाराजांची बुद्धि फार तीव्र नव्हती. म्हणून त्यांजवर अभ्यासाचा फार बोजा न ठेवितां बाताबेतानें विषय शिकविण्याचा क्रम मे॰ ह्यामिकसाहेबांनीं मुळापासून ठेविला होता. क्षेपेल त्याहून जास्त कांहीं त्यांस शिकवीत नसत. ह्यामिकसाहेब त्यांच्याशीं नेहमीं मिळूनमिसळून वागत. ते त्यांजबरोबर पायीं व घोड्यावरून फिरावयास जात, शिकारी-

गार्डियन यांचें महाराजांशीं ममताळू वर्तन.

स जात. खेळावयास जात. इतकेंच नाहीं तर पत्तेसुद्धां खेळावयास येऊन त्यांबरोबर बसत, व अत्यंत ममतेनें त्यांशीं वागत.

सन १८७४।७५ सालीं महाराणीसाहेबांचे पुत्र युवराज प्रिन्स आफ् वेल्स हे हिंदुस्थान पाहण्याकरितां मुंबईस आले. त्यावेळीं महाराजांची स्वारी सर्व सरदार मंडळासह युवराजांच्या मुलाखतीकरितां सन १८७५ सालीं आक्टोबर महिन्यांत मुंबईस गेली होती. बरोबर मे· स्नेडरसाहेब पोलिटिकल एजंट, मे· ह्यामिकसाहेब गार्डियन, व रा· ब· महादेव वासुदेव बर्वे कारभारी हे होते. तसेंच श्री· वाडीकर व मुधोळकर आणि दुसरे संवगडे सरदार व कागलकर, बावडेकर, विशाळगडकर, इचलकरंजीकर व सरलष्कर वगैरे पदरचे सरदारही होते. उभयतांच्या मुलाखती व नजरा झाल्या. महाराजांनीं युवराजांस रत्नजडित अशी एक प्राचीन तरवार व एक जंब्या व दुसरे कांहीं पदार्थ मिळून सुमारें ६००० रुपये किमतीचा विषय नजर केला. युवराजांनीं महाराजांस एक रुपेरी म्यानाची विलायती तरवार, एक सोन्याचा पदक, रत्नजडित तपकिरीची डबी, आपली तसबीर, एक नकाशाचें बुक व एक तसबिरांचें बुक असे जिन्नस नजर केले. युवराज हिंदुस्थानांत आले, व महाराजांची मुलाखत झाली, या गोष्टीचें चिरकाल स्मरण राहावें म्हणून कोल्हापूर येथें दोन लाख रुपये खर्च करून हास्पिटल बांधण्यास व त्यास युवराजांचें आलबर्ट एडवर्ड हें नांव देण्याविषयीं परवानगी घेतली. मुंबईस जातांना पुण्यांतील दर्शनीय स्थळें महाराजांस दाखविण्यांत आलींच होतीं. युवराजांची स्वारी मुंबईहून गेल्यावर कांहीं दिवस तेथेंच मुकाम करून मुंबईंतील व आसपासचीं स्थळें त्यांस दाखविलीं व तेथून पुणें, सातारा मार्गानें परत न येतां गोवें प्रांत दाखविण्याच्या हेतूनें स्वारीस जलमार्गानें परत आणिलें. गोवें दाखवून परत देवगड बंदरीं स्वारी आली, व तेथून पायमार्गानें कोल्हापुरास फोंडे घाटानें आली.

राज्ञी पुत्र युवराजयांच्या भेटीस महाराज मुंबईस जातात.

सन १८७६ सालीं जानेवारी महिन्याच्या २१ व्या तारखेस मुंबईचे गव्हरनर सर फिलिप वोडहौस यांची स्वारी करवीरीं आली. महाराजांच्या भेटी होऊन मोठा दरबार झाला, व नजरनजराणे होऊन महाराजास पोषाख दिल्यावर साहेबांनीं कोल्हापूर राज्यकारभाराची व्यवस्था पाहून व महाराजांच्या विद्याभ्यासाची व्यवस्था पाहून खुष झाल्याबद्दल दरबारांत मोठें भाषण करून बोलून दाखविलें. ह्याच

गवर्नर फिलिप वोडहौस करवीरीं येतात.

स्कुलांतील विद्यार्थ्यांस बक्षिसें वांटण्याचा समारंभ त्यांच्या हातें होऊन ते तारीख २६ रोजीं सातान्यास गेले. या वेळीं गव्हरनरसाहेबांस शहरम्युनिसिपालिटीकडूनही मानपत्र देण्यांत आलें.

पुढील म्हणजे सन १८७७ सालीं जानेवारी महिन्यांत महाराणीसाहेबांनीं केसर- ई- हिंद हा किताब धारण केला, व त्यानिमित्य दिल्लीस मोठा दरबार झाला. त्या दरबारास त्या वेळचे गव्हरनर जनरल लार्ड लिटनसाहेब यांजकडून महाराजांस निमंत्रण आलें होतें, व जाण्याची तयारीही चालली होती. परंतु सन १८७६ सालच्या अवर्षणामुळें दक्षणेंत मोठा दुष्काळ पडला होता. त्याप्रमाणें या प्रांतीही दुष्काळ पडून दुष्काळग्रस्त मनुष्यांच्या रक्षणार्थ ज्या तजविजी सुरू केल्या होत्या, त्यांकरितां सर्व अंमलदार येथें असणें अवश्य होतें. म्हणून महाराजांची स्वारी दिल्लीस गेल्यास त्यांजबरोबर मे० एजंटसाहेब, त्यांचे असिस्टंट व स्टेट कारभारी यांस जावें लागेल व इकडे दुष्काळ पीडित प्रजेचे हाल होतील. याकरितां स्वारी दिल्लीस जाण्याचें रहित झालें. दिल्ली दरबारच्या दिवशीं येथें दरबार भरला व किताब धारण केल्याचा जाहीरनामा वाचण्यांत आला; व १०१ तोफांची सलामी झाली. सायंकाळीं दारूकाम सोडिलें. आणि साहेब लोकांस खाना देण्यांत आला, व ४० कैद्यांस मुक्त केलें. महाराज दरबारास गेले नाहींत तरी त्यांस नाइट कम्यांडर आफ दि स्टार आफ इंडिया या पदवीचा चांद व एक निशाण अशीं देण्यांत आलीं; व स्टेट कारभारी महादेव बासुदेव बर्वे यांस रावबहादूर हा किताब देण्यांत आला. पुढील सालीं चांद व निशाण आल्यावर मोठा दरबार भरून महाराजांस चांद व निशाण अशीं देण्यांत आलीं, व त्यावेळींही पादशाही सलामी झाली.

दिल्लीचा दरबार सन १८७७

दुष्काळामुळें महाराज जात नाहींत.

महाराजास किताब देतात.

याच सालीं मुंबईचे गव्हरनर सर रिचर्ड टेंपल यांची स्वारी दोन वेळ कोल्हापुरास येऊन दुष्काळ निवारणार्थ केलेली व्यवस्था व जंगलची व्यवस्था पाहून गेली. पुढील सालीं येथें जंगलखातें स्वतंत्र करून त्यावर एक जंगल आफिसराची दरमहा २५० रुपये पगार व १५० रुपये भत्ता अशा पगारावर नेमणूक झाली.

मुंबईचे गव्हरनर येतात.

महाराज वयस्क झाले म्हणून सन १८७८ सालीं फाल्गुन मासीं महाराजांचें बाघोजीराव शिर्के सातारकर यांच्या कन्येशीं मोठ्या समारंभानें

लग्न झालें. खर्च ७०,००० रुपये झाला. पैकीं दुम्तपट्टी बसवून इनामदार व दुमालदार यांजकडून ५००० रुपये वसूल केले होते. नवरीचें नां- व आनंदीबाई राणीसाहेब ठेवून त्यांच्या विद्याभ्यासाचीही व्यवस्था केली.

महाराजांचें लग्न.

याप्रमाणें तरुण महाराजांच्या विद्याभ्यासाबद्दल वगैरे सर्व व्यवस्था सुरळीत चालली असतां महाराजांची दिसावी तशी सुधारणा दिसेना. त्यांचें वय आतां म्हणजे सन १८७८ सालीं सुमारें १८ वर्षांचें झालें. तेव्हां त्यांचा अंतर्गत स्वभाव निदर्शनास हळू हळू येऊं लागला. त्यास आपली स्थिति अत्यंत उदासवाणी वाटूं लागली. इतके दिवस राज्यवैभव भोगून त्यांच्या मनाची अशी स्थिति होणें हें मोठें आश्चर्य होय. हे मुख्य छत्रपति म्हणून सर्व कृत्यांत पुढारी असून त्यांस या प्रमाणें वागावें लागे. परंतु तें त्यांस मनापासून आवडत नसे. कोणत्याही कृत्यांत पुढार घेऊन खारदस्तपणानें वागून मोठेपणा मिळवून नांवालौकिकास चढावें अशी त्यास मुळींच इच्छा होत नसे. हें पाहून मे. स्नेडरसाहेब व स्टेटकारभारी रावबहादूर बर्वे यांस फार वाईट वाटूं लागलें. रावबहादूर बर्वे तर आरंभापासून म्हणजे दत्तक घेतल्यापासून कारभाऱ्याचे कामावर होते. त्यासिक साहेब होते तोंपर्यंत बरेंच ठीक चाललें होतें. परंतु सन १८७७ अखेर त्यासिकसाहेब बदली होऊन गेले, व त्यांच्या जागीं कांहीं दिवस दुसऱ्याची नेमणूक न झाल्यामुळें मे. स्नेडर साहेब पोलिटिकल एजंट यांजकडेच महाराजांची साक्षात् देखरेख आली, व ते एक दोन वेळां मिरज, मुधोळ, गोकाक, गडहिंग्लज, आजरें वगैरेकडे महाराजांस फिरवयास घेऊन गेले. तेव्हां तर त्यांची स्थिति त्यांच्या पूर्णपणें नजरेस आली. व आतां पुढें काय विचार करावा, अशी त्यास काळजी वाटूं लागली. महाराजांनीं कोणत्याही कृत्यांत मन घालूं नये. अभ्यासाकडे यथा तथाच लक्ष द्यावें. हरएक कामांत मागें मागें राहावें. सांगितल्याप्रमाणें वागूं नये. यामुळें कोणाही पालकास वाईट वाटेल यांत नवल नाहीं. मे. स्नेडर साहेब हे दिसण्यांत उग्र व स्वभावानें थोडे तापट असत. परंतु अंतःकरणाचे दयाळू व प्रसन्नाळू होते. रावबहादूर बर्वे हे तर दिसण्यांत सौम्य व मनमिळाऊ असत, व महाराजांनीं चांगलें व्हावें याबद्दल फार काळजी वाहात असत. यांनीं महाराजांस फार कडक रीतीनें वागविलें, व महाराजांची पुढील भ्रमिष्ट स्थिति होण्यास हेंच कारण झालें. असा जो जनापवाद पुढें प्रसिद्धीस आला, त्यांत बिलकुल खरेपणा नाहीं. अमुक गोष्ट करणें चांगलें, व अमुक वाईट, अस-

महाराजांचा अंतर्गत स्वभाव निदर्शनास येऊं लागला.

च्या रीतीनें वागणें योग्य आहे, इत्यादि गोष्टि खुद्द महाराजांच्या हि-
ताकरितां सांगण्याचे त्यांस अनेक प्रसंग येत, त्यास नाइलाज होता. स-
न१८७७ अखेर पर्यंत महाराजांची सर्व व्यवस्था साक्षात् मे· त्यामिकसाहेबांक-
डे होती, व त्यांचें महाराजांशीं इतकें ममताळू व निर्दोष वर्तन होतें कीं, इ-
तका कडक याविषयीं वाद झाला तरीं त्यांजविषयीं कोणी एक ब्रही त्यांस
प्रतिकूळ काढला नाहीं. एजंट व कारभारी यांचा साक्षात् संबंध आठ दहा
महिने होता व एवढ्या काळांत महाराजांच्या चित्तवृत्तींत त्यांच्यामुळें फरक झा-
ला असें म्हणणें कधींही बरोबर होणार नाहीं, व वास्तविक तसा प्रकारही
नव्हता.

असो येथील व्यवस्थेनें महाराजांची व्हावी तशी सुधारणा होत नाहीं, अ-
सें पाहून पूर्वी श्री· सुधोळकरांस व नंतर वाडीकरांस राजकोटास राजकुमार-

महाराजांस राजकोटास पाठवितात.

कालेजांत पाठविलें होतें, त्याप्रमाणें महाराजांसही पाठ-
वून कांहीं सुधारणा होते कीं काय? तें पाहावें असा वि-
चार मनांत आणून महाराजांसही मे· एजंटसाहेबांनीं या
बद्दल विचारिलें. त्यांनींही तिकडे जाण्याची खुषी दर्शविली. तेव्हां सरका-
रास लिहून सरकारची मंजुरी आल्यावर सन१८७८ सालीं आक्टोबर म-
हिन्यांत महाराजांस निपाणकर व म्हैसाळकर यांसहवर्तमान राजकोटास
पाठविलें. यावेळीं रावबहादूर बर्वे हे रजेवर असून राव बहादूर येशवंत मो-
रेश्वर केळकर हे त्यांच्या जागीं स्टेटकारभारी होते. महाराजांबरोबर राजको-
टास जाण्याचें त्यांचे ट्यूटर आजगांवकर यांणीं कबूल न केल्यामुळें सिर-
जकरांकडे असलेले ट्यूटर बाळाजी प्रभाकर मोडक यांस ट्यूटर नेमिलें.
महाराज नवंबर महिन्यांत राजकोटास पोंहोंचले व राजकुमार कालेजांत जा-
ऊं लागले. तेथें मार्च अखेरपर्यंत सर्व ठीक चाललें होतें. परंतु तेथेंही म-
हाराजांच्या अंतर्गत स्वभावांत कांहीं अनुकूल फेरफार झाल्यासारखें दिस-
लें नाहीं. तथापि एप्रिल महिन्यांत सुटी झाल्यावर स्वारी परत करवीरीं सुख-

महाराज करवीरीं येतात व सररिचर्ड टेंपल यांचें करवीरीं आगमन

रूप आली. येथें आल्यावर त्यांच्या वृत्तींत विशेष वाईट फे-
रफार दिसूं लागला. जून महिन्यांत मुंबईचे गव्हरनर सर
रिचर्ड टेंपल करवीरीं येणार होते म्हणून त्यांच्या मुला-
खतीकरितां महाराज मे अखेर जाणार होते तें राहित झा-
लें. गव्हरनरसाहेब येऊन दरबार व भेटी वगैरे झाल्यावर त्यांच्या हातें न-

वीन राजवाड्याच्या पायाचा दगड बसविण्याचा समारंभ झाला. यावेळीं महाराजांस नामदारसाहेबांनीं जो उपदेश केला, त्यावरून तर महाराजांचें मन बरेंच बिघडलें, व दिवसानुदिवस पुढें पाऊल पडत चाललें. नामदार साहेबांची स्वारी गेल्यावर महाराजांची राजकोटास रवानगी झाली. स्थळ बदलल्यानें कदाचित प्रकृतींत फेरबदल होईल असें वाटलें परंतु स्वारी राजकोटास पोहोंचल्यापासून अधिकाधिकच भ्रमिष्टासारखें करूं लागले. अभ्यास वगैरे मुळींच बंद झाला. तेथून आक्टोबर महिन्यांत परत मुंबईस आणिलें. तेथें रावबहादूर बर्वे हे येऊन त्यांस आराम पडण्याकरितां खटपट सुरू झाली. डाक्टर हंटर, कुक व मर्फी यांची कमिटी नेमून त्रिवर्गास महाराजांची प्रकृति दाखविली, व त्यांचे उपाय सुरू झाले.

महाराज राजकोटास जातात व प्रकृति फार बिघडते.

मुंबईस आणून औषधोपाय सुरू करितात.

तेथें कांहीं दिवस राहून महाबळेश्वरास न्यावें असा डाक्टरांनीं सल्ला दिला. महाबळेश्वर येथें डाक्टर मर्फी यांनीं औषधोपाय करावे असें ठरलें. पुढें डाक्टर मर्फी यांची स्वतंत्र महाराजांकडे नेमणूक झाली. महाबळेश्वर येथें म्हणण्यासारखा आराम पडेना. तेव्हां त्यांस निळगिरीस नेलें. यावेळीं रावबहादूर बर्वे यांची प्रकृति नादुरुस्त झाल्यामुळें त्यांनीं रजा घेतली व निळगिरीस स्वारीबरोबर रावबहादूर केळकर गेले. तेथें सुमारें तीन महिने ठेवून परत पुण्यास आणिलें, व त्यांच्या पूर्व घरच्या मातापितरांसही त्यांच्याजवळ ठेवून पाहिलें. तेथून परत करवीरास आणून पाहावें असा विचार होऊन, त्यांस करवीरास आणिलें.

महाबळेश्वरीं व निलगिरीवर नेऊन परत पुण्यास आणितात.

पुण्याहून करवीरीं आणून पुनः परत पुण्यास नेतात.

त्यावेळीं त्यांची उस्तवारी वगैरे करण्यास ग्रीन या नावाचा एक युरोपियन ठेविला होता. येथेंही कांहीं फरक पडेना तेव्हां पुनः पुण्यास नेऊन तेथून करवीरच्या सर्व माणसांस काढून नवीं माणसें ठेविलीं. पुढें महाराज पक्के भ्रमिष्ट झाले, असा पुष्कळ डाक्टरांचा अभिप्राय ठरला, तेव्हां त्यांस अहंमदनगरास नेऊन ठेविलें. आणि कोल्हापुरास राज्यकारभार चालविण्यास रीजन्सीकौन्सिलाची स्थापना केली. अहंमदनगरास असतां सन १८८३ सालीं दिसेंबर महिन्याचे २५ व्या तारखेस महाराज मरण पावले. तेथें प्रेत दहन करून करवीरीं अस्थि व रक्षा आणून यथाविधि उत्तरकार्य केलें. शिवाजी महाराज एकंदर १२

पुण्याहून अहंमदनगरास पाठवितात व तेथें त्यांचा काळ होतो.

वर्षें गादीवर होते. मरण काळीं त्यांचें वय सुमारें २२ वर्षांचें होतें.

---

# एजंटी कारकीर्द.

## (राज्यकारभार.)

### इ० स० १८६६ ते १८८२ प०

### बाबासाहेब महाराज मरण पावल्यापासून रिजन्सीची स्थापना होईपर्यंत ब्रिटिश देखरेखीखालीं चाललेला राज्य-कारभार.

बाबासाहेब महाराज सन १८६६ सालीं आगस्ट महिन्याच्या चवथ्या तारखेस मरण पावले, व त्यांचे दत्तक पुत्र अल्पवयी असल्यामुळें पोलिटिकल एजंट यांच्या साक्षात देखरेखीखालीं कारभार सुरू झाला. पुढें

उपोद्घात.

राजाराम महाराजही कारभार हातीं घेण्यापूर्वींच इ० सन १८७० सालीं नवंबर महिन्याचे ३० वे तारखेस विलायतेहून परत येत असतां मार्गांत मरण पावले. यामुळें त्यांनीं साक्षात् राज्यकारभार मुळींच पाहिला नाहीं. तदनंतर त्यांचे दत्तक पुत्र शिवाजी महाराज हे अल्पवयी असल्यामुळें राज्यकारभार पोलिटिकल एजंट यांच्याच साक्षात् देखरेखीखालीं चालला. त्यांचेंही वय राज्यकारभार हातीं घेण्याजोगें झालें;

परंतु त्यांची प्रकृति बिघडून ते भ्रमिष्ट झाले, व त्यांचा रोग असाध्य आहे असें ठरलें. त्या समयीं आज कित्येक वर्षे कोल्हापूर राज्याचा जो कारभार थेट ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या साक्षात् देखरेखीखालीं असल्यानें स्वराज्याचा उपभोग मिळण्याची इकडील लोकांस स्वभावतःच संधि येईना, म्हणून दुसऱ्या रीतीनें तरी लोकांस स्वराज्यसुख मिळावें, या हेतूनें मुंबई सरकारानें रीजन्सीची स्थापना करून त्या मंत्रीमंडळाच्या हवालीं सर्व राज्यकारभार सन १८८२ सालीं मार्च महिन्याच्या १६ व्या तारखेस केला, व तेव्हांपासून कोल्हापुरास पुनः स्वराज्य झालें. राजाराम महाराज व शिवाजी महाराज हे उभयतां गादीवर मात्र होते. परंतु त्यांनीं स्वतः राज्यकारभार मुळींच केला नाहीं. या करितां सन १८६६ माहे आगस्ट तारीख ४ पासून सन १८८२ माहे मार्च तारीख १६ पर्यंत म्हणजे पंधरा वर्षे सात महिने १२ दिवस कोल्हापूर येथील निरनिराळ्या पोलिटिकल एजंटांच्या साक्षात् देखरेखीखाली राज्यकारभार चालला, व त्या काळांत जे फेरफार व ज्या सुधारणा झाल्या, व तेणेंकरून या प्रांतास जी भरभराटी आली, त्यांचें सर्व श्रेय त्यांस व ब्रिटिश सरकारास आहे. यास्तव सदर दोन महाराजांचीं चरित्रें स्वतंत्र देऊन या काळच्या राज्यकारभाराची हकीकत वेगळी देण्याचा विचार केला आहे. त्याच प्रमाणें रीजन्सी काउन्सील कारभार करीत असतां शिवाजी महाराज मरण पावले व त्यांचे दत्तक पुत्र श्री. शाहू महाराज हल्लीं गादीवर आहेत. यांचे अल्पवयांत प्रथम रीजन्सी काउन्सिल व नंतर काउन्सील आफ् आडमिनीस्ट्रेशन आजपर्यंत (सन १८९१) राज्यकारभार करीत आहे. त्यांच्या कारभाराची हकीकत वेगळी देणार आहों.

वर सांगितलेंच आहे कीं, या पंधरा सोळा वर्षांत कोल्हापूर राज्याचा सर्व कारभार या काळांत वेळोवेळीं जे पोलिटिकल एजंट नेमण्यांत आले, त्यांच्या साक्षात् देखरेखीखालीं चालला. यास्तव प्रथमतः या काळांत पोलिटिकल एजंट यांच्या जाग्यावर कोणकोणाच्या नेमणुका झाल्या, व ते कोठपासून कोठपर्यंत त्या हुद्यावर होते, तें प्रथम सांगितलें म्हणजे त्यांच्या कारकीर्दीत जे फेरफार व ज्या सुधारणा झाल्या त्यांचें सांगणार आहों तें समजण्यास सुलभ पडेल.

पोलिटिकल एजंट.

बाबासाहेब वारले त्या सुमारास कर्नेल **जार्ज स्लायगो अलेक्झांडर अंडरसनसाहेब** यांची नेमणूक सन १८६६ सालीं पोलिटिकल एजं-

ट या जागीं झाली. हे मध्यें एक वेळ तीन महिन्याच्या रजेवर गेले

कर्नल जी. एस. ऐ. अंडरसन

होते व त्यावेळीं त्यांच्या जागीं कर्नल स्नायडर यांचीच पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांची नेमणूक झाली होती. पुनः अंडरसन साहेब परत आल्यावर सन १८७४ सालीं डिसेंबर महिन्यांत काम सोडून दोन वर्षांचे रजेवर गेले, व रजा भरल्यावर पेनशन घेऊन तिकडेच राहिले. व कर्नल स्नायडर यांची कायमची नेमणूक त्यांच्या जाग्यावर झाली. यावरून म्हणजे चारवर्षे राजाराम महाराज गादीवर असतां सर्व काळ व शिवाजी महाराज गादीवर असतां चार वर्षे असा यांनीं राज्यकारभार केला. म्हणजे ज्या पंधरा सोळा वर्षांच्या कारकीर्दीची हकीकत लिहिणार आहों, त्यापैकीं महत्तम काळ पर्यंत हेच कारभार करीत होते. व हेच आरंभीं असल्यामुळें कारभाराच्या निरनिराळ्या खात्यांत नवी शिस्त सुरू करण्याचें व चांगलें वळण लावून देण्याचें जोखीम यांवरच पडलें, व त्याबरोबरच आपल्या इच्छेप्रमाणें फेरफार करण्यास व नवीन सुधारणा करण्यास त्यांस संधि मिळाली. हल्लीं जो कारभार चालला आहे. त्या इमारतीचा सर्व पाया यांनींच घातला. व इमारतीचे भाग यांनींच आखून टाकिले, आणि कांहीं भाग पुरेही केले. यांच्या मागून आलेल्यानीं राहिलेले भाग पुरे केले, व कांही नवीन दालनें मात्र जोडिलीं. यांनीं मुख्यत्वें विद्याखात्यांत व काटकसरीनें खर्च करण्याविषयीं ज्या सुधारणा केल्या त्यांच्या योगानें त्यांचें नांव या इलाख्यांत अमर होऊन राहिलें आहे, असें पुढील वर्णनावरून दिसून येईल. यांच्या कारकीर्दीत ज्या सुधारणा झाल्या त्यांचें सर्व यश यांसच आहे. स्टेट कारभारी हे यांजबरोबर अखेरचीं चार वर्षे होते. त्यांस या कारकीर्दीतील सुधारणांचा वांटा देतां येत नाहीं. तथाप सुरू केलेले फेरफार व सुधारणा अमलांत आणण्यास यांनीं सहाय्य केलें एवढें म्हटलें पाहिजे.

कर्नल अंडरसन साहेब सन १८७४ सालीं पेनशन घेऊन गेल्यावर त्यांच्या जागीं कर्नल स्नायडर यांची नेमणूक झाली. हेही मध्यंतरीं एक वेळ तीन म-

कर्नल स्नायडर.

हिन्याची रजा घेऊन विलायतेस गेले होते, व त्यावेळीं त्यांचे जागीं कर्नल बार्टन यांची नेमणूक झाली होती. परंतु रजेवरून परत आल्यावर सन १८७९ सालीं डिसेंबर महिन्यांत पेनशन घेऊन विलायतेस गेले. या प्रमाणें अंडरसन साहेबांच्या खालोखाल बरीच म्हणजे ५ वर्षे राज्यकारभार या-

च्या हातीं होता, व शिवाजी महाराज भ्रमिष्ट झाले तेव्हांही हेच होते. यांच्या कारकीर्दीत सुधारणेचीं आरंभिलेलीं कामें तडीस जाऊन कांहीं नवीनही फेरफार यांनीं केले,आणि राजवाडा व आलबर्ट एडवर्ड हास्पिटल, कळंबा तलाव व रंकाळा तलाव हीं मोठीं कामें सुरू झालीं. आंबेघांटचा रस्ता पुरा झाला. पेट्यांनीं मामलेदार कचेऱ्या, धर्मशाळा वगैरे कित्येक कामें झालीं. कोल्हापूर येथें नवीन जंगलखातें यांनींच स्थापिलें, व राजाराम कालेज स्थापण्याविषयीं यांनींच रिपोर्ट केला. सर फिलिप वुडहौस व सर रिचर्ड टेंपल या दोन गव्हरनरांच्या स्वाऱ्या करवीरीं आल्या होत्या. यांच्या कारकीर्दीतील सुधारणांचें सर्व यश यांसच न देतां त्या वेळचे स्टेट कारभारी यांचा वराच त्यांत वांटा होता, असें म्हटलें पाहिजे. हे येण्यापूर्वीं कारभारी यांचा अम्मल पूर्ण बसला होता, व सर्व राज्यकारभारांत ते एक मुख्य असून त्यांची सल्ला हरएक कामीं एजंट घेत होते. यास्तव या कारकीर्दींतील सर्व बऱ्या वाईट गोष्टींचे कारभारी हे पूर्ण वांटेकरी होते, असें म्हणणें भाग आहे.

कर्नल पार हे सन १८७९ सालीं दिसेंबर महिन्यांत कोल्हापूर येथें एजंटीचे कामावर आले, व सन १८८१ माहे आगस्ट तारीख २१ रोजीं गेले. हे सारे दीड वर्ष कारभार करीत होते. यांच्या कारकीर्दीत राजाराम कालेजाची स्थापना झाली. मागील कारकीर्दीत जी शिवाजी महाराजांची भ्रमिष्ट स्थिति झाली होती, ती तशीच कायम राहिली. यांच्या कारकीर्दीत सर जेम्स फर्ग्यूसन मुंबईचे गव्हरनर यांची स्वारी सन १८८१ सालीं मार्च महिन्यांत आली होती, व त्या वेळीं नवीन दवाखान्याच्या पायाचा दगड रोविला, व हायस्कुलच्या मुलांस बक्षिसें वांटलीं. यांच्या कारकीर्दीतच कोणी घोडेबावा हा शिंमासाहेब आहे असें ढोंग करून कित्येक लोकांनीं इंग्रज अम्मलदारांस मारण्याचा व लुटण्याचा बेत केला. परंतु त्यांचा बेत फसला, व सर्वांस पकडलें व चौकशी करून शिक्षा दिल्या. याच वेळीं सन १८८१ सालीं कोल्हापूरची खानेसुमारी झाली. कर्नल पार.

कर्नल पार गेल्यावर त्यांचे जागीं सन १८८१ सालीं सपटंबर महिन्यांत कर्नल रीव्हिज साहेब एजंटीचे कामावर आले, व सन १८८२ सालीं मार्च महिन्यांत रीजन्सीची स्थापना होईपर्यंत हेच कारभार पहात होते. यांनीं सारे साडे पांच महिने कारभार पाहिला. या यांच्या छोट्या कारकीर्दीत महाराजांची भ्रमिष्ट स्थिति होती तशीच होती. राव बहादूर महादेव वासुदेव ब- कर्नल रीव्हिज.

वे स्टेट कारभारी यांजवर पुण्याच्या कित्येक वर्तमानपत्रकर्त्यांनीं महाराजांच्या आमिष्टपणाच्या संबंधानें खोटे दोषारोप केले होते. त्याबद्दल त्यांजवर फिर्यादी करून दोषमुक्त होण्याबद्दल त्यांस सरकारचें सांगणें झालें. त्यांनीं मुंबईस फिर्यादी केल्या. त्यांत ते निर्दोष ठरून वर्तमानपत्रकर्त्यांस शिक्षा झाल्या. अखेर रिजन्सीची स्थापना झाली.

वेळोवेळीं जे कारभारी झाले, त्यांसही राज्यकारभारांतील सुधारणांचें श्रेय कांहीं अंशीं दिलें पाहिजे. याकरितां या काळांत कोण कोण कारभारी झाले, त्यांपैकीं राज्यांतील सुधारणा करण्यास कोणा कोणाचें विशेष सहाय्य झालें तें सांगितलें पाहिजे.

कारभारी.

बाबासाहेब वारले तेव्हां स्टेट कारभाऱ्याचे कामावर रामराव ताडपत्रे होते. बाबासाहेबांच्या पश्चात तेच काम पाहात होते. सन १८६७ सालीं मे महिन्याच्या ९ व्या तारखेस ते वारले, व त्यांच्या कुटुंबास १०० रुपये पेनशन दिलें. अँडरसन साहेबांच्या कारकीर्दीच्या अखेरीस ज्या सुधारणा सुरू झाल्या त्यांत रामरावांचें कांहीं अंग होतें असें म्हणण्यास कांहीं आधार नाहीं. कारण रामरावजी हे फार वृद्ध झाले असून त्यांच्या अंगीं फार मेहनतीचें व विचाराचें काम करण्याचा नकवा राहिला नव्हता.

रामराव नृसिंह ताडपत्रे.

रामरावजी वारल्यावर त्यांच्या जागीं लागलीच दुसऱ्या कोणाची नेमणूक न करितां सदरअमीनाचे जाग्यावर नारायण रघुनाथ हे होते, व त्यांस मुलकी कामाचा चांगला अनुभव होता. सबब त्यांस असिस्टंट कारभारी नेमून त्यांच्या मदतीनें अँडरसन साहेब स्वतः कारभार चालवूं लागले. हेही फार अनुभविक पण वृद्ध व जुन्या चालीचे असून काम मोठ्या नेकीनें व इमानानें करीत. अँडरसन साहेबांचे हुकूम हे योग्य रीतीनें अमलांत आणीत. याहून जास्त यांच्या हातून कांहीं झाल्याचें दिसत नाहीं. हे असिस्टंट कारभारी असतां यांनीं कांहीं एखादी सुधारणा सुचविली असें म्हणतां येत नाहीं.

नारायण रघुनाथ असि० कारभारी

राजाराम महाराज मोठे होत चालले व त्यांच्या हवालीं राज्यकारभार करण्याचा समय लौकरच येणार तेव्हां त्यांस सहाय्य करण्यास पूर्व कारकीर्दीत तयार झालेले कारभारी असणें अवश्य आहे. याकरितां दरमहा ५०० रुपये पगारावर इंग्रजी भाषा जाणणारा असा हुषार व विद्वान् मनुष्य कारभाऱ्याचे जाग्यावर नेमण्याविषयीं सरकारास लि-

रावबहादूर महादेव वासुदेव बर्वे.

हून अंडरसन साहेबांनीं सरकारची मंजुरी घेतली; आणि सरकारच्या हुकमानें राव बहादूर महादेव वासुदेव बर्वे धारवाड जिल्ह्याचे डेप्युटि कलेक्टर यांची स्टेट कारभारी या जाग्यावर प्रथम सहा महिनेपर्यंत नेमणूक झाली. व ते सन १८७० च्या जून महिन्याच्या ९ व्या तारखेस करवीरीं येऊन कामावर रुजू झाले. पुढें तेच कायम झाले. सन १८७४ सालीं त्यांचा पगार ८०० रुपये झाला, व पुढें सन १८७८ सालीं १००० रुपये पगार झाला. आणि नंतर सन १८८२ सालीं रीजन्सीची स्थापना झाली, तेव्हां दिवाणाचे जागीं त्यांचीच नेमणूक झाली. या प्रमाणें ज्या काळाविषयीं लिहिणार त्यापैकीं सुमारें बारा वर्षें हे कारभाऱ्याचे कामावर होते. या काळांत पोलिटिकल एजंट वेळोवेळीं बदलले परंतु हे सर्वांच्या कारकीर्दींत काम पहात होते. वर लिहिलेंच आहे कीं, कर्नल अंडरसन साहेबांच्या कारकीर्दींतील सुधारणांत यांचें अंग कमी होतें. परंतु त्यांच्या मागून जे पो० एजंट झाले, व त्यांच्या कारकीर्दींत जे फेरफार झाले, त्या सर्वांत यांचें अंग होतें. यांनीं आपल्या कारकीर्दीचा अंमल सर्व प्रांतांत बसविला होता, व सर्व महत्वाच्या कामांत हे मुख्य चालक होते. वास्तव या काळांत ज्या बऱ्या वाईट गोष्टी झाल्या त्यांचे हे पूर्ण वांटेकरी होते.

रावबहादूर येशवंत मोरेश्वर केळकर.

कित्येक वेळां राव बहादूर बर्वे आजारीपणामुळें रजेवर गेले. एक वेळीं फ्यामिन कमिशनमध्यें मेंबर नेमिल्यामुळें गेले होते, शिवाजी महाराज प्रवासिए झाले तेव्हां त्यांजबरोबर होते; व शेवटीं अब्रू नुकसानीच्या खटल्याकरितां गेले होते. या सर्व वेळीं त्यांच्या जागीं मिरजेचे कारभारी रावबहादूर येशवंत मोरेश्वर केळकर यांची नेमणूक झाली होती. यांनीं एकंदर सरासरीनें तीन चार वर्षें कारभाऱ्याचें काम केलें. हे रावबहादूर बर्वे यांच्या वळणावरच काम चालवीत. तथापि हे जात्या फार हुषार व विद्वान असल्यामुळें या कारकीर्दींतील सुधारणांचे श्रेय कांहीं अंशीं यांसही देणें रास्त आहे. राजाराम कालेज स्थापन करण्याचें श्रेय तर सर्वस्वीं यांसच दिलें पाहिजे. रीजन्सीची स्थापना झाल्यावर यांची कायमची नेमणूक सरसुभे या जागीं झाली, व आरंभीं अक्टिंग दिवाणही हेच होते.

रामराव नाडपत्रे असे पर्यंत कारभाऱ्यांची कचेरी वेगळी होती. ते वारल्यावर कारभाऱ्यांची कचेरी आपल्या कचेरींत नेऊन कोल्हापूर दरबारचें मराठींतु-

न चाललेलें सर्व काम त्या कचेरींत व्हावें, आणि सर्व कागदांवर कारभारी व पोलिटिकल एजंट यांच्या सह्या व्हाव्या, व त्या शिवाय चिटणीस यांची सही असावी, अशी शिस्त सुरू केली. येणेंकरून कोणतीही गोष्ट एजंटाच्या दरवलगिरी शिवाय होईना, व कोणतीही रक्कम एजंटाच्या मंजुरीशिवाय खर्च होईना. यामुळें काटकसरीनें खर्च करण्यास व सर्व कारभार एक द्वारानें चालण्यास उपयोग झाला. परंतु कारभारी यांचें आफीस स्वतंत्र असून त्यांजकडे कांहीं स्वतंत्र अधिकार असल्यानें कोणतीही गोष्ट करितांना जी जबाबदारी कारभारी यांस वाटली असती ती नाहींशी झाली. सर्व हुकुमांवर पोलिटिकल एजंटाची सही असल्यानें कोणत्याही गोष्टी विषयीं दाद मागण्यास मुंबई सरकाराशिवाय मार्ग खुंटला. आणि सर्व हुकूम एजंटाच्या दरवलगिरीनें होतात, तेव्हां सर्व जबाबदारी आपणावर नाहीं असें कारभारी यांस वाटूं लागलें. परंतु वस्तुतः सर्व मराठी प्रकरणें कारभारी मात्र पाहूं शकत, व त्यांच्या इच्छेप्रमाणें सुनावणी करून एजंटाचा हुकूम घेत. सर्व खात्याचीं कामें यःकश्चित् लहान गोष्टींपासून मोठ्या महत्वाच्या कामापर्यंत कारभारी यांचे कचेरींत होऊं लागल्यानें काम फार वाढलें, व दररोज भारा भारा कागद जमूं लागले. तेव्हां स्वाभाविकच सर्व प्रकरणें खुद्द कारभारी यांसही पाहण्यास सवड होत नसल्यामुळें त्यास चिटणिसांवर विशेष अवलंबून राहवें लागूं लागलें. यामुळें कारभारी यांस चिटणिसांवर व एजंट यांस कारभारी यांजवर अवलंबून राहावें लागत असून अखेर झेप्यावर एजंटाची सही पडे आणि सर्व मार्ग खुंटे. हा या पद्धतीत मोठा दोष होता. हीच पद्धत रीजन्सी होईपर्यंत चालू होती.

*जमाबंदी व मुलकी कामाची शिस्त.*

कर्नल अंडरसन साहेबांच्या कारकीर्दीत कोल्हापूर इलाख्यांतील बहुतेक संस्थानिक व सरदार हे अल्पवयी असल्यामुळें ( हे कामावर आले तेव्हां फक्त प्रतिनिधि मात्र मुखत्यारीनें आपल्या संस्थानचा कारभार करीत होते, व तेही सन १८७१ सालीं तारीख २४ फेब्रुवारीं रोजीं वारले. ) सर्व पेठ्यांनीं व संस्थानांनीं कामाची एक तऱ्हेची शिस्त बसवितां आली. पूर्वी पांच पेटे होते. म्हणजे अळतें व शिरोळ या दोनी पेट्यांचीं कामें एकाच मामलेदाराकडे होतीं. त्यांचे पृथक्‌ दोन तालुके केले. सर्व मामलेदारांचे पगार वाढविले. कित्येक जुन्या व वृद्ध कामगारांस पेनशन देऊन कित्येक मामल्यावर व पोटसंस्थानच्या कारभाऱ्यांच्या जाग्यांवर खालसांतून हुषार

व अनुभविक अशा लोकांस आणून नेमिलें. सर्व मामलेदार व पोटसंस्थानें व जाहागिरी यांवरील कारभारी यांचे हिशेब तपासण्याकरितां एक दफ्तरदार नेमून त्याच्या वेळीं हिशेब पुरे करून तपासण्याची वहिवाट सुरू केली. वारस चौकशांची अवल चौकशी दफ्तरदार यांणीं करून प्रकरणें हुजूर निकालाकरितां पाठवावीं असें ठरविलें. तसेंच न्यायखातें, पब्लिक वर्क्स खातें, शाळाखातें वगैरे सर्व खात्यांचीं कामें खुद्द एजंटाच्या देखरेखगिरीनें होऊं लागलीं, व त्यापासून फार उपयोग होत असे.

बहुतेक पेट्यांनीं एजंटसाहेब व कारभारी दरसाल जाऊन त्यांचीं दफ्तरें व कामें तपासूं लागले. दफ्तरदार जाऊन हिशेब तपाशीत. एजंट रोज सकाळीं शहरांत शाळा पाहण्यास, सरकारी कामें चाललीं असतील तीं पाहण्यास, तसेंच तुरुंग, इस्पितळ, बागा वगैरे फिरावयास हमेष जात. हीच शिस्त राव बहादूर बर्वे व केळकर यांनींही ठेविली होती.

खालसा इलाख्या प्रमाणें दोन हापत्यांनीं वसूल घेण्याची व बाकी न राहूं देण्याची शिस्त सरसास चालू केली; व मामलेदार यांणीं सर्व खेडीं फिरून पाटील कुळकरण्याचें लिहिणें तपासून शेरे करावे, असा हुकूम दिला. नवीन कारकून वगैरे नेमणें ते मुलकी परीक्षा पास झाल्याशिवाय कोणास नेमावयाचें नाहीं, असा ठराव केला. विद्याखातें साक्षात् डायरेक्टर यांच्या देखरेखी खालीं जाण्यापूर्वी त्यांच्या खात्रीचे कामगार येथें नेमिलेले नसल्यामुळें येथें मुलकी परीक्षा पूर्वी होत नव्हता. पुढें डेप्युटि इन्स्पेक्टराची डायरेक्टरकडून नेमणूक झाल्यापासून येथें खालसाप्रमाणें सन १८६७ पासुन मुलकी परीक्षा सुरू झाली, व त्या परीक्षेंत पास झाल्याशिवाय कोणास नोकरीस ठेवावयाचें नाहीं असा हुकूम अमलांत आणिला, व सर्व नेमणुका हुजूरून होऊं लागल्या. पूर्वींचे जे बदली व उमेदवार होते, त्यांची परीक्षा घेण्यास एक कमेटी नेमून जे परीक्षेंत पास झाले. त्यांची यादी केली, व जागा रिकाम्या झाल्या म्हणजे नेमणुका करूं लागले. याबहुतेक सुधारणा राव बहादूर बर्वे हे येण्यापूर्वींच झाल्या. नंतर ते आल्यावर खालसांतील मुलकी व जमाबंदी शिस्त अधिक जारीनें सुरू झाली. हळू हळू सर्व मामलेदारांच्या कचेऱ्यांकरितां नवीन इमारती बांधिल्या. अळतें पेट्याचें मुख्य स्थान हातकणंगलें करून तेथें पेटा कचेरी बांधून तेथें पेटा केला. हा गांव मिरज सांगलीच्या रस्त्यावर असल्यानें जास्त सोईचा

होता. तसेंच आजपर्यंत भुदरगडावर पेटा कचेरी असे. यामुळें कामकाजाकरितां गडावर चढून जाण्याची लोकांस फार गैरसोय होत असे. याकरितां गडाखालीं गारगोटी या नदीकांठच्या गांवीं पेटा कचेरी बांधून तेथें पेटा नेला. पन्हाळ्यास व शिरोळासही मामलेदार कचेऱ्या बांधिल्या.

मामलेदारांच्या कामावर मुख्यत्वें स्टेट कारभारी यांचीच कायती देखरेख असे. परंतु त्यांस नियमानें दरसाल सर्व पेटे व संस्थानें फिरून तपासणी करण्यास सवड सांपडत नसे. याकरितां ब्रिटिश इलाख्यांतील असिस्टंट कलेक्टरास इतके अधिकार असलेले दोन कामगार नेमून त्यांजकडे मुल्की व जमाबंदी कामाची नियमानें सर्व ठिकाणीं जाऊन तपासणी करण्याचे अधिकार दिले. सर्व इलाख्याचे दक्षिण व उत्तर असे दोन भाग करून सन १८७४ सालीं कर्नल अंडरसन साहेबांच्या कारकीर्दींतच दोन डिस्ट्रिक्ट आफिसर या नांवाचे कामगार दरमहा अडीचशेहें रुपये पगारावर नेमिले. त्यांजकडे माजिस्ट्रेटचाही अधिकार दिला. त्याजबद्दल पुढें लिहिण्यांत येईल.

जमाबंदी किंवा वसूल

श्री० बाबासाहेब महाराजांच्या कारकीर्दींत ५ वर्षें कोल्हापूर खालसाचा वसूल खालीं लिहिल्याप्रमाणें होत होता:—

| इसवी सन १८६२।६३ | इसवी सन १८६३।६४ | इसवी सन १८६४।६५ | इसवी सन १८६५।६६ | इसवी सन * १८६६।६७ | पांच वर्षांची सरासरी. |
|---|---|---|---|---|---|
| ७,७४,४६४ | ९,०९,९१९ | ९,५३,१८८ | ९,८६,२२६ | ९,५०,४७२ | ९,१४,८५४ |

कर्नल अंडरसन साहेबांच्या आठ वर्षांच्या कारकीर्दींत खालीं दिल्याप्रमाणें वसूल होत गेला:—

| १८६७।६८ | १८६८।६९ | १८६९।७० | १८७०।७१ | १८७१।७२ | १८७२।७३ | १८७३।७४ | १८७४।७५ | सरासरी. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १०,९७,००५ | १२,९५,००० | ११,९३,०१२ | १३,०४,९६४ | १३,२२,८६१ | १३,१२,४०२ | १३,६२,३२२ | १४,२३,६६२ | १२,६६,४५२ |

* या सालीं एजंटी कारकीर्द सुरू झाली.

पुढील सात वर्षांचा वसूल खालीं दिला आहे.

| सन १८७५।७६ | सन १८७६।७७ | सन १८७७।७८ | सन १८७८।७९ | सन १८७९।८० | सन १८८०।८१ | सन १८८१।८२ | सात वर्षांची सरासरी. | पंधरा वर्षांची सरासरी. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२,६०,७६३ | १३,०२,०५७ | १४,५७,३५१ | १६,४४,०८० | १५,७१,१५५ | १५,१८,३०८ | १७,०१,५३२ | १५७८६२० | १२१४८११ |

या प्रमाणें या कारकीर्दींत राज्याचा वसूल एकसारखा वाढत गेला. दर रुपयास एक आणा लोकलफंड वसूल करण्याची सुरुवात याच कारकीर्दीत सुरू झाली. व त्यानें दरसाल लाखावर उत्पन्न वाढलें. वारसचौकशा होऊन बरींच बेवारशी उत्पन्नें खालसा झाल्यानें वसूल वाढला. पडजमिनीची लागवड झाल्यानेंही उत्पन्न वाढलें. अलीकडे जंगलखात्याचें नवीनच उत्पन्न येऊं लागलें. स्टांप, दस्तऐवज नोंदणें, दारू कलालीचा मक्ता वगैरे अनेक बाबी वाढल्या. शिवाय सर्व प्रांताची मोजणी व तरमबंदी झाल्यानें लोकांचें हित झालें, व यानेंही सरकारचें थोडें उत्पन्न वाढलें, व याच प्रमाणें खर्चाचें मानही वाढत गेलें. तरी जमेपेक्षां जास्त किंवा अव्यवस्थित रीतीनें खर्च न करितां दरसाल शिल्लक टाकीत गेले; व कांहीं शिल्लकेच्या प्रामिसरी नोटी घेत गेले, व त्याचें व्याजही येऊं लागलें. या काळांत सर्व खात्याचा खर्च वाढला, तरी या १५।१६ वर्षांच्या कारकीर्दींत सार्वजनिक रस्ते व इमारतींकडे व सरकारी इमारतींकडे वगैरेही फार खर्च झाला. तरी शिल्लक त्या मानानें अधिकाधिक टाकीत गेले. बाबासाहेब महाराज वारले, त्या वेळीं सर्व कर्ज फिटून खजिन्यांत ८,५६,८३१ रुपये शिल्लक राहिली होती. ती शिल्लक अंडरसनसाहेबांच्या कारकीर्दीत ते सन १८७४।७५ सालीं गेले तेव्हां २२ लक्ष रुपये झाली होती; तीच एजंटी कारकीर्दीच्या अखेरीस ३१ लक्ष पर्यंत वाढली. ज्या रकमेच्या प्रामिसरी नोटी घेतल्या होत्या त्याचें व्याज ही एक महत्वाची रक्कम वसुलांत येऊं लागली. या कारकीर्दीच्या शेवटल्या सहा वर्षांच्या जमाखर्च आणि शिल्लक यांच्या रकमा दिल्या आहेत. जमेच्या रकमांत विशेष प्रकारच्या जमा धरलेल्या असल्यानें मागील रकमांशीं यांचा मेळ नाहीं:—

| वर्ष. | वसूल. | खर्च. | शिल्लक. | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नोटी. | रोख शिल्लक. | एकूण. |
| १८७६।७७ | १९,९४,८६४ | २१,१२,६१० | २१,००,००७ | ३,७३,९०९ | २४,७३,९१६ |
| १८७७।७८ | २५,८०,२०२ | २३,२०,६३० | १८,५८,७०७ | ८,७४,७३३ | २७,३३,४४० |
| १८७८।७९ | २३,८७,६१३ | २१,८७,८६६ | २२,११,४०० | ७,२१,७८८ | २९,३३,१८८ |
| १८७९।८० | २१,३२,५५८ | २०,१४,४८३ | २३,८२,६०० | ६,६८,६५३ | ३०,५१,२५३ |
| १८८०।८१ | २१,१८,४८६ | १९,९२,०२९ | २३,०४,५०० | ९,१३,२१० | ३२,१७,७१० |
| १८८१।८२ | २२,१९,७६० | २२,३०,८४५ | २२,९९,५०० | ८,०७,२१५ | ३१,०६,६१५ |

खर्चाचें मानही याच प्रमाणें वाढत गेलें. सन १८७०।७१ सालीं एकंदर १,०७,७२,२८१ रुपये खर्च झाला. तो ५ वर्षांनीं सन १८७५।७६ सालीं ११,३८,२६८ पर्यंत वाढला, व एजंटी कारकीर्दीच्या अखेर सालीं २२,३०,८४५ रुपये खर्च झाला. या पैकीं सर्वांत फार खर्च पब्लिक वर्क्स म्हणाज इमारत कारखाना खात्याकडे झाला. सन १८७० पासून १८७५ पर्यंत दरसाल सरासरीनें तीन चार लाख रुपये खर्च होता. व पुढें ६।७ सालें ४।५ लक्ष या प्रमाणें झाला. सन १८७०।७१ पासून या कारकीर्दींत या खात्याकडे एकंदर ४८,९३,४५४ रुपये खर्च खुद्द कोल्हापुर इलाख्यांत झाला. पेटा संस्थानांतून या कामाकडे झालेला खर्च वेगळा आहे. सालवार खर्च खालीं दिला आहे. यांतच जुन्या व पूर्वींच्या कामाच्या दुरुस्तीचा खर्चही आला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १८७०।७१ | १,८०,०७२ | १८७६।७७ | ३,८१,०५५ |
| १८७१।७२ | ५,०२,९०४ | १८७७।७८ | ४,४१,०९५ |
| १८७२।७३ | ३,४२,४७४ | १८७८।७९ | ४,७९,११८ |
| १८७३।७४ | ३,७३,२२५ | १८७९।८० | ४,२३,४२५ |
| १८७४।७५ | ३,४२,३३२ | १८८०।८१ | ४,०४,५०१ |
| १८७५।७६ | ३,५८,६६७ | १८८१।८२ | ६,६४,४१६ |
| एकूण .. | २०,९९,७६४ | एकूण ... | २७,९३,६९० |

एकूण ४८,९३,४५४

खानेसुमारी:- या कारकीर्दींत दोन खानेसुमाऱ्या एक सन १८७२ साली व दुसरी सन १८८१ साली अशा झाल्या. दोनही वेळची लोकसंख्या खाली दिली आहे.

खानेसुमारी

| प्रांत. | पुरुष. | | स्त्रिया. | | एकूण. | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १८७२ | १८८१ | १८७२ | १८८१ | १८७२ | १८८१ |
| कोल्हापूर... | ३,१६,९४९ | ३,२१,९९१ | ३,०२,७५८ | ३,०२,८३६ | ६,१९,७०७ | ६,२४,८२७ |
| पोटसंस्थानें.. | ९२,६१० | ८८,६५६ | ९०,३७४ | ८६,७०६ | १,८२,९८४ | १,७५,३६२ |
| एकूण... | ४,०९,५५९ | ४,१०,६४७ | ३,९३,१३२ | ३,८९,५४२ | ८,०२,६९१ | ८,००,१८९ |

निरनिराळ्या धर्मांचे लोक दोनही वेळ खाली दिल्याप्रमाणें होते.

| साल. | हिंदु. | जैन. | मुसलमान. | ख्रिस्ति. | इतरधर्मी. | एकूण. |
|---|---|---|---|---|---|---|
| १८७२ | ७,२७,१३२ | ४३,०९३ | ३१,३६६ | १,१०० | ० | ८,०२,६९१ |
| १८८१ | ७,१९,१६४ | ४६,७३२ | ३२,०२२ | १,२५३ | १८ | ८,००,१८९ |

यावरून या इलाख्यांत हिंदु सुमारें ९/१० व इतर सारे १/१० आहेत. दुसऱ्या खानेसुमारीच्या वेळीं लोकसंख्या न वाढतां कांहीं थोडी कमी झाली. साधारण स्थितींत शेंकडा १० या मानानें लोकसंख्या वाढते. परंतु सन १८७६।७७ सालच्या दुष्काळामुळें कमी झाली असें अनुमान निघतें.

शाळांत शिकणारे, लिहितां वाचतां येणारे व न येणारे असे लोक खालील कोष्टकांत दाखविले आहेत. त्यावरून शिक्षणाचा प्रसार कसा होत चालला आहे हें लक्षांत येईल:-

| लोक. | शाळांत शिकणारे. | लिहितां वाचतां येणारे. | लिहितां वाचतां न येणारे. |
|---|---|---|---|
| पुरुष... ... | १०,२६६ | २१,०९६ | ३,७९,२८५ |
| स्त्रिया... .. | ४०७ | १७९ | ३,८८,९५६ |
| एकूण... | १०,६७३ | २१,२७५ | ७,६८,२४१ |

सन १८७२ सालापासून विद्येचा प्रसार विशेष होत गेला. या सालीं सरकारी शाळा १०१ असून त्यांत ४८७२ विद्यार्थी शिकत होते. सन १८८१ सालीं शाळांची संख्या १५० होऊन त्यांत शिकणारे विद्यार्थी ८,४०६ झाले. सन १८७२ सालच्या खानेसुमारीच्या वेळीं शाळांत शिकणाऱ्यांची संख्या ८,२२० होती. यांत खासगी शाळांतीलही लोक धरले होते. तीच सन १८८१ सालीं १०,६७३ झाली. शिकणाऱ्या व लिहितां वाचतां येणाऱ्या पुरुषांचें प्रमाण शेंकडा ७.६ आहे व अशा स्त्रियांचें सारें .१५ आहे. निरनिराळ्या जातींत हें प्रमाण कसें आहे तें खालीं दिलें आहे.

| जात. | शेंकडा पुरुष. | शेंकडा स्त्रिया. |
|---|---|---|
| ब्राम्हण ... ... ... | ७९.१ | १.६५ |
| जैन.. ... ... ... | १०.७ | .०४ |
| लिंगायत . ... ... | १०.६ | .०५ |
| मराठे... . ... ... | ८.६ | .०३ |
| मुसलमान. ... ... | ७.५ | .०३ |
| कुणबी... ... ... | १.५ | .०४ |

बाबासाहेब महाराजांच्या कारकीर्दींत डागवारी करून जमिनीची मोजणी होऊन साऱ्यांत फेरफार केले होते, व तेणेंकरून १,७५,००० रुपये

वसूल वाढला होता. ही डागवारी केवळ रामराव ताडपत्रे यांणीं आपल्या हाताखालील अनुभविक अशा कारकुनांकडून करविली होती. जरी डागवारीनें कांहीं सुधारणा झाली, तरी डागवारी मोजणी शास्त्रीय पद्धतीनें झाली नव्हती, व ती करण्यास लायख व वाकबगार माणसें नव्हतीं. याकरितां कर्नल अंडरसन साहेबांनीं सरकारची मंजुरी घेऊन ब्रिटिश इलाख्याप्रमाणें रेव्हिन्यु सर्वे सुरू करून ब्रिटिश इलाख्यांतील सर्व्हे कमिशनरच्या देखरेखी खालीं सन १८६७ सालीं सर्वे (पाहणी) सुरू केली. ती पुरी होण्यास सुमारें १५ वर्षें लागलीं, व रीजन्सी स्थापन झाल्यावर पुरी झाली. आतां सर्व पेटे व सर्व पोटसंस्थानें व सरंजाम यांची पाहणी होऊन तरमबंदी झाली आहे. सर्व पेट्याचे व गांवचे नकाशे तयार झाले आहेत. पूर्वींचे रयताव्याचे सर्व प्रकार मोडून नवीन रयतवारी प्रकार सर्वत्र सुरू केला, आणि पूर्वींच्या सर्व बाबी व पट्ट्या माफ केल्या. यापासून लोकांचें नुकसान न होतां एकंदरींत फायदा झाला. आपापल्या जमिनीच्या हद्दी कायम ठरून सरकार देणें असुक हें ठामपणें समजलें, व जमिनी सुधारण्यास उत्तेजन आलें. पूर्वी पाहणीवरून सारा ठरवीत, व कांहीं सुधारणा केली तर त्याबद्दल लागलीच दुसऱ्या वर्षी सरकारची बाब बसे. शिवाय सरकार देणें ठरविण्यास हलके सलके कारकून येत, व त्यांच्या मर्जीप्रमाणें सरकारबाबी जास्त कमी ठरत. डागवारी करण्यापूर्वीं सन१८६२।६३ सालीं काळीचा वसूल ७,००,७७० होत होता तो डागवारीनें ८,९७,७८० रुपये सन १८६७।६८ सालीं झाला होता. तोच रेव्हिन्यु सर्व्हे झाल्यावर सन १८८१।८२ सालीं ११,७७,७७० रुपये झाला. भुदरगड पेट्यास नवीन दर अद्याप लागू केले नव्हते. यानें शेंकडा २१ टक्के वसूल वाढला.

तरमबंदी.

तरमबंदी झाल्यावर आणि शिवाय बाबी व पट्ट्या माफ केल्यावर लोक शिक्षणास व लोकोपयोगी कामास मदत होण्याकरितां खालसा प्रमाणें रुपया मागें आणाप्रमाणें लोकलफंड बसविला. हा कर रयत व इनामदार अशा सर्वांवर बसवून त्याचा व्यय सदर कामांकडे करण्याची वहिवाट सुरू केली.

बाबासाहेब महाराजांस मुखत्यारी देण्यापूर्वीं जी इंग्रजी कारकीर्द झाली, त्यावेळीं सर्व दुमालदार लोकांच्या सनदा वगैरे नोंदून बिन सनदांचीं इनामें वगैरे जप्त करण्यात आलींच होतीं. नंतर दुमालदार मरण पावल्यावर त्यांचा जो योग्य वारस असेल तो ठरवून इनाम चा-

वारस चौकशी.

लवावयाचें आणि सरळ वारस नसल्यास खालसा करावयाचें असा नियम करून दुमालदार मयत होतांच जमीन जप्त करून वारस चौकशी करीत. हें काम बाबासाहेब महाराजांच्या कारकीर्दींत फार तुंबलें होतें. व याचें मोठें ओझें अंडरसनसाहेबांवर पडलें. दप्तरदार हे आरंभीं चौकशी करून पुरावा घेत, आणि आपल्या अभिप्रायासह निकालाकरितां प्रकरण हुजूरास पाठवीत. हें काम अतिशय झपाट्यानें चालविलें होतें. या वारस चौकशा कमेटीनें केल्यामुळें बेवारस अशीं पुष्कळ इनामें खालसा झालीं. या चौकशा करण्याविषयीं जे नियम केले होते ते खालीं दिले आहेत. त्याप्रमाणें वारसचौकशांचें काम चालत असे.

१. जीं देवस्थानें चालू असतील त्यांस ज्या जमिनी सनदेनें देवस्थानांकडे चालू असतील, किंवा सनद नसल्यास राज्यकर्त्या महाराजांच्या कारकीर्दींत भोग्य असल्याचें शाबीद केल्यास व देवस्थानें चालू असल्यास नजराणा घेतल्याशिवाय, जमिनी चालवाव्या.

२. धर्मादाय नेमणुका व नोकरी करण्याची नसतां जातीच्या तैनाती वंशपरंपरा चालण्याबद्दल सनदा दाखविल्यास किंवा सन १८३८ च्या पूर्वी ३० वर्षें भोग्य असल्याचें शाबीत केल्यास एक वर्षाचें उत्पन्न नजराणा घेऊन सरळ वारसास चालवावयाच्या. हिशेबी दाखल नसल्यास नेमणुकवाल्याकडे चालू असल्याचा दाखलाच मातब्बरीचा समजावा. सरळ वारस नसल्यास दत्तक वारसास चालविणें किंवा न चालविणें हें प्रत्येक प्रकरणाच्या सरदुरावर अवलंबून राहील, व त्यास सदर्मी सरकारची मंजुरी लागेल.

३. लष्करांत नोकरी करण्याबद्दल जे सरंजाम व नेमणुका असतील, त्यांस वरील दुसरा नियम लागू पडेल. आणि आतां नोकरीची जरूर नसल्यानें दरसाल ६॥ नोकरी अंश द्यावा लागेल.

४. लष्कराशिवाय दुसरी नोकरी करण्याबद्दल नेमणुका असल्या व त्या नोकरीची जरूर नसेल तर त्यांस दुसरा नियम लागू होईल. व नोकरी अंश खालीं लिहिल्याप्रमाणें द्यावा लागेल.

५. देशमुखी, देशपांडकी, नाडगौंडकी व दुसऱ्या असल्या वतनावर शेंकडा १५ रुपये प्रमाणें जुडी घेण्याची.

६. नायकी व अशा दुसऱ्या भारी नोकरीबद्दल जीं वतनें असतील त्यांवर शेंकडा २५ रुपये प्रमाणें.

७. पूर्वीं कायमची जानीची नोकरी करण्याकरितां ज्या जमिनीच्या नेमणुका चालत असतील, व ज्या नोकरीची आतां गरज नाहीं, त्या नेमणुकांवर शेंकडा ५० रुपये प्रमाणें.

एकंदर कोल्हापूर प्रांतापैकीं ¾ मुलूख दुमाला झाल्यामुळें करवीर सरकारास वसूल फार थोडा येत असे. परंतु मुख्य कांहीं संस्थानिक व जहागीरदार यांचे मुलूख शिवाय करून इतर सर्व दुमाला मुलखावरील मुलकी, दिवाणी व फौजदारी सर्व कामें करवीर सरकारास करावीं लागत. परंतु तिस्याहून जास्त मुलूख खालसा असल्यामुळें पैशाची बरीच टंचाई पडे. याकरितां मुंबई सरकाराकडून वारंवार लिहून येई कीं, इतका जो मुलूख दुमाला चालत आहे, त्याजबद्दल वारस चौकशा कसोशीनें करून बेवारस दुमाले खालसा करावे, व त्याचप्रमाणें वारस चौकशांचें काम फार लांबणीवर न टाकतां होईल तितक्या जलदीनें निकाल करावा असा हुकूम होता. याकरितां हीं वारसचौकशांचीं कामें अंडरसन साहेबांच्या कारकीर्दीपासून फार जारीनें व सख्तीनें चालू होतीं. याबद्दल जे नियम ठरविले होते, त्याप्रमाणेंच चौकशा होऊन निकाल होत. दरसाल ५।७ हजारांचा मुलूख खालसा होत जाऊन एजंटी कारकीर्दींत पाऊण लाखावर मुलूख खालसा झाला, व यानें वसुलास बरीच भर पडत चालली. स्टेट कारभारी रावबहादूर बर्वे यांची नेमणूक झाल्यापासून या कामाचा निकाल मुख्यत्वें त्यांच्या सल्ल्यानेंच होत असे, व लोकांची अशी समजूत झाली होती कीं, रावबहादूर हे वारसाविषयीं शंका येईल त्या ठिकाणीं मनास येईल त्यांचीं इनामें चालवितात, व बाकीच्यांचीं खालसा करितात. हा समज खोटा असून केवळ नियमाप्रमाणेंच काम चालत असे. तत्राप ही गोष्ट रावबहादूर बर्वे हे अप्रिय होण्यास बऱ्याच अंशीं कारण झाली होती.

**न्यायखातें:— दिवाणी—** न्यायखात्यांत मुनसफांच्या निकालांवर अपील पूर्वीं एकदम हुजूर म्हणजे पोलिटिकल सुपरिंटेंडेंटाकडे किंवा महाराजांस मुखत्यारी दिल्यावर खुद्द महाराजांकडे होत असे, व दिवाणी काम सन १८२७ च्या कायद्याप्रमाणें बहुतेक चाले

दिवाणी कामें.

मराठी ... ठाणे

परंतु कर्नल अंडरसन साहेबांच्या कारकीर्दीत एक मोठा फेरफार दिवाणी खात्यांत झाला. दिवाणी कामांत वाकबगार असा एक खात्यांतून कामगार आणून न्यायाधीश या हुद्यावर त्याची नेमणूक करून त्यांस खालसांतील डिस्ट्रिक्ट जज्जाचा अधिकार दिला. आणि मुनसफ व सदरअमीन यांच्या निकालांवरील अपिलें आणि १०,००० रुपयांहून जास्त रकमांचे अव्वल दावे व हक्कदार लोकांवरील अव्वल दावे घेण्याचा अधिकार दिला. आणि न्यायाधीशावर अपील पोलिटिकल एजंटाकडे व्हावें असें ठरविलें. तसेंच ५०० रुपयेपर्यंत रकमांच्या दाव्यांत मुनसफांच्या ठरावांवर एकच अपील न्यायाधीशाकडे व्हावें असेंही ठरविलें. याप्रमाणें एक नवीन दिवाणी अपीलकोर्ट झाल्यानें अपीलांचा निकाल लौकर होऊं लागून दिवाणी काम झटपट होऊं लागलें. ही वहिवाट दिवाणी कामांत एजंटीच्या अखेर कारकीर्दीपर्यंत चालली होती.

कर्नल अंडरसन साहेबांची नेहमीं अशी इच्छा असे कीं, जबाबदारीच्या जाग्यावर उत्तम मनुष्यास नेमावयाचा व त्यावर पूर्ण विश्वास ठेवावयाचा. सुदैवानें त्यांनीं आपल्या कारकीर्दीत जे मोठे अंमलदार आणिले ते सर्व फार हुषार अनुभविक व विद्वान् असे होते. न्यायाधीशाची जागा करून त्याकडे दिवाणी अपील घेण्याचा अधिकार द्यावयाचा असें ठरल्यावर त्या जागीं त्यांनीं राव बहादूर महादेव गोविंद रानडे एम्. ए. एल्. एल्. बी हे त्यावेळीं अक्कल-कोटास कारभारी होते. त्यांची नेमणूक सन १८६७ सालीं केली. परंतु त्यांस एल्फिन्स्टन कालेजांत प्रोफेसरची जागा मिळाल्यानें ते सन १८६८ सालीं गेले. तेव्हां त्यांच्या जागीं गोपाळ गोविंद फाटक महाडचे मुनसफ यांस नेमिलें. यांचा पगार पुढें ४०० व अखेर ५०० झाला. हे या कामावर सन १८७४ सालापर्यंत होते. नंतर त्यांची नेमणूक धारवाडास सदरअमीनाच्या जाग्यावर होऊन ते गेल्यावर त्या जागीं जुन्नरचे मुनसफ विश्वनाथ गोविंद चोळकर यांस नेमिलें. सन १८८१ सालीं नवंबर महिन्यांत हे वारले. तेव्हां त्यांच्या जागीं तासगांवचे मुनसफ खानसाहेब मेहेरजी कुंवरजी भाई यांस नेमिले. तेच पुढें चीफ जज्ज व मागाहून दिवाण व हल्लीं दिवाण व काऊन्सिलचे प्रेसिडेंट झालेले आहेत. याच काळांत ब्रिटिश इलाख्यांतील दिवाणी काम चालविण्याचा सन १८५९

चा आक्ट ८ ह्याही सुरू करण्यांत आला. त्यापूर्वी दिवाणी काम ब्रिटिश इलाख्यांतील खालील कायद्यां अन्वयें काम चालत असे.

मुंबईचे सन १८२७ चे कायदे ४।५।६ आणि ८.

" चा " १८२८ चा कायदा ३.

" " १८३१ " " ३.

" " १८६६ " आक्ट ७.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| हिंदुस्थान सरकारचा | सन | १८३९ | चा | आक्ट | ३२. |
| " | " | १८४१ | " | " | १९. |
| " | " | १८५५ | " | " | २८. |
| " | " | १८५८ | " | " | ३५. |
| " | " | १८६० | " | " | २७ |
| " | " | १८६१ | " | " | ११ |
| " | " | १८६४ | " | " | २० |
| " | " | १८७१ | " | " | ८ |
| " | " | १८७२ | " | " | १४९ |
| " | " | १८७३ | " | " | १० |

या कायद्यांची अंमल बजावणी करितांना जुन्या वहिवाटीस अनुसरून रिणकोवर कोर्टाचा हुकूमनामा झाला तरी त्याचें घर त्याच्या फेडीकरितां लिलांव केलें जात नसे. प्रत्यक्ष घरच तारण लावून दिलें असल्यास मात्र विकलें जाई. तसेंच रिणकोची जमीनही कधीं विकली जात नसे. व कर्जाकरितां दिवाणी तुरुंगाची सजा मिळत नसे. मात्र जमीन कर्जाची फेड होई पर्यंत धनकोच्या हवाली केली जातअसे. या कारकीर्दीच्या अखेरीस सन १८५९ चा दिवाणी आक्ट ८ हा सुरू झाला तरी त्याची अंमलबजावणी वरील गोष्टींस सोडून होत नव्हती.

दिवाणी कामाच्या व्यवस्थेनें लोकांची फार सोय झाली. परीक्षा दिलेल्या अशा कायद्यांत वाकबगार वकीलांची संख्या वाढत जाऊन लोकांस न्याय चांगला व लोकर मिळूं लागला. मात्र कोल्हापूरच्या सदर अमीन कोर्टांत कज्जे फार शिल्लक राहूं लागले. या कोर्टाचे हद्दींत कोल्हापूर व पनाळा असे दोन पेटे व कोल्हापूर शहर असल्यानें या कोर्टाकडे फार दावे फैल होत. फक्त कोल्हापूर शहरचे दावे एका पेट्याइतके होत. ही

शिलकेचा निकाल होण्याकरितां वरचेवर मदत मुनसफाची नेमणूक करण्यांत येत असे.

या व्यवस्थेनें स्टांपाची विक्री जास्त होऊन उत्पन्नही वाढलें. पुढें सन १८८०।८१ सालीं तर ४६८०० रुपये उत्पन्न झालें.

**दस्तऐवजाची नोंदः**– सन १८५९ सालीं दस्तऐवज नोंदण्यासाठीं पोलिटिकल सुपरिंटेंडेंटच्या कचेरींत एक शाखा सुरू केली, परंतु दस्तऐवज नोंदणें किंवा न नोंदणें हें लोकांच्या मर्जीवर होतें. पुढें सन १८७५ सालीं कर्नल स्नेडर साहेबांच्या कारकीर्दींत १८७१ च्या ८ व्या आक्टा अन्वयें नवीन नियम करून स्वतंत्र नोंदणी खातें स्थापन केलें व त्यावर खालसांतील रजिस्ट्रेशन खात्यांतील रा॰ रा॰ लक्षुमण रामचंद्र गोळवलकर यांस स्वतंत्र डिस्त्रिक्ट रजिस्ट्रर नेमिलें. मुद्दाम परीक्षा घेऊन पेट्यांनीं वगैरे ११ सब रजिस्ट्रार नेमिले. पन्नास रुपयांवरील सर्व दस्तऐवज नोंदणें अवश्य केलें. या खात्याचें उत्पन्न सरासरी १०,००० रुपये होऊं लागलें. स्वतंत्र डिस्त्रिक्ट रजिस्ट्रार कायम ठेवण्याजोगें काम नसल्यामुळें ही जागा पुढें कमी करून हें काम दफ्तरदार यांजकडे सांगितलें.

**फौजदारी**– कर्नल अंडरसन साहेबांच्या कारकीर्दींतच इंडियन पिनलकोड व फौजदारी काम चालविण्याचा कायदा असे सुरू केले. या कायद्यानें मामलेदारांस पूर्वीं तीन महिन्याची शिक्षा देण्याचा अधिकार होता, तो एक महिन्याची कैदेची शिक्षा देण्याचा मात्र अधिकार राहिला. कोल्हापूरच्या न्यायाधीशांस खालसांतील डिस्त्रिक्ट माजिस्त्रेटचा अधिकार म्हणजे २ वर्षेपर्यंत कैद देण्याचा आणि १००० रुपये पर्यंत दंड करण्याचा असे अधिकार दिले. त्याप्रमाणेंच कनिष्ठ माजिस्त्रेटांच्या निकालांवरील अपीलें ऐकण्याचा व त्यांच्या कामावर देखरेख ठेवण्याचा असे अधिकार दिले. त्याचप्रमाणें यांस असिस्टंट जज्जाचाही अधिकार देण्यात आला. या अधिकारानें पोलिटिकल एजंट जे फौजदारी खटले पाठवीत, त्यांची चौकशी असेसरांच्या मदतीनें ते करूं लागले पुढें महाराजांकडे गार्डियनची स्वतंत्र नेमणूक झाल्यावर त्याजकडेच हें असिस्टंट जज्जाचें काम मुख्यत्वेंकरून सोंपविलें होतें. पोलिटिकल एजंटाचे कोल्हापूर इलाख्यांवरील असिस्टंट यांसही असिस्टंट जज्जाचे अधिकार असून त्याजकडेही पोलिटिकल एजंट दिवाणी अपीलें व फौजदारी खटले पा-

ठवीत. पोलिटिकल एजंटास सेशन जज्जाचा अधिकार असून त्यांजकडे सर्व प्रकारच्या गुन्ह्यांची चौकशी होई. फांशीची, काळ्या पाण्याची व जन्म ठेपीची या शिक्षा मात्र मुंबई सरकारकडे मंजुरीस जाव्या लागत.

सन १८७३ सालीं फौजदारी काम चालविण्याचा नवा कायदा (सन १८७२ चा आक्ट १०) या इलाख्यांत चालू केला. या कायद्यानें मामलेदारांस ६ महिनेपर्यंत कैद व २०० रुपये पर्यंत दंड इतक्या शिक्षा देतां येऊं लागल्या.

सन १८७४ सालीं दोन डिस्ट्रिक्ट आफीसरांच्या नेमणूका झाल्यावर त्यास फर्स्टक्लास माजिस्ट्रेटचे अधिकार देण्यांत आले. हे कामगार फिरते असल्यानें लोकांची जास्त सोय झाली.

सन १८६९ सालापर्यंत सिव्हिल इस्पितळावरील डाक्टर हेच शहर माजिस्ट्रेटचें काम करीत होते. परंतु ती वहिवाट पुढें बंद होऊन शहराकरितां एक स्वतंत्र माजिस्ट्रेट ही नेमिला, व मामलेदारांच्या अव्वलकारकुनांसही माजिस्ट्रेटचे अधिकार देण्यांत आले.

वर नमूद केल्याशिवाय फौजदारी कामांत खालील कायदेही चालू होते.

मुंबईचा सन १८२७ चा कायदा १२ कलम १९ बाब १.

” ” १८२७ ” ” १४ ” २९ ” २.

” ” १८२७ ” ” १६ प्रकरण ३.

” ” १८२७ ” ” १७ कलम १६.

” ” १८२७ ” ” १८ ” ८५०.

” ” १८५४ ” आक्ट ७.

” ” १८५७ ” ” ११ कलम ८

” ” १८६७ ” ” ७ व ८ (पोलीस आक्ट).

” ” १८६९ ” ” १५.

” ” १८७१ ” ” १.

” ” १८७२ ” ” १. (पुराव्याचा कायदा).

” ” १८७२ ” ” ११.

” ” १८७३ ” ” १०

” ” १८६४ ” ” ६ (फटक्यांचा)

या पुढील तीन गोष्टींत मात्र या कायद्याप्रमाणें अमल बजावणी होत नाहीं:-

१. एखादी स्त्री व्यभिचारिणी आहे असें शाबीद झाल्यास ब्रिटिश इलाख्यांत पिनलकोड सुरू होण्यापूर्वी ज्या प्रमाणें तिला शिक्षा देत असत त्याच प्रमाणें अद्याप या इलाख्यांत देतात.

२. महार, मांग, रामोशी व दुसरे अशा प्रकारचे लोक यांस दररोज पोलीस पाटलास हजीरी द्यावी लागते. परवानगी शिवाय व जरूरीच्या कारणाशिवाय तो हजीरीस येण्यास चुकवील तर त्यास पिनलकोडच्या १७४ कलमा प्रमाणें शिक्षा करितात.

३. शिवी गाळ देणें हा अपराध समजून मुंबईच्या सन १८२७ च्या १४ व्या कायद्याच्या २९ कलमा प्रमाणें शिवी गाळ करणारास शिक्षा देतात.

**पोलीस खातें:-** सन १८६९ सालीं पोलीस खात्याची निराळी व्यवस्था करून प्रत्येक पेट्यास एकेक फौजदार व कोल्हापूर शहराकरितां एक फौजदार असे नेमण्यांत आले, व यांचे पगार ३० पासून ५० रुपये पर्यंत केले. स्वतंत्र पोलीस शिपायी ठेवून त्यांस खालसा प्रमाणें काळे डगले वगैरे दिले. हें सर्व पोलीस खातें न्यायाधीश यांच्या ताब्यांत होतें. नंतर सन १८७५ सालीं कर्नल स्नायडर साहेबांच्या कारकीर्दींत या खात्यावर स्वतंत्र पोलीस आफीसर व एक स्पेशल पोलीस आफीसर अशा नेमणुका झाल्या. पुढें सन १८८१।८२ सालीं कर्नल रीव्हज यांच्या कारकीर्दींत या खात्यांत आणखी सुधारणा होऊन सुमारें ५०।६० नवीन पोलीस शिपाई ठेविले, व पूर्वीं पगार ५, ५॥ व ६ असे होते ते वाढवून ६।७ व ८ असे केले, व त्यांस पुढें पेनशन देण्याचेंही ठरविलें. हल्लीं पोलीस खात्यांत ४८६ लोक आहेत, व त्याबद्दल खर्च दरसाल ५० पासून ५५ हजार रुपये होतो.

**जंगल खातें:-** सन १८७४ पर्यंत जंगलाविषयीं कांहीं विशेष व्यवस्था करण्यांत आली नाहीं. कांहीं थोडे डंग शिवाय करून जंगलांत हवे ते लांकडें तोडीत, आणि लहान झाडें झुडपें सफा तोडून कुमरी लागवडही जिकडे तिकडे करीत असत. यामुळें सह्याद्रीवरील झाडी नाहींशी होत जाऊन डोंगर उघडे बोडके झाले; त्यांतून वाहणाऱ्या नद्या व ओढेही कोरडे पडत चालले. जंगलाकडे कर्नल अंडरसन साहेबांचें मुळींच लक्ष गेलें नाहीं. त्या मागून कर्नल स्नायडर साहेब आले. त्यांचें

याकडे लक्ष गेलें, व प्रथमतः त्यांनीं असलेलीं जंगलें राखण्याकरितां १२ फारेस्टर व १ इन्स्पेक्टर असे नेमिले. पुढें सन १८७६ सालच्या दुष्काळच्या सालीं कमी पाऊस पडल्यामुळें जिकडे तिकडे पाण्याची टंचाई झाली. याच सालीं मुंबईचे गव्हरनर सर रिचर्ड टेंपल हे दोन वेळां या इलाख्यांत आले. त्यांनीं इकडील जंगलची व्यवस्था पाहून जंगलाची चांगली सुधारणा करण्यास सुचविलें. त्यावरून दक्षिणभागचे जंगलखात्यावरील कान्सरवेटर यांणीं कोल्हापूर जंगलची पाहणी केली; व तिकडील जंगलखात्यांतील एक अनुभविक अंमलदारास इकडे दिलें. त्यावरून इकडे जंगलखातें स्वतंत्र करून त्यावर प्रथम नारायण बल्लाळ ओक यांची जंगल आफीसर या जागीं नेमणूक झाली. यांस दरमहा २५० रुपये पगार व १५० रुपये भत्ता देण्याचा ठराव झाला. तसेंच यास दरमहा ११३ रुपयांचे कारकून शिपायी वगैरे दिले. शिवाय इन्स्पेक्टर, फारेस्टर वगैरे दरमहा १३०० रुपये खर्च मंजूर केला. हा खर्च जरीं आरंभीं फार दिसतो तरी त्यापासून राज्यास फायदा झाला. आरंभीं सह्याद्रीच्या माथ्यापासून पांच मैलांत कोणतेंही झाड तोडावयाचें नाहीं, असा सक्त हुकूम दिला. तसेंच आरंभीं कुमरी लागवड करण्याची मनाई केली. नंतर जंगलच्या साधारण हद्दी ठरवून त्यांच्या तुकड्या केल्या व प्रत्येक तुकडीवर एकेक इन्स्पेक्टर नेमिला. प्रत्येकाच्या हाताखालीं हेडफारेस्टर व फारेस्टर नेमिले. असे आरंभींच ९ इन्स्पेक्टर २० हेड फारेस्टर, व १२० फारेस्टर नेमिले. नंतर बीं पेरून झाडें उगविण्याकरितां नरसरी म्हणजे छोट्या बागा स्थापन केल्या व त्यांत आवण तयार करून तीं रोपें पावसाळ्याच्या आरंभीं लावण्याचा क्रम सुरू केला. तसेंच जंगलाकरितां राखलेल्या जमिनींत अनेक तऱ्हेच्या जंगली झाडांचें बीं जमवून पेरण्याचा व टोंचून टाकण्याचाही क्रम सुरू केला. हें खातें झाल्यावर पहिल्याच वर्षी सन १८७९।८० सालीं १६५२ एकर जमिनींत २,६८,२४० खळग्या पाडून बीं टाकिलें. व नरसरीमध्यें उगविलेले ४२,७८० रोपे जंगलांत लाविले. दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी सुमारें १०,००० एकर जमिनींत बीं पेरिलें व खळग्या काढून टाकिले. व ३० चाळीस हजार रोपें नरसऱ्यांमध्यें वाढवून लाविले. हाच क्रम पुढें चालून रीजन्सीच्या अमदानींत जंगलखातें हें फार महत्वास चढून सरकारास मोठें

उत्पन्न होऊं लागलें. या कारर्कीर्दीच्या अखेरीस फक्त याचें बीजारोपणमात्र झालें. विशेष खुलासा पुढील प्रकरणांत येईल. हिरड्यांचें व एकंदर जंगलाचें मिळून पूर्वी फारसें उत्पन्न होत नसे. हें खातें झाल्यापासून तीन वर्षांत खालीं लिहिल्याप्रमाणे या खात्याचें उत्पन्न व खर्च होता.

हिरड्यांचें उत्पन्नः—

| वर्ष. | हिरडे खंडी. | | किंमत रुपये. | गोळा करण्यास खर्च. | निवळ फायदा. |
|---|---|---|---|---|---|
| | मण. | शेर | | | |
| १८७९।८० | १०६ | १० | ४२६० | ... | ४२६० |
| १८८०।८१ | ९५४ | १२ | ३४३६५ | १०६३३ | २३७३२ |
| १८८१।८२ | १३३० | ११ | ४५२२७ | १५९६५ | २९२६२ |

जंगलचें एकदर उत्पन्न व खर्चः—

| वर्ष | उत्पन्न. | खर्च. | फायदा. |
|---|---|---|---|
| १८७९।८० | १०१६२ | २२९४९ | — १२७४७ |
| १८८०।८१ | ४४२२३ | ३८९८३ | + ५२४० |
| १८८१।८२ | ४६१०९ | ३४२२३ | + ११८८६ |

**मेडिकलखातें—** या खात्यांत या काळांत फारसा फेरफार झाला नाहीं. गडहिंग्लज व मलकापूर या दोन ठिकाणीं मात्र दोन नव्या डिस्पेन्सऱ्या स्थापन झाल्या. कर्नल **अंडरसन साहेबांच्या** कारर्कीर्दीत वेड्यांचें इस्पितळ व स्त्रियांकरितां एक इस्पितळ अशा दोन छोट्या इमारती बांधण्यांत आल्या. व सन १८७८ सालीं दवाखान्याकरितां मोठी जंगी इमारत बांधण्यास सुरुवात झाली. कर्नल अंडरसनसाहेब आले तेव्हां दवाखान्यावर डाक्टर **एन्डिंग** हे होते. सन १८७९ सालीं पटकीनें ते वारल्यावर त्यांच्या जागीं डाक्टर **सिंक्लेर** यांची नेमणूक झाली. व तेच या कारर्कीर्दीच्या अखेरपर्यंत होते. यांच्या कारर्कीर्दींत दवाखान्यावर लोकांची जास्त भक्ति बसत चालली, व दवाखान्यांत औषधें घे-

ण्यासही लोक फार येऊं लागले. दवाखान्यांत ठेवून औषधें घेणारांची संख्या १००० पर्यंत चढली. व केवळ औषधें घेऊन जाणारांची संख्या१२००० पर्यंत वाढली. या खात्याची सर्व देखरेख पूर्वीप्रमाणेंच मुंबई इलाख्याचे सर्जन जनरल यांजकडेच या काळांत होती. व सर्व नेमणुका त्यांजकडून-च होत. या खात्याचा खर्च सन १८८०।८१ साली १७००० रुपये झाला होता. पूर्वीप्रमाणेंच देवी काढणारे पेट्यांनीं व संस्थानांनीं होते, व त्यांची देखरेख मुंबई इलाख्यांतील सुपरिंटेंडेंट आफ व्याक्सिनेशन यांजकडे होती. या निमित्त खर्च १७।१८ शें रुपये होत असे.

शाळाखातें:- शाळाखातें सुधारण्याकडे कर्नल अंडरसन साहेबाचें फार लक्ष गेलें. व त्यांनीं या खात्यांत ज्या सुधारणा सुरू केल्या. त्या तशाच पुढें चालून हें खातें आज मोठ्या भरभराटीस आलें आहे व कोल्हापूर राज्याच्या निरनिराळ्या खात्यांत सुशिक्षित व विद्वान कामगारांचा मोठा भरणा होत चालला आहे. ज्या ठिकाणीं पूर्वी मुलकी परीक्षा पास झालेले कारकून बाहेरून आणावे लागत, त्याच ठिकाणीं ती परीक्षा पास झालेले व म्याट्रिक्युलेशन परीक्षा पास झालेले पुष्कळ विद्यार्थी नोकरी मिळण्यासाठीं अर्ज करितात, व त्यांतून निवड करावी लागते. हायस्कुलांतील मास्तर, वकील व इतर मोठमोठ्या जबाबदारीच्या हुद्यांवरील कामगार राजाराम विद्यालयांतून तयार झालेले नेमले गेले आहेत. कर्नल अंडरसन साहेबांनीं चार्ज घेतला त्यावर्षी येथें हायस्कूल किंवा कालेज मुळींच नसून साधारण इंग्रजी व मराठी शाळा मिळून २५ शाळा होत्या, व त्यांत ११४७ मुलें शिकत होतीं, त्याच ठिकाणीं या काळच्या अखेर म्हणजे मार्च सन १८८२ सालांत शाळांची संख्या १५५ झाली व मुलांची संख्या ९,५११ पर्यंत वाढली. आणि ज्या खात्याकडे पूर्वी सुमारें ३।४ हजार रुपये खर्च होत होता. तोच ७१,६९६ रुपये पर्यंत वाढला आणि जेथें पूर्वी फीचें उत्पन्न १००० रुपये होत होतें तेथें सन १८८०।८१ सालीं २०,७८६ रुपये झालें. सन १८६६।६७ सालीं मुलींची शाळा एकच असून तींत ३२ मुली शिकत होत्या. त्या ठिकाणीं या कारकीर्दीच्या अखेरीस सन १८८१।८२ सालीं मुलींच्या शाळा ५ होऊन त्यांत ३३० मुली शिकूं लागल्या. आतां या खात्याविषयीं थोडी तपशीलवार माहिती खालीं देतों.

हायस्कूल व कालेज— कर्नल अंडरसन साहेब कोल्हापुरास आले, तेव्हां कोल्हापुरास एक इंग्रजी शाळा मात्र होती. सन १८६७ सालीं मुंबई इलाख्याचे डायरेक्टर सर ए. ग्रांट हे कोल्हापुरास आले होते व त्यांनीं येथील इंग्रजी शाळा व कोल्हापूर शहर पाहून अशी सल्ला दिली कीं, येथें हायस्कूल स्थापिल्यास चांगलें चालेल व लोकांस फार फायदा होईल. ही गोष्ट अंडरसन साहेबांस योग्य वाटून त्यांनीं हायस्कूल स्थापन करण्याबद्दल सरकारची मंजुरी घेऊन सन १८६७ सालीं एप्रिल महिन्यांत कोल्हापूर येथें इंग्रजी शाळेच्या जागीं हायस्कूलची स्थापना केली व त्यावर ग्रांटसाहेब डायरेक्टर यांच्या शिफारशीवरून महादेव मोरेश्वर कुंटे सिंध हैदाबाद हायस्कूलचे हेडमास्तर यांस दरमहा २५० रुपये पगारावर हेडमास्तर नेमिलें. व हायस्कुलांत मास्तर नेमणें, परीक्षा घेणें व सर्व प्रकारची देखरेख ठेवणें हें सर्व काम मुंबई इलाख्याचे डायरेक्टर यांजकडेच ठेविलें. इतकेंच नाहीं तर त्या हायस्कुलाची गणना इलाख्यांतील इतर हायस्कुलांत व्हावी व या हायस्कुलांतील मास्तरांस खालसांतील हायस्कुलांत व तिकडील मास्तरांस इकडे अशा नेमणुका करितां याव्या, याकरितां हिंदुस्थान सरकारास लिहून अशी मंजुरी आणिली कीं, या हायस्कुलांत खालसांतून जे मास्तर येतील किंवा ज्यांच्या नेमणुका मूळ प्रथमच येथें होतील त्यांच्या पगारावर शेंकडा पांच रुपये प्रमाणें पेनशनफंड द्यावा व त्यांस ब्रिटिश सरकारानें पेनशन द्यावें अशीही मंजुरी घेतली. या व्यवस्थेनें या हायस्कुलास खालसांतील हायस्कुलाचे सर्व नियम लागू होऊन फार उत्तम रीतीनें हें काम चाललें, व दिवसें दिवस अशा भरभराटीस येत चाललें कीं १५ वर्षांत येथें कालेज स्थापन करण्याजोगी योग्यता आली आणि सन १८८० सालीं जून महिन्यांत कर्नल स्नायडरसाहेब व राव बहादूर केळकर अक्टिंग स्टेट कारभारी यांच्या शिफारशीवरून कालेजाची स्थापना झाली.

सन १८७१ सालीं कुंटे यांची नेमणूक पुणें हायस्कुलावर करून त्याच्या जागीं बळवंत भिकाजी वाखारकर यांची नेमणूक झाली व तेच कालेज होईपर्यंत हेडमास्तर होते, व कालेज झाल्यावर व्हाइस प्रिन्सिपाल झाले. कुंटे यांनीं हायस्कुलचा फार मजबूत असा पाया घा-

तला व वरवारकर यांनीं त्यावर भक्कम व टोलेजंग इमारत कायमची बांधली. कुंटे यांच्या कारकीर्दीतच हायस्कुलांतील गरीब विद्यार्थ्यांस अभ्यासाकरितां फुकट पुस्तकें देतां यावीं याकरितां एक "पुअरबाईज फंड" म्हणून सन १८६८ सालीं स्थापन केला व जे गृहस्थ हायस्कुल पाहण्यास येतील, त्यांजकडून थोडी बहुत वर्गणी घेण्याचें सुरू केलें. पुढें त्यास कर्नल अंडरसन व रावबहादूर वर्वे यांच्या आश्रयानें भर पडत जाऊन फंडाची रक्कम सुमारें १५०० रुपये पर्यंत वाढली. परंतु आल्या गेल्यापासून भिक्षा मागण्याचें काम वरवारकर यांस न आवडल्यामुळें व मेहेरवान चाटफिल्ड साहेब डायरेक्टर यांसही बरें न दिसल्यामुळें फंडास वर्गणी जमविण्याचें काम ५।६ वर्षांनीं बंद जाहलें, व यामुळें फंडाची रक्कम आहे तेवढीच राहिली. जर करितां फंड जमविण्याचा क्रम थोडथोडा आजपर्यंत असाच चालला असता तर ४।५ हजार रकम जमली असती, व त्यांतून बुकांशिवाय आणखीं गरीब मुलांस फी व विशेष प्रसंगीं कपडे व पोटगीही देतां आली असती; व असाच उद्देश त्याचे उत्पादक कुंटे यांचा होता. हल्लीं जमलेल्या रकमेच्या प्रामिसरी नोटी घेऊन ठेविल्या आहेत, व त्यांचें व्याज येतें त्यांतून गरीब मुलांस बुकें देण्यास सांपडतात.

कुंटे यांनीं हायस्कुलांत दुसऱ्या ज्या दोन महत्वाच्या सुधारणा सुरू केल्या, त्या तालीम आणि यंत्रशाळा या होत. खानगांत सुद्धां बहुतेक हायस्कुलांत तालमी स्थापिल्या नसून विद्यार्थ्यांस शरीर व्यायाम घेण्याची कांहीं सोय नव्हती. परंतु त्यांनीं येथील हायस्कुलांत तालीम करून जोर, जोडी, मल्लखांब वगैरे व्यायाम घेण्याचें सामान आणवून एका पहिलवानाची नेमणूक करून घेतली, व प्रत्येक वर्गांतील मुलांनीं शाळेच्या वेळांत दररोज अर्धा तास नियमानें जोर, जोडी वगैरे मेहनत करावी, अशी पद्धत सुरू केली. ती वाढत जाऊन पुढें कालेज झाल्यावर इंग्रजी कसरत करण्याचें सर्व सामान आणून त्यावर आणखी एका पारशी वस्तादाची दरमहा ६० रुपयांवर नेमणूक झाली.

दुसरी सुधारणा यंत्रशाळेची होय. हायस्कुलांत शास्त्रीय विषय शिकविण्यास यंत्रांचा कांहीं संग्रह नव्हता; व त्या वेळीं एकदम या कामाकरितां मोठ्या रकमेची मंजुरी मिळेल असा रंगही नव्हता. म्हणून एक वर्षी मुलांस बक्षिसें न देतां तो पैसा व थोडीशी निराळी रक्कम मागून

त्या रकमेची साधे प्रयोग दाखविण्यापुरतीं यंत्रें आणिलीं. आणि त्यांनीं पूर्वीं हातांनीं कधीं यंत्रें वापरलीं नव्हतीं. व प्रयोग केले नव्हते. तथापि म्याट्रिक्युलेशनच्या मुलांस प्रयोग वगैरे दाखविण्याचा क्रम त्यांनीं सुरू केला. व ते जाईपर्यंत ३००।४०० रुपयांचें सामान जमविलें. पुढें सन १८७१ सालीं खालसांतील इतर हायस्कुलांबरोबर अवश्य तितका यंत्र संग्रह सुमारें ७००।८०० रुपयांचा मिळाला. पुढें त्यांत वरचेवर भर पडत जाऊन कालेज स्थापन झालें तेव्हां सुमारें २००० रुपयांवर किमतीचा यंत्र संग्रह जमला होता. या यंत्र संग्रहाचा दुसरा असा उपयोग झाला कीं, प्रस्तुत हकीकत लिहिणारास शास्त्रीय विषयांचा व्यासंग करून रसायनशास्त्र व सृष्टिशास्त्र यांवर मराठींत पुस्तकें लिहितां आलीं. तसेंच हायस्कूलच्या शिक्षणास अवश्य जो पुस्तक संग्रह तो करण्यासाठीं दरमहा ३० रुपयांची नेमणूक कुंटे यांनीं करून घेतली. त्यांतून वरचेवर पुस्तकें घेत गेल्यानें सन १८८२ पर्यंत पुस्तकांचा बराच मोठा संग्रह झाला होता.

तिसरी एक गोष्ट जी त्यांनीं सुरू केली, ती सर्व मुलांस घेऊन पंचगंगा नदींतून बोटींतून प्रयागास एकवार जाणें ही होय. या तिन्ही संस्था अद्याप चालू आहेत. प्रयाग मेळ्याबद्दल आरंभीं लोक त्यांस हसूं लागले, व बरोबर जाण्याकरितां विद्यार्थी व मास्तर मिळून १०।२० मंडळी सुद्धां जमण्याची मोठी मारामार पडत असे. परंतु त्या संस्थेस वरवारकर यांनीं चांगला टेंका दिल्यामुळें ती मोठ्या भरभराटीस आली; व त्या ठिकाणीं आतां मुलांनीं केलेल्या कविता म्हणाव्या व नेमलेल्या विषयांवर भाषणें करावीं, व त्यास बक्षिसें द्यावीं, ही टूम वरवारकर यांनीं सुरू केली.

वरवारकर यांच्या कारकीर्दींत हायस्कूलची इमारत पुरी होऊन नव्या इमारतींत हायस्कूल सन १८७३ सालीं गेलें. या पूर्वींच हायस्कुलांत मुलें फार वाढत चाललीं म्हणून सन १८७२ सालीं हायस्कुलांतील खालच्या ३ इयत्ता शिकविण्याचें वेगळ्या निराळ्या इमारतींत सुरू केलें. पुढें नवी इमारत तयार झाल्यावर दोन्ही शाळा पुनः एकत्रच झाल्या. वरवारकरांनीं जरी बाह्य कांहीं विशेष सुधारणा केल्या नाहींत. तथापि शिकविण्याचें व देखरेख ठेवण्याचें हीं दोन्हीं कामें फार आस्थेनें, नियमानें व झटून करून शाळेची अंतस्थिति फार सुधारली व हायस्कूलची गणना इलाख्यांतील प्रमुख हायस्कुलांत होऊं लागली. हायस्कूल स्थापन

झाल्यापासून सन१८८१ सालापर्यंत १४७ विद्यार्थी म्याट्रिक्युलेशन परीक्षेंत पास झालें. त्यांपैकीं ४७ विद्यार्थ्यांनीं युनिव्हर्सिटीच्या वगैरे एक किंवा अधिक परीक्षा दिल्या आहेत. त्यांचा तपशील येणें प्रमाणें:-

| | | | |
|---|---|---|---|
| एम्. ए. | १ | एफ्. इ. ए. | ७ |
| एल्. एल्बी. | ३ | पी. ई. | १२ |
| एल्. एम् | १ | फारेस्ट क्लास | ३ |
| बी. ए. | १२ | एग्रिकलचरिस्ट | २ |
| फर्स्ट बी. ए. | ३ | फर्स्ट एक्झामिनेशन इनमेडिसिन | १ |
| एफ्. सी. ई. | २ | | |

नव्या इमारतींत हायस्कूल गेलें. तेव्हां राजाराम महाराजांच्या स्मरणार्थ हायस्कुलास राजाराम हायस्कूल असें नांव दिलें, व राजाराम महाराजांचा संगमरवरी दगडाचा पुतळा हायस्कुलांत बसविला. व पुढें कालेजची स्थापना झाल्यावरही कालेजास राजाराम कालेज असेंच नांव देण्यांत आलें.

हायस्कुलाची भरभराटी होण्यास राजाराम स्कालरशिपी व आलफ्रेड स्कालरशिपी व पेटा संस्थानच्या एक्झिबिशनच्या जागा बऱ्याच अंशीं कारणीभूत झाल्या. पहिल्या दोहोंविषयीं मागें राजाराम महाराजांच्या चरित्रांत लिहिण्यांत आलेंच आहे. तालुक्यांतील व पोट संस्थानांतील हुशार व होतकरू मुलांस कोल्हापुरीं राहून हायस्कुलांत अभ्यास करण्यास उत्तेजन मिळावें या हेतूनें दर पेट्यास व दर संस्थानास दरमहा ३ रुपये पगाराची व ५ वर्षे चालणारी अशी एकेक पगारी जागा स्थापन केली. येणेंकरून प्रत्येक विभागांतील मराठी शाळांपैकीं जो उत्तम विद्यार्थी ठरेल, त्यास ही जागा मिळूं लागली, व असे दरसाल १० विद्यार्थी येऊं लागले व पुढें ५० विद्यार्थी कायमचे राहूं लागले. या ५० पगारी जागा व राजाराम स्कालरशीपच्या १६ जागा मिळून ६६ पगारी जागा कायमच्या झाल्या. व ६६ होतकरू व हुशार मुलांस सहाय्य मिळूं लागलें.

कालेजची स्थापना मात्र या काळांत झाली. याकरितां त्याबद्दल येथें कांहीं न लिहितां पुढील काळच्या वर्णनांत याबद्दल तपशीलवार माहिती देणार आहें.

**मराठी व मराठी इंग्रजी शाळा**— मराठी शाळांची देखरेख चांगली

राहून खालसांतील शाळांप्रमाणेंच इकडील शाळांची योग्यता वाढावी म्हणून खालसांत अनुभव घेतलेल्या अशा कामगारास डेप्युटी एज्युकेशनलच्या जागीं नेमावें, असा कर्नल अंडरसन साहेबांनीं निश्चय करून सर एन्थ्रांट यांच्या शिफारशीवरून रत्नागिरीचे डे. ए. इन्स्पेक्टर रावसाहेब बाळ परशुराम पंडित यांस दरमहा १५० रुपयांवर डे. ऐ. इन्स्पेक्टर सन १८६७ सालीं नेमिलें, व त्यांसही हायस्कूलच्या मास्तरांप्रमाणें पेनशनीचे वगैरे नियम लागू केले. हेच या काळाच्या अखेर पर्यंत कामावर होते, व शाळाखात्यांतील सर्व सुधारणांचें श्रेय यांसच आहे. यांनीं कामाचा चार्ज घेतला तेव्हां शाळांची संख्या २१ व त्यांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १२५२ होती, ती सन १८८१।८२ सालीं अनुक्रमें १५४ आणि ९११९ झाली. नवीन शाळा स्थापन करणें तर त्यांवर शिक्षणपद्धतीच्या कामांत तयार झालेलेच मास्तर असावे हें योग्य आहे असा विचार करून मास्तर तयार झाल्याशिवाय नवीन शाळा स्थापन करावयाच्या नाहींत, असा कर्नल अंडरसन साहेबांनीं निश्चय केला, व कोल्हापूर येथें एक ट्रेनिंगस्कूल सन १८६७ च्या आगस्ट महिन्यांत स्थापन करून त्यावर दोन हुषार मास्तर नेमिले, व त्यांत पगारी विद्यार्थ्यांचे दोनवर्ग ठेविले; आणि त्यांत पुणें येथील ट्रेनिंगकालेजच्या पद्धतीनें सर्व शिक्षण देण्याचा क्रम सुरू केला. ज्या प्रमाणें या शाळेंत मास्तर तयार होऊं लागले, त्या प्रमाणें नव्या शाळा स्थापन करूं लागले. आणि सन १८७३ सालीं अंडरसन साहेब गेले, तेव्हां शाळांची संख्या १३० पर्यंत आणि विद्यार्थ्यांची संख्या ६३९८ पर्यंत वाढली. या कारकीर्दीच्या अखेरीस सन १८८१।८२ सालीं शाळा १५४ व विद्यार्थी ९११९ झाले. इंग्रजी मराठी शाळांवर मास्तर तयार करण्याकरितां म्याट्रिक्युलेशन परीक्षेंत पास झालेल्या विद्यार्थ्यांचा एक वर्ग काढून त्यांत तयार झालेल्यांस आंग्लो व्हर्न्याक्यूलर स्कूलांवर नेमूं लागले. या सर्व व्यवस्थेनें इकडील मराठी शाळांची स्थिति थेट खालसाप्रमाणें झाली. या पंधरा वर्षांच्या काळांत मराठी शाळा, त्यांतील विद्यार्थी, फी व खर्च क्रमकसा वाढत गेला हें खालील कोष्टकांत दिलें आहे:—

| सन. | शाळा. | विद्यार्थी. | फीचें उत्पन्न. | खर्च. |
|---|---|---|---|---|
| १८६७।६८ | २१ | १२५३ | १०६० | ४८४१ |
| १८६८।६९ | २५ | १६२६ | १७९२ | ११३६१ |
| १८६९।७० | ३५ | २२०० | २६११ | २२३५१ |
| १८७०।७१ | ५९ | ३४८४ | ३७२० | १९८०७ |
| १८७१।७२ | १०१ | ४८७२ | ३४६० | २५५३१ |
| १८७२।७३ | १२९ | ५९०९ | ३५६१ | २९२३२ |
| १८७३।७४ | १३९ | ६३९८ | ३७०४ | ३९४०५ |
| १८७४।७५ | १३८ | ६४५५ | ३७८१ | ३७८७९ |
| १८७५।७६ | १३७ | ६२८१ | ३७५२ | ३७८३० |
| १८७६।७७ | १३३ | ६५७० | ३७८७ | ४२४२६ |
| १८७७।७८ | १३२ | ६२०७ | ३६६७ | ४१०२० |
| १८७८।७९ | १३३ | ६२१८ | ३५९५ | ३८९७९ |
| १८७९।८० | १४४ | ७२२३ | ३६९८ | ४१५६२ |
| १८८०।८१ | १४९ | ८०९३ | ४०५४ | ४१८३४ |
| १८८१।८२ | १५४ | ९१९१ | ४५१० | ४३९०९ |

**शाळांच्या इमारती**– सरकारी मराठी शाळांकरितां कोल्हापूर शहरीं किंवा बाहेरही इमारती मुळींच नव्हत्या. त्या बांधण्याकरितां दरसाल कांहीं रक्कम खर्च करावयाची असा ठराव करून इमारती बांधण्याचें काम सुरू केलें. आणि या काळाच्या अखेरीपर्यंत शाळांकरितां बऱ्याच इमारती तयार झाल्या. व त्यांकडे एकंदर ५०।६० हजार रुपये खर्च झाला.

**मुलींच्या शाळा**– या काळांत स्त्रीशिक्षणाकडे अगदीं दुर्लक्ष होतें असें नाहीं. कर्नल अंडरसन साहेब आले तेव्हां कोल्हापूर शहरीं मुलींची शाळा एकच होती व तिजमध्यें ३२ मुली होत्या. या शाळेची सुधारणा करून बाहेरही आणखी चार शाळा स्थापन केल्या व मुलांच्या कित्येक शाळांमध्यें मुलींचे वर्ग स्थापन केले. राणीसाहेबांस शिकविण्याकरितां एक युरोपियन लेडी आणिली. तिच्याकडे कोल्हापूरच्या शाळेची देखरेख दिली व कशिद्याचें वगैरे काम शिकवूं लागले. चोळ्या, अंगरखे, पैरणी वगैरे बेततां व शिवतां यावें, म्हणून एक दरजीही शिकविण्यास ठेविला. सन १८८१।८२ सालीं एकंदर पांच शाळा व कांहीं वर्ग मिळून ३३० मुली शिकत होत्या. शाळांस राणीसाहेबांकडूनही वारंवार उत्तेजन मिळत असे, व साहेब लोकांच्या मडमाही वारंवार येऊन मदत देत. पुढें शाळेवर पुणें येथील स्त्रियांच्या ट्रेनिंगकालेजांत तयार झालेल्या एक स्त्रीस शिक्षक नेमिलें. अशी बरीच व्यवस्था झाली. तरी स्त्रीशिक्षणाचा पाय या काळांत फारसा पुढें गेला असें म्हणतां येत नाहीं.

**रात्रीच्या शाळा**– येथें इमारतींचीं पुष्कळ कामें सुरू झालीं. व कुणबी, माळी, गवंडी, पाथरवट, शेतकरी वगैरे दिवसा धंदे करून पोट भरणारे लोक व त्यांचीं मुलें यांस दिवसा पोटाकरितां काम करून रात्रीं शिकतां यावें, म्हणून कर्नल अंडरसन साहेबांनीं रात्रीच्या शाळा स्थापन करण्याची कल्पना नवीन काढिली. व प्रथम कोल्हापूर शहरीं प्रत्येक मराठी शाळेंत रात्रीची शाळा स्थापन केली. व त्यांवर मास्तर नेमून फुकट शिकविण्याचा क्रम सुरू केला. या शाळा अद्याप चालल्या आहेत. सन १८८१।८२ सालीं या शाळांची संख्या १८ होती. या शाळा रात्री इंग्रजी ७ वाजल्यापासून ९ वाजेपर्यंत भरतात. या शाळांचा सुतार, लोहार, पाथरवट वगैरे जितका फायदा करून घेतील असें प्रथम वाटलें तितका घेत नाहींत. रात्रीच्या सर्व शाळांत मिळून सन १८८१।८२ सालीं ७२१ मुलें होतीं.

या प्रांतांत ज्या गांवठी शाळा होत्या, त्यांस मदत देणें किंवा सुधारणें हें काम या कारकीर्दीत मुळींच झालें नाहीं. तें पुढील कारकीर्दीत सुरू झालें.

**सरदारांचें शिक्षण–** या शिक्षणाकडेही अंडरसन साहेबांचें बरेंच लक्ष गेलें. बाबासाहेब महाराज मुखत्यार होण्यापूर्वीच्या पोलिटिकल सुपरिंटेंडेंटच्या कारकीर्दीत सरदारांच्या मुलांकरितां एक वर्ग स्थापन करण्यांत आला होता. हायस्कूल स्थापन झाल्यावर तो वर्ग मोडून सर्व सरदारांनीं हायस्कुलांत व इतर शाळांत जाऊन इतर मुलांबरोबर शाळांतील वर्गांत बसून शिकावें, अशी पद्धत कर्नल अंडरसन साहेबांनीं सुरू केली. त्याप्रमाणें प्रथम आबासाहेब इचलकरंजीकर, आबासाहेब कागलकर, बाळासाहेब बावडेकर, नानासाहेब सरलष्कर, आपासाहेब कापशीकर व कांहीं छोटे सरदार हायस्कुलांत व मराठी शाळांत जाऊं लागले. मोठमोठ्या सरदारांस घरीं शिकविण्यास ट्यूटर असत, व त्यांजकडेच त्यांच्या खर्चविचाची व नोकरांची वगैरे व्यवस्था असे. पुढें शिवाजी महाराज गादीवर बसल्यावर व त्यांबरोबर अभ्यास करण्यास येथें आलेले वाडीकर व मुधोळकर व दुसरे महाराजांचे संवगडे हेही येथील आंग्लोव्हर्न्याक्युलर स्कुलांतच इतर मुलांबरोबर वर्गांत बसून अभ्यास करीत होते, व या सर्वांस एकदम शाळेंत नेण्याकरितां व तेथून आणण्याकरितां अंडरसन साहेबांनीं मुद्दाम एक आम्निबस आणविला होता. याच प्रमाणें अभ्यास करून आबासाहेब इचलकरंजीकर म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षेस जाऊन पास झाले. महाराजांचे जे गार्डियन असत त्यांची देखरेख सरदारांच्या शिक्षणावर असे व ते वरचेवर सरदारांची परीक्षा घेत, व ट्यूटर आपलें काम बरोबर करितात किंवा नाहीं तें पाहात. या प्रमाणें शिक्षणक्रम चालण्यास इतर मुलांप्रमाणें सरदारांस फार अभ्यास करावा लागे. परंतु पुढें हळू हळू कवाईत शिकणें, घोड्यावरून व गाडींतून नियमित वेळीं फिरावयास जाणें, खेळ खेळणें, साहेब लोकांच्या भेटीस जाणें, व संस्थानीं कित्येक विशेष प्रसंगीं समारंभाकरितां जाणें, इत्यादि अनेक लचांडें सरदारांच्या मागें लागल्यामुळें सकाळीं दोन अडीच तासांहून जास्त वेळ घरीं अभ्यास करण्यास मिळेना, व यामुळें जीं इतर मुलें घरीं दर रोज चार पांच तास अभ्यास करीत, त्यांच्या बरोबर अभ्यास नीट चालेना. तेव्हां मे॰ ह्यामिक साहेबांनीं मागें लिहिल्याप्रमाणें सरदारांस वेगळें शिकविण्याचें

ठरवून अभ्यास बंगल्यांत वर्ग करून तेथें अभ्यास सुरू झाला, व बहुतेक तोच क्रम कालेज स्थापन होईपर्यंत चालला होता. या पद्धतींत सकाळीं ७ पासून ९ पर्यंत आणि दोन प्रहरीं अकरापासून ३ पर्यंत शाळेंत अभ्यास चाले, व या शिवाय निराळा अभ्यास घरीं करीत नसत, व सरदारांचे ट्यूटर त्यास शिकवीत.

पुढें महाराज राजकोटास गेल्यावर पुनः सरदारांस शाळेंत पाठविण्याचा क्रम सुरू झाला. नंतर कालेज स्थापन झाल्यावर त्यांत सरदारांचा वेगळा वर्ग काढून त्यांस कालेजांत वेगळें शिकवूं लागले.

**पब्लिक वर्क्स खातें**— शाळाखात्याप्रमाणें या खात्याकडेही कर्नल अंडरसन साहेबांचें विशेष लक्ष होतें, व हें खातें यांच्या कारकीर्दींत फार भरभराटीस आलें, व नेमेंच या कारकीर्दीच्या अखेरीपर्यंत वाढत गेलें. प्रांतांत सर्वत्र चांगले रस्ते झाले, व सुशोभित अशा अनेक नव्या इमारती उठल्या. नव्या बागा झाल्या, व रस्त्यांच्या बाजूस हजारों झाडें लागलीं. व या खात्याकडे लाखों रुपये दरसाल खर्च होऊन हजारों मजुरांस व इतरांसही काम मिळूं लागलें. अंडरसन साहेब आले तेव्हां इलाख्यांत व कोल्हापूर शहरांत म्हणण्यासारख्या ठळक व चांगल्या अशा नवीन पद्धतीच्या इमारती नव्हत्या, व रस्तेही साधारण होते, व कारागीरही यथातथाच होते. कांहीं चांगले पाथरवट व गवंडी होते, परंतु त्यांची संख्या फार थोडी होती. चांगले व कसबी सुतार इतके थोडे होते कीं, खुर्च्या, टेबलें व कपाटें करून वक्तशीर मिळण्यास अडचण पडे. परंतु या इमारत कारखान्याच्या सरशीनें इमारतींस लागणारें कसब इतकें वाढलें आहे कीं, हव्या त्या नमुन्याचें काम करणारे लोक येथें तयार झाले आहेत व सरकारी सुरेख व सुबक इमारतींनीं लोकांची अभिरुचि इतकी सुधारली आहे कीं, हल्लीं जीं लोक नवीं घरें बांधतात, तीं सुद्धां फार सुबक व सुरेख असतात. नवीन राजवाडा, इस्पितळ वगैरे कामें करते वेळीं फार कारागिरांस बाहेरून आणावें लागलें नाहीं.

अंडरसन साहेब आले त्यावेळीं खुद्द करवीर सरकारच्या पदरीं कोणी चांगला वाकबगार इंजनियर किंवा ओव्हरसियरही नव्हता. यांच्या आसपासचीं खालसा हद्दींतील कामें पाहण्यास व कोल्हापूर सरकारचीं कामें पाहण्यास सोय व्हावी, या हेतूनें निपाणीपासून वारणेपर्यंत एक स्वतंत्र वि-

भाग करून त्यांवर एक एक्झिक्युटिव्ह इंजनियर नेमावा, व त्याच्या हाताखालीं असिस्टंट इंजिनियर, ओव्हरसियर वगैरे खालसांतील जिल्ह्याप्रमाणें असून कोल्हापूर येथें एक्झिक्युटिव इंजिनीअरचें एक आफिस स्थापन करावें. आणि त्याबद्दल जो सरसाल एकंदर खर्च होईल, त्यांपैकीं एक तृतीयांश खर्च कोल्हापूर सरकारानें द्यावा, असा सरकारचा ठराव झाला, व ही गोष्ट अंडरसन साहेबांनीं मोठ्या आनंदानें मान्य केली. पुणें बेळगांवच्या रस्त्यांवरील वेदगंगा, पंचगंगा, वार्णा या नद्यांस व उदगांवापाशीं कृष्णेस पूल बांधावयाचीं मोठीं कामें ब्रिटिश सरकारास कर्तव्य होतीं, व कोल्हापूर सरकारास तर हायस्कूल वगैरे मोठीं कामें आरंभावयाचीं होतीं परंतु एका स्वतंत्र एक्झिक्युटिव्ह इंजनिअरास नेमण्याची त्यावेळीं करवीर सरकारास ताकद नव्हती, व त्यास पुरण्याजोगें कामहीं त्यावेळीं नव्हतें. यास्तव वरील व्यवस्था उभयपक्षीं फायदेकारक होती, व त्यावेळीं ती तत्काल अमलांत आली.

कोल्हापुरानजीक पंचगंगेस व कागलानजीक वेदगंगेस पूल बांधण्याचीं कामें चाललीच होतीं, शिवाय अंडरसन साहेबांच्या कारकीर्दीत अगदीं प्रथम अति मोठी अशी हायस्कूलची इमारत बांधण्याचें ठरलें. या इमारतीचा नकाशा वगैरे म्यांट साहेबांच्या शिफारशीवरून म्यांटसाहेबांकडून करविला होता. हे अंडरसन साहेबांचे आप्त असून त्यांवर यांचा पूर्ण भरंवसा होता. याकरितां या समयास त्यांची नेमणूक येथील जागीं व्हावी, अशी अंडरसन साहेबांची फार इच्छा होती व ती लौकरच घडून आली. तेणेंकरून अंडरसन साहेबांस फार आनंद झाला, व इलाख्यांत इमारती व रस्ते बांधण्याचीं कामें त्यांनीं जारीनें सुरू केलीं.

हायस्कूलचें काम सन १८७० सालीं सुरू करून राजाराम महाराजांच्या हातून पायाचा दगड बसविला, वगैरे हकीकत पूर्वीं आली आहे. या इमारतीच्या देखरेखीकरितां एक स्वतंत्र ओव्हरसियर पाहिजे होता, व शिवाय खासगीकडील व इतर शहरांतील सरकारी इमारतींचीं व रिपेरीचीं चिल्हर कामें पाहण्यास म्हणून एक स्वतंत्र ओव्हरसियर एक्झिक्युटिव्ह इंजिनीअरच्या ऑफीसांतीत देतां येणार नाहीं, याकरितां या कामाकरितां नारायण बापूजी सागंत यांस दरमहा १५० रुपयांवर नेमून त्यांस हेड ओव्हरसियर कोल्हापूर स्टेट असा हुद्दा देऊन त्यांजकडे करवी-

र सरकारच्या शहरांतील सर्व इमारत कारखान्याचा चार्ज दिला. ते इमारत कारखान्याचीं इतर कामें करून हायस्कूल इमारतीचें काम स्वतंत्रपणें म्यांट साहेबांच्या देखरेखीखालीं करूं लागले.

जसजसें हायस्कूलचें काम वर येऊं लागलें त्या प्रमाणें कसबी कारागिरांची वाण पडूं लागली. तेव्हां सुरत, पुणें, मुंबई व रत्नागिरी या ठिकाणाहून गुजराथी, कच्छी, कोंकणे वगैरे नक्षी व सुरेख काम करणारे सुतार, मेस्त्री व ड्राफ्टसमन, नमुने करणारे, पोरबंदरच्या दगडाचें नक्षी काम करणारे व कसबी लोक आणिले, व तीन चार वर्षें काम झपाट्यानें चाललें. हायस्कूल इमारत म्हणजे कारागीर लोकांस शिकण्याची एक शाळाच झाली होती. हें काम चाललें असतांच खासगीकडील घोड्यांकरितां नवीन पागा बांधणें, राजवाड्याचे उंच सज्जे पडावयास झाले होते, ते पाडून अंबाबाईचा चौक दुरुस्त करून बांधणें, टाऊन हाल, रिसाला, हत्तिमहाल, मराठी शाळांकरितां इमारती, व इचलकरंजीकरांकरितां बंगला वगैरे, नव्या इमारती बांधण्याचीं कामें निघालीं. मोठ्या इमारतीचे नकाशे म्यांट साहेबांनींच केले, व छोट्यांचे रा॰ रा॰ सामंत यांनीं त्यांच्या देखरेखी खालीं केले. आणि इमारती बांधण्याचीं कामें सामंत यांणीं केलीं. एकटे सामंत यांस सर्व कामें उरकेनात तेव्हां त्यांच्या हाताखालीं रामचंद्र बळवंत तांबे यांस ओव्हरसियर नेमिलें, व त्यांजकडे टाऊन हाल व इचलकरंजीकरांचा बंगला, हीं कामें दिलीं. सदर शिवाय कोल्हापूर येथील मामलेदार कचेरी, सदर अमीन कचेरी, न्यायाधीश कचेरी, रिसाला, रेकार्ड आफीस, हत्ती महाल याही इमारती अंडरसन साहेबांच्या कारकीर्दीतच झाल्या. सदरशिवाय टाऊनहालाच्या सभोंवार जो सुंदर व रमणीय बाग केला आहे, तो तर अंडरसन साहेबांनीं स्वतः केला. या ठिकाणीं तर पूर्वी अत्यंत घाण असून दलदल होती. तीच जागा सर्व शहरांत अति शोभायमान झाली आहे. या जागेची रचना व त्यांतील नाना तऱ्हेचीं फुलझाडें व इतर झाडें, छोटे रस्ते, कांचेचें घर वगैरे सर्व गोष्टी इतक्या मनोहर आहेत कीं, तेथें गेलें म्हणजे मन रमल्याशिवाय कधीं राहात नाहीं. असें स्थळ पुणें, मुंबई शिवाय इतर ठिकाणीं या इलाख्यांत कोठें नाहीं. सदरशिवाय गारगोटी व पन्हाळा येथें मामलेदार कचेऱ्या, कोल्हापूर पासुन गैबी खिंडीपर्यंत पक्का रस्ता व तसेंच कोल्हापूर पासून मिरजसांगली पर्यंतचा रस्ता वगैरे रस्त्यांची

ही लहान मोठीं बरींच कामें झालीं व कोल्हापुराहून आंबेघांटापर्यंत रस्ता बांधण्याचें ठरलें. अंडरसन साहेबांच्या एकंदर कारकीर्दींत पब्लिकवर्क्स खात्याकडे २९४१००० रुपये सुमारें खर्च झाला असावा.

कर्नल स्नायडर साहेबांच्या कारकीर्दींत शिरोळ, हातकणंगलें व गडइंग्लज येथील मामलेदार कचेऱ्या बांधण्यांत आल्या. उदगांव येथें कृष्णेस पूल झाला. या पुलास करवीर सरकारानें दोन लाख व सांगली व मिरज सरकारानें दोन लाख दिले, व ब्रिटिश सरकारानें बाकी खर्च केला. हा रस्ता अथणी, विजापूर व पंढरपूर यांकडे जाण्याचा असल्यानें या पुलाचा व्यापारास फार उपयोग झाला. कोल्हापुराहून आंब्यापर्यंत रस्ता तयार झाला, व पंचगंगेस ब्रम्हपुरीनजीक दुसरा पूल झाला. संकेश्वराहूनगडइंग्लज व आजरें यांवरून ओंबोली घांटास जाण्याचा रस्ता झाला. आलबर्ट व एडवर्ड इस्पितळ व नवीन राजवाडा या इमारती बांधण्याचें ठरलें व पुढें कर्नल पार व रीव्हजसाहेब यांच्या कारकीर्दींत काम चालून अखेर रीजंटी कारकीर्दींत या इमारती पुऱ्या झाल्या. याच कारकीर्दींत मोठ्या रस्त्यांवर सुंदर धर्मशाळा बांधण्यांत आल्या. या इतक्या चांगल्या बांधल्या गेल्या आहेत कीं, खालसांतील रहदारी बंगल्यांहून फार चांगल्याव मजबूद आहेत. तसेंच रंकाळा तलाव वाढवून बांधण्याचेंही काम यांच्या कारकीर्दींतच सुरू होऊन बहुतेक पुरें होत आलें होतें. कात्यायनीकडे विहीर बांधून पाणी जास्त करण्याकरितां कांहीं काम करून गांवांत सर्व रस्त्यांनीं नळ टाकून गायमुखें केलीं, व जुने हौद काढून टाकिले. परंतु यानें पाणी वाढलें नाहीं, व सर्वत्र पसरल्यानें गांवांत पाण्याची टंचाई जास्त झाली. मुलींच्या शाळेकरितां व नेटिव्ह लायब्ररीकरितां इमारती व थट्टी हीं कामेंही यांच्याच वेळीं झालीं.

राजवाड्याचें काम कर्नल स्नायडरसाहेब जाण्यापूर्वींच सुरू झालें होतें. इस्पितळाचें काम पारसाहेबांच्या कारकीर्दींत सुरू झालें. पारसाहेबांनीं नवीं कामें वगैरे कांहीं उपस्थित केलीं नाहींत. राजवाड्याच्या पायाचा पहिला दगड नामदार सर रिचर्ड टेंपल साहेबांनीं व इस्पितळच्या पायाचा दगड नामदार सर जेम्स फर्ग्युसन यांनीं बसविला.

रा० रा० नारायण बापूजी कानिटकर यांस मुंबई म्युनिसिपालिटींत जागा मिळाल्यावर त्यांचे जागीं रा० रा० रामचंद्र बळवंत तांबे यांस नेमि-

ले, व शहरांतील चांगलीं कामें करण्याची संधि यांस मिळाल्यानें इमारतींचे सुरेख नकाशे करणें, व त्या इमारती बांधणें, यांत ते हळू हळू जास्त वाकबगार होऊं चालले. नेटिव्ह लायब्ररी व मुलींची शाळा या इमारतीं यांच्या हातच्याच आहेत. पुढें सरकारांनीं येथील एक्झिक्युटिव्ह इंजिनीअरचें आफीस अर्जी काढून नेलें. व कोल्हापूर सरकारचीं दिवसेंदिवस जास्त कामें वाढत चाललीं म्हणून कोल्हापूर सरकाराकरितां एक स्वतंत्र एक्झिक्युटिव्ह इंजिनीअर नेमणें जरूर झालें व त्याप्रमाणें मेहरबान शाननसाहेब यांस एक्झिक्युटिव्ह इंजिनियर नेमिलें.

**म्युनिसिपालिटी**— सुपरिंटेंडेंटच्या कारकीर्दींत एक शहर कमेटी नेमून तिजकडे शहर सुधारणेचें काम सोंपविलें होतें. परंतु त्यांजकडे फंड नसल्यानें थोड थोडें काम होत असे. बाबासाहेब महाराज वारले त्यावेळीं रस्त्यांत घाण व पत्रावळी टाकण्याची वहिवाट सुरू होती. पुढें अंडरसन साहेबांनीं शहर सफाईची व्यवस्था न्यायाधीश यांजकडे दिली, व पुढें कांहीं वर्षांनीं मुख्य मुख्य कामदार व शहरचे कांहीं सरदार व व्यापारी यांस म्युनिसिपाल कमिशनर नेमून व त्यांजकडे सरासरी ७००० रुपयांचें उत्पन्न देऊन सुधारणा केली. फाटक न्यायाधीश यांच्या कारकीर्दींत पेंवाचे तारदखाने बंद करण्यांत आले. व रस्त्यावर केरकचरा टाकण्याची सक्त मनाई करून केरकचरा टाकण्यास निराळ्या स्वतंत्र जागा करून व तो बाहेर नेण्याची तजवीज झाली. व कित्येक रस्ते सुधारून मोठ्या रस्त्यांवर दिवे लावण्याची सुरुवात झाली. पुढें आणखीं सन १८७३ सालीं आणखी सुधारणा करून कामगार व इतर मिळून २१।२६ मेंबरांच्या नेमणुका केल्या. व मे० व्हामिकसाहेब यांस प्रेसिडेंट नेमून जास्त व्यवस्था केली. जुन्या सर्व जकाती माफ करून थळभर व थळमोड सरसकट गाडीमागें चार आणे जकात घेण्याचें ठरविलें. तसेंच जुना घरफाळा माफ करून कमेटीनें सरसकट सर्व घरांवर भाड्याच्या मानानें घरपट्टी बसवावी असा हुकूम दिला, व कमेटीच्या सभा भरून सर्वानुमतें ठराव करून काम चालवें अशी वहिवाट सुरू केली.

येणेंकरून उत्पन्न बरेंच वाढलें आणि शहर सफाईचीं व आरोग्याचीं कामें जास्त करितां येऊं लागलीं. प्रथम कमेटीचें काम करण्यास म्युनिसिपल कामगार या नांवाचा हुद्देदार नेमण्याचें ठरून सातारा म्युनिसि-

पालिटीपैकीं रा० रा० गणेश भास्कर चांफेकर यांस दरमहा १०० रुपये पगारावर नेमिलें. शहरांतील केरकचरा नेण्यास गाड्या ठेविल्या. कंदील सर्व रस्तोरस्तीं लाविले. गटारें साफ करण्यास व रस्ते झाडण्यास लोक ठेविले. आणि सर्वांत मोठा फेरफार कमेटीकडे भंगी ठेवून त्यांजकडून नोकरी करवून तारदखान्यांतील मैला दूर नेण्याची तजवीज केली, व या मैल्याचें सोनखत करून विकूं लागले. कोटांतील तारदखान्यांची मोफत नोकरी सुरू केली, व कोटाबाहेरील तारदखान्यांची दर तारदखान्यास चार आणे घेऊन करण्याचें सुरू केलें. पुढें वरचेवर नवे तारदखाने कोटांत होऊं लागले. तेव्हां नव्या तारदखान्याची नोकरी चार आणे घेऊन करण्याची वहिवाट सुरू केली. गोरगरीब लोकांस तारदखाने नसल्यामुळें रिकामी जागा असेल तेथें विधि करण्यास बसण्याची वहिवाट असे. ती बंद व्हावी म्हणून अनेक ठिकाणीं सार्वजनिक तारदखाने बांधिले. नवीन तारदखाने ठरींव नमुन्याप्रमाणें बांधविण्याचें केलें. तसेंच नवीन घरें बांधितेवेळीं रस्ता रुंद करण्यास हटवून बांधवूं लागले. शिवाय जे रस्ते फार अरुंद पण रहदारीचे त्या रस्त्यांवरील घरांचे भाग कांपेन्सेशन देऊन घेऊन रस्ते रुंद करूं लागले. कोटा भोंवतालचा तट पाडून खंदक भरून टाकिले. अशा अनेक सुधारणा शहरांत झाल्यानें शहरची हवा फार सुधारली आहे. जेथें वरचेवर पटकीची धास्त येत असे, तेथें तिची फेरी क्वचित येते. या कालाच्या अखेरीपर्यंत कमिशनरच्या सभा भरून महत्वाच्या कामाबद्दल वादविवाद होऊन ठराव होत. परंतु सर्व काम प्रेसिडेंटांच्या हुकमानें कामगार करीत होते.

पुस्तकालयें (लायब्ररया). मागील म्हणजे पोलिटिकल सुपरिंटेंडेंटी कारकीर्दींत कोल्हापुरास एक पुस्तकालय स्थापन होऊन त्याकरितां एक इमारत बांधण्यांत आली. असें सांगितलें आहे. ही इमारत हल्लींच्या थोरल्या दवाखान्या शेजारीं डाक्टरचा बंगला आहे, तेथें होती व तिचा उपयोग लष्करांतील व गांवांतील असे दोन्ही ठिकाणचे लोक करीत असत. आणि दरमहा वर्गणीचें जें उत्पन्न होत असे त्यातून प्रत्याह्निक एक इंग्रजी पत्र व साप्ताह्निक व मासिक कांहीं मराठी व इंग्रजी पत्रें घेत असत. या लायब्ररीकडे सरकारांतून दोन शिपाई नेमणुकीस होते. व शिवाय दरमहा चार रुपये वर्गणी मिळत असे. बाकी सर्व ख-

र्चे वर्गणींतून होत असे. पुढें एजंटी कारकीर्दीत हायस्कूल स्थापन झालें. व नवीन सुशिक्षित कामगार येऊं लागले. तेव्हां शहरच्या लोकांकरितां स्वतंत्र लायब्ररी असणें अवश्य झालें व लायब्ररीची इमारत डाक्टर साहेबांस राहण्यास घेण्याची जरूर आली. तेव्हां सरकारानें त्या इमारतीची किंमत दिली, व त्या पैशांतून गुजरींतील बोहऱ्याची हवेली गाहाण घेऊन तेथें लायब्ररी आणिली; व लष्करच्या साहेब लोकांकरितां एजन्सि बुक क्लब या नांवाचें निराळें पुस्तकालय रेसिडेन्सीनजीक स्थापण्यांत आलें. येथें लायब्ररी स्वतंत्र झाल्यापासून व नवीन सुशिक्षित लोकांचा भरणा होऊं लागल्यापासून तिची सुधारणा होऊं लागली. मे. कर्नल अंडरसन साहेब व रावबहादूर माधवरावजी बर्वे यांच्या कारकीर्दीत सरकारांतून दरमहा १० रुपये आणि इतर सरदारांकडून ५।३ असे रुपये वर्गणी देण्याचें ठरलें व लायब्ररीस सुमारें ३० रुपयांचें हें नियत उत्पन्न झालें. पुढें हळूहळू वर्गणीदारांची संख्या वाढत गेली व पुस्तकांचीही संख्या वाढली. यामुळें गाहाण घेतलेली इमारत पुरेना व ती चांगली सोईची नव्हती. यास्तव नवीन इमारत बांधण्याकरितां पैसे जमा करण्यासाठीं सभा भरून फंड गोळा करण्यास सुरुवात झाली, व सुमारें ५।६ हजार रुपये जमले. व पूर्वींच्या इमारतीवर दिलेले तीन चार हजार रुपये होते. एवढ्या रकमेंत नवीन इमारत बांधून देण्याकरितां करवीर सरकारास विनंति केली. त्यांनीं नव्या हायस्कुलासमोर नवी इमारत बांधण्याचें सन १८६९ सालीं ठरविलें. यावेळी कर्नल स्नायडरसाहेब पोलिटिकल एजंट होते, व रावबहादूर बर्वेच कारभारी होते. लायब्ररीकरितां हायस्कुलांत इमारत बांधण्याचें ठरलें, तेव्हां हायस्कुला सारख्या सुंदर इमारतीपुढें बांधणें तर त्या इमारती शेजारीं शोभण्याजोगी सुंदर झाली पाहिजे. याकरितां जमलेल्या रकमेहून जो जास्त खर्च लागेल तो सरकारांतून देण्याचें ठरून सुमारें २७ हजार रुपये खर्चून हल्लींची सुंदर इमारत बांधून लायब्ररीस सन १८६७ सालीं देण्यांत आली, व त्यांत लायब्ररी नेली. ही इमारत लहान पण सुरेख व टुमदार आहे. या इमारतींत लायब्ररी आल्यापासून तिची भरभराटीच होत गेली, व या कारकीर्दीच्या अखेर या संस्थेची स्थिति कशी सुधारत गेली हें पुढील को-

कावरून समजेल.

| ईसवी सन. | वर्गणीदार. | वर्गणीचें उत्पन्न. | वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें | खर्च रकम. | पुस्तक संख्या. |
|---|---|---|---|---|---|
| १८७१ | ६१ | ४९८ | २२ पै. १२ बक्षी. | १२५ | ८६५ |
| १८८१ | १७६ | ११०० | ३० | ३२५ | २४३० |

लायब्ररीच्या उत्कर्षास रावबहादूर बर्वे यांणीं फार सहाय्य केलें. तसेंच शाळा व इतर खात्यांतील सुशिक्षित कामदारही फार झटले.

प्रांतांतही इचलकरंजी, आजरें, पन्हाळा, नृसिंहवाडी, कागल वगैरे कित्येक ठिकाणीं पुस्तकालयें स्थापन झालीं. हायस्कुलांत मोठा पुस्तक संग्रह व्हावा, याकरितां दरमहा ३० रुपयांची नेमणूक हायस्कूल स्थापन होतेवेळीं केली होती. तेथेंही मोठा संग्रह होत गेला. तदनंतर हायस्कूलची नवीन इमारत झाल्यावर एकदम ७।८ हजार रुपये खर्चून मोठा पुस्तक संग्रह खरेदी केला, व तोही हायस्कूल इमारतींतच ठेविला. यामुळें हायस्कुलांतील लायब्ररीही मोठी झाली आहे, व असा मोठा पुस्तक संग्रह पुणें, मुंबई शिवाय या इलाख्यांत इतर ठिकाणीं नसेल, असें वाटतें. एजन्सी बुक क्लबमध्यें बरींच इंग्रजी पत्रें घेत असून पुस्तक संग्रहही वाढत गेला.

**छापखाने व वर्तमानपत्रें**— सुपरिंटेंडेंटी कारकीर्दींत करवीर सरकारांतून एक शिळा छापखाना स्थापन करून वर्तमान-संग्रह नांवाचें वर्तमानपत्र सुरू केलें होतें. व एक ज्ञानसंग्रह नांवाचें मासिक पुस्तक कांहीं दिवस निघत होतें. याच छापखान्यांत कांहीं सरकारी कामही छापीत असत. पुढें एजंटी कारकीर्दींत ज्ञानसागर या नांवाचा खासगी शिळेचा छापखाना स्थापन होऊन ज्ञानसागर या नांवाचें वर्तमानपत्र निघूं लागलें. हें पत्र निघूं लागल्यावर पूर्वींचें वर्तमानसंग्रह पत्र बंद करण्यांत आलें. नंतर कांहीं दिवस एस. पी. जी. मिशनचे लोक चर्च मिसेलनी या नांवाचें लहानसें मासिक पुस्तक खिस्ती धर्म प्रसाराकरितां काढीत होते, परंतु तें लौकरच बंद झालें. खिळे छापाचें काम काढ-

ण्याची सरकारास वरचेवर अडचण येऊं लागली, व सर्व काम बाहेरू-न छापून आणावें लागे, म्हणून अंडरसन साहेबांच्या वेळीं लहान-सा खिळ्यांचा छापखाना सन १८६७ सालीं चालू केला. आरंभीं दो-न कंपाझिटर, थोडे टाईप व एक लहानसा प्रेस एवढें सामान आ-णिलें होतें. पुढ़ल्याने काम पुरेना तेव्हां आणखी प्रेस व खिळे आ-णिले, व जास्त कंपाझिटर ठेविले, व सर्व कामें येथें काढूं लागले. व आणखीं काम वाढल्यामुळें एजंटी कारकीर्दीच्या अखेरीस प्रिंटिंगम-शीन व कटिंगमशीनही आणण्याचें ठरून पुढें आलीं. आरंभीं खि-ळे व शिळा छापखान्याचा खर्च सुमारें १००० रुपये व उत्पन्न १२०० रुपये होतें. तें या कारकीर्दीच्या अखेरीस खर्च सुमारें १५०० रुपये व उत्पन्न २००० हजार रुपये झालें.

**मिशनें—** खिस्ती पाद्री लोकांच्या या इलाख्यांत दोन संस्था आहेत. (१) अमेरिकन पाद्रींची व (२) री इंग्रज पाद्रींची. पहिली संस्था सुपरिंटेंडें-ट यांच्या कारकीर्दींत सन १८५२ सालीं येथें स्थापन झाली. आरंभीं येथें एकच पाद्रीसाहेब होते, व ते गांवोगांव उपदेश करीत फिरत, व जे धर्मां-तर करण्यास उत्सुक असत, त्यांस दीक्षा देत आणि त्यांच्या पोटापाण्या-चीही सोय करीत. यांनीं एक मोठी जागा घेऊन तेथें आपणास व खि-स्ती झालेल्या लोकांस राहण्यास घरें बांधिलीं व गांवांत रवि-वारीं प्रार्थना करण्यासाठीं एक देवळही बांधिलें. पुढें एजंटी कारकीर्दी-त सन १८७० सालीं दुसरे एक पाद्री आले. नंतर आणखीं ५ वर्षां-नीं तिसरे पाद्री आले. त्यांनीं पन्हाळ्यास ठाणें दिलें, व तेथें एक ल-हानसें देऊळ बांधिलें, व आसपास उपदेश करूं लागले. यांचा को-णास उपद्रव नसून कोणावर सक्तीही नाहीं. हें आपलें कार्य गोडी-गुलाबीनें नेहमीं करितात. उच्च जातीच्या लोकांपेक्षां कनिष्ठ जातीच्या लो-कांत यांच्या उपदेशाचा जास्त प्रसार होऊन त्या जातींतील खिस्ती ध-र्म स्वीकारल्याचीं बरींच उदाहरणें आहेत. तरी कांहीं रजपूत, मराठे वगैरे उच्च जातीच्या लोकांनींही खिस्ती धर्म स्वीकारल्याचीं उदाहरणें आहेत. अमेरिकन प्रेसबिटेरिअन मिशनबोर्ड याकडून एथल्या मिश-नाचा सर्व खर्च चालतो. या कारकीर्दीच्या अखेरीस म्हणजे सन १८८२ सालीं खिस्ती झालेल्या लोकांची संख्या ११० होती.

एस्. पी. जी. या नांवाच्या मंडळीचे पाद्री येथें एजंटी कारकीर्दींतच आले. येथें जे प्राटेस्टंट पंथाचे इंग्रज आहेत, त्यांस उपदेश करण्याचें कामही या मंडळीच्या पाद्रीकडे असल्यानें यांस सरकारचा आश्रय आहे, व शिवाय वरील मंडळीकडून या संस्थेस खर्चास मिळतें. कोल्हापूर शहरानजीक ब्रम्हपुरीवर या मंडळीनें मोठी जागा घेऊन एक बंगला, उपदेशगृह, व ख्रिस्ती झालेल्या लोकांस राहण्यासाठीं दुसरीं घरें बांधिलेलीं आहेत. या मंडळीचे पाद्री पूर्वी रस्तोरस्तीं फिरून लोकांस उपदेश करीत, व गांवांत एक जागा घेऊन तेथें व्याख्यानेंही देत. या मंडळीचे पाद्रीच चर्च मिसलनी हे मासिकपत्र कांहीं दिवस काढीत होते. या पाद्रीच्या उपदेशानेंही बरेच ख्रिस्ती झाले असून त्यांची संख्या या कारकीर्दीच्या अखेरीस बरीच होती.

---

# एजंटी कारकीर्दीचा सारांश.

मागें वर्णन केल्याप्रमाणें एजंटी कारकीर्दींत निरनिराळ्या ख्यात्यांत ज्या सुधारणा झाल्या, त्या सुधारणा सांगून एजंटी कारकीर्दींतील राज्यकारभाराचें साधारण दिग्दर्शन केलें. आतां सन १८६६ सालीं एजंटी कारकीर्द सुरू झाल्यापासून तिच्या समाप्तीपर्यंत दरसाल ज्या विशेष बिना घडल्या, त्या सांगून हें प्रकरण आटपितों.

सन १८६६– आक्टोबर तारीख २१ रोजीं पुण्यास दरबार भरून राजाराम महाराजांस नामदार फ्रिअर साहेबांनीं पोषाख दिला, व जीं भाषणें झालीं तीं मागें दिलीं आहेत. याच वेळीं कोल्हापूरचे महाराज व पटवर्धन सरदार यांच्या भेटी झाल्या. पुढें दिजंबर महिन्यांत महाराजांची मातोश्री सुंदरा बाई राणीसाहेब तारीख २० रोजीं स्वर्गवासी झाल्या.

सन १८६७– या सालीं मार्च महिन्यांत राजाराम महाराजांचें श्री॰ मुधोजीराव नाईक निंबाळकर फलटणकर यांच्या कंन्येशीं लग्न झालें.

एप्रिल महिन्यांत कोल्हापुरास हायस्कूलची स्थापना झाली; व मराठी शाळांवर इंग्रजी जाणणारा डेप्युटि एज्युकेशनल इन्स्पेक्टर नेमिला, व मास्तर तयार करण्यासाठीं ट्रेनिंगस्कूल स्थापिलें. सरदारांचा वर्ग मोडून सर्व सरदारांनीं शाळांत इतर मुलांबरोबर अभ्यास करावा अशी शिरस्त सुरू केली.

मे महिन्यांत ९ तारखेस रामराव ताडपत्रे कारभारी पारले. त्यांच्या कुटुंबास १०० रुपये पेनशन दिलें. व कारभारी यांचें निराळें आफीस मोडून नारायण रघुनाथ सदर अमीन यांस असिस्टंट कारभारी नेमून सर्व कारभार कर्नल अंडरवुड पोलिटिकल एजंट हे स्वतः पा-

हूं लागले. तारीख ९ मे रोजींच मोरेश्वर राव पंत अमात्य बावडेकर वारले. ह्यावेळीं यांचें वय सारें २६ वर्षांचें होतें. ५०,००० रुपये नजराणा घेऊन नंदगांव घराण्यांतील माधवराव यांस मोरेश्वर राव यांचे पत्नींचे मांडीवर दत्तक दिलें. क्याप्टन वेस्ट महाराजांचे गार्डियन व क्यापटन घेन्त्राप कोल्हापूर इन्फंट्रीवरील कम्यांडर यांजकडे कारभाऱ्याकडील मुलकी काम वांटून दिलें. पन्हाळा व करवीर हे पेटे वेस्ट साहेबांकडे आणि शिरोळ, गडइंग्लज. व भुदरगड हे पेटे वेस्ट्रापसाहेबांकडे दिले. आणि यांस माजिस्ट्रेटी अधिकारही दिले. व खासगी खातें वेस्टसाहेबांकडे ठेविलें. हिशेब तपासण्यास व वारस चौकशीचीं कामें करण्यास गणेश नारायण काळे यांस दफतरदार नेमिलें. राव बहादूर महादेव गोविंद रानडे यांस दिवाणी कामाकरितां न्यायाधीश नेमिलें.

आक्टोबर महिन्यांत महाराजांचें दुसरें लग्न सरलष्कर यांच्या मुलीशीं झालें, व या राणीचें नांव सकवारबाई असें ठेविलें, व त्या महाराजांपाशीं राहूं लागल्या. तारीख ७ दिजेंबर रोजीं महाराजांची आत (पितृभगिनी) आकासाहेब स्वर्गवासी झाली. त्यांचा मुलगा आबासाहेब कागलकर माजी रीजंट व त्यांची कन्या अशीं महाराजांपाशीं बंगल्यांत राहूं लागलीं.

सन १८६८ — या सालीं कामाची माहिती करून घेण्यासाठीं महाराजांकडून कांहीं राज्यकारभाराचें काम करवूं लागलें. व खटले चालत असतां पाहण्यास नेऊं लागले. तारीख ९ आक्टोबर रोजीं महाराज पुण्यास नामदार सर फिट जेरल्ड साहेबांमीं पुण्यास दरबार भरविला त्या दरबारास गेले. व त्यांनीं दक्षणच्या सरदारांच्या वतीनें मानपत्र वाचलें.

महाराजांचे वडील रामचंद्रराव पाटणकर हे वारले व त्यांच्या बायकोच्या मांडीवर भागोजीराव यांस द-

नक दिलें.

महादेव गोविंद रानडे हे मुंबईस एल्फिस्टन कालेजांत प्रोफेसर होऊन गेले, व त्यांच्या जागीं गोपाळ गोविंद फाटक यांस न्यायाधीश नेमिलें.

याच सालीं पन्हाळी रुपये मोडून कंपनी नाणें सरास सुरू केलें. आणि खजिन्यांतील सर्व पन्हाळी रुपये मुंबईच्या टांकसाळेंत पाठवून त्यांचे ७,५३,५०० कंपनी रुपये पाडिले.

आबासाहेब इचलकरंजीकर मिरजेस अभ्यासास होते. तेथून त्यांस कोल्हापुरास हायस्कुलांत आणिलें आणि ते व बावडेकर यांस बावडेकराच्या वाड्यांत ठेवून गजानन कृष्ण भाटवडेकर बी. ए. यांस ट्यूटर नेमिलें.

सन १८६९ – या सालीं मे महिन्यांत तारीख १५ रोजीं चिमासाहेब महाराज कराचीस वारले. खासगी खातें महाराजांचे हवालीं केलें.

याच वर्षी कोल्हापुरास पटकीचा वाखा भयंकर झाला. व डाक्टर अंटिंग वाखयानें वारले, व त्यांचे जागीं हल्लींचे डाक्टर सिंक्लेर आले. व याचवर्षी कापशीकरांस मुखत्यारी दिली.

सन १८७० – फेब्रुवारी महिन्यांत हायस्कूलच्या पायाचा दगड महाराजांनीं बसविला. व महाराणीसाहेबांचे द्वितीय पुत्र ड्यूक आफ् एडिंबरो यांच्या मुलाखतीस मुंबईस गेले. यांच्या स्मरणार्थ ४५,००० रुपये देऊन दरमहा २५ रुपयांच्या सहा स्कालरशिपा स्थापिल्या. नंतर तेथूनच विलायतेस गेले. व परत येत असतां नवंबर महिन्यांत फ्लारेन्स येथें मरण पावले.

याच सालीं रा० ब० महादेव वासुदेव बर्वे यांस स्टेट कारभारी नेमिलें, व यांजकडे खाजगी खातें व खजिना दिला. यांचें आफीस एजंट कचेरींतच असून एजंट व कारभारी या दोघांच्या सहीनेंच सर्व कारभार पूर्वीप्र-

माणें चालूं लागला.

राजाराम महाराज तारीख २२ मे रोजीं विलायतेस जाण्याकरितां मुंबईहून निघाले. तेथून तारीख १ नवंबर रोजीं परत निघाले व तारीख ३० रोजीं फ्लारेन्स येथें वारले. यांचें स्मारक करण्यासाठीं कोल्हापुरास व मुंबईस सभा भरल्या. हायस्कुलास राजाराम हायस्कूल नांव दिलें.

सन १८७१– या सालीं संताजीराव घोरपडे कापशीकर यांस सुखत्यारी दिली. कृष्णराव प्रतिनिधि तारीख १ मार्च रोजीं वारले. व याच सालीं रेव्हिन्यु सर्व्हे सुरू झाली.

दिनकरराव सावर्डेकर यांचा मुलगा नारायणराव यांस ताराबाई राणीसाहेबांच्या मांडीवर तारीख २३ आक्टोबर रोजीं दत्तक देऊन शिवाजी महाराज असें नांव ठेविलें.

आक्कासाहेबांची मुलगी व आबासाहेब कागलकरांची बहीण दुर्गाबाई इचा नानासाहेब सरलष्करांशीं विवाह झाला व याकडे २०,००० रुपये खजिन्यांतून खर्च केले.

पोलिटिकल एजंटास काम फार पडतें. म्हणून त्यास कोल्हापूर दौलतींतून ४०० रुपये जास्त पगार द्यावा असें ठरलें. राजाराम स्मारक फंडाचे २१,००० रुपये जमले. व त्याच्या १६ राजाराम स्कालरशिपा हायस्कुलांत स्थापिल्या. राजाराम महाराजांची रोजनिशी छापिली. याच वर्षी रात्रीच्या शाळा घातल्या. रेकार्डाकरितां इमारत बांधून रेकार्डकीपरची नेमणूक केली.

सन १८७२– शिवाजी महाराजांकडे ह्यामिक साहेब यांस गार्डियन व यशवंत वासुदेव आठल्ये यांस ट्यूटर नेमिलें. याच सालीं आबासाहेब इचलकरंजीकर म्याट्रिक्युलेशन परीक्षा पास झाले. सिटी आंग्लोव्हर्न्याक्युलरस्कूल स्थापन झालें. तारीख २० नवंबर रोजीं मुंबईस लार्ड नार्थ ब्रुक हिंदुस्थानचे व्हाइसराय आले, व मोठा दरबार झाला तेव्हां शिवाजी महाराज दरबारास गेले व रत्नागिरीवरून परत आले. या सालीं फेब्रुवारी महिन्यांत कोल्हापूरची खानेसुमारी झाली.

सन १८७३ – सावंतवाडीकर व मुधोळकर कोल्हापुरास अभ्यासा करितां आले. व महाराजांबरोबर त्यांच्या बंगल्यांत राहूं लागले राजाराम हायस्कूलची इमारत पुरी होत आली. टाऊनहालचे इमारती सभोंवार सुंदर बाग केला. कोल्हापूर शहरच्या म्युनिसिपालिटींत सुधारणा करून उत्पन्न वाढविलें. आणि स्वतंत्र कमिशनर व प्रेसिडेंट नेमून त्यांच्या कडून तिची व्यवस्था होऊं लागली.

सन १८७४ – सालीं हायस्कूलची इमारत पुरी होऊन तिजमध्यें हायस्कूल गेलें. तसेंच टाऊनहालची इमारत पुरी झाली. व सभोंवार बागही पुरा झाला. या शिवाय कोल्हापूर व पन्हाळा मामलेदार कचेऱ्या, न्यायाधीश कोर्ट, रिसाला, सदरअमीन कोर्ट, पागा, हत्तिमहाल, रिकार्ड आफीस वगैरे इमारती पुऱ्या झाल्या. दोन डिस्ट्रिक्ट आफीसर नेमण्यांत आले, व अंडरसन साहेब रजेवर गेले. त्यांच्या जागीं स्नायडरसाहेब आले. याच सालीं नवंबरांत विलायतेहून युवराज मुंबईस आले. व त्यांच्या मुलाखतीकरितां महाराज आपल्या सर्व सरदारांसह गेले. युवराजांच्या स्मरणार्थ कोल्हापुरास दोन लक्ष रुपये खर्चून हास्पिटल बांधावयाचें व त्यास त्यांचें नांव द्यावयाचे ठरलें.

सन १८७५ – या सालीं जानेवारी महिन्यांतच मुंबईचे गव्हरनर सर फिलिफ वुडहौस [illegible] दरबार भरला व [illegible]कोल्हापूरचा राज्यकारभार चांगला चालला [illegible] अशा मतलबाचें स्तुतिपर भाषण केलें. हायस्कुलांतील मुलांस बक्षिसें वांटलीं. गोपाळराव फाटक न्यायाधीश गेले. व त्यांच्या जागीं विश्वनाथ गोविंद चोळकर यास नेमिलें. पोलीस खातें निराळें करून त्यावर चीफ पोलीस आफिसराची नेमणूक झाली. आबासाहेब इचलकरंजीकर वारले.

सन १८७६ – या सालीं दक्षणेंत मोठें अवर्षण पडून दुष्काळ पडला. दुष्काळ निवारणार्थ कामें सुरू केलीं. व अन्नसत्रें घातलीं.

सन १८७७ – दुष्काळ निवारणार्थ कामें व सत्रें चालू होतीं. हीं कामें

पाहण्यास नामदार सर रिचर्ड टेंपल दोन वेळां आले. जंगलची अव्यवस्था पाहून जंगल सुधारण्यास सांगितलें. महाराणी साहेबांनीं हिंदुस्थानची बादशाहीण हा किताब धारण केल्याचा जाहीरनामा वाचण्यासाठीं दिल्लीस दरबार झाला. दुष्काळामुळें महाराज गेले नाहींत. तरी त्यांस के. सी. एस्. आय्. या पदवीचा चांद व एक निशाण दिलें. व माधवरावजी बर्वे यांस रावबहादूर हा किताब दिला. बर्वे रजेवर गेले व यशवंत मोरेश्वर केळकर त्यांचे जागीं अक्टिंग कारभारी आले. आबासाहेब इंचलकरंजीकरांच्या पत्नीचे मांडीवर या संस्थानचा विशाळगड, बावडा वगैरे संस्थानांसारखा कोल्हापुराशीं संबंध राहील अशा करारावर दत्तक दिला. राणोजी राव चव्हाण हिंमतबहाद्दर वारले.

सन १८७८– जानेवारींत दरबार भरून महाराजांस चांद व निशाण देण्यांत आलें. जंगलखातें स्वतंत्र करून त्यावर एक कामगार नेमिला. याच सालीं शिवाजी महाराजांचें लग्न झालें. माधवराव बर्वे यांस क्यामिल कमिशनमध्यें नेमिलें व त्यांचे जागीं य० मो० केळकर यांस नेमिलें. महाराजांस राजकोटास राजकुमार कालेजांत पाठविलें. कोल्हापूर येथें ब्रिटिश सरकारची काळी पलटण होती. ती अफगाणिस्थानच्या लढाईमुळें गेली. नानासाहेब सरलष्कर वारले, त्यांच्या बा[illegible] दिला.

सन १८७९– राणोजीराव हिंमतब[illegible] पत्नीनें भीतिराव यांच्या मुलांपैकीं दत्तक घेण्याचें नाकबू[illegible]वरून मुंबई सरकारानें भीतिरावाच्या हवालीं जहागीर के[illegible], व तिनें विलायतेस अपील केलें. जयसिंगराव आबासाहेब कागलकर यांस मुखत्यारी देऊन संस्थान स्वाधीन केलें. या सालीं जून महिन्यांत सर रिचर्ड टेंपल कोल्हापुरास आले व नवीन राजवाड्याच्या पायाला दगड त्यांनीं बसविला. व हायस्कूलच्या मुलांस बक्षिसें वांटलीं. दोन्ही वेळीं येथील व्यवस्थेविषयीं स्तुतिपर भाषणें केलीं. कोल्हापुरास महाराजां-

ची प्रकृति बिघडली. नंतर राजकोटास गेल्यावर जास्त बिघडली. तेथून परत आणून औषधोपाय सुरू केले व बरोबर माधवरावजींस ठेविलें, व कोल्हापुरास य० मो० केळकर यास कारभारी नेमिलें. साल अखेरीस स्नायडरसाहेब जाऊन पारसाहेब एजंटीचे जागीं आले. या सालीं ब्रिटिश सरकारांनीं आपलें इंजनेर आफीस कोल्हापुराहून काढिलें. तेव्हां कोल्हापुराकरितां स्वतंत्र एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर नेमण्यांत आला.

सन १८८० – या सालीं कोल्हापुरास राजारामकालेजाची स्थापना झाली, व सरदारांचा वर्ग काढिला. याच वर्षी एका बुवास चिमासाहेब म्हणून पुढें करून कित्येकांनीं बंड करण्याच्या मिषानें दरवडे घालण्यास सुरू केलें. परंतु सर्वांस पकडून शिक्षा देण्यांत आल्या.

सन १८८१।८२ – या सालीं मुंबईचे गव्हरनर सरजेम्स फर्ग्यूसन आंबेघांटानें कोल्हापुरास आले. सरदारांच्या भेटी घेऊन हायस्कुलांतील मुलांस बक्षिसें वांटलीं व इस्पितळच्या इमारतीच्या पायाचा दगड बसविला. सन १८८१ सालच्या फेब्रुवारी महिन्यांत कोल्हापूरची खानेसुमारी झाली. बाळासाहेब बावडेकरास मुखत्यारी देण्यांत आली. पारसाहेब जाऊन त्यांचे जागीं रीव्हजसाहेब एजंटीचे जागीं आले. व सन १८८२ सालच्या मार्च महिन्यांत रीजंटीची स्थापना झाली. नारायणराव घाटगे वारले. माधवराव बर्वे यांवर कित्येक आरोप केल्यावरून त्यांजवर त्यांनीं सरकारच्या सांगण्यावरून वे अब्रु केल्याबद्दल मुंबईस फिर्याद केली.

---